म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ८७

REFBK-0006975

# सोव्हिएट आर्थिक नियोजन

[ हिंदी अर्थ व्यवस्थेवरील विवेचनासह ]

अ. रा. कामत

REFBK-0006975

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

मुद्रक :

एस्. व्ही. पोरे
चैतन्य प्रेस
६१९ बुधवार,
पुणें २

किंमत अडीच रुपये

☆

वेष्टनावरील आलेखांत सोविएट देशांतील रहाणीचें मान कसें वाढत गेलें हें दाखविलं आहे.

प्रकाशक :

के. एस्. ठुले
६१९ बुधवार
पुणें २

☆

एकमेव विक्रेते :

चित्रशाळा प्रेस
प्रकाशन-विभाग
पुणें २

पुढील सर्व आवृत्तीचे
हक्क
लेखकाधीन

# अनुक्रमणिका

प्रस्तावना : प्रि. वा. य. कोल्हटकर, एम्. ए., एम्. कॉम्., एम्. एस्सी. (लंडन)

लेखकाची प्रस्तावना.

प्रकरण १ लें : वेगवान् आर्थिक प्रगति

नियोजनाची कल्पना– आर्थिक नियोजन म्हणजे काय ? मागासलेला रशिया– पहिल्या योजनेचा उद्देश; वेगवान औद्योगीकरण– काय हवें ? कापड कीं यंत्रें ? दोन प्रश्न आणि त्यांची उत्तरें– सामायिक शेतीचें प्रयोजन– कमालीचा स्वार्थत्याग– पहिल्या योजनेची फलश्रुति– दुसरी व तिसरी योजना– युद्धकालीन आर्थिक नियोजन– युद्धोत्तर पुनर्घटना : चौथी योजना.

पृष्ठें १—२४

प्रकरण २ रें : नियोजनाची कार्यपद्धति

राज्यघटना आणि अर्थव्यवस्था– नियोजनाची आवश्यकता– गोसप्लॅन उर्फ मध्यवर्ति नियोजन समिति– नियोजन समितीचें कार्य– वार्षिक योजना कशी ठरते ?– ताळेबंदी (Method of Balances)– तज्ज्ञ-सत्ता नव्हे लोकसत्ताच !– विविध क्षेत्रांतील नियोजन– द्रव्ययोजना– देखरेख आणि मार्गदर्शन– सोव्हिएट नियोजनाचें ऐतिहासिक समालोचन– नेप उर्फ नवें आर्थिक धोरण– पंचवार्षिक योजनांचा काळ–

पृष्ठें २५—४७

प्रकरण ३ रें : द्रव्ययोजना आणि अंदाजपत्रक

नवें भांडवल– वेतन आणि किमती– सरकारी उत्पन्नाच्या बाबी– उत्पादन कर– नफ्यावरील कर– मिळकतीवरील कर– राष्ट्रीय कर्ज (Loans)– अंदाजपत्रक– मध्यवर्ति व इतर अंदाजपत्रकें– सोव्हिएट अंदाजपत्रकाचे विशेष– राष्ट्रीय बँक– दीर्घ मुदतीचे व्यवहार (Credits)– चलनाची योजना (Curreney Plan) परदेशाशीं व्यवहार– समाजवादी अर्थव्यवस्थेंत पैशाचें कार्य कोणतें ?

पृष्ठें ४८—७१

प्रकरण ४ थें : दौन अर्थव्यवस्था

समाजवादी अर्थव्यवस्थेचें श्रेष्ठत्व— बहुजनसमाजाची सुखसोय— भांडवली अर्थव्यवस्थेतील अंतर्विरोध— योजनाबद्ध अर्थव्यवस्थेंतील कांहीं प्रश्न— कामगार वर्गाची नवी भूमिका— शेतकऱ्यांचा प्रश्न— समाजवादी अर्थव्यवस्थेचे टीकाकार— व्यक्तिस्वातंत्र्य— भांडवली देशांतील "आर्थिक नियोजन"— फॅशिस्ट "आर्थिक नियोजन"— समाजवादी अर्थव्यवस्थेचीं प्रमेयें.

पृष्ठें ७२—९६

प्रकरण ५ वें : हिंदी अर्थव्यवस्था

समृद्ध देश आणि कंगाल जनता— दरिद्री अर्थव्यवस्था— आर्थिक प्रगतीचा कार्यक्रम— राष्ट्रीय चळवळीचा आर्थिक कार्यक्रम— युद्धोत्तर काळांतील घरसोड आणि घसरगुंडी— बड्या भांडवलदारांची टाटा बिर्ला योजना— हिंदी ब्रिटिश भांडवलदारांचें कारस्थान— राष्ट्रीयीकरणास विरोध कां?— हिंदी भांडवलदारांची मोहीम— राष्ट्रीय सरकारची घरसोड आणि घसरगुंडी— धोक्याचा इशारा— भांडवलदारी पद्धतीनें प्रगति होणें अशक्य— कामगारविरोधी मोहिमेचें रहस्य— जनतेच्या अर्थव्यवस्थेसाठीं संयुक्त आघाडी.

पृष्ठें ९७—१३१

परिशिष्ट : हिंदुस्थानविषयीं कांहीं महत्त्वाची आंकडेवारी

खनिज संपत्ति— जलशक्ति— दरमाणशीं वार्षिक उत्पन्न— आहार— जन्म आणि मृत्यु यांचें लोकसंख्येशीं प्रमाण— सरासरी आयुर्मान— बालमृत्यूंचें प्रमाण— इस्पितळांतील खाटा— शिक्षणांतील मागासलेपणा— उद्योगधंदे आणि शेती यांवर अवलंबून असलेली लोकसंख्या— निरनिराळ्या देशांतील दर एकरी पीक— दर एकरी पीक घटत आहे— खेड्यांतील कर्जबाजारीपणा— परदेशांतून धान्याची आयात— सध्यांची परिस्थिति— पहिल्या दहा वर्षांचा संकल्पित कार्यक्रम.

पृष्ठें १३३—१४०

★

नं. ७९२
१०७५८

# प्रस्तावना

प्रा. अ. रा. कामत यांनी सध्यां जगांत ज्या दोन तऱ्हेच्या आर्थिक पद्धती चालू आहेत त्यांचे तौलनिक विवेचन करणारा हा लहानसा ग्रंथ लिहून बहुमोल कामगिरी केली आहे. जुनी भांडवलशाही अनियंत्रित अर्थव्यवस्था गेल्या तीस चाळीस वर्षांत उत्पादनाच्या वाढीच्या दृष्टीनें उत्तरोत्तर जास्त दुर्बल होत आहे हें या कालाच्या प्रत्यक्ष इतिहासावरून सिद्ध होत आहे. त्याच्या उलट सोव्हिएट रशियांत गेली तीस वर्षें सुरू असलेली योजनाबद्ध अर्थव्यवस्था उत्पादनाच्या दृष्टीनें आश्चर्यकारक प्रगति करीत आहे हें कोणासहि मान्य करणे प्राप्त आहे. योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचे निरनिराळे प्रकार आहेत. तथापि ते सर्वच अनियंत्रित अर्थपद्धतीपेक्षा श्रेष्ठ आहेत असे म्हणतां येत नाहीं. योजनाबद्ध अर्थपद्धति जर समाजवादी तत्वावर आधारलेली असली तरच समाजाची अर्थोत्पादनाची कार्यक्षमता वाढते. भांडवलशाहीची बीजे कायम ठेवून कोणतीहि योजनाबद्ध अर्थव्यवस्था यशस्वी होणे अशक्य आहे हें रा. कामत यांनी सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. समाजसत्तावादी तत्वावर आधारलेल्या समाजांत सर्व सामाजिक साधनसंपत्ति समाजाच्या मालकीची झाल्यामुळें खासगी वैयक्तिक फायद्याकरतां तिचा वापर बंद होतो. भांडवलशाहीच्या आर्थिक स्पर्धेच्या कालांत वैयक्तिक फायद्याकरतां उत्पादनाची वाढ केली जात असे. पण त्यामुळें मालाच्या किंमती उतरून वरचेवर आर्थिक अरिष्टे येत असत. म्हणून किंमती वाढविण्याकरतां भांडवलदार स्पर्धा नष्ट करण्याच्या मागे लागले. स्पर्धा कमी होऊन समाजांत भांडवलदारी मक्तेदारी सुरू झाली. मक्तेदारीच्या जोरावर उत्पादन कमी करून मालाचे भाव वाढविण्याचा प्रयत्न सुरू झाला. हिंदुस्तानांत गेल्या वीस वर्षांत इतर देशांप्रमाणेच मक्तेदारी बोकाळत चालली आहे. त्यामुळें फायदा वाढविण्यासाठी उत्पादन कमी करण्याचा

उपक्रम येथेंहि सुरू झालेला आहे. म्हणजे स्पर्धायुगाच्या स्थितीच्या अगदी उलट स्थिति आतां चालू आहे. फायद्याकरतां उत्पादन वाढण्या ऐवजी घटत आहे. वैयक्तिक अगर मक्तेदारी फायदा अशा रीतीनें उत्पादनाच्या मुळावरच घाव घालीत आहे. म्हणून सामाजिक उत्पादन वाढवावयाचें असेल तर खासगी फायद्याची हांव नष्ट करणे प्राप्त आहे. येवढ्याच करतां सर्व मोठमोठ्या धंद्यांचे राष्ट्रीयीकरण करणे जरूर आहे. पण हें राष्ट्रीयीकरण विनामोबदला होणे जरूर आहे. नाहीं तर खासगी फायद्याचें अस्तित्व निराळ्या तऱ्हेनें टिकणारच.

विनामोबदला मोठ्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण हें समाजसत्तावादी तत्व अमलांत आणल्यास त्याचे इतर महत्त्वाचे परिणाम होतात. प्रथमतः समाजांतील ऐतखाऊ वर्ग नष्ट झाल्यामुळें बहुजनसमाजाची पिळणूक थांबते. याचा अर्थ असा कीं कामकरी वर्गाला केल्या कामाचा पूर्ण मोबदला मिळूं लागतो. आज केल्या कामाचे बरेंच मोल ऐतखाऊंना पोसण्यांत गेल्यामुळें कामकऱ्यास स्वतः स्वतःची कार्यक्षमता वाढविण्यास मुळींच उत्साह राहत नाहीं. त्याचबरोबर गरीबीमुळें त्याची कार्यक्षमता ऱ्हास पावते. पिळणूक नष्ट झाली म्हणजे कामकरी वर्गाचा उत्पादनांतील वांटा प्रचंड प्रमाणांत वाढून त्याचा काम करण्याचा हुरूप वाढतो व उत्पन्न वाढल्यामुळें कार्यक्षमता वृद्धिंगत होते. या दोन्ही कारणांनीं सामाजिक उत्पादन झपाट्यानें वाढणें शक्य होतें. तिसरें असें कीं पिळणूक थांबल्यामुळें बहुजनसमाजाची क्रयशक्ति मोठ्या प्रमाणांत वाढून उत्पादिलेला माल खपून जाण्यास मुळींच वेळ लागत नाहीं. किंबहुना बाजार-मागणीच्या अभावाची भांडवलशाहींत जी वरचेवर अडचण भासते ती समाजसत्तावादी अर्थव्यवस्थेंत नाहींशी होते. सर्व जनतेस म्हातारपणाची तरतूद, रोगराईच्या अडचणी विरूद्ध तरतूद, मुलाबाळांच्या शिक्षणाची तरतूद व रोजगाराची पूर्ण शाश्वति या सर्व गोष्टी अमलांत आल्यामुळें वैयक्तिक उत्पन्नांतून बचत करण्याचें कारणच उरत नाहीं. सर्वच उत्पन्न रोजच्या उपभोगासाठीं वापरल्यामुळें उत्पादित मालाच्या उठावाचा प्रश्नच उरत नाहीं. जितकें उत्पादन जास्त तितकेंच बहुजन-

समाजाचें उत्पन्न जास्त व मालाचा त्वरित उठाव अशी परिस्थिति उत्पन्न झाल्यामुळें उत्पादनवाढीला सामाजिक कार्यक्षमतेशिवाय दुसरें कोणतेंच बंधन राहत नाहीं; व ही कार्यक्षमता एकसारखी वाढवितां येते. चौथें असें कीं सार्वराष्ट्रीय आर्थिक नियोजनामुळें देशांतील साधनसंपत्ति संपूर्णतया उपयोगांत येते. बेकारीचा अपव्यय टळतो व शास्त्रीय शोधांचा उत्तम प्रकारें उपयोग करून घेतां येतो. हल्ली खासगी फायद्याकरतां शास्त्रीय प्रगतीची जी गळचेपी होत आहे ती थांबते. सोव्हिएट रशियाच्या यशाची ही अशी कारणमीमांसा आहे. तिचा उहापोह श्री. कामत यांनी बोलक्या आंकड्यांनीं उत्तम प्रकार केला आहे.

अनियंत्रित भांडवलशाही समाजाच्या उत्पादनशक्तीचाहि, हिंदुस्थानचें उदाहरण घेऊन रा. कामत यांनीं उत्तम प्रकारें विचार केला आहे. अशा अर्थव्यवस्थेमध्यें सध्यां अनर्थ उत्पन्न होत आहेत व त्यामुळें महागाई, बेकारी, कर्जबाजारीपणा, जीविताची अनिश्चितता वगैरे समाजस्वास्थ्यास व प्रगतीस बाधक अशीं सामाजिक संकटें अनिवार्य झालेलीं आहेत. समाजसत्तावादी अर्थव्यवस्थेचा वाढता उत्कर्ष व भांडवलशाही व्यवस्थेची वाढतीं संकटें अशीं हीं दोन दृश्यें आज मानवजातीपुढें उभी आहेत. जुन्या अर्थव्यवस्थेंत ज्या ऐतखाऊ वर्गाचा फायदा होत आहे तो वर्ग आज ती व्यवस्था टिकवून धरण्यासाठीं सर्व तऱ्हेच्या बऱ्यावाईट मार्गांचा अवलंब करीत आहे. जुन्यानव्याच्या या प्रचंड जागतिक संघर्षातून काय निष्पन्न होईल तें होवो, तथापि बहुजन कामकरी शेतकरी वर्गाचा ओढा नव्या अर्थव्यवस्थेकडे वाढत्या प्रमाणांत असणें सहाजिकच आहे. या क्रांतिकारक संघर्षाचा विचारवंतांनीं फार बारकाईनें विचार करणें जरूर आहे. त्या दृष्टीनें प्रा. कामतांनीं परिश्रमपूर्वक लिहिलेल्या या पुस्तकाचा उत्तम उपयोग होणार आहे.

समाजसत्तावादी नव्या अर्थव्यवस्थेमध्यें व्यक्तिस्वातंत्र्याचा नाश होतो असा सार्वत्रिक समज करून देण्यांत येत आहे. व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट झाल्यामुळें नवी अर्थव्यवस्था लोकशाही स्वरूपाची नसून हुकूमशाही

स्वरूपाची आहे असा एकसारखा प्रचार करण्यांत येत आहे. प्रो. हायेक या सुप्रसिद्ध सनातनी अर्थशास्त्रज्ञाचा यावरचा ग्रंथ आज सर्वांना परिचित झालेला आहे. प्रा. कामत यांनीं या आक्षेपांचा आपल्या पुस्तकांत चांगलाच परामर्ष घेतलेला आहे. याबद्दल एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आपण ध्यानांत ठेवणें जरूरीचें आहे. व्यक्तिस्वातंत्र्य ही निसर्ग-दत्त देणगी नाहीं. समाजांतल्या मानवी सहकार्याचें तें एक फल आहे. सामाजिक व वैयक्तिक अडीअडचणी व प्रश्न या सहकार्याच्या वाढीनें सुटणार आहेत. बेकारीपासून, गरीबीपासून, जीविताच्या अनिश्चितते-पासून स्वातंत्र्य मिळून स्वतःच्या सर्व सुप्त शक्तींना विकसित होण्यास पूर्ण वाव जर कोठें मिळत असेल तर तो बहुजनसमाजाचें जेथें वाढतें सहकार्य आहे अशाच ठिकाणीं. भांडवलशाही समाजांत बहुजनसमाजास कोणतेंच स्वातंत्र्य असत नाहीं. मूठभर ऐतखाऊ परान्नपुष्ट धनवंत सोडल्यास बाकीच्या सर्व व्यक्तींस आपल्या सर्व गरजांसाठीं परिस्थितीवरच अवलंबून राहावें लागतें. त्यांचें जीवित त्यांच्या इच्छेप्रमाणें चालत नसून तें त्यांच्या आटोक्याबाहेरच्या परिस्थितीच्या धक्याधक्यामुळेंच ठरत असतें. व्यक्तीची स्थिती प्रवाहपतितासारखीच असते. याचा आपणां सर्वांस प्रात्यक्षिक अनुभव हरघडी येत असतो. नव्या समाजांत व्यक्तिस्वातंत्र्य नाहीं असा प्रचार करणाऱ्यांच्या सांगण्याचा गर्भितार्थ नेहमी असा असतो कीं सध्यांच्या समाजव्यवस्थेंतच व्यक्तिस्वातंत्र्य असते. पण असे स्वातंत्र्य आपल्यापैकीं शेंकडा नव्वद लोकांना नसते याचा आपणां सर्वांस हरवडी अनुभव आहे. या उलट नव्या समाजव्यवस्थेंत नव्वद टक्के लोकांना परस्परसहकार्यानें सामाजिक परिस्थितीवर ताबा मिळवून स्वतःचे वैयक्तिक प्रश्न सोडवून घेतां येतात असा सोविएत रशियांत प्रात्यक्षिक अनुभव आहे. अशारीतीनें परस्पर सह-कार्यानें म्हणजेच लोकशाही मार्गानें व्यक्तिस्वातंत्र्याची वाढ होते. अर्थात अशा व्यवस्थेंत मूठभर ऐतखाऊ वर्गाचें पिळणुकीचें स्वातंत्र्य अजिबात नष्ट होतें ही गोष्ट कबूल केली पाहिजे. प्रचलित समाजांत दहा टक्के लोकांस स्वातंत्र्य, नव्वद टक्के लोकांस गुलामगिरी ही स्थिति पालटून

नव्वद टक्के लोकांस स्वातंत्र्य व दहा टक्के लोकांस स्वातंत्र्याचा अभाव ही स्थिति उत्पन्न व्हावी असें जर सामान्य कामकरी जनतेस वाटले तर त्यांत नवल नाहीं. कालांतरानें ऐतखाऊ वर्गच नाहींसा झाल्यावर समाजांतील सर्वच लोकांस वैयक्तिक व सामुदायिक विकासास पूर्ण स्वातंत्र्य व संधि नव्या समाजव्यवस्थेंतच मिळू शकेल. स्वातंत्र्याचा उपयोग आपल्या सुप्त शक्तींचा विकास करण्यास वाव असला तरच होतो. आपल्या समाजांत भिकाऱ्यांस मरणाचें स्वातंत्र्य असतें. गरीबांस उपासाचें स्वातंत्र्य असतें. अशा स्वातंत्र्यास स्वातंत्र्य म्हणणें म्हणजे स्वातंत्र्याची थट्टा करणें आहे. सोव्हिएट रशियांत प्रत्येक व्यक्तीस आपल्या सुप्त शक्तींचा विकास करण्याचें स्वातंत्र्य आहे व तो होण्यासाठीं जी साधनसंपत्ति लागते तीहि उपलब्ध आहे. समाजांतील साधनसंपत्तीची विपुलता व प्रत्येकास स्वतःच्या विकासासाठीं तिचा वापर करण्याची शक्यता असल्यामुळेंच तेथें व्यक्तिस्वातंत्र्याला खरा अर्थ उत्पन्न झालेला आहे. स्वातंत्र्याचा पाया अशारीतीनें साधनांच्या विपुलतेंत आहे. मानसिक स्वातंत्र्य सर्व तऱ्हेच्या समाजांत सर्वांनाच असतें. तें कोणीही व कोणत्याही परिस्थितींत काढून घेऊं शकत नाही. तथापि आपल्या मनाचा पूर्ण विकास घडवून आणणारी पार्थिव साधनसंपत्ति फक्त सोव्हिएट रशियांतच व तत्सम इतर समाजांतच आढळेल. व्यक्तिस्वातंत्र्याचीं दृश्यफलें विपुल प्रमाणांत तेथें लोकांना भोगतां येत आहेत. दुर्दैवानें आपल्याइकडील विचारवंतांस ही साधी गोष्ट आकलन होत नाहीं. रा. कामत यांनीं याही गोष्टीची आपल्या पुस्तकांत उत्तम चर्चा केली आहे. त्यांच्या पुस्तकानें लोकांमध्यें उदयोन्मुख नव्या समाजरचनेबद्दल कुतूहल निर्माण झाल्यास व याविषयीचा जास्त अभ्यास करण्याची उत्कंठा वाढल्यास रा. कामतांचे परिश्रम सफळ होतील यांत शंका नाहीं.

कॉमर्स कॉलेज,
बडोदें.

ना. य. कोल्हटकर

# लेखकाची प्रस्तावना

पुस्तकाचें हस्तलिखित तयार झाल्यास आज सात आठ महिने होऊन गेले. त्यानंतर गंभीर स्वरूपाच्या कौटुंबिक अडचणी उद्भवल्यामुळें हस्तलिखितावर अवश्य असा अखेरचा हात फिरविणें शक्य झालें नाहीं. उपमुद्रितें तपासतांनांहि दोनचार किरकोळ फेरफार करण्यापलीकडे फारसा बदल करणें शक्य झालें नाहीं. याचा मुद्दाम उल्लेख करण्याचें कारण असें कीं, आज छापील स्वरूपांत संपूर्ण पुस्तक वाचल्यावर शेवटच्या दोन प्रकरणांतील कांहीं भाग पुन्हा लिहिणें जरूरीचें आहे याची माझी मलाच जाणीव झाली आहे. विस्तृत प्रस्तावना लिहून हा दोष दूर करतां आला असता. परंतु आजदेखील पुरेसें मनःस्वास्थ्य आणि सवड नाहीं; तेव्हां त्याविषयीं संक्षिप्त निर्देश करून समाधान मानावें लागणार आहे.

दुसरें महायुद्ध संपून दोन वर्षें लोटलीं नाहींत तोंच भांडवली अर्थव्यवस्थेंतील अंतर्विरोध पुन्हां तीव्र होऊं लागले आहेत. पूर्व युरोपांतील कित्येक राष्ट्रांनीं भांडवली चौकटींतून निसटून लोक-नियंत्रित अर्थव्यवस्थेची कांस धरली आणि उत्तर चीनसारख्या इतर प्रदेशांतहि त्याच दिशेनें प्रयत्न होत आहेत. यामुळें भांडवली अर्थव्यवस्थेंतील पेंचप्रसंग तीव्रतर झाला आहे. लोकसत्ताक समाजवादी आणि भांडवली साम्राज्यवादी असे जागतिक अर्थव्यवस्थेंत आज दिसून येणारे दोन स्वच्छ तट; लौकरच ओढवणाऱ्या आर्थिक अरिष्टाची भांडवली जगावर पडलेली दाट सांवली; त्यामधून स्वतांला सांवरण्यासाठीं अमेरिकेचे डॉलरशहा इतर देशांतील जनतेभोंवतीं आवळींत असलेले सावकारी पाश ( मार्शल योजना ); गेल्या युद्धांतील रक्ताचे डाग वाळले नाहींत तोंच नव्या युद्धाची आणि जग जिंकण्याची भाषा बोलणारा आक्रमक

अमेरिकन साम्राज्यवाद; आर्थिक हुकूमशाहीकडे झुकणारी अमेरिकन अर्थव्यवस्था आणि तिच्या युद्धरथाला जुंपून घेण्यांत धन्य मानणारे ॲटली, बेव्हिन, ब्लम, शूमान, स्पाक, सरागाट, शूमाकेर वगैरे " समाजवादी " आणि या मंडळींच्या तथाकथित " तिसऱ्या " अथवा " मध्यम मार्गाचा " फोलपणा; यांचा निर्देश चौथ्या प्रकरणांत करावयास हवा होता. दोन अर्थव्यवस्थांचें विवेचन त्यामुळें अधिक स्पष्ट झालें असतें.

हिंदी अर्थव्यवस्थेविषयींच्या विवेचनांतहि ( प्रकरण पांचवें ) वाचकांना शेवटचा भाग संदिग्ध वाटेल. हिंदुस्तानची आजची आर्थिक अनवस्था, आर्थिक प्रगतीसाठीं आवश्यक असलेल्या मूलभूत आर्थिक योजना आणि हिंदी भांडवलाचा या योजनांस असलेला विरोध या संबंधींच्या विवेचनांत बदल करण्याची जरूरी नाहीं. गेल्या सात आठ महिन्यांतील नव्या घटनांचीं उदाहरणें दिलीं असतीं तर तो भाग अद्यावत् करतां आला असता इतकेंच. जे प्रश्न आज विशेष महत्त्वानें पुढें येत आहेत तें हे कीं हिंद देशाला जनतेच्या लोकसत्ताक अर्थव्यवस्थेकडे नेण्याचें प्रचंड कार्य कोण पार पाडूं शकेल ? आणि हें कार्य सध्यांच्या सत्ताधाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं होऊं शकेल कीं नाहीं ?

यापैकीं पहिल्या प्रश्नाचें उत्तर पुस्तकाच्या पांचव्या प्रकरणांत आलेंच आहे. कामकरी, शेतकरी आणि मध्यमवर्गीय जनता, म्हणजेच देशांतील बहुजनसमाज संघटित झाला, त्याचें सामर्थ्य एकवटलें तरच तीस कोटि हिंदी जनतेची आर्थिक परिस्थिति झपाट्यानें सुधारूं शकेल; एऱ्हवीं नाहीं. जनतेच्या या संयुक्त आघाडीचें नेतृत्व सध्यांचे सत्ताधारी घेतील कीं नाहीं याविषयींच्या पुस्तकांतील विवेचनांत संदिग्धता उत्पन्न झालेली आहे. पंधरा ऑगस्टच्या सत्तांतरानंतर लागलीच हें पुस्तक लिहून झालें; त्यामुळें नव्या राज्यकर्त्यांचें स्वरूप आणि त्यांचें संभाव्य धोरण याविषयीं निश्चित निदान मांडणें त्यावेळीं शक्य झालें नाहीं. पण हिंदी सरकारचें गेल्या सात आठ महिन्यांतील आर्थिक धोरण, नवें अंदाजपत्रक, राज्यघटनेचा मसुदा आणि मध्यवर्ति व प्रांतिक सरकारें करीत असलेले नवनवे कायदे आणि त्यांची अंमलबजावणी हीं ध्यानांत

घेतलीं कीं आज या प्रश्नाचें उत्तर मिळूं शकतें. जनतेची संयुक्त आघाडी उभारून जनतेची अर्थव्यवस्था निर्माण करण्याचें कार्य सध्यांचे राज्यकर्त्यांच्या नेतृत्वाखालीं होणें शक्य दिसत नाहीं, असें आज निश्चितपणें म्हणतां येईल. राज्यकर्त्यांच्या तोंडून यापुढेंहि समाजवादाची, बहुजनसमाजाच्या सर्वोदयाची भाषा अनेक वेळां निघेल हें खरें. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र सध्यांचे सत्ताधारी बहुधनसमाजाचे प्रतिनिधि आहेत आणि ते त्यांचेंच हित पाहतात हें अधिकाधिक उघड होत जाईल. तेव्हां लोकांच्या आणि लोकनियंत्रित अर्थव्यवस्थेसाठीं होणारे संघटित प्रयत्न त्यांच्या नेतृत्वाखालीं होणार नाहींत. त्यासाठीं बहुजनसमाजास स्वप्रयत्नांनीं संघटित व्हावें लागेल आणि त्याकरितां आवश्यक ते नेतृत्व आपल्यामधूनच निर्माण करावें लागेल असें दिसतें.

असो. वर उल्लेखिलेल्या कौटुंबिक अडचणीमुळें उपमुद्रितांकडे हवें तितकें लक्ष देतां आलें नाहीं. त्यामुळें कांहीं प्रमाद राहून गेले आहेत. ज्यामुळें अर्थबोध होण्यास अडचण होईल अशांचा निर्देश पुढें करीत आहें:—

पृष्ठ ४२ ओळ २२–२३, "युद्धकालीन कम्युनिझमचा काळ"; पृष्ठ ५४ ओळ १५, नव्या भांडवलाच्या निर्मितीसाठीं; पृष्ठ ५५ ओळ ९–१०, उत्पादन–कराच्या कमीअधिकपणामुळें किंमत कमीअधिक होते; पृष्ठ ५६ ओळ १४, सहकारी संस्थांमार्फत; पृष्ठ ११५ ओळ ११, हिंदी भांडवलदारांचा; याप्रमाणें वाचावें.

बडोदें येथील कॉमर्स कॉलेजचे विद्वान्, अर्थशास्त्रज्ञ, प्रिन्सिपॉल श्री. वा. य. कोल्हटकर यांनीं प्रस्तावना लिहिण्याचें मान्य केलें याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. तसेंच चित्रशाळा प्रकाशन–संस्थेचे व्यवस्थापक श्री. दामुअण्णा रानडे यांनीं पुस्तकाच्या सौष्ठवांत आपुलकीनें आणि स्नेहभावानें लक्ष घातलें याबद्दल त्यांचे हार्दिक आभार मानून ही लेखकाची प्रस्तावना पुरी करतों.

फर्ग्युसन कॉलेज, पुणें<br>
१५ एप्रिल १९४८

अ. रा. कामत

# सोव्हिएट आर्थिक नियोजन

❋

# वेगवान आर्थिक प्रगति

: १ :

## नियोजनाची कल्पना

हिंदुस्थानच्या प्रगतीसाठीं आर्थिक नियोजनाची आवश्यकता आहे ही कल्पना आतां सर्वांना मान्य झाली आहे. दहा वर्षांपूर्वी काँग्रेसतर्फे पं. नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं 'राष्ट्रीय नियोजन समिति' नेमण्यांत आली. गेल्या तीनचार वर्षांत या समितीच्या अहवालाशिवाय टाटा-बिर्ला-योजना इत्यादि योजनांचे प्रत्यक्ष आराखडेहि प्रसिद्ध झाले आहेत. "राष्ट्रीय प्रगतीसाठीं आर्थिक नियोजन" हें तत्त्व आतां अनेक राष्ट्रांना पटलेलें आहे. कित्येक देशांत तशा योजना आंखून अमलांत आणल्या जात आहेत आणि नियोजनाची कल्पना आतां कोठेंच निषिद्ध मानली जात नाहीं.

वीस वर्षांपूर्वी परिस्थिति अशी नव्हती. त्या वेळीं अर्थशास्त्रज्ञांना नियोजनाचें तत्त्व निषिद्ध होतें; इतकेंच नव्हे, तर अनावश्यक, अव्यवहार्य, अनिष्ट आणि अशक्य या विशेषणांनीं त्याची संभावना होत असे. खाजगी मालकी आणि फायदा यांवर उभी असलेली अनियंत्रित अर्थव्यवस्था हीच आर्थिक प्रगतीचा पाया समजला जात असे.

१९२९ सालीं या रूढ कल्पनेला जबर धक्का बसला. त्या वर्षी भांडवली अर्थव्यवस्थेवर आधारलेलें सर्व जग आर्थिक अरिष्टाच्या प्रचंड फेऱ्यांत सापडलें. जिकडे तिकडे मंदीची लाट उसळली. बाजारांतील माल उठेना, कारखाने बंद पडूं लागले, लक्षावधि कामगार बेकार झाले, धान्याचे व इतर मालांचे भाव भयंकर घसरले आणि शेतकऱ्यांची परिस्थिति अतिशय हलाखीची झाली. एकीकडे बाजारपेठा आणि कोठारें मालानें तुडुंब भरलेलीं—इतकीं कीं किमतीची घसरगुंडी थांबावी या हेतूनें त्यांचा पद्धतशीरपणें नाश करण्यांत येऊं लागला, तर दुसरीकडे बेकारी, उपासमार आणि दैन्य यांना पारावार उरला नाहीं. कोसळणारी अर्थ-व्यवस्था सांवरण्यासाठीं अर्थशास्त्रज्ञांनीं अनेक उपाय सुचवले. देशो-देशींच्या सरकारांनीं कमालीची धडपड केली. पण हें सर्व व्यर्थ ठरलें. आर्थिक अरिष्ट टाळण्याच्या कामीं अथवा त्याचे घोर परिणाम कमी करण्याच्या कामीं त्यांना फारसें यश आलें नाहीं.

एक देश मात्र या सर्व गोष्टींस अपवाद होता. समाजवादी सोव्हि-एट रशियाला या अरिष्टाची झळ फारशी लागली नाहीं; इतकेंच नव्हे तर त्या देशांत आर्थिक प्रगति विलक्षण वेगानें चालली होती. बेकारी साफ नष्ट झाली आणि संपत्तीचें उत्पादन आणि राहणीचें मान हीं सतत वाढत राहिलीं. या विस्मयकारक घटनेकडे जगांतील सर्व विचार-वंतांचें लक्ष वेधलें. ते सोव्हिएट देशाच्या अखंडित चालू राहिलेल्या आर्थिक प्रगतीचें कारण शोधूं लागले; आणि त्यांना दिसून आलें कीं सोव्हिएट देशांत योजनाबद्ध अर्थव्यवस्था सुरू आहे.

आर्थिक नियोजनाच्या जोरावर सोव्हिएट रशियानें स्वतांस आर्थिक अरिष्टाच्या फेऱ्यांतून वांचविलें; इतकेंच नव्हे, तर जुनाट, मागासलेल्या रशियन साम्राज्याच्या जागीं, अगदीं लहानशा कालावधींत बलाढ्य, उद्योगप्रधान, समाजवादी सोव्हिएट राष्ट्रसंघ उदयास आला. १९२८ सालापासून दोन पंचवार्षिक योजना अमलांत आणून उद्योग-धंदे व शेती यांच्या उत्पादनांत प्रचंड वाढ साधण्यांत आली. तिसरी पंचवार्षिक योजना चालू असतांना नाझी जर्मनीनें सोव्हिएट देशावर

प्राणघातक हल्ला केला. त्यानंतर चाललेल्या घनघोर महायुध्दांत सोव्हिएटनें आपल्या योजनाबध्द अर्थव्यवस्थेच्या जोरावर निकराचा प्रतिकार केला आणि शेवटीं मातलेल्या हिटलरशाहीचा पुरा पाडाव केला. आणि आज चौथी पंचवार्षिक योजना आंखून सोव्हिएट यूनियननें युद्धामुळें खुंटलेली प्रगति पुन्हा झपाट्यानें सुरू केली आहे. ही योजनाबद्ध प्रगति कशी साधण्यांत आली, त्यामध्यें कोणते प्रश्न निर्माण झाले आणि ते कसे सोडविण्यांत आले याचें स्थूल विवेचन या प्रकरणांत करण्याचें मीं ठरविलें आहे.

## आर्थिक नियोजन म्हणजे काय ?

आर्थिक नियोजनाची सामान्य कल्पना देणें अगदीं सोपें आहे. कारण मर्यादित क्षेत्रांत नियोजनाचा उपयोग नेहमींच करण्यांत येतो. टाटा कंपनीचा लोखंड—पोलादाचा कारखाना उदाहरणादाखल घेऊं. तेथील कारभार काय पूर्वयोजनेशिवाय चालू असतो ? पुढील वर्षी कोणत्या मालाचें किती उत्पादन करावयाचें, त्यासाठीं कच्चा माल किती लागेल, तो कसा व कोठून मिळवावयाचा, कारखान्यासाठीं कामगारवर्ग किती व कोणत्या दर्जाचा लागेल, त्यांना वेतन किती द्यावयाचें, तयार मालाचा उठाव कसा करावयाचा, नवी यंत्रसामग्री किती निर्माण करावयाची इत्यादि सर्व गोष्टींचा काळजीपूर्वक आणि तपशीलवार अंदाज केलेला असतो. कारण अशा प्रकारच्या योजनेशिवाय कोणताहि कारखाना सुरळीत चालूच शकणार नाहीं हें उघड आहे.

सबंध देशाच्या उत्पादनाची योजना आंखावयाची झाली तर ती सामान्यपणें अशाच प्रकारची पण यापेक्षां लाखो पटींनीं विस्तृत व गुंतागुंतीची होणार यांत शंका नाहीं. परंतु केवळ प्रचंड विस्तार आणि अतिशय गुंतागुंत यांवरच ही गोष्ट थांबणार नाहीं. कारण एखाद्या कारखानदारानें आंखलेली कारखान्यासंबंधीची योजना आणि सबंध देशासाठीं आंखलेली आर्थिक योजना यांत एक मोठा मूलभूत महत्त्वाचा फरक आहे. कारखान्याच्या योजनेमागील उद्दिष्ट कार-

## पहिल्या योजनेचा उद्देश- वेगवान औद्योगीकरण

जो देश औद्योगिक दृष्ट्या इतका मागासलेला आहे आणि जेथील शेकडा ८० टक्क्यांहून अधिक जनता जुनाट पद्धतीनें आणि मोडक्या-तोडक्या औतांनीं शेती करून कशीबशी जगते, त्या देशांत आर्थिक नियोजनाचें ध्येय कोणतें असणार ? अर्थात् शेतकीप्रधान देशाचें शक्य तितक्या जलद उद्योगप्रधान देशांत रूपांतर करणें. कारण देशांत उद्योग-धंदे आणि कारखाने सुरू झाल्याशिवाय कमी श्रमांत अधिक, आणि अधिक प्रकारची, संपत्ति उत्पादन होणार नाहीं. तसेंच संपत्तीचें उत्पादन जोंपर्यंत वाढत नाहीं, तेथपर्यंत राहणीचें मान खालींच राहतें. आणि जेथें आधुनिक सुखसोयी नाहींत, तेथें संस्कृतीहि विकास पावत नाहीं, हें उघड आहे. तेव्हां भौतिक व सांस्कृतिक दृष्ट्या जीवन समृध्द व्हावयाचें असेल तर उत्पादन वाढत राहिलें पाहिजे व यासाठीं देशांतलि सर्व विभागांचें जलद औद्योगीकरण झालें पाहिजे. आणि म्हणूनच आर्थिक नियोजनाचें मुख्य ध्येय देशांतील सर्व भागांत मोठ्या प्रमाणावर उद्योग-धंदे सुरू करणें असेंच असलें पाहिजे. सोव्हिएट आर्थिक नियोजनाचें ध्येय हेंच होतें व आहे.

याला अनुसरून सोव्हिअेट देशांत जी पहिली पंचवार्षिक योजना ( १९२८–३३ ) आंखण्यांत आली तिचें सूत्र पुढीलप्रमाणें ठरविण्यांत आलें. या पांच वर्षांत उद्योगधंदे, शेती आणि वाहतूक ( रेल्वे, आग-बोटी, रस्ते इत्यादि ) या तीन क्षेत्रांतील प्रगतीला आवश्यक असलेलीं यांत्रिक साधनें तयार करणारे कारखाने प्रथम उघडण्यांत यावे आणि त्यांच्या जोरावर शेतीप्रधान असलेला सोव्हिएट देश या पांच वर्षांच्या शेवटीं उद्योगप्रधान बनावा. प्रतिवर्षी उपलब्ध असलेली श्रमशक्ति आणि कच्चा माल यांचें मोठ्यांत मोठें प्रमाण हे कारखाने आणि उद्योगधंदे उभारण्यांत खर्च करण्यांत यावें आणि अशा रीतीनें कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाचें प्रमाण सारखें वाढतें राहावें अशी तरतूद करण्यांत आली.

१९२८ ते १९३२ या चार वर्षांत ( पहिली पंचवार्षिक योजना सव्वा चार वर्षांतच पुरी झाली ) एकंदर राष्ट्रीय उत्पादनांतील शेकडा ३० एवढा मोठा भाग या कामीं ( कारखाने उभारण्यांत अथवा नवीन भांडवल तयार करण्यांत ) उपयोगांत आणण्यांत आला; आणि या अवधींत औद्योगिक मालाचें उत्पादन ८६ टक्क्यांनीं ( दुपटीपेक्षां थोडें कमी ) वाढलें. इंग्लंडसारख्या अतिशय पुढारलेल्या राष्ट्रांतहि नवीन भांडवल तयार करण्यांत राष्ट्रीय उत्पादनापैकीं शेकडा १४ हून अधिक भाग कधींच खर्च झालेला नाहीं. १९२८ सालच्या रशियासारख्या दरिद्री व मागासलेल्या देशांत इंग्लंडच्या मानानें दुपटीहून अधिक वेगानें नवे उद्योगधंदे उभारण्यांत आले यावरून औद्योगीकरणाचा हा वेग किती मोठा होता याची कल्पना येते. औद्योगिक मालाच्या उत्पादनांतील वाढीचे तुलनात्मक आकडे हीच गोष्ट सिद्ध करतात. शांततेच्या काळीं जगांतील एकूण औद्योगिक उत्पादनाच्या वाढीचा वेग प्रतिवर्षी शेकडा तीनपेक्षा अधिक नाहीं. ( युद्धकाळांतील वाढ अर्थातच अपवादात्मक समजली जाते. ) १९२५ ते २९ या औद्योगिक दृष्ट्या भरभराटीच्या कालखंडांतहि इंग्लंड आणि अमेरिका या देशांत वार्षिक वाढ ४ टक्के होती आणि अधिकांत अधिक वाढ ( पोलंड व फ्रान्स यांची ) ९ टक्के होती. तर पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत सोव्हिएट देशांत हें प्रमाण २० टक्क्यांहून अधिक पडतें !

## काय हवें ? कापड कीं यंत्रें ?

केवळ आंकडे पाहिल्यानें या औद्योगिक प्रगतीची यथार्थ कल्पना येणार नाहीं. वरील आंकड्यांवरून सोव्हिएट प्रगतीचा झपाटा डोळ्यांत भरतो; पण ती साध्य करण्यासाठीं सोव्हिएट नागरिकांना जो कमालीचा स्वार्थत्याग करावा लागला त्याची कल्पना येईलच असें नाहीं. त्याकरितां थोडें खोलांत शिरलें पाहिजे.

नवीन तयार होणाऱ्या वस्तूंचे स्थूल मानानें दोन ठळक भाग पाडतां येतात : ( १ ) गिरण्या, कारखाने, खाणी, इत्यादि. यांचा उपभोग समा-

जास तात्काळ घेतां येत नाहीं; परंतु त्यांच्या साधनानें भावी काळांत कमी श्रमांत अधिक उपभोग्य वस्तु निर्माण करतां येतात. यांना 'उत्पादनसाधनें' किंवा 'भांडवल' असें म्हणतां येईल. (२) कापड, कागद, खाद्यपदार्थ, घरें, इत्यादि; की ज्यांचा उपभोग त्या वस्तु उत्पन्न होतांच घेतां येतो. यांना 'उपभोग्य वस्तु' असें नांव आपण देऊं. आतां ज्यापासून हा तयार माल उत्पन्न होतो तो (कापूस, धान्य, धातु वगैरे) कच्चा माल आणि तो तयार करणारी श्रमशक्ति (कामकरी वर्ग) या दोन्ही गोष्टी केव्हांहि ठराविक संख्येनेंच उपलब्ध असतात. अर्थात् मर्यादित श्रमशक्ति आणि कच्चा माल यांची वर उल्लेखिलेल्या दोन तऱ्हेच्या उत्पादनासाठीं वांटणी करणें भाग आलें. म्हणून उत्पादनाचीं साधनें अथवा भांडवल जितक्या अधिक प्रमाणांत तयार करण्याचें ठरवावें तितक्या प्रमाणांत उपभोग्य वस्तु कमी उत्पन्न होणार हें उघड आहे. याचाच अर्थ असा, कीं नवीन कारखाने आणि उद्योगधंदे उभारावयाचे म्हटले की तेवढ्या प्रमाणांत दैनंदिन गरजा कमी केल्या पाहिजेत. उदाहरणानें ही गोष्ट स्पष्ट होईल.

हातमागापेक्षां गिरणींत कापड कितीतरी पटीनें अधिक निघतें, म्हणून आपण गिरणी बांधावयाचें ठरविलें आहे असें क्षणभर समजूं. गिरणी बांधण्यासाठीं, गिरणींतील निरनिराळीं यंत्रें निर्माण करण्यासाठीं अनेक कामगारांना निदान अेकदोन वर्षें तरी खपावें लागणार. या मुदतींत या कामगारांनीं हातमागावर कापड काढलें असतें अथवा इतर उपभोग्य वस्तु (अर्थातच हस्तव्यवसायानें) तयार केल्या असत्या, त्यांचें उत्पादन अर्थातच तात्पुरतें बंद झालें. गिरणी तयार झाल्यानंतर म्हणजे आणखी अेकदोन वर्षांनीं कापड मुबलक होणार असलें तरी आज मात्र कापडाची अधिकच टंचाई होणार. गिरणीसारख्या मोठाल्या कारखान्यांतील यंत्रसामग्रीचा विचार केला तर हीच गोष्ट अधिक तीव्रतेनें भासते हीं यंत्रें निर्माण करण्यासाठीं लोखंडाचे कारखाने उभारावे लागतात आणि त्यासाठीं आणखी कांहीं वर्षें हजारों कामगारांना उपभोग्य वस्तूंचें उत्पादन बंद करून या उद्योगाकडे

वळावें लागेल. पुन्हा कारखान्यांतील यंत्रें निर्माण करण्याकडे लोखंडाचा ओघ वळविला कीं खिळे, सुया, गज, पलंग इत्यादि लोखंडाच्या वस्तूंचें उत्पादन तात्पुरतें (निदान लोखंडाच्या नव्या खाणी आणि तें शुद्ध करण्याचे कारखाने निघेपर्यंत) कमी होणार तें निराळेंच! हे मोठाले कारखाने चालण्यासाठीं जी विद्युत्शक्ति उत्पन्न केली पाहिजे, त्यासाठीं कोळशाच्या खाणी खणल्या पाहिजेत अथवा नीपर नदीवरील धरणासारखीं मोठालीं धरणें कित्येक वर्षें खपून बांधलीं पाहिजेत; त्याशिवाय लोखंड, कोळसा वगैरे खनिज पदार्थांसाठीं भूगर्भशास्त्रीय पाहणी व संशोधन करावयास पाहिजे. या सर्व उदाहरणांवरून असा निष्कर्ष निघतो, कीं उपभोग्य वस्तूंचें उत्पादन करण्यासाठीं जीं उत्पादनसाधनें आणि कारखाने आवश्यक असतात तीं निर्माण करण्याकडे श्रमशक्ति आणि कच्चा माल याचा ओघ वळविला की तितक्या प्रमाणांत उपभोग्य वस्तु व इतर सुखसोयी यांचा तात्पुरता तुटवडा भासणें अपरिहार्य आहे. परंतु नजीकच्या भविष्यकाळांत उपभोग्य वस्तूंचा पुरवठा मुबलक होण्यासाठीं, गिरण्या–कारखाने निर्माण करण्यासाठीं, या सर्वांचा जणूं पायाच अशा खनिज द्रव्यांच्या खाणी, लोखंड–पोलादाचे मोठाले कारखाने, रासायनिक द्रव्यांचे कारखाने आणि विजेसाठीं प्रचंड धरणें आणि विद्युत्केंद्रें—या आणि अशाच इतर 'मूलभूत उद्योगधंद्यां'ची (हेवी इण्डस्ट्री) प्रथम स्थापना केली पाहिजे. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्यें जें भांडवल ओतण्यांत आलें त्यांपैकी तीन-चतुर्थांश भांडवल या मूलभूत उद्योगधंद्यांत घालण्यांत आले होतें आणि यासाठीं उपभोग्य वस्तूंच्या बाबतींत सोव्हिएट नागरिकांनीं या काळांत कमालीचा स्वार्थत्याग केला. त्यांनीं पोट बांधून राष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीचा पाया रचला.

### दोन प्रश्न आणि त्यांचीं उत्तरें

या ठिकाणीं दोन प्रश्न उपस्थित होतात. उपभोग्य वस्तूंचा इतका तुटवडा सहन करण्याऐवजीं त्यांनीं औद्योगिक प्रगतीचा वेग थोडा कमी कां केला नाहीं? उद्योगधंद्यांत पुढारलेल्या युरोपियन राष्ट्रांकडून त्यांनीं कर्जाऊ मदत कां घेतली नाहीं?

मूलभूत उद्योगधंद्यांवर भर देण्यांत देशाचा मागासलेपणा त्वरित घालवावा याशिवाय आणखीहि एक कारण होतें. या वेळीं सोव्हिएट देशाभोंवतीं भांडवलशाही राष्ट्रांचें कोंडाळें पडलेलें होतें; आणि या राष्ट्रांना सोव्हिएटविरुध्द चिथविण्यासाठीं इंग्रज, फ्रेंच व इतर साम्राज्यवादी टपून बसले होते. पूर्वेकडे जपानी साम्राज्यशाही कुरापत काढण्यास तयार होती. तेव्हां सोव्हिएट देशाला कमींत कमी अवधींत स्वसंरक्षणासाठीं समर्थ होणें अतिशय निकडीचें होतें. संरक्षणक्षम होण्यासाठीं आधुनिक शस्त्रास्त्रें हवींत आणि त्यासाठीं मूलभूत उद्योगधंद्यांचे कारखाने पाहिजेत. औद्योगिक प्रगतीच्या प्रचंड वेगाची अशी ही कारणपरपरा होती.

इतर राष्ट्रांकडून सोव्हिएटनें कर्जाऊ मदत कां घेतली नाहीं या प्रश्नाला आतां निराळें उत्तर द्यावयास नको. सोव्हिएटला पाण्यांत पाहणारीं साम्राज्यवादी राष्ट्रें सोव्हिएटला थोडीच मदत करणार? कित्येक राष्ट्रें तर व्यापार करण्यासहि राजी नव्हतीं. परंतु कांही राष्ट्रांना सोव्हिएटकडे असलेला लांकूड, केसाळ कातडीं, धान्य आणि सोनें इत्यादि कच्चा माल हवा होता; म्हणून तीं व्यापार करीत. सोव्हिएट देशांत आयात व निर्यात व्यापार सरकारच्या स्वाधीन असल्यामुळें साम्राज्यवादी राष्ट्रांना व्यापाराच्या निमित्तानें तेथें हातपाय पसरण्यास अवसर मिळणें अशक्य होतें. सोव्हिएट सरकार या मालाच्या मोबदला त्यांना तातडीनें हवीं असलेलीं मोठालीं यंत्रें आणि यंत्रतज्ज्ञांचा सल्ला यांची मागणी करीत असे. अर्थात् उपभोग्य वस्तूंची आयात न होतां कच्च्या मालाच्या द्वारां उलट निर्यातच होत असे. यामुळें देशांत उपभोग्य वस्तूंचा तुटवडा अधिक होत असे; परंतु असें केल्यावांचून गत्यंतर नव्हतें.

१९२९ च्या आर्थिक अरिष्टाचा सोव्हिएटवर फारसा परिणाम झाला नाहीं असें आरंभींच म्हटलें आहे; त्यामधील 'फारसा' हा शब्द मुद्दामच वापरला आहे. कारण थोडासा परिणाम झालाच. सोव्हिएट सरकारनें आधीं एकदोन वर्षें यंत्रांची मागणी केली होती व त्यांच्या किमती ठरल्या होत्या. आतां धान्याचे भाव ३०–४० टक्के उतरल्यानें सोव्हिएट रशियाला हीं यंत्रें मिळविण्यासाठीं अधिक धान्य व कच्चा माल निर्यात

करावा लागला. भांडवलशाही जगाच्या आरेष्टाच्या फेऱ्यापायीं सोव्हिएट नागरिकालाहि आपलें पोट थोडें अधिक आवळावें लागलें !

मूलभूत उद्योगधंद्यांवर इतका भर देणें अगत्याचें होतें याचें आणखी एक कारण असें, कीं सोव्हिएटमधील रेल्वे, आगबोटी, रस्ते, मोटारी वगैरे वाहतूकीचीं साधनें अतिशय मागासलेलीं होतीं. देशांतील संपत्तीचें उत्पादन वाढत जाईल तसतसा अंतर्गत व्यापार, मालाची ने-आण यांमध्यें वाढ होत जाते. या वाढत्या वाहतुकीला जरूर असणारीं साधनें नसलीं तर वाहतुक मंद होऊन औद्योगिक प्रगतीचा वेग मंदावेल. तेव्हां दळणवळणाच्या साधनांमध्यें सुधारणा करणें भाग होतें. संरक्षणासाठींहि त्यांची आवश्यकता होतीच. आणि यासाठीं पुन्हा मूलभूत उद्योग-धंद्यांचा वाढ करणें जरूर झालें.

## सामायिक शेतीचें प्रयोजन

वेगवान् औद्योगिक प्रगतीचें धोरण अंगीकारतांच सोव्हिएटसमोर दोन प्रश्न ताबडतोब उभे राहिले : ( १ ) या प्रचंड कार्यक्रमासाठीं आवश्यक असलेलें प्रचंड मनुष्यबळ (कामगार-वर्ग) कोठून आणावयाचें ? ( २ ) गिरणी-कारखाने चालवावयाचे म्हणजे कापूस, ताग, गळिताचीं धान्यें इत्यादि पिकांची पैदास मोठ्या प्रमाणांत व्हावयास हवी. गहूं, मका यांच्या लागवडीखालीं असलेल्या शेतांत कापूस पिकवावा तर धान्याची पैदास कमी होणार; शिवाय गिरणी—कारखान्यांत काम करणाऱ्या शहरी कामगारवर्गाची संख्या मोठ्या प्रमाणांत वाढणार; म्हणून त्यांच्यासाठीं धान्यहि अधिक पिकवावें लागणार; सारांश धान्य, कापूस वगैरे शेतीपासून होणाऱ्या कच्च्या मालाच्या पैदाशींत अतिशय वाढ होणें जरूर होतें. हें कसें साधावयाचें ?

त्या वेळीं सोव्हिएट शेती हजारो वर्षें चालत आलेल्या बैला-घोड्यां-च्या जुनाट औतांनीं केली जात असे आणि जमिनीची विभागणी अति-शय झाल्यामुळें शेतजमिनीचे लहान लहान तुकडे झाले होते. अशा शेतीव्यवस्थेमध्यें शेतकऱ्याची स्वतःची गरज भागविल्यावर फारसें जादा

पीक राहात नाहीं हें आपणांस हिंदी शेतीच्या अनुभवानें माहीत झालें आहे. शेतीचें पीक वाढवावयाचें तर यांत्रिक पद्धतीनें शेती केली पाहिजे आणि यंत्रें वापरावयाचीं तर शेतांचें तुकडे एकत्र होऊन मोठालीं शेतें झालीं पाहिजेत. याचाच अर्थ असा, छोट्याछोट्या शेतकऱ्यांना यंत्रें परवडणें शक्य नसल्यामुळें त्यांनीं एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर यांत्रिक सामायिक शेती सुरू केली पाहिजे. यामुळें शेतीची पैदास वाढेल, त्यांचें स्वतःचें राहणीचें मान उंचावेल आणि कारखान्यासाठीं जरूर असलेला जादा कच्चा मालहि निर्माण होईल. सोव्हिएट औद्योगीकरणाच्या योजनेंत यांत्रिक पद्धतीनें करावयाच्या सामायिक शेतीचा कार्यक्रम हा एक मूलभूत महत्त्वाचा भाग होता.

शेती यांत्रिक पद्धतीनें करावयाची म्हणजे मोठाले ट्रॅक्टर ( यांत्रिक नांगर ) व इतर साधनें हवींत; आणि हीं तयार करण्यासाठीं लोखंड-पोलादाचे मोठाले कारखाने ( मूलभूत उद्योगधंदे ) पाहिजेत. या गोष्टी साध्य होण्यास किती वेळ लागतो हें आपण वर पाहिलेंच आहे. अर्थातच शेतीचें यंत्रीकरण हळूहळू होत गेलें. प्रथम प्रथम सामायिक शेती करणारे शेतकरी आपलीं जुनीं साधनें एकत्र करून व त्यांत सरकारकडून मिळेल त्या यंत्रसाधनांची भर घालून शेती करीत असत. पहिल्या पंच-वार्षिक योजनेच्या चार वर्षांत शेकडा ६० टक्के शेतकरी आणि ७० टक्के शेतजमीन सामायिक शेतींत सामील झाली. तसेंच ५ कोटि एकरांची नवी जमीन लागवडीखालीं आली. यंत्रीकरणाची प्रगति मात्र तेवढ्या वेगानें झाली नाहीं. १९३२ सालीं सामायिक शेतीचा तिसरा हिस्सा शेती पूर्णपणें यांत्रिक साधनांनीं केली जात होती आणि एकूण दीड लक्ष ट्रॅक्टर वापरले जात होते. या अवधींत धान्याची पैदास दीडपटीहून थोडी कमी इतकी वाढली.

सामायिक यांत्रिक शेतीमुळें वर उल्लेखिलेली मनुष्यबळाची अडचणहि दूर होण्याच्या मार्गास लागली. शेती यांत्रिक होऊं लागली तसें शेतावर काम करण्यासाठीं पूर्वींइतकीं माणसें लागेनाशीं झालीं. या शिल्लक राहणाऱ्या श्रमशक्तीचा ओघ गिरणी-कारखान्याकडे वळवितां

येऊं लागला. शेती सामायिक व यांत्रिक बनल्याचा असा दुहेरी उपयोग झाला.

परंतु हें जादा मनुष्यबळ जसेंच्या तसेंच औद्योगीकरणासाठीं उपयोगी पडणें शक्य नव्हतें. ज्यानें पिढ्यान्‌पिढ्या शेतीचा धंदा केला आहे असा अशिक्षित शेतकरी तरुण शहरांत आला खरा. पण शिक्षणाशिवाय आणि यांत्रिक ज्ञानाच्या श्रीगणेशाशिवाय तो कारखान्यांतील यंत्रें कशीं चालवणार? तेव्हां पंचवार्षिक कार्यक्रम यशस्वी होण्यासाठीं साक्षरताप्रसार आणि धंदेशिक्षण यांचा प्रचंड कार्यक्रम हातीं घेणें आवश्यक होतें. फिटर, मेकॅनिक्, फोरमन, इंजिनिअर वगैरे अनेक दर्जाचीं यंत्रकुशल माणसें चुटकीसरशीं निर्माण होणें शक्य नसतें. यामुळें प्रथम प्रथम कारखान्यांतील कामगारांची उत्पादनशक्ति फार कमी असे. कधीं कधीं यंत्रांच्या कारखान्यांतून बाहेर पडणारीं यंत्रें निकामी ठरत असत. बाहेरच्या देशांतून यंत्रसामग्री मागविली, कारखाना उभारला, पण तीं मोठालीं व गुंतागुंतीचीं यंत्रें चालवावयाचें ज्ञान मात्र कोणासच नाहीं, अशीहि परिस्थिति कांहीं वेळां निर्माण झाली. परंतु या अडचणी तात्कालिक होत्या. शिक्षण आणि यंत्रज्ञान यांची पातळी जसजशी उंचावूं लागली तसतशी कारखान्यांची उत्पादनक्षमता वाढत गेली आणि औद्योगीकरणाचा वेगहि वाढूं लागला.

## कमालीचा स्वार्थत्याग

अशा प्रकारें पंचवार्षिक योजनेचा गाडा झपाट्यानें वाढ चालूं लागला पण यासाठीं त्या वेळीं सोव्हिएट नागरिकांना अनेक सुखसोयींना मुकावें लागलें. औद्योगीकरणाचा प्रचंड कार्यक्रम आणि त्यांतहि सर्व भर कापड-गिरणीसारख्या उपभोग्य वस्तूंच्या कारखान्यांवर नव्हे, तर मूलभूत उद्योगधंद्यांवर. परदेशांतून कर्जाऊ मदत नाहीं; अर्थात् तिकडून उपभोग्य वस्तूंचा पुरवठा होण्याची गोष्ट दूरच राहिली; उलट यंत्रसाधनें मिळविण्यासाठीं आपला कच्चा माल तिकडे पाठविणें भाग! परकीय आक्रमणाचा धोका आणि म्हणून मूलभूत उद्योगधंद्यांवर

आणि स्वयंपूर्णतेवर अधिकच कटाक्ष; शेतमजुरांस राबविणाऱ्या श्रीमंत शेतकऱ्यांनीं सामायिक शेतीस विरोध करण्यासाठीं शेतीचें केलेलें नुकसान; या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला कीं उपभोग्य वस्तूंचा पुरवठा कमी पडूं लागला. पण नवेनवे धंदे-रोजगार खुले होत असल्यानें आणि शिक्षण, आरोग्य इत्यादि व्यवसायक्षेत्रें सारखीं वाढत असल्या-मुळें नागरिकांच्या दैनंदिन गरजा मात्र वाढत जात होत्या. यामुळें उपभोग्य वस्तूंची वाण फार तीव्रतेनें भासूं लागली.

पुरवठा मर्यादित आणि मागणी फार, अशी स्थिति असली म्हणजे काय करावें लागतें याची आपणांस युद्धकाळांतील रेशनपद्धतीनें कल्पना आलेली आहे. सोव्हिएट सरकारनेंहि नित्योपयोगी वस्तूंच्या बाबतींत हाच उपाय अमलांत आणला. त्या त्या वस्तूंचा पुरवठा आणि निर-निराळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्यांची गरज ध्यानांत घेऊन धान्य, कापड वगैरे नित्योपयोगी वस्तूंची वांटणी रेशनपद्धतीनें करण्यांत आली. १९३५ सालीं पुरवठा मुबलक होईपावेतों रेशनपद्धति चालू होती.

साम्राज्यवादी वृत्तपत्रांनीं याचा फायदा घेऊन ‘ सोव्हिअेट रशियांत मालाचा दुष्काळ पडला आहे ’ अशी हाकाटी केली आणि योजनाबद्ध समाजवादी प्रगतीचे कार्यक्रम अयशस्वी ठरत आहेत असें मनोरथी भविष्यहि वर्तविलें. ही वाण, हे हाल आणि या गैरसोयी तात्पुरत्या आहेत आणि त्या वेळच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितींत अटळ आहेत, याचा विचार करण्याची त्यांना गरजच भासली नाहीं. घर बांधण्यासाठीं अथवा आपल्या मुलांना उत्तम शिक्षण मिळावें म्हणून, आपण तात्पुरत्या हाल-अपेष्टा थोड्या कां सोसतों ! येथें तर देशाचा आर्थिक पायाच रचावयाचा होता; आणि सबंध समाजाला संस्कृतिपथावर न्यावयाचें होतें. मग त्याकरितां सोव्हिएट समाजाला कांहीं काळ स्वार्थत्याग करावा लागला यांत नवल कसलें ? ही सर्व आर्थिक प्रगति आपल्या फायद्यासाठीं, मालक वर्गाच्या फायद्यासाठीं नव्हे, ( कारण भांडवलदार केव्हांच नष्ट झाले होते ) हें माहीत असल्यामुळें त्यांनीं हा तुटवडा धीरानें सहन केला.

## पहिल्या योजनेची फलश्रुति

योजनाबद्ध पंचवार्षिक कार्यक्रम तडीस नेतेवेळीं सोव्हिएटला कोण-कोणते अनुभव आले याचें आतांपर्यंत विस्तारानें विवेचन केलें. आतां पहिल्या पंचवार्षिक योजनेची फलश्रुति सांगून पुढील प्रगतीकडे वळूं.

पहिली पंचवार्षिक योजना सव्वाचार वर्षांत पुरी झाली. या काळांत निरनिराळ्या क्षेत्रांतील उत्पादनांत पुढील वाढ झाली:—

### उत्पादनांतील वाढ ( १९२८–१९३२ )

| | | | |
|---|---|---|---|
| मोठे कारखाने... | ११८ टक्के | कोळसा... | ७५ टक्के |
| धातूंचें उत्पादन... | २०० टक्के | लोखंड, पोलाद | ६० टक्के |
| उपभोग्य वस्तु... | ६६ टक्के | वीजशक्ति... | १५० टक्के |

एकूण राष्ट्रीय उत्पादन... ८६ टक्के

या काळांत निरनिराळ्या उद्योगधंद्यांतील यंत्रीकरणाचें मान सारखें वाढत गेलें. उदाहरणार्थ, १९२८ सालीं कोळशापैकीं ८५ टक्के भाग यंत्राशिवाय खोदला जात असे; १९३२ सालीं ६६ टक्के कोळसा यांत्रिक कुदळीनें खोदण्यांत येऊं लागला.

वरील आंकड्यावरून एक गोष्ट सहज दिसते, कीं प्रगतीचें मान मूल-भूत उद्योगक्षेत्रांत इतरांपेक्षा अधिक आहे. अशा प्रकारें देशाचा आर्थिक पाया रचण्याचें पहिल्या पंचवार्षिक योजनेचें उद्दिष्ट सफल झालें आणि पूर्वीं शेतीप्रधान असलेला सोव्हिएट देश आतां औद्योगिक युगांत शिरला.

## दुसरी व तिसरी योजना

१९३२ सालापासून दुसरी पंचवार्षिक योजना ( १९३२ ते ३७ ) सुरू झाली. या वेळीं दरवर्षीच्या उत्पन्नांतील फक्त १९ टक्के भाग ( हें प्रमाण पहिल्या योजनेपेक्षां कमी होतें ) नवीन भांडवल निर्माण कर-ण्यांत खर्च करावयाचा, असें ठरविण्यांत आलें होतें. पहिल्या योजनेच्या काळांत नागरिकांना पडलेला ताण कमी व्हावा असा याचा उद्देश होता. परंतु जर्मनींत हिटलरशाही जोर धरूं लागली, युद्धाचा धोका

वाढूं लागला, यामुळें शस्त्रास्त्रांसाठीं जरूर असलेल्या उद्योगधंद्यांची वाढ झपाट्यानें करणें प्राप्त झालें. म्हणून १९३६ पासून भांडवलनिर्मितीचें प्रमाण वार्षिक उत्पादनांतील २५–२६ टक्केपर्यंत चढलें. यांमधील दोन-तृतीयांश भाग उत्पादनाचीं साधनें निर्माण करणारे उद्योगधंदे वाढविण्याकडे खर्च व्हावयाचा होता.

असें असूनहि दिवसेदिवस उपभोग्य वस्तूंचा पुरवठा वाढूं लागला. कारण उपभोग्य वस्तूंच्या निर्मितीसाठीं आतां पूर्वीपेक्षां कितीतरी पटीनें अधिक कारखाने काढण्यांत आले. उत्पादनाच्या साधनांचे उद्योगधंदे या पांच वर्षांत दुपटीनें वाढले, तर उपभोग्य वस्तूंचे उद्योगधंदे चौपट झाले. कापडाशिवाय इतर मालाची चणचण बरीच कमी झाली.

पहिल्या योजनेच्या काळापेक्षां दुसऱ्या योजनेमध्यें शेतीच्या पिकांत २८ टक्के वाढ झाली. यांपैकी कांहीं वाढ नवी जमीन लागवडीखालीं आल्यामुळें झाली, शिवाय दर अेकरीं उत्पादनहि २१ टक्क्यांनीं वाढलें. या सर्व प्रगतीमुळें राहाणीचें मान उंचावूं लागलें आणि हळूहळू सुबत्तेचें वातावरण निर्माण होऊं लागलें. आतां नित्योपयोगी पदार्थांचें रेशन करण्याचें कारण उरलें नाहीं. १९३१ पासून १९३८ पर्यंत अेकूण राष्ट्रीय उत्पन्न ४,००० कोटि रुबलवरून १०,५०० कोटि रुबलपर्यंत (अडीच पट) वाढलें आणि शिक्षण व सांस्कृतिक विकास यांसाठीं होणारा सरकारी खर्च १९३२ पासून १९३८ पर्यंत साडेतीन पटीनें वाढला, या दोन गोष्टी या वाढत्या सुखसोयींच्याच निदर्शक आहेत.

दुसऱ्या योजनेच्या काळांत पहिल्या योजनेमध्यें आरंभिलेले मोठाले उद्योगधंदे पुरे तयार झालेच. शिवाय कित्येक नवीन उद्योग–केंद्रें निर्माण झालीं. १९३८ सालीं चालू असलेल्या गिरणी-कारखान्यांपैकीं ८० टक्के भाग १९२८ सालानंतर निर्माण झालेला होता. दुसऱ्या योजनेच्या काळांत उरल प्रदेश, कुझनेत्स्क, वगैरे देशाच्या अगदीं आंतल्या भागांत नवे लोखंड-पोलादाचे कारखाने बांधण्यांत आले. तसेच नवे रासायनिक कारखाने व तेलखाणी सुरू झाल्या; आणि औद्योगिक प्रगति अगदीं अतिपूर्वेकडील प्रदेशांपर्यंत पसरली. याच्याच जोडीनें मध्य

आशिया, उरल प्रदेश व सायबेरिया या प्रदेशांत नवीन साडेतीन कोटि एकर जमीन यांत्रिक शेतीखालीं आली.

अशा प्रकारें दुसऱ्या योजनेच्या शेवटीं सोव्हिएट देशाचें औद्योगीकरण बऱ्याच अंशीं परिपूर्ण होऊन आर्थिक व तांत्रिक या दोन्ही दृष्टींनीं तो स्वयंपूर्ण आणि समर्थ देश बनला. समाजवादी सोव्हिएट राष्ट्राची अर्थव्यवस्था मजबूत झाली. १९३८ सालापासून आंतरराष्ट्रीय परिस्थिति गंभीर होत असल्यामुळें यापुढें देशाचें संरक्षणसामर्थ्य कायम राखून दैनंदिन जीवन समृद्ध करणें हें यापुढील आर्थिक योजनेचें ध्येय होतें. १९३८ सालापासून योजिलेल्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें युद्धोपयोगी मूलभूत उद्योगधंद्यांचा जंगी कार्यक्रम होता. शिवाय उपभोग्य वस्तूंचा पुरवठा दीडपट ते दुप्पट व्हावा असें ठरविण्यांत आलें होतें. ही योजना संपूर्ण तडीस गेली नाहीं. १९३९ सालीं जागतिक महायुद्ध सुरू झालें. फक्त कांहीं क्षेत्रांत तीन वर्षांचा कार्यक्रम ( १९३८ ते १९४० ) योजल्याप्रमाणें अमलांत आला. या तीन वर्षांतील प्रगतीचे आकडे पुढीलप्रमाणें:—उत्पादनाचीं साधनें ५२ टक्के वाढ; उपभोग्य वस्तु ३३ टक्के; एकूण औद्योगिक उत्पादन ४४ टक्के; आणि एकूण राष्ट्रीय उत्पन्नांत ३० टक्के वाढ झाली. १९४० सालापासून युद्धोपयोगी वस्तूंच्या उत्पादनावर मुख्य भर देणें सुरू झालें. युद्धकालीन आर्थिक नियोजनाकडे वळण्यापूर्वीं दुसऱ्या व तिसऱ्या योजनेची फलश्रुति आणि महायुद्ध सुरू झालें नसतें, तर तिसऱ्या योजनेनें काय साध्य झालें असतें हें दाखविणारा अंदाज, तसेंच १९२८ ते १९४० या बारा वर्षांत घडून आलेल्या औद्योगिक क्रांतीचे परिणाम, या गोष्टी दाखविणारीं कांहीं कोष्टकें पुढें देत आहे:—

**कोष्टक २ : औद्योगिक क्रांतीमुळें कामगारांच्या संख्येंत झालेली वाढ व शेतावर राहणाऱ्यांच्या संख्येंत झालेली घट**

| साल | १९१३ | १९३७ |
|---|---|---|
| कामगारांची संख्या........ | १,१२ लक्ष | २,८० लक्ष |
| कामगारांचें लोकसंख्येशीं प्रमाण | १६·७ टक्के | ३४·७ टक्के |
| शेतकऱ्यांचें ,, ,, | ८० टक्के | ५५·५ टक्के |

**कोष्टक ३ : नव्या भांडवलाची निर्मिति** ( आंकडे दश कोटि रुबलांचे )

| आर्थिक क्षेत्र | पहिली योजना | दुसरी योजना | तिसऱ्या योजनेंतील आखलेला अंदाज |
|---|---|---|---|
| मूलभूत उद्योगधंदे | २१३ | ४९८ | ८७२ |
| इतर उद्योगधंदे... | ३५ | ८८ | १६४ |
| एकूण उद्योगधंदे... | २४८ | ५८६ | १०३६ |
| शेती ... ... | ९८ | १४६ | १८० |
| एकूण भांडवल... | ५०५ | ११४७ | १८८२ |

कोष्टक ( ३ ) पाहतांना पुढील गोष्टी ध्यानात घ्याव्या:—एकूण उद्योगधंदे आणि शेती यांमधील भांडवलाची बेरीज एकूण भांडवला-बरोबर येणार नाहीं; कारण एकूण भांडवलांत या दोन क्षेत्रांबरोबरच वाहतूक, इमारती इत्यादि क्षेत्रांचाहि समावेश होतो. तसेंच पहिल्या व दुसऱ्या योजनेचे आंकडे पार पडलेल्या प्रगतीसंबंधीं असून तिसऱ्या योजनेचे आंकडे योजलेल्या कार्यक्रमांचे आहेत. यांपैकी फक्त कांहीं भागच पार पडला.

कोष्टक ४ :

## सोव्हिएट आर्थिक प्रगति

| | | १९१३ | १९२८ | १९३७ | १९४२ (योजलेला कार्यक्रम) |
|---|---|---|---|---|---|
| एकूण औद्योगिक उत्पादन ... | (कोटि रुबल) | १५०० | १८०० | ९५५० | १८००० |
| यांपैकी { उत्पादनाची साधनें | ( ,, ) | ५०० | ८०० | ५५०० | ११२०० |
| यांपैकी { उपभोग्य वस्तु | ( ,, ) | १००० | १००० | ४००० | ६८०० |
| वीजशक्ति | (कोटि किलोवॅट तास) | १९० | ५०० | ३६४० | ७५०० |
| पेट्रोलियम | (लक्ष टन) | ९२ | ११७ | ३०५ | ५४० |
| कोळसा | ( ,, ,, ) ... | २९१ | ३५५ | १२७९ | २४३० |
| लोखंड | ( ,, ,, ) ... | ४२ | ३३ | १४७ | २२० |
| पोलाद | ( ,, ,, ) ... | ४२ | ४२ | १७६ | २७५ |
| साखर | ( ,, ,, ) ... | १३ | १३ | २४ | ३५ |
| सुती कापड | (कोटि मीटर) ... | २२२·७ | २७४·२ | ३४४·७ | ४९०·० |
| धान्य | (कोटि क्विंटल) ... | ८१ | ७३·३ | १०८·२ ते १२०·३ | १३०·० |

कोष्टक (४) मधील उत्पादनासंबंधीचे पहिल्या तीन ओळींतील आंकडे १९२६ सालच्या रुबलच्या किमतींत हिशेबिलेले आहेत. (प्रो. मॉरिस डॉब आणि प्रो. अलेक्झांडर वायकोव यांच्या पुस्तकांवरून हे आकडे घेतले आहेत.)

## युद्धकालीन आर्थिक नियोजन

तिसरी योजना संपूर्ण झाली असती तर कांहीं महत्त्वाच्या आर्थिक क्षेत्रांत सोव्हिअेट रशिया अितर पुढारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांच्या जोडीला आला असता. परंतु तत्पूर्वीच युद्धाचे ढग जमूं लागले आणि सोव्हिअेटला स्वसंरक्षणार्थ सर्व आर्थिक व्यवस्था त्या दिशेनें वळविणें जरूर झालें. अर्थव्यवस्था योजनाबद्ध असल्यामुळें तसें करणें कठीण गेलें नाहीं. अेकूण श्रमशक्ति आणि उत्पादन यांची वांटणी आतां युद्धप्रयत्न, नवे उद्योगधंदे आणि दैनंदिन गरजांसाठीं उपभोग्य वस्तु या तीन स्थूल विभागांत करण्यांत आली. युद्धकालीन आर्थिक घडामोडींची पद्धतशीर माहिती उपलब्ध झालेली नाहीं. परंतु पुढें दिलेल्या महत्त्वाच्या घटना त्यांची स्थूल कल्पना देण्यास पुरेशा आहेत.

आधींच्या काळांत दूरदृष्टीनें केलेल्या योजनाबद्ध प्रगतीचा युद्धप्रयत्नांना अतिशय उपयोग झाला. युद्धोत्पादनासाठीं आवश्यक असलेले मूलभूत उद्योगधंदे निर्माण झालेले होते, प्रत्येक प्रदेशाचें औद्योगीकरण झालेलें असून कारखाने देशाच्या आंतवर पसरलेले होते, बराचसा नवीन प्रदेश शेतीखालीं आला होता आणि त्यामुळें प्रादेशिक स्वयंपूर्णता बऱ्याच अंशीं साधण्यांत आली होती, आणि १९४० सालापासून कित्येक वस्तूंचे शिलकी साठे करून ठेवण्यास सुरुवात झाली होती. युद्ध सुरू होतांच आधींपासून केलेल्या या तरतुदीचा फायदा झाला. लागलीच सर्व कारखान्यांचें उत्पादन शस्त्रास्त्रें, दारूगोळा व इतर युद्धसामग्री निर्माण करण्यासाठीं एकवटण्यांत आलें. लोखंडी नांगर निर्माण करण्याच्या कारखान्यांतून आतां चिलखती गाडे निघूं लागले. यंत्रें निर्माण करणारे कारखाने आतां दारूगोळा उत्पन्न करूं

लागले. या सर्व युद्धप्रयत्नांमध्यें एकसूत्रीपणा आणणें सोव्हिअेटला इतर राष्ट्रांइतकें कठीण गेलें नाहीं व त्यास विलंबहि लागला नाहीं. आर्थिक नियोजनाची सर्व व्यवस्था या कामीं अतिशय मोलाची ठरली.

शत्रूनें सोव्हिएट भूमि व्यापल्यास त्या प्रदेशांतील सर्व युद्धोपयोगी कारखाने उलगडून पार आंतल्या भागांत पाठविण्यांत आले आणि तेथें ते जोडून अल्पावधींत त्यामधून युद्धसाधनें बाहेर पडूं लागलीं. योजनाबद्ध आर्थिक व्यवस्थेमुळेंच हें शक्य झालें. ज्या गोष्टी हलविण्याजोग्या नव्हत्या त्या शत्रूला उपयोगी पडूं नयेत म्हणून नष्ट करण्यांत आल्या. वर्षानुवर्षें खपून प्रचंड परिश्रमानें उभें केलेलें नीपर नदीवरील जगप्रसिध्द धरण—त्याला सुरुंग लावतांना सोव्हिएट नागरिकांना काय वाटलें असेल याची कल्पनाच केलेली बरी !

युद्धोत्पादन झपाट्यानें वाढविण्यासाठीं कित्येक नवीं उद्योगकेन्द्रें उभारण्यांत आलीं आणि जुन्या केंद्रांतील उत्पादनाचें प्रमाण कितीतरी पटीनीं वाढलें. या सर्व गोष्टींसाठीं यंत्रज्ञ कामगारवर्गाची वाण भासूं लागली. कारण सोव्हिएटमध्यें बेकार कामगारवर्ग मुळींच नव्हता. ही कमतरता भरून काढण्यासाठीं १९४० सालापासून युध्दकालीन धंदेशिक्षणाची नवी विस्तृत योजना आंखून अमलांत आणण्यांत आली. लक्षावधि तरुण यंत्रज्ञ कामगार बनले. सैन्यांत व कारखान्यांत दाखल झाल्यामुळें शेतावर काम करणाऱ्या माणसांचा तुटवडा पडला; तेव्हां शिक्षक, विद्यार्थी, कारकून, स्त्रिया आणि कित्येक शहरी नागरिक, यांनीं हंगामांत शेतावर काम केलें. अशा प्रकारें श्रमशक्तीचें योग्य नियोजन करून मनुष्यबळाचा प्रश्न सोडविण्यांत आला.

उत्पादनशक्तीचा मोठा ओघ युद्धसाधनें उत्पन्न करण्याकडे वळल्यामुळें दैनंदिन जीवनाला आवश्यक असलेल्या उपभोग्य वस्तूंचें उत्पादन पुष्कळच घटलें. आवश्यक वस्तूंचें पुन्हा रेशन सुरू झालें. पहिल्या योजनेच्या काळांत वेगवान् औद्योगिक प्रगति साधण्यासाठीं सोव्हिएट नागरिकांनीं आपलें पोट घट्ट आवळलें, तर महायुध्दाच्या काळांत ही प्रगति आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य यांच्या बचावासाठीं त्यांनीं

त्याहूनहि अधिक स्वार्थत्याग केला. अर्थव्यवस्था खाजगी मालकीची नव्हती, समाजाच्या मालकीची होती, म्हणूनच हें शक्य झालें.

सोव्हिएटचे युध्दप्रयत्न कसे कल्पनेबाहेर यशस्वी झाले हें आता सर्वांस ठाऊकच आहे. सर्व युरोपची युध्दसाधनें पाठीशीं असलेल्या, कित्येक वर्षें युध्दाची कडेकोट तयारी केलेल्या, अद्यावत् साधनांनीं युक्त अशा नाझी युध्दयंत्राचा त्यांनीं केवळ स्वतःच्या ताकदीवर चार वर्षें लढून चक्काचूर केला. अमेरिकेनें सोव्हिएटला शस्त्रास्त्रांची पुष्कळ मदत केली, अशी तिची जगभर जाहिरात झाली. परंतु आतां आंकड्यांनिशीं असें सिध्द झालें आहे, कीं कोणत्याहि तऱ्हेचीं अमेरिकेनें पुरविलेलीं शस्त्रास्त्रें सोव्हिएटनें उपयोगांत आणलेल्या एकंदर शस्त्रास्त्रांच्या आठवा हिस्सासुध्दां नव्हतीं. सोव्हिएटनें ज्यांच्या जोरावर जर्मनीला खडे चारले, तीं शस्त्रास्त्रें सोव्हिएट कामगारांनीं सोव्हिएट कारखान्यांत तयार केलीं होतीं आणि तीं सोव्हिएट यंत्रज्ञ सैनिकांनीं वापरलीं. यावरून आधींच्या बारा वर्षांत आणि युध्दकाळांत सोव्हिएटनें केवढी आर्थिक व यांत्रिक प्रगति केली याची चांगली साक्ष पटते सोव्हिएट समाजवादी अर्थव्यवस्था जगड्व्याळ महायुध्दाच्या कसोटीला पुरेपूर उतरली असें म्हणण्यास बिलकुल हरकत नाहीं.

## युध्दोत्तर पुनर्घटना : चौथी योजना

या महायुध्दांत सोव्हिएट देशाचें अपरिमित नुकसान झालें. जर्मनीनें पांच कोटींहून अधिक लोकवस्तीचा भाग व्यापला होता आणि हा सर्व प्रदेश खाणी, कारखाने, उद्योगधंदे, विद्युत्केंद्रें व गव्हाचीं सुपीक शेतें यांनीं गजबजलेला होता. जर्मनांनीं माघार घेतांना ही सर्व भूमि बेचिराख केली. या चार वर्षांत एकूण ७० लक्ष स्त्रीपुरुष ठार झाले, २ कोटि लोक जखमी झाले आणि राष्ट्रीय संपत्तीचा तिसरा हिस्सा संपत्ति नष्ट झाली असा अंदाज आहे.

शत्रूच्या तावडींतून हा प्रदेश सोडविल्या क्षणापासून आर्थिक पुनर्रचनेस प्रारंभ झाला. नष्ट झालेली साधनसंपत्ति पुन्हा निर्माण करणें हें काम महा

कठीण होतें. परतु येथेंहि योजनाबद्ध अर्थव्यवस्था हातार्शी असल्यामुळें शक्य तितक्या कमी वेळांत उद्योगधंदे, शेती व एकंदर समाजजीवन, यांची घडी बसविण्यास सुरुवात झाली आणि युद्ध संपून सहा महिने व्हावयाच्या आंत नवी (चौथी) पंचवार्षिक योजना आंखून ती अमलांत येऊं लागली.

महायुद्धांत झालेली हानि पांच वर्षांच्या आंत भरून काढून कांहीं क्षेत्रांत ज्या वर्षीं युद्धामुळें प्रगति स्थगित झाली त्या १९४० सालाच्या उत्पादनाला उल्लंघून पुढें जाणें, असा या चौथ्या पंचवार्षिक योजनेचा ( १९४६ ते ५० ) उद्देश आहे. १९५० सालीं अेकूण भांडवलाची वाढ १९४० सालाहून ८ टक्के अधिक व्हावयाची असून यासाठीं भांडवल निर्मितींत दरवर्षीं १२ टक्के वाढ आखण्यांत आली आहे. अमेरिकेंतील प्रतिगामी गटांची सोव्हिएट-विरोधी युद्धाची खटपट सुरू झाल्यामुळें सोव्हिअेटचें संरक्षण सामर्थ्य अद्यावत् आणि जय्यत ठेवणं हेंहि या योजनेचें अेक उद्दिष्ट नमूद करण्यांत आलें आहे. निरनिराळ्या क्षेत्रांतील उत्पादनाच्या वाढीचे ( १९४० पेक्षां अधिक ) संकल्पित आकडे पुढीलप्रमाणें:— एकूण औद्योगिक उत्पादन ४८ टक्के; लोखंड-पोलाद ३५ टक्के; कोळसा ५१ टक्के; वीजशक्ति ७० टक्के; यंत्रें दुपटीहुन अधिक-खाद्य व इतर उपभोग्य वस्तु पूर्वीपेक्षां ( १९४० सालापेक्षां ) थोड्या अधिक; शेतीचें उत्पादन २७ टक्के.

ही योजना आखल्याला दोन वर्षें होऊन गेलीं आहेत आणि त्यांपैकी पहिल्या वर्षाचा कार्यक्रम पार पडल्याचें जाहीर झालें आहे. कांहीं वस्तूंचें रेशनहि सुटलें आहे. युद्ध सुरू झालें नसतें, तर १९४२ सालीं पुढील दहा वर्षांसाठीं जो कार्यक्रम आखण्यांत यावयाचा होता तो कार्यक्रम १९५० सालीं हातीं घेण्यांत येअील; आणि तो सफल होण्यासाठीं आवश्यक असलेली शांतता दीर्घ काल लाभली, तर १९६० सालीं सोव्हिअेट देश पुढारलेल्या भांडवलशाही राष्ट्रांनाहि मागें टाकील असा अंदाज आहे. १९२८ सालापासून सुरू असलेल्या आर्थिक प्रगतीचा वेग पाहिला तर हा अंदाज खरा ठरेल असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं.

# नियोजनाची कार्यपद्धति : २ :

सोव्हिअेट रशियांतील आर्थिक नियोजन, त्यामध्यें निर्माण झालेले विविध प्रश्न, निरनिराळ्या पंचवार्षिक योजना आणि अल्पावधींत संपादिलेली प्रचंड आर्थिक प्रगति यांचें विवेचन मी पहिल्या प्रकरणांत केलें.

या आर्थिक योजना कोण आंखतें ? त्यांचा तपशील कसा ठरविला जातो ? त्या अमलांत आणण्यासाठीं आणि त्यांवर देखरेख करण्यासाठीं कोणत्या संस्था आहेत ? इत्यादि अनेक प्रश्न स्वाभाविकपणें उद्‌भवतात. या दुसऱ्या प्रकरणीं सामान्यपणें वरील प्रश्नांचा उहापोह केला आहे.

## राज्यघटना आणि अर्थव्यवस्था

समाजवादी अर्थव्यवस्था आणि आर्थिक नियोजन यांचा सोव्हिएट राज्यघटनेंत प्रामुख्यानें निर्देश केलेला आहे. घटनेचें पहिलें कलम पुढीलप्रमाणें आहे—" सोव्हिएट संघराज्य हें कामगार–शेतकऱ्यांचें समाजवादी राज्य आहे. " या कलमांतील समाजवादी अर्थव्यवस्थेचा आशय चौथ्या आणि सहाव्या कलमाअन्वयें अधिक स्पष्ट केला आहे. सोव्हिएट देशांत उत्पादनाचीं साधनें खाजगी मालकीचीं राहिलेलीं नाहींत; तेथें भांडवली अर्थव्यवस्था समूळ नष्ट झाली असून उत्पादनाचीं सर्व साधनें समाजाच्या मालकींची बनलीं आहेत, असें चौथ्या कलमांत

म्हटलें आहे. जमीन, खनिज संपत्ति, नद्या आणि जलाशय, अरण्यें, गिरण्या, कारखाने, खाणी, रेलवे वगैरे वाहतुकीचीं साधनें, सामायिक शेतें, इत्यादि सर्व मालमत्ता राष्ट्राच्या मालकीची म्हणजेच आम जनतेच्या मालकीची आहे असें सहाव्या कलमांत नमूद करून चौथ्या कलमाचा अर्थ अशा रीतीनें उदाहरणें घेऊन अधिक स्पष्ट केला आहे.

याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं सोव्हिएट देशांत खाजगी मालमत्ता नाहीं. वैयक्तिक आणि कौटुंबिक उपयोगांच्या सर्व वस्तूंवर त्या त्या व्यक्तींची व कुटुंबाची मालकी आहेच. सामायिक शेती करणाऱ्या शेतकऱ्याचें सामायिक शेताशिवाय स्वतःच्या मालकीचें लहानसें शेत असतें आणि सामायिक शेती करून उरलेल्या वेळांत तो तेथें स्वतःच्या श्रमानें पीक काढतो. तसेच शेतकरी आणि कारागीर यांना स्वतांच्या मालकीचीं उत्पादन साधनें वापरून ( उदा० जमीन, हत्यारें वगैरे ) केवळ स्वतांच्या श्रमावर शेती अगर व्यवसाय करण्यास कायद्यानें परवानगी आहे. मात्र त्यांनीं इतर कोणासही आपले मजूर म्हणून राबवितां कामा नये. ( घटनेंतील नववें कलम पाहा. ) पण एकंदर देशाची अर्थव्यवस्था मुख्यत्वेंकरून सामायिक मालकीवर उभी आहे.

राज्यघटना आणि प्रत्यक्ष परिस्थिति यांमध्यें पुष्कळदां कितीतरी अंतर आढळून येतें. उदाहरणार्थ, अमेरिकेच्या घटनेंत वर्णभेदाला थारा नाहीं; पण प्रत्यक्ष व्यवहारांत नीग्रो लोकांना कमालीचा वर्णभेद सहन करावा लागतो ही गोष्ट सर्वश्रुत आहे. सोव्हिएट देशाची आर्थिक वस्तुस्थिति काय दर्शविते ? एकूण उत्पादनाविषयींचे पुढील आंकडे पाहा:

| | | |
|---|---|---|
| समाजवादी पद्धतीचें उत्पादन | ... | शेंकडा ९८·७ टक्के |
| सामायिक शेतकऱ्यांनीं स्वतःच्या शेतावर केलेलें उत्पादन | ... | शेंकडा १·१ टक्के |
| व्यक्तिशः शेती अगर कारागिरी करणाऱ्यांचें उत्पादन | ... | शेंकडा ०·२ टक्के |
| एकूण उत्पादन | ... | शेंकडा १०० टक्के |

सोव्हिएट देशाची अर्थव्यवस्था केवळ घटनेंतच नव्हे तर प्रत्यक्षांतहि समाजवादीच आहे हें यावरून उघड होतें.

## नियोजनाची आवश्यकता

गिरणी खाजगी मालकीची असली तर तिच्यामधून कोणता व किती माल उत्पन्न करावयाचा हें गिरणीचा मालक ठरवितो. तो माल विकून आपणांस किती फायदा होईल याचा प्रथम हिशेब करून तो उत्पादनाची आंखणी करतो. मालकाचा फायदा हाच उत्पादनाचा मूळ हेतु असतो. समाजाची गरज हा उत्पादनामागील मूळ हेतु नव्हे. पण जमीन, गिरण्या, कारखाने वगैरे सर्व उत्पादन–साधनांची खाजगी मालकी नष्ट झाली कीं कोणत्या उत्पादन–केंद्रानें किती व कोणता माल उत्पन्न करावयाचा हें कोणी व कसें ठरवावयाचें ? अर्थात् जनतेच्या सरकारनेंच हें सर्व योजिलें पाहिजे. समाजवादी अर्थव्यवस्थेंत आर्थिक नियोजनाची कशी मूलभूत जरूरी आहे हें यावरून वाचकांच्या सहज ध्यानीं येईल.

उलट अर्थव्यवस्था बहुतांशीं खाजगी मालमत्तेवर आणि वैयक्तिक फायद्यावर आधारलेली असली तर आर्थिक नियोजन शक्यहि होणार नाहीं. प्रत्येक मालक समाजाच्या गरजांकडे लक्ष न देतां केवळ आपापल्या फायद्याकडे बघून स्वतंत्रपणें उत्पादन करणार, त्यासाठीं तो प्रति-स्पर्ध्यांशीं चढाओढ करणार. अशा परिस्थितींत एकंदर देशाचें आर्थिक नियोजन कसें शक्य होईल ? खाजगी मालकी आणि फायदा नष्ट झाला तरच समाजाच्या गरजा आणि उत्पादन यांचा मेळ घालणारें आर्थिक नियोजन अमलांत येऊं शकेल. समाजवादी अर्थव्यवस्थेंत नियोजन जसें आवश्यक आहे तसें तें शक्यहि आहे.

म्हणूनच सोव्हिएट राज्यघटनेंत आर्थिक नियोजनाचा स्पष्ट निर्देश केलेला आढळतो. घटनेच्या अकराव्या कलमांत सोव्हिएट देशाची अर्थव्यवस्था योजनाबद्ध आहे असें म्हटलें असून तिचे उद्देशहि तेथें नमूद केलेले आहेत. एकूण राष्ट्रीय उत्पादन वाढवून जनतेचें जीवन अधिकाधिक समृद्ध व सुसंस्कृत करणें आणि स्वसंरक्षणाचें सामर्थ्य वाढवून देशाचें

स्वातंत्र्य अबाधित कायम राखणें हे सोव्हिएट अर्थव्यवस्थेचे प्रमुख उद्देश आहेत.

हे उद्देश तडीस नेण्याकरितां निरनिराळ्या मुदतींच्या योजना आंखल्या जातात. दरवर्षाच्या आरंभीं पुढील वर्षाची योजना ठरविलेली असते. शिवाय पंचवार्षिक आणि त्याहूनहि दीर्घ मुदतीचे कार्यक्रम योजण्यांत येतात. पंचवार्षिक योजना आतां आपल्या चांगल्या परिचयाच्या झाल्या आहेत. लेनिननें १९२० सालीं पुरस्कारिलेली विद्युतीकरणाची योजना पंधरा वर्षांची होती. तसेंच १९३८ मध्यें आणि सध्यांहि पुढील पंधरा वर्षांच्या प्रगतीची स्थूल दिशा आंखलेली आहे. लांब मुदतीचे कार्यक्रम अर्थातच तपशिलवार तयार केलेले नसतात; उलट वार्षिक योजना अगदीं तपशील-वार ठरविलेली असते. वार्षिक योजना या दीर्घकालीन कार्यक्रमाच्या एकामागून एक येणाऱ्या पायऱ्या होत असें म्हणावयास हरकत नाहीं.

## गोस्प्लॅन उर्फ मध्यवर्ति नियोजनसमिति

या योजना कोण ठरवितें ? कोणत्याही आर्थिक योजनांचें स्थूल उद्दिष्ट ठरविण्याचें काम अर्थातच सोव्हिएट सरकारचें आहे. परंतु या उद्दिष्टांना मूर्त स्वरूप देऊन त्यांची काळजीपूर्वक तपशिलवार आंखणी करण्यासाठीं एक स्वतंत्र समिति आहे. तिला मध्यवर्ति नियोजन समिति अथवा "गोस्प्लॅन" असें नांव असून तिच्यावर सत्तर सभासद असतात. मध्यवर्ति प्रधान मंडळाच्या दोन उपाध्यक्षांपैकीं एक या योजना-समितीचा अध्यक्ष असतो, आणि त्याच्या सल्ल्यानें मंत्रिमंडळाकडून इतर सभासदांची नेमणूक होते. सभासदांमध्यें औद्योगिक व शेती विभागांतील तज्ज्ञ, शास्त्रज्ञ, सांस्कृतिक कार्यकर्ते इत्यादि निरनिराळ्या शाखांतील तज्ज्ञांचा भरणा असतो. गोस्प्लॅनच्या कामावर कोणत्याहि एका विशिष्ट खात्याचें नियंत्रण नसतें. तिचें कार्य एकंदर मंत्रिमंडळाच्या देखरेखीखालीं चालतें. योजना समितीचें काम एखाद्या खात्याच्या बाजूनें झुकूं नये यासाठीं आणखी एक खबरदारी घेण्यांत येते ती अशी कीं कोणाही सभासदानें कोठल्याहि खात्यांत अधिकाराच्या जागेवर असतां कामा नये.

किरोव, कुयबिशेव, मोलोटोव वगैरे पहिल्या प्रतीच्या सोव्हिएट नेत्यांनीं गोस्प्लॅनच्या अध्यक्षपदाचें काम केलेलें आहे हें लक्षांत आणलें कीं आर्थिक नियोजनाला सोव्हिएट देशांत केवढें महत्त्व आहे हें समजून येतें. वोझ्नेसेन्स्की हे सध्यांचे अध्यक्ष आहेत.

आर्थिक नियोजनाचें काम फक्त मध्यवर्ति नियोजन समितीच करतें असें नाहीं. सोव्हिएट संघराज्यांतील प्रत्येक स्वतंत्र राष्ट्र, स्वायत्त राष्ट्र, प्रादेशिक विभाग, जिल्हे, तालुके आणि मोठ्या वस्तीचीं शहरें या सर्वांच्या स्वतांच्या नियोजन समिती असतात. त्याशिवाय प्रत्येक खातें, औद्योगिक विभाग, मोठाले कारखाने यांच्याहि नियोजन समिती असतात. आणि त्या आपापल्या कक्षेंत नियोजनाचें कार्य करतात. त्यांची घटना व कार्यपद्धति सामान्यपणें वरीलप्रमाणेंच पण मर्यादित स्वरूपाची असते; आणि त्यांवर त्याहून वरिष्ठ समितीचें नियंत्रण असतें. एकावर एक चढत जाणाऱ्या या समितींची गोस्प्लॅन ही सर्वांत वरिष्ठ समिति आहे.

गोस्प्लॅनचे अनेक विभाग व उपविभाग करण्यांत आले आहेत; आणि त्या प्रत्येकाकडे अर्थव्यवस्थेंतील एकेका विभागाचें नियोजन सोंपविण्यांत आलेलें असतें. या विभागांचे तीन प्रकार आहेत: — ( १ ) निरनिराळीं खातीं, प्रादेशिक विभाग वगैरेंच्या स्वतांच्या नियोजन समितींचा उल्लेख वर आला आहे. त्यांच्या कार्यांचा मेळ घालून त्यांत सूत्रबद्धता आणण्याचें काम पहिल्या प्रकारचे विभाग करतात. ( २ ) रेल्वे, शेती, रासायनिक कारखाने वगैरे अर्थव्यवस्थांच्या निरनिराळ्या शाखांचे विभाग दुसऱ्या प्रकारांत मोडतात. ( ३ ) संरक्षण, आरोग्य, वगैरे कांहीं खास विभागांचा तिसऱ्या प्रकारांत समावेश होतो. या विभागांशिवाय मध्यवर्ति जमाखर्च खातें, आर्थिक संशोधन संस्था आणि आर्थिक नियोजन महासभा, या तीन संस्थांचा गोस्प्लॅनमध्यें अंतर्भाव होतो.

गोस्प्लॅनचा हा प्रचंड व्याप उरकण्यासाठीं केवढा मोठा तज्ज्ञ अधिकारी वर्ग आणि इतर नोकरवर्ग लागत असेल याची कल्पनाच केलेली वरी. शास्त्रज्ञ, यंत्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, शेतीतज्ज्ञ, इत्यादि हजारांनीं मोजण्या-

जोगा तज्ज्ञवर्ग यासाठीं खपत असतो. कारकून, शिपाई वगैरे इतर नोकरवर्ग याच प्रमाणांत मोठा असणार हें उघड आहे. मॉस्को येथें गोस्प्लॅनची एक अवाढव्य कचेरी आहे.

## नियोजन समितीचें कार्य

एकंदर देशाच्या आर्थिक प्रगतीसाठीं दीर्घकालीन, वार्षिक, तिमाही आणि ( कित्येक बाबतींत ) मासिक योजना आंखून त्या मध्यवर्ति मंत्रिमंडळाच्या पसंतीसाठीं मांडणें असें गोस्प्लॅनच्या कार्याचें स्वरूप आहे. यासाठीं निरनिराळीं खातीं आणि घटक राष्ट्रें यांनीं सुचविलेल्या आर्थिक योजनांचें परीक्षण करून गोस्प्लॅन त्यासंबंधींची आपलीं मतें व निष्कर्ष मंत्रिमंडळापुढें ठेवते, आणि या सर्व आर्थिक योजना आपल्या राष्ट्रव्यापी आर्थिक योजनेंत समाविष्ट करते. असें करतांना अनेक गोष्टी लक्षांत घ्याव्या लागतात. एकंदर देशाची तसेंच त्यांतील प्रत्येक प्रादेशिक विभागाची अधिकांत अधिक प्रगति व्हावी, आणि ही प्रादेशिक प्रगति शक्यतों त्या त्या प्रदेशांतील कोळसा, तेल, वीज वगैरे शक्ति आणि तेथें उपलब्ध असलेला कच्चा माल यांवर आधारलेली असावी असा कटाक्ष वाळगण्यांत येतो. नव्या गिरण्या, कारखाने उभारतांना कच्चा माल आणि तयार माल यांची व्यर्थ नेआण टळावी आणि अशा रीतीनें तो तो प्रदेश शक्यतां स्वयंपूर्ण होऊन वाहतुकीवर जादा भर पडूं नये अशी खबरदारी घ्यावी लागते. तसेंच अर्थव्यवस्थेच्या विविध शाखांचा एकमेकांशीं मेळ घातला जावा व प्रगतीचा वेग सर्वत्र प्रमाणशीर असावा, कोठें फार कमी तर कोठें फार अधिक, असा होऊं नये ही गोष्टहि साधावी लागते.

मध्यवर्ति सरकाराच्या पसंतीस पडणारी आर्थिक योजना तयार केल्यानें गोस्प्लॅनचें काम संपत नाहीं. योजना अमलांत आल्यावर त्यावर देखरेख करण्याचें कामहि तिचेंच आहे. देखरेख करतांना उद्भवलेले प्रश्न आणि त्यांसंबंधींच्या आपल्या सूचना ती वेळोवेळीं मंत्रिमंडळापुढें ठेवते आणि त्या अनुरोधानें मंत्रिमंडळाकडून योग्य ती तजवीज होते. प्रादे-

शिक विभाग आणि निरनिराळीं खातीं आपल्या योजना कशा पार पाडीत आहेत हें पाहण्यासाठीं गोस्प्लॅनने त्या त्या ठिकाणीं आपले निरीक्षक अधिकारी नेमलेले असतात. तसेंच याकरितां जरूर असलेली सर्व माहिती आणि खुलासा त्या त्या खात्यांकडे मागण्याचा गोस्प्लॅनला अधिकार आहे.

विविध प्रादेशिक आणि इतर नियोजन समितींनीं गोस्प्लॅनच्या निर्णयांना अनुसरून आपलें काम करावयाचें असतें. या नियोजन समितींचें आपापल्या क्षेत्रांतील कार्य आणि अधिकार सामान्यपणें गोस्प्लॅन-सारखेच असतात. गोस्प्लॅन आणि तिच्या हाताखालच्या प्रादेशिक व इतर नियोजन समिति यांजमध्यें नियोजनाच्या कार्याची विभागणी कशी होते हें पुढील उदाहरणांवरून स्पष्ट होईल. मॉस्को–व्होल्गा कालवा अथवा विमानांचा मोठाला कारखाना बांधावयाचा झाला तर त्यांचें महत्त्व प्रादेशिक नसून राष्ट्रीय स्वरूपाचें असणार; अर्थात हें योजावयाचें काम गोस्प्लॅनचें. परंतु शाळांची संख्या वाढवावयाची असली तर त्याची योजना त्या त्या प्रदेशाकडून व्हावयास पाहिजे; कारण त्यांनाच आपल्या गरजा अधिक माहीत असणार. एकूण देशाची संकल्पित प्रगति ध्यानांत घेऊन उपलब्ध असलेल्या शालेय साहित्याची त्या त्या प्रदेशाच्या गरजे-नुसार विभागणी करणें हें काम मात्र पुन्हा गोस्प्लॅनलाच करावें लागतें. थोडक्यांत सांगावयाचें तर सर्व शाखांतील प्रगतीचा मेळ घालून त्यांना मार्गदर्शन करणें आणि त्यांत एकसूत्रीपणा आणणें हें काम गोस्प्लॅनचें; आणि आपापल्या क्षेत्रांतील प्रगतीच्या योजना सुचवून शेवटीं ठरविण्यांत आलेल्या योजना पार पाडावयाचें काम प्रादेशिक व इतर नियोजन समितींचें; अशी ही वांटणी आहे. मागासलेल्या प्रदेशांना आपल्या बरोबरीस आणण्यासाठीं पुढारलेल्या प्रदेशांचें साहाय्य मिळणें ही गोष्ट या केंद्रीय सूत्रबद्धतेमुळेंच शक्य होतें.

## वार्षिक योजना कशी ठरते ?

पुढील वर्षाची आर्थिक योजना कशी ठरविण्यांत येते हें आतां आपण

पाहूं. नवा कार्यक्रम योजावयाचा तो सध्यांच्या आर्थिक बलावरच उभा-रला पाहिजे; म्हणून देशाच्या सध्यांच्या परिस्थितीचें सूक्ष्म व तपशील-वार ज्ञान गोस्प्लॅनला असणें जरूर आहे. चालू वर्षाची आर्थिक योजना पार पडत असल्यासंबंधीची माहिती व आंकडे गोस्प्लॅनकडे वेळोवेळीं येत असतात; त्यामुळें निरनिराळ्या उद्योगकेंद्रांतील यंत्रसामग्री, कामगार-वर्ग, कच्चा माल व तयार माल इत्यादींचें सर्व ज्ञान गोस्प्लॅनला असतें; इतकेंच नव्हे, तर त्याचा व्याप किती व कोणत्या दिशेनें वाढवितां येणें शक्य आहे आणि त्याकरितां कोणत्या गोष्टींची तरतूद करावी लागेल याचाहि सामान्य अंदाज गोस्प्लॅनला करतां येतो. अशाप्रकारें सद्यःपरिस्थितीचें ज्ञान आणि शक्य असलेल्या प्रगतीचा अंदाज हीं हस्तगत झालीं. पण एवढ्यानें नियोजनाची पूर्वतयारी पुरी होत नाहीं. पुढील वर्षाच्या आर्थिक प्रगतीची दिशा कोणती, उद्दिष्टें कोणतीं, हें ठरविल्याशिवाय योजना आंखतां येत नाहीं. सध्यांच्या माहितीवरून पुढील वर्षाच्या उत्पादनाचे अंदाज काढणें म्हणजे आर्थिक नियोजन नव्हे. नियोजन म्हणजे ठरविक उद्दिष्टांसाठीं सध्याच्या साधनसामग्रीचा उपयोग कोणत्या प्रकारें करावा हें सांगणें. म्हणून प्रथम योजनेचीं उद्दिष्टें ठरविलीं पाहिजेत.

गोस्प्लॅन ही तज्ञांची समिति आहे; देशाच्या भावी प्रगतीचीं उद्दिष्टें ठरविण्याचें काम तिच्याकडे सोपविलेलें असणें शक्य नाहीं. मग हीं उद्दिष्टें कोण ठरवितें ? अर्थात् जनतेनें निवडून दिलेलें मध्यवर्ति सोव्हिएट सरकार. अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय परिस्थिति लक्षांत घेतां पुढील वर्षीं कोणत्या शाखांत अधिक प्रगति झाली पाहिजे, कोणत्या वस्तूंचें उत्पादन अधिक आवश्यक आहे याविषयींचे आपले निर्णय मध्यवर्ति प्रधान मंडळ गोस्प्लॅनला कळवितें, आणि आर्थिक क्षेत्रांतील सद्यःपरि-स्थिति आणि हीं उद्दिष्टें यांचा मेळ घालून गोस्प्लॅन नवी आर्थिक योजना आंखते. जुन्या उद्योगकेंद्रांचा व्याप किती वाढवावयाचा, नवीं उद्योग-केंद्रें कोणतीं व कोणत्या प्रकारचीं उभारावयाचीं, त्यासाठीं आवश्यक असलेलें मनुष्यबळ आणि साधनसामग्री कशी मिळवावयाची याविषयींच्या

योजना गोस्प्लॅन तयार करते. प्रधानमंडळानें ठरविलेलीं उद्दिष्टें अशा रीतीनें मूर्त स्वरूपांत अवतरतात.

## ताळेबंदी ( Method of Ballances )

हें कार्य अर्थातच सोपें नाहीं. अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या विभागांच्या उत्पादनाचें प्रमाण प्रथम ठरवावें लागतें; त्याकरितां उपलब्ध साधनसामग्री, कच्चा माल आणि मनुष्यबळ यांची वांटणी कोणत्या प्रमाणात करावयाची हेंहि ठरविणें भाग आलें. यासाठीं निरनिराळे ताळेबंद ( Balances ) तयार करण्यांत येतात. ताळेबंदांचे चार स्थूल प्रकार करतां येतील. ( १ ) कच्चा माल ( धातु, धान्य, कापूस, लाकूड वगैरे ); ( २ ) जळण, ( कोळसा, तेल, पीट ( Peat ), जळाऊ लांकूड, वीज इत्यादि ); ( ३ ) उपभोग्य वस्तु ( मांस, स्निग्ध पदार्थ, साखर, कापड, वगैरे ) आणि ( ४ ) श्रमशक्ति ( मनुष्यबळ ), पैसा, पगार वगैरे. या सर्व वस्तु कशा पैदा करावयाच्या आणि त्यांच्या एकूण संचयाची वांटणी कशी करावयाची हें ठरविण्यासाठीं यापैकी प्रत्येक वस्तूचें उत्पादन आणि व्यय यांचे ताळेबंद तयार करावे लागतात. उदाहरणार्थ, सर्व देशासाठीं म्हणून धान्य या वस्तूचा ताळेबंद पुढीलप्रमाणें असेल.

| संचय | व्यय |
|---|---|
| १ वर्षारंभीची शिल्लक; यापैकी— | १ लागवडीसाठीं— |
| ( अ ) शेतीधंद्यांत, | ( अ ) बीं–बियाणें, |
| (आ) कारखान्यांच्या कोठारांत, | ( आ ) जनावरांसाठीं खाद्य, |
| (इ) व्यापारी संस्थांच्या कोठारांत. | २ कारखान्यांच्या उपयोगासाठीं, |
| २ वर्षाचें नवें पीक ( प्रदेशाप्रमाणें ) | ३ जनतेच्या उपयोगासाठीं— |
| ३ एकूण धान्यसंचय | ( अ ) शेतकरी वर्ग, |
| | ( आ ) कामगार व इतर वर्ग, |
| | ( इ ) इस्पितळें वगैरे संस्था, |
| | ४ आयात-निर्यात व्यापारासाठीं, |
| | ५ एकूण व्यय |

वर्षअखेरीची शिल्लक:—
( १ ) शेतीधंद्यांत
( २ ) कारखान्यांच्या कोठारांत व
( ३ ) व्यापारी संस्थांच्या कोठारांत

असे ताळेबंद केवळ सर्व देशासाठीं करून चालणार नाहीं. निरनिराळे प्रादेशिक विभाग, निरनिराळे उद्योगधंदे, अर्थव्यवस्थेच्या विविध शाखा या सर्वांसाठीं असे ताळेबंद करावे लागतात. हें काम किती गुंतागुंतीचें असेल याची कल्पना केली कीं प्रादेशिक व विविध शाखा व उद्योगधंदे यांच्या योजना यांचा एकमेकांशीं मेळ घालून एकसूत्री राष्ट्रीय आर्थिक योजना करणें ही गोष्ट सोपी नाहीं हें सहज ध्यानांत येईल. गोस्प्लॅन आणि विविध नियोजन समिती यांचा फार मोठा व्याप असतो, याचा उल्लेख मागें आला आहे; तसें कां याचें कारण आतां चटकन् उमगूं शकेल.

## तज्ज्ञसत्ता नव्हे, लोकसत्ताच !

गोस्प्लॅन आपण ठरविलेल्या योजनेचा आराखडा आपल्या हाता-खालच्या प्रादेशिक नियोजन समिती आणि विविध शाखांच्या समिती यांजकडे विचारासाठीं पाठविते. या समिती त्यांत अवश्य तो तपशील धरून आणि फेरफार सुचवून स्वतःच्या अधिकाराखालील उत्पादन-केंद्रांच्या योजनाधिकाऱ्यांकडे पाठवितात; आणि अशा रीतीनें राष्ट्रीय योजनेच्या आराखड्यांतील त्यांच्या वांट्याचा भाग त्या त्या उत्पादन-केंद्रांपर्यंत जाऊन पोंचतो. त्या उत्पादनकेंद्रांत राबणाऱ्या सर्वांची सभा होऊन तेथें या योजनेवर मोठ्या उत्साहानें चर्चा होते, दुरुस्त्या सुच-विल्या जातात आणि अखेर त्या उत्पादनकेंद्राकडून मूळ योजनेंत स्वतःच्या सूचना घालून एक प्रतियोजना (Counter Plan) सुचवि-ण्यांत येते. प्रतियोजना तयार करतांना अनेक कारखाने आपल्या उत्पादनांत फेरफार ( बहुधा योजनेपेक्षां अधिक वाढ ) सुचवितात. या प्रतियोजना वरवर जात जात शेवटीं गोस्प्लॅन समितीकडे त्या सर्वांचा संकलित खर्डा पाठविण्यांत येतो. प्रधान मंडळानें घालून दिलेलीं उद्दिष्टें

डोळ्यांसमोर ठेवून गोस्प्लॅन वरील सर्व प्रतियोजनांचा काळजीपूर्वक विचार करते आणि योजनेचा नवा दुरुस्त खर्डा तयार होतो. तो प्रधानमंडळाच्या संमतीसाठीं सादर केला जातो. प्रधानमंडळ आणि गोस्प्लॅन यांची त्यावर संयुक्त चर्चा होते. आपलीं उद्दिष्टें नीटपणें आंखण्यांत आलीं नाहींत असें वाटल्यास प्रधानमंडळ या खर्ड्यांत दुरुस्त्या सुचवितें आणि आर्थिक योजना अखेरच्या स्वरूपांत तयार होते. याप्रमाणें योजना तयार करतांना आम जनतेच्या क्रियाशीलतेस आणि कल्पनांना पुरेपूर वाव मिळतो आणि लोकनियुक्त सरकारनें ठरविलेल्या उद्दिष्टांना तिच्याचकडून शेवटचा शिक्कामोर्तब होऊन अखेरचें मूर्त स्वरूप मिळतें. याचाच अर्थ असा कीं सोव्हिएट आर्थिक नियोजन तज्ज्ञसत्ताक नसून लोकसत्ताकच आहे. पण नियोजनाच्या कामीं तज्ज्ञांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग करून घेतला जातो आणि त्यामध्यें आवश्यक असें एकसूत्रीकरण साधलेलें आहे.

## विविध क्षेत्रांतील नियोजन

अर्थव्यवस्थेच्या विविध विभागांचें नियोजन करतांना त्यांचे विशेष लक्षांत घेणें जरूर असतें. एखाद्या औद्योगिक विभागाचें नियोजन करतांना प्रथम त्याची सध्यांची उत्पादन-शक्ति, तिचा अधिक उपयोग होण्याची शक्यता आणि संभाव्य वाढ यांची संपूर्ण माहिती असली पाहिजे. तसेंच या औद्योगिक विभागाच्या विविध उद्योग-केंद्रांना जरूर असलेला कच्चा माल, जळण आणि श्रमशक्ति यांचा अंदाज काढणें आवश्यक असतें. नवीन कारखाने बांधावयाचे तर ते किती मोठे व कोणत्या ठिकाणीं बांधावयाचे व त्यांची तरतूद कशी करावयाची हेंहि ठरविलें पाहिजे. या दोन्ही बाबतींत पूर्वीं आलेले अनुभव जमेस धरून नव्या योजना आंखावयाच्या असतात. उद्योगधंद्यांची वाढ करतांना देशाची व त्यामधील निरनिराळ्या प्रदेशांची गरज, तसेंच वाढती लोकसंख्या यांचा विचार प्रथम करावा लागतो.

शेतीव्यवस्थेच्या नियोजनांत मुख्य भर लागवडीखालील जमीन वाढविणें आणि दरएकरीं पीक वाढविणें या दोन गोष्टींवर असतो.

उत्तमोत्तम सामुदायिक शेतांवर आलेले अनुभव आणि शेतीतज्ज्ञांचा सल्ला यांची या कामीं बहुमोल मदत होते. प्रत्येक सामुदायिक शेतानें आपली उत्पादन-योजना आंखलेली असते. सामुदायिक शेतांची सर्व व्यवस्था जरी स्वतः शेतकरींच पाहत असले तरी धान्याच्या भागाचें नियंत्रण करून अप्रत्यक्षपणें शेतीचें नियोजन करणें शक्य असतें. कारण शेतकऱ्यांच्या स्वतांच्या गरजा भागवून राहिलेल्या धान्यापैकीं शेंकडा नव्वद टक्के धान्य सरकार स्वतांच निरनिराळया रूपानें ठराविक भावानें विकत घेतें. अशा प्रकारें योजना सुचवून प्रत्यक्षपणें आणि भावनियंत्रण करून अप्रत्यक्षपणें सरकारला शेतीचें नियोजन अंमलांत आणतां येतें. शिवाय शेतीयंत्रांचीं केंद्रें (Machine tractor stations) आसपासच्या शेतांना यांत्रिक साधनें पुरवून शेतीला मदत करतात. तीं केंद्रें सरकारी असल्यामुळें शेतीचें नियोजन व नियंत्रण करणें अधिकच सुलभ होतें.

आर्थिक योजनेचा एक अतिशय महत्त्वाचा भाग म्हणजे शहरी लोकवस्तीला धान्य वगैरे शेतांत पिकणाऱ्या जिनसांचा पुरवठा करणें आणि कारखान्यांत तयार झालेल्या मालाचा सर्व जनतेला पुरवठा करणें हा होय. याचाच अर्थ असा कीं व्यापाराचें नियोजन केलें पाहिजे. सोव्हिएट देशाचा परदेशांशीं असलेला आयात आणि निर्यात व्यापार सर्वस्वीं सरकारच्या हातीं आहे. राष्ट्रीय प्रगतीस आवश्यक असलेलीं यांत्रिक साधनें व इतर महत्त्वाच्या वस्तू खरीद करून त्याबदला जरूर तेवढा कच्चा वा तयार माल परदेशीं पाठविण्यांत येतो. याचा उल्लेख मागें आलाच आहे.

अंतर्गत व्यापार तीन तऱ्हांनीं चालतो : (१) सरकारी व्यापार खातें, (२) सहकारी व्यापार संस्था व (३) सामुदायिक शेतांवरील खुला व्यापार. १९३९ सालीं या तीन प्रकारच्या देवघेवीचे आंकडे अनुक्रमें ११,४२०, ४,९२० आणि ३,००० कोटि रुबल असे होते. यावरून खुल्या व्यापाराचें प्रमाण किती कमी आहे हें उघड होईल. यामुळेंच व्यापाराचीं सूत्रें नियोजित पद्धतीनें चालविणें शक्य होतें. मालाच्या किमती ठरविणें, त्यांची निरनिराळया प्रदेशांच्या गरजांनुसार विभागणी करणें, कोणत्या

कारखान्याचा माल सामान्यपणें कोणत्या प्रदेशांत जावयाचा हें ठरविणं इत्यादि गोष्टींची दखल व्यापाराचें नियोजन करतांना घ्यावी लागते.

नवे कारखाने उभारावयाचे किंवा जुन्या कारखान्यांचे उत्पादनांत वाढ करावयाची म्हणजे नवा कामगार-वर्ग उभा केला पाहिजे. श्रम-शक्तीचें नियोजन केल्याशिवाय कोणतीहि आर्थिक प्रगतीची योजना पुरी होणार नाहीं. लोकसंख्येंत दरवर्षी वाढ होत असल्यामुळें उपलब्ध श्रमशक्तीहि वाढत असते. पण तिचा उपयोग होण्यासाठीं ग्रामीण विभागांत जादा असलेल्या श्रमशक्तीचा ओघ कारखान्याकडे वळवावा लागतो. तसेंच आधुनिक यंत्रसाधनांनीं सज्ज अशा कारखान्यांत काम करावयाचें तर कामगारांना किमान यांत्रिक शिक्षणहि मिळालेलें असलें पाहिजे. खेड्यांतून नवा कामगार–वर्ग मिळविणें आणि त्याला यांत्रिक शिक्षण देणें या दोन्ही गोष्टींची योजना करावी लागते. कामगार ही कांहीं कच्च्या मालाप्रमाणें वाटेल तिकडे नेतां येणारी वस्तु नाहीं. अर्थातच शेतकरी तरुण आपण होऊन उद्योगधंद्याकडे वळावेत याकरितां नवे कारखाने त्या त्या प्रदेशांत उघडण्यांत येतात. तसेंच शिक्षण, पगार, सवलती इत्यादि साधनेंहि त्यांचें मन वळविण्यासाठीं योजिलीं जातात. अगदीं दूरच्या प्रदेशांत उघडलेल्या खाणी कारखान्यांत काम करण्यासाठीं तरुणांच्या देशाभिमानास आवाहन करण्यांत येतें. अशा तऱ्हेनें हा महत्त्वाचा प्रश्न सोडविला जातो.

केवळ आर्थिक प्रगति हें सोव्हिएट समाजाचें उद्दिष्ट नाहीं. भौतिक व सांस्कृतिक जीवनाचा विकास हें त्यांचें ध्येय आहे. म्हणून आरोग्य, शिक्षण, करमणूक, सांस्कृतिक सुखसोयी इत्यादि बाबतींतहि राष्ट्रीय योजना आंखण्यांत येते. शाळांच्या संख्येंत किती वाढ करावयाची, शिक्षणाचा दर्जा कसा वाढवावयाचा, शिक्षक कसे व किती तयार करावयाचे इत्यादि गोष्टींचा शैक्षणिक योजनेंत समावेश होतो. तसेंच सिनेमा, नाट्यगृहें, ग्रंथालयें, ग्रंथप्रकाशन, क्लब, विश्रांतिस्थानें, दवाखाने, इस्पितळें, क्रीडामंदिरें इत्यादि सुखसोयींची प्रगतीहि पूर्वनियोजित तऱ्हेनें साधण्यांत येते.

शास्त्रीय प्रगतीसंबंधानें तीच गोष्ट म्हणतां येईल. आर्थिक प्रगतीसाठीं शास्त्रीय संशोधनाची किती निकडीची जरूरी आहे हें सोव्हिएट देशांत पूर्णपणें ओळखण्यांत आलेलें आहे. निसर्गावर अधिकाधिक प्रभुत्व मिळवून जीवन समृद्ध करणें ही त्यांची आकांक्षा आहे. अर्थात् शास्त्राभ्यास आणि संशोधन यांमधील प्रगतीला आर्थिक योजनेंतील एक प्रमुख अंग समजण्यांत येतें.

नवे कारखाने, विद्युत् केंद्रें, कालवे, रस्ते, रेलवे, इमारती इत्यादि कायम स्वरूपाची साधनसंपत्ति निर्माण करणें हा आर्थिक योजनेचा अतिशय महत्त्वाचा भाग आहे यांत शंका नाहीं. त्या त्या वेळीं ठरविलेल्या उद्दिष्टांप्रमाणें या नव्या भांडवलनिर्मितीचे कार्यक्रम हातीं घेण्यांत येतात. असें करतांना ही नव्या भांडवलाची निर्मिति आणि सध्यां आवश्यक असलेल्या उपभोग्य वस्तु यांमध्यें उपलब्ध श्रमशक्ति आणि साधनसामुग्री यांची विभागणी करावी लागते. याचा उल्लेख पहिल्या प्रकरणांत आला आहे. त्या वेळची परिस्थिति व गरज ध्यानांत घेऊन ही वांटणी करण्याचें काम अर्थात गोसूप्लॅनचें आहे; आणि प्रत्येक वार्षिक योजना आंखतांना ही गोष्ट प्रथम करावी लागते.

## द्रव्ययोजना

सोव्हिएटमधील प्रचंड आर्थिक योजना पाहिल्या कीं पुढील प्रश्न तात्काळ आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो. एवढ्या मोठ्या योजनांना लागणारा पैसा कसा व कोठून आणतात? भांडवली अर्थव्यवस्थेंत नवा कारखाना उभारावयाचा म्हटला कीं त्यासाठीं पैशाची जमवाजमव करावी लागते; इतकेंच नव्हे तर कारखान्यांत तयार झालेला माल बाजारांत विकला जाण्यासाठीं लोकांजवळ क्रयशक्ति आहे कीं नाहीं याचाहि विचार करणें भाग असतें. म्हणून पैसा हा भांडवली अर्थव्यवस्थेचा एक मूलभूत आधार होऊन राहतो. परंतु योजनाबद्ध अर्थव्यवस्थेंत खाजगी मालकी आणि फायदा यांचें अस्तित्व नष्ट झाल्यामुळें लोकांच्या गरजा भागविण्यासाठीं उत्पादन असें तिचें स्वरूप असतें. या व्यवस्थेंत उपलब्ध

साधनसामुग्री आणि श्रमशक्ति यांची विभागणी आणि त्यापासून व्हाव-याचें उत्पादन या गोष्टी प्रथम ठरल्या कीं पैशाचा प्रश्न त्या अनुरोधानें सोडविण्यांत येतो. ह्याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं आर्थिक योजनेंत पैशाला फारसें महत्त्व नाहीं; पण मुख्य गोष्ट उत्पादनयोजना ही असून द्रव्य-योजना ही दुय्यम दर्जाची असते. द्रव्ययोजना हा आर्थिक योजनेचाच एक भाग म्हणून आखलेली असते. तिचा विचार पुढील प्रकरणांत स्वतंत्रपणें केला आहे.

सोव्हिएट देशांत बँका आणि त्यांचे व्यवहार सरकारी मालकीचे आहेत; स्टेट बँक ही सर्वांत मोठी बँक असून त्याशिवाय कांहीं लहान लहान बँका आहेत. स्टेट बँक आणि फडणिशी खातें या दोन्ही संस्था एकमेकांच्या पूर्ण सहकार्यानें काम करतात, आणि त्यांच्या मदतीनें गोसप्लॅन समिती आर्थिक योजनेंतील पैशांच्या विभागाची योजना करते.

या सर्व गोष्टी वर्षअखेरीच्या शेवटच्या दोन तीन महिन्यांत पार पडतात आणि नव्या वर्षाच्या सुरुवातीपूर्वी त्यांच्यासाठीं तयार झालेली आर्थिक योजना ज्या त्या उत्पादन—केंद्रांच्या हातीं पडते. मग ती योजना पुढील वर्षांत पार पाडणें हें त्याचें आवश्यक कर्तव्य होऊन राहतें. * या योजना अमलांत आणण्याची जबाबदारी त्या त्या उत्पादन-केंद्राची, औद्योगिक विभागांची, खात्यांची वा प्रादेशिक सरकारची असते. हें काम गोसप्लॅन अथवा तिच्याखालच्या समितीकडे नाहीं.

---

* सोव्हिएट नियोजन कसें बंधनकारक आहे, भांडवली नियोजना-प्रमाणें केवळ अंदाजवजा नाहीं, हें स्तालिनच्या पुढील उताऱ्यावरून स्पष्ट होईल : "आपल्याप्रमाणें तेहि (भांडवलदार) आर्थिक नियोजना-सारखें कांहीं तरी ठरवितात, ही गोष्ट खरी; पण त्यांच्या योजना म्हणजे भाकितासारख्या अथवा अंदाजवजा असतात. त्या पार पाड-ण्याचें कोणावरहि बंधन नसतें; आणि अशा योजनांच्या साहाय्यानें देशाची अर्थव्यवस्था चालविणें शक्य नसतें. आपली तऱ्हा अगदीं वेगळी आहे. आपल्या योजना म्हणजे भाकितें अथवा अंदाज नसतात

## देखरेख आणि मार्गदर्शन

परंतु गोसूप्लॅनचें कार्य येथें संपत नाहीं. योजना अमलांत आणण्याची जबाबदारी गोसूप्लॅनवर नसली तरी ती पार पडत असतांना तिच्यावर देखरेख ठेवण्याची आणि मार्गदर्शन करण्याची जबाबदारी तिच्यावरच असते. उत्पादनावर नियंत्रण ठेवण्यासाठीं आणि एकंदरींत राष्ट्रीय प्रगति योग्य दिशेनें होत आहे हें पाहण्यासाठीं असें करणें आवश्यक असतें. योजना अमलांत येत असतांना प्रत्यक्ष परिस्थितीमुळें तिच्यांत कोणते फेरफार करणें इष्ट आहे आणि ते सत्वर कसे करतां येतील या गोष्टी अतिशय महत्त्वाच्या आहेत हें कोणाच्याहि सहज ध्यानांत येईल. कारण योजनेचा तपशील कितीहि बिनचूक ठरविलेला असला तरी इतक्या गुंतागुंतीच्या व प्रचंड व्यापाच्या कार्यांत कांहीं चुका होणें अगदीं संभवनीय असतें. शिवाय दुष्काळ, महापूर, अपघात वगैरे अदृष्ट घटनांमुळें नियोजित कार्यक्रमांत आयत्यावेळीं बदल करणें अपरिहार्य होऊन बसतें. त्यांची ताबडतोब दखल घेऊन त्यांवर ताबडतोब उपाय योजणें हें काम गोस्प्लॅनचें आहे. तसेंच आंतरराष्ट्रीय परिस्थितींत एकाएकीं बदल घडून आला ( उदा० युद्धाचा धोका निर्माण झाला, अथवा बाहेरच्या जगांत आर्थिक अरिष्ट ओढवून त्याचा सोव्हिएटच्या व्यापारावर परिणाम झाला ) तर त्याप्रमाणें आर्थिक योजनेंत फेरफार करणें भाग असतें. ही जबाबदारी अर्थात् गोस्प्लॅनवरच असते.

कित्येक वस्तूंच्या उत्पादनांत कधीं अनपेक्षित घट उत्पन्न होते, तर अनेक उद्योगकेंद्रांत आपलें नियोजित उत्पादन पार पाडून शिवाय अधिकांक गांठण्याची अहमहमिका चालू असते. याकरितां योजनेंतच कांहींसा वाव ठेवणें

---

३८ पानावरून टीप चालू ]
( उद्योगकेंद्रांच्या ) अधिकारी वर्गाला दिलेले ते बंधनकारक आदेश असतात आणि एकंदर देशाची प्रगति साधण्याच्या बाबतींत ते निर्णायक ठरतात. या दोन प्रकारच्या योजना तत्त्वतःच वेगळया आहेत हें सहज ध्यानीं येईल—" ( स्तालिन )

जरूर असतें; नाहीं तर या वढीमुळें अथवा वाढीमुळें त्या वस्तूचा आणि तिच्यासाठीं लागणाऱ्या साधनसामुग्रीचा ताळेबंद एकदम कोसळावयाचा. योजनेंत असलेला हा वाव जमेस धरूनहि अगदीं अनपेक्षितपणें एखाद्या वस्तूंत एखाद्या कारखान्यांत घट आली तर ताबडतोब त्या अथवा तत्सम वस्तूंच्या इतर कारखान्यांत ताबडतोब वाढ होण्याची सूचना केली जाते. उलट एखादा जिन्नस अनपेक्षितपणें अधिक निर्माण होऊं लागला तर त्या शाखेंतील साधनसामुग्री व श्रमशक्ति इतर जिनसांच्या उत्पादनाकडे वळवितां येते. या सर्व सूचना व फेरफार गोस्प्लॅन व इतर योजना-समिती करतात.

केवळ वस्तूंच्या नियोजित संख्येनें उत्पादन साधल्यानें भागत नाहीं, तर तिची प्रतहि नियोजित गुणाची असली पाहिजे. दर दिवशीं ठरल्याप्रमाणें हजार मोटार गाड्या तयार केल्या खऱ्या पण त्या जर चांगल्या दर्जाच्या नसतील तर ती योजना पार पडली असें कसें म्हणतां येईल ? तेव्हां उत्पादित वस्तूंचा गुणात्मक दर्जा सांभाळावयाची जबाबदारीहि गोस्प्लॅनकडे सोंपविलेली आहे. याच हेतूनें जीं उद्योगकेंद्रें आपली योजना उत्तम रीतीनें पार पाडीत आहेत त्यांच्या कार्यपद्धतींचे विशेष संकलित करून इतरांच्या माहितीसाठीं पाठविण्यांत येतात; मागासणाऱ्या केंद्रांना याचा अतिशय फायदा होतो.

दैनंदिन व्यवहारांत येणाऱ्या अडचणी दूर करणें, कच्चा माल अथवा साधनसामग्री कमी पडल्यास तिचा पुरवठा करणें, प्रमाणाबाहेर अथवा प्रमाणापेक्षां कमी उत्पादन झाल्यास त्यावर उपाय योजणें, जनतेला तयार माल सतत मिळत राहण्याची व्यवस्था करणें, या सर्व व्यवहारांचा एकमेकाशीं मेळ घालून सूत्रबद्धता राखणें इत्यादि कार्य गोस्प्लॅन व इतर योजना–समिती वर्षभर सतत करीत राहतात. या कार्यांत येणाऱ्या विशेष अडचणी आणि त्यांवरून निघणारे निष्कर्ष यांवर गोस्-प्लॅन आणि प्रधानमंडळ यांजमध्यें नेहमीं विचारविनिमय होत असतो; आणि जरूर तेथें प्रधानमंडळाकडून मार्गदर्शन करण्यांत येतें.

गोस्प्लॅनला हें कार्य नीट रीतीनें पार पाडतां यावें यासाठीं निर-

निराळीं उद्योगकेंद्रें, खातीं, प्रादेशिक सरकारें यांजकडून योजनेच्या अंमलबजावणीसंबंधानें वेळोवेळीं अहवाल येत असतात. कित्येक मोठाल्या केंद्रामधून दररोज अहवाल पाठविण्यांत येतो. शिवाय प्रत्यक्ष परिस्थिति त्या त्या जागीं राहून अवलोकन करण्यासाठीं गोस्प्लॅननें आपले अधिकारी नेमलेले असतात. लागेल ती सर्व माहिती त्यांना पुरवलीच पाहिजे असें सर्व संस्थांवर बंधन आहे; यामुळें गोस्प्लॅनच्या मध्यवर्ति कचेरीला देशाच्या आर्थिक प्रगतीचें दैनंदिन चित्र उभें करतां येतें.

ही सर्व आंकडेवारी संकलित करून व्यवस्थितपणें मांडण्यासाठीं व तिच्यावरून योग्य ते निष्कर्ष काढण्यासाठीं आंकडेशास्त्रज्ञांची (Statistitians) भली मोठी फौज जरूर असणार हें उघड आहे. गोस्प्लॅनतिच्या उपसमिती आणि निरनिराळीं खातीं यांमध्यें मिळून हजारो आंकडेशास्त्रज्ञ या कामीं खपत असतात. त्या सर्वांचा उत्पादनकेंद्रांशीं थेट संबंध असतो आणि ते मध्यवर्ति जमाखर्च खात्याचे अधिकारी असतात. त्यांनीं तयार केलेले अहवाल वस्तुस्थितीचें यथार्थ दर्शन घडविणारे असावे आणि त्यामध्यें सारखेपणा असावा या हेतूनें १९३८ सालापासून आंकडे मांडणीच्या कांहीं नव्या पद्धती सर्वत्र अमलांत आणण्यांत आल्या आहेत. त्यामुळें गोस्प्लॅनचें काम अधिक सुलभ आणि त्यांची माहिती व अंदाज अधिक निश्चित स्वरूपाचें होण्यास मदत झाली आहे.

## सोव्हिएट नियोजनाचें ऐतिहासिक समालोचन

अशा प्रकारच्या राष्ट्रीय स्वरूपाच्या आर्थिक योजनेकरितां योजनेचीं उद्दिष्टें, योजना आंखण्यासाठीं तज्ज्ञवर्ग, देशाच्या सध्यांच्या अर्थव्यवस्थेची संपूर्ण तपशीलवार माहिती आणि ठरविलेलीं उद्दिष्टें मूर्त स्वरूपांत आणणारी योजना आंखण्याची व्यवस्था अशा चार गोष्टींची पूर्वतयारी लागते. तसेंच तिच्या सफलतेसाठीं ती अमलांत आणणारा अधिकारीवर्ग व संस्था आणि तिला मार्गदर्शन करणारा तज्ज्ञवर्ग यांची आवश्यकता असते. आज सोव्हिएट देशांत ही सर्व सिद्धता आपल्या नजरेस पडते; कारण तेथें आर्थिक नियोजन बऱ्याचशा परिणत अवस्थेंत आहे.

पण हें सर्व अर्थातच चुटकीसरसें झालेलें नाहीं. सोव्हिएट अर्थव्यवस्था पंधरा-वीस वर्षांच्या अनुभवांतून या अवस्थेप्रत पोंचलेली आहे. आर्थिक नियोजनाच्या या प्रगतीचे कांहीं विशेष आणि त्यांमधील महत्त्वाचे टप्पे यांचा निर्देश करून हें विवेचन पुरें करतों.

सोव्हिएट देशाच्या आर्थिक इतिहासाचे चार स्थूल कालखंड मानतां येतील. ( १ ) १९१८ ते १९२२:, परकीय आक्रमणाचा काल; (२) नवें आर्थिक धोरण ऊर्फ नेप (New Economic Policy) १९२२ ते १९२८; ( ३ ) योजनाबद्ध अर्थव्यवस्था—रेशनिंग कालखंड: १९२८ ते १९३५; ( ४ ) योजनाबद्ध अर्थव्यवस्था—सुबत्तेचा काल : १९३६ ते दुसऱ्या महायुद्धापर्यंत.

१९१७ सन सालीं समाजवादी क्रांति झाली त्यावेळीं युद्धकाळांत कोलमडून पडलेली झारशाहींतील दुबळी अर्थव्यवस्था सोव्हिएट सरकारच्या हातीं आली. क्रांति झाल्यावर कांहीं महिन्यांतच कामगार वर्गानें मोठाले कारखाने आपल्या हातीं घेतले आणि शेत-कुळांनीं जमीनदारांना हुसकून जमिनीची वांटणी करून घेतली. त्यानंतर लागलीच नव्या सरकारला परकीय आक्रमणाला आणि अंतर्गत यादवीला तोंड द्यावें लागलें. यामुळें शांतताकालीन आर्थिक धोरण आंखण्यास अवसरच मिळाला नाहीं. सर्व उद्योगकेंद्रें सरकारी नियंत्रणाखालीं घेऊन युद्धोपयोगी माल तयार करणें भाग होतें; तसेंच शेतकऱ्यांकडून सक्तीनें धान्यवसुली करणेंहि आवश्यक झालें. या चार वर्षांत सर्व कारखाने व जमिनी जनतेच्या मालकीच्या झाल्या. बँका, आयात–निर्यात व्यापार हीं अर्थव्यवस्थेचीं मूलभूत सूत्रें सरकारनें आपल्या हातीं घेतलीं. या कालखंडाला युद्धकालीन ' कम्युनिझमचा काळ ' असें नांव पडलें आहे. या धामधुमीच्या व अस्वस्थतेच्या काळांत उत्पादन वाढणें शक्यच नव्हतें; उलट तें अतिशय खालीं आलें.

तरीसुद्धां आर्थिक नियोजनास याच काळांत आरंभ झाला हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. १९१९ सालीं लेनिनच्या प्रेरणेनें विद्युतीकरणाची पंधरा वर्षांची योजना आंखण्यासाठीं शास्त्रज्ञांची परिषद भरली आणि विद्युतीकरणाच्या पायावर उद्योगधंदे आणि यांत्रिक शेती उभारण्याची

योजना तयार झाली.* तसेंच निरनिराळ्या औद्योगिक क्षेत्रांत उत्पादनाच्या योजना आंखणें सुरू झालें. १९२१ सालीं राष्ट्रव्यापी आर्थिक योजना ठरविण्यासाठीं सोव्हिएट सरकारनें गोस्प्लॅनची स्थापना केली. त्या धामधुमीच्या काळांत देशाच्या आर्थिक परिस्थितीचें पुरेसें ज्ञान नसल्यामुळें तशी योजना तावडतोब आंखणें अशक्यच होतें; पण विविध उत्पादन-केंद्रांच्या योजनांना मार्गदर्शन करण्यास प्रारंभ झाला.

## नेप ऊर्फ नवें आर्थिक धोरण

१९२२ सालापर्यंत समाजवादी सोव्हिएट सरकारनें परकीय आणि अंतर्गत शत्रु यांना नामोहरम करून आपली सत्ता स्थिर केली. आतां या कोसळलेल्या अर्थव्यवस्थेचें आणि बेचिराख झालेल्या देशाचें पुनरुज्जीवन कसें करावयाचें हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा होता. कोणीहि भांडवली राष्ट्र सोव्हिएटला कर्जाऊ मदत अथवा यंत्रसामुग्री पुरविण्यास तयार नव्हतें; कारण त्या सर्वांना समाजवादी राष्ट्राचें अस्तित्वच नकोसें होतें. म्हणून लेनिन व त्याचे सहकारी यांनीं मर्यादित प्रमाणांत छोटे कारखानदार व व्यापारी यांना मोकळीक देण्याचें ठरविलें. या धोरणाला ' नवें आर्थिक धोरण " ऊर्फ नेप (New Economic Policy) असें नांव आहे. आर्थिक पुनर्घटना लवकर व्हावी हा यामागील खरा उद्देश

*जनतेच्या उत्साहाला चालना देऊन तिला कार्यप्रवण करण्यासाठीं आर्थिक कार्यक्रम देणें कसें आवश्यक असतें याची कल्पना लेनिनच्या पुढील उतार्‍यावरून येईल. विद्युतीकरणाच्या योजनेची आवश्यकता प्रतिपादन करतांना लेनिन म्हणतो, " जनतेची मनें वेधून घेईल अशा प्रकारचा प्रचंड कार्यक्रम तिच्यापुढें ठेवला पाहिजे. तिला समजेल, तिच्या डोळ्यांत भरेल अशा तर्‍हेनें तो तिला सांगितला पाहिजे. हा कार्यक्रम शास्त्रीय तत्त्वांवर आधारलेला आणि उज्ज्वल भविष्यकाल स्पष्टपणें दाखविणार असला पाहिजे; मग त्याच्या जोरावर आपण जनतेस हाक देऊं कीं, बापहो, उठा, उद्योगास लागा. दहाविस वर्षांच्या अवधींत रशियाची शेती आणि उद्योगधंदे यांमध्यें बिजली खेळवायाची आहे ! "

होता. बँका आणि आयात निर्यात व्यापार आणि मूलभूत व मोठाले उद्योगधंदे व वाहतूक या आर्थिक जीवनाच्या मुख्य नाड्या सरकारनें आपल्या हातीं घट्ट राखल्या होत्या. शिवाय कर, सवलती आणि कायदे या साधनांनीं भांडवलशाहीचे अवशेष अखेर नष्ट करावयाचे हें निश्चित होतें. समाजवादी प्रगतीचा पुढील झेप घेण्यासाठीं 'नेप' हें तात्पुरतें मागें घेतलेलें पाऊल होतें असें या धोरणाचें यथार्थ वर्णन करतां येईल.

या काळांत आर्थिक नियोजनाच्या दोन प्रकारच्या संस्था निर्माण झाल्या. कांहीं संस्था विशिष्ट क्षेत्रांत नियोजन करीत तर दुसऱ्या प्रकारच्या संस्था सर्वसामान्य योजना ठरवीत. तसेंच सन १९२१ पासून प्रादेशिक नियोजनासहि प्रारंभ झाला. राज्यकारभाराच्या सोयीसाठीं जसजसे नवे नवे प्रांत व प्रदेश पाडण्यांत आले, नवनवीं स्वायत्त अथवा स्वतंत्र राष्ट्रें उदयास आलीं, तसतशा प्रादेशिक नियोजनाच्या संस्था वाढत गेल्या आणि अशा रीतीनें आज दिसणारा नियोजन समितींचा मनोरा उभा झाला.

प्रथम प्रथम केवळ कांहीं विशिष्ट क्षेत्रांतच ( कीं जेथें तांतडीनें लक्ष घातल्याशिवाय गत्यंतर नव्हतें ) गोस्प्लॅन नियोजन करीत असे. उदाहरणार्थ, जळण, लोखंड, पोलाद, सुती कापड वगैरे. तीन वर्षांच्या अनुभवानें १९२४ सालीं गोस्प्लॅनची मोठाल्या उद्योगधंद्यांसाठीं सर्वसाधारण योजना तयार झाली; आणि पुढल्या वर्षी १९२५–२६ सालाच्या एकंदर आर्थिक व्यवस्थेसाठीं म्हणून नियंत्रक आंकडे Control Figures सुचविण्यांत आले. पण ते प्रधानमंडळास पसंत पडले नाहींत. पलीकडील वर्षींच्या योजनेचीहि अशीच वासलात लागली.

असें होण्याचें कारण केवळ तांत्रिक नसून तात्त्विक महत्त्वाचें होतें, म्हणून त्याचा उल्लेख येथें जरूर केला पाहिजे. या योजना तयार करणारे अर्थशास्त्रज्ञ भांडवली अर्थशास्त्रांत मुरलेले होते. त्यांनीं नियोजनाचा अर्थ केवळ सध्यांच्या दिशेनें प्रगति झाल्यास पुढील वर्षी किती प्रगति होईल याचा अंदाज करणें एवढाच केला. उदाहरणार्थ, नेप कालखंडांत व्यापारी व श्रीमंत शेतकरी वळावत होते आणि ही प्रवृत्ति

इष्ट कीं अनिष्ट याचा विचार न करतांच ती वाढत जाईल असें गृहीत धरून त्यांनीं पुढील वर्षाची योजना ठरविली. वास्तविक समाजवादी अर्थव्यवस्था प्रस्थापित करावयाची तर या प्रवृत्तीला मारक असें नियोजन करणें आवश्यक होतें म्हणून ही योजना सरकारनें रद्द ठरविली. नियोजन, म्हणजे आहेत त्या प्रवृत्ति वाढत जातील या भरंवशावर अंदाज करणें नव्हे तर ठरविलेल्या उद्दिष्टासाठीं इष्ट प्रवृत्ति वाढूं देऊन अनिष्ट प्रवृत्ति नष्ट करणें या भूमिकेवरून आंखलेल्या योजना हें पक्कें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

याप्रमाणें बदल होऊन ( १९२७–२८ ) नव्या जमान्यांतील अर्थशास्त्रज्ञांनी सुचविलेले नियंत्रक आंकडेहि सर्व शाखांस संमत झाले नाहींत. याला दोन कारणें होतीं. कांहीं क्षेत्रांत सद्यःपरिस्थितीच पूर्णपणें माहीत नव्हती आणि शेती व व्यापार यांतील बराचसा भाग खाजगी मालकीचा असल्यामुळें त्याचें नियोजन करणें सुलभ नव्हतें. पहिली अडचण दूर करण्यासाठीं पूर्वीची व्यवस्था रद्द करून एक मध्यवर्ति माहिती खातें स्थापण्यांत आलें व त्याच्या शाखा सर्व खात्यांत व उद्योगकेंद्रांत उघडण्यांत आल्या. यामधून पुढें सध्यांचें मध्यवर्ति जमाखर्च खातें निर्माण झालें. १९२८ पासून शेती सामुदायिक होण्यास आरंभ झाला आणि व्यापारांतील अधिकाधिक भाग सरकारी आणि सहकारी संस्थांच्या हातीं येऊं लागला व खाजगी मालकी नष्ट होऊं लागली. या दोन बाबतींत जसजशी प्रगति होत गेली तसतसें नियोजन करणें अधिकाधिक शक्य होऊं लागलें.

## पंचवार्षिक योजनांचा काळ

१९२८ सालीं सर्व देशाच्या अनेकविध अर्थव्यवस्थेसाठीं दीर्घ मुदतीची योजना प्रथमच आंखण्यांत आली. हीच ती सुप्रसिद्ध पहिली पंचवार्षिक योजना. या योजनेंतसुद्धां पहिल्या दोन वर्षीं फक्त वर्षांचे नियंत्रक आंकडेच देण्यांत आले होते व त्यांतहि संरक्षण, अंदाजपत्रक वगैरेंचे आंकडे नव्हतेच. १९३१ सालापासून मात्र प्रत्येक वार्षिक योजनेंत बहुतेक सर्व शाखांची नियोजित प्रगति तपशीलवार सादर करण्यांत येऊं लागली. अशा रीतीनें इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर विविध

शाखांच्या वेगवेगळ्या नियोजित आंकड्यांमध्यें पद्धतशीरपणा आणि सूत्रबद्धता निर्माण झाली.

गोस्प्लॅननें प्रत्येक शाखेच्या योजनेंत किती प्रमाणांत तपशील भरावा हें अनुभवानेंच ठरवावें लागलें. अगदींच स्थूल योजना आंखली तर वेगवेगळया उद्योगकेंद्रांच्या प्रगतींत प्रमाणबद्धता रहात नाहीं; उलट अतिशय काटेकोर झालें तर उद्योगकेंद्रांना स्वतांचें वैशिष्ट्य व उत्साह दाखविण्यास अवसरच मिळणार नाहीं. म्हणून मध्यम मार्गच शेवटीं योग्य ठरला. प्रत्येक घटकाला योग्य वाव ठेवून एकूण उत्पादनाच्या योजनेचें केंद्रीकरण कसें करण्यांत येतें याचा उल्लेख गोस्प्लॅनच्या कार्यपद्धति सांगतांना आलेलाच आहे. देशाची औद्योगिक प्रगति झपाट्यानें होऊं लागली तसें निरनिराळ्या पदार्थांचे ताळेबंद जमविणें आवश्यक होऊं लागलें, आणि यासाठीं विविध शाखांच्या प्रगतीचा मेळ बसविण्याचें कार्यहि वाढूं लागलें. १९३५ सालापासून गोस्प्लॅनची पुनर्घटना होऊन या कार्यासाठीं खास विभाग निर्माण करण्यांत आले. तसेंच दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून पुढील योजनेचा खर्डा खालच्या संस्था व उद्योगकेंद्रें यांजकडे पाठविण्यांत येऊं लागल्या, व त्यावर त्यांच्या सूचना ( प्रतियोजना ) मागविण्यांत येऊं लागल्या. १९३५ सालीं गोस्प्लॅनची जी घटना ठरली तीच थोड्याफार फरकानें आजला चालू आहे.

वस्तूंच्या उत्पादनाची योजना आंखण्याबरोबरच त्यांचा गुणात्मक दर्जा सुधारावा, तसेंच कामगार वर्गाची उत्पादनक्षमता वाढावी याहि बाबतींत हळूहळू योजनाबद्ध प्रगति होऊं लागली. १९४१ सालापासून पुढील वर्षीं कोणत्या यांत्रिक व तांत्रिक सुधारणा अमलांत आणावयाच्या या विषयांची योजनाहि गोस्प्लॅन समिति ठरवूं लागली आहे.

दुसरी पंचवार्षिक योजना सुरू होईपर्यंत गोस्प्लॅनचा एक विभाग उत्पादनाचे आंकडे जमविण्याचें काम करीत असे; पण त्यावर त्याची सतत देखरेख नसे. तेव्हांपासून त्या विभागानें उत्पादनावर देखरेख व नियंत्रण ठेवावें असें ठरलें होतें; परंतु खरें नियंत्रण “ कामगार शेतकरी

नियंत्रण समिति " नांवाच्या दुसऱ्याच एका समितीकडे असे. १९३४ सालापासून ही समिति रद्द होऊन देखरेखीचा सर्व अधिकार गोस्प्लॅनकडे आला. तरीहि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटीं आढावा घेतांना कित्येक शाखांची प्रगति अप्रमाणशीर झाल्याचें दिसून आलें; तेव्हां गोस्प्लॅनचे यासंबधींचे अधिकार अधिक विस्तृत व्हावे आणि तिची देखरेख अधिक बारकाईनें व्हावी असें ठरलें. तसेंच उत्पादनाच्या दैनंदिन प्रगतीचे अहवाल सतत मिळावे अशी व्यवस्थाहि झाली.

आजची योजनाबद्ध अर्थव्यवस्था हें इतक्या वर्षांच्या अनुभवाचें व परिश्रमाचें फळ आहे.

# द्रव्ययोजना आणि अंदाजपत्रक : ३ :

सोव्हिएट आर्थिक योजना कशी आंखली जाते हें आपण आतांपर्यंत पाहिलें. आर्थिक योजनेला अनुलक्षून आणि तिचाच एक भाग म्हणून द्रव्ययोजना ठरविली जाते असा उल्लेख मागील प्रकरणांत आला आहे. द्रव्ययोजना आणि अंदाजपत्रक यांचें महत्त्व आणि त्यांचे विशेष यांचें या प्रकरणांत अधिक विस्तारानें विवेचन करण्याचें योजिलें आहे.

सध्यां उपलब्ध असलेलीं यंत्रादि साधनें, कच्चा माल आणि श्रमशक्ति यांची वांटणी नवें भांडवल, उपभोग्य वस्तू आणि आरोग्य, शिक्षण इत्यादि सामाजिक सुखसोयी यांच्या उत्पादनाकरितां कशी व कोणत्या प्रमाणांत करावयाची हें आर्थिक योजना ठरविते. पण ही वांटणी प्रत्यक्षांत उतरविण्याकरितां पैसा हें साधन वापरावें लागतें. म्हणून आर्थिक योजनेला साजेशी द्रव्ययोजना ( Financial plan ) आंखणें आवश्यक आहे.

## नवें भांडवल

प्रथम नव्या भांडवलाच्या निर्मितीचा ( नवे कारखाने, रेल्वे, इमारती वगैरे ) प्रश्न घेऊं. देशाच्या आर्थिक प्रगतीसाठीं, किंबहुना चालू

घडी कायम राखण्यासाठीं देखील नवें भांडवल निर्माण करणें आवश्यक असतें. इतर देशांत हें कार्य कसें पार पडतें ? भांडवलदारांकडे नफा सांचला कीं तो हा पैसा पुन्हा दुसरा एखादा कारखाना उभारण्यांत गुंतवितो. उद्देश असा कीं रिकामा राहिलेला पैसा अधिक नफा मिळविण्याच्या कामीं उपयोगांत यावा. नव्या भांडवलापासून मिळणारा फायदा हा हेतूच त्याच्या निर्मितीच्या मुळाशी असतो, समाजाला उपयुक्त वस्तूंचा पुरवठा करणें हा नव्हे. आतां गिऱ्हाइकांना वस्तु हवी असली तरच ती सामान्यपणे विकली जाईल आणि म्हणून अप्रत्यक्षपणें समाजाची गरज भागते ही गोष्ट वेगळी परंतु शैक्षणिक पुस्तकासारखी एखादी आवश्यक वस्तु असली पण ती भांडवलदारास फायदेशीर नसली तर तो ती वस्तु कधींच निर्माण करणार नाहीं. तेव्हां भांडवलदारास मिळणारा फायदा हेच उद्योगधंदे चालू ठेवण्याचा व नवें भांडवल निर्माण करण्याचा प्रधान हेतु असतो. त्यासाठीं आवश्यक असलेला कच्चा माल व श्रमशक्ति तो आपल्या पैशानें खरीद करतो आणि अशा रीतीनें नवें भांडवल निर्माण होतें.

सोव्हिएट देशांत भांडवलदार वर्ग नाहीं, खाजगी मालकी नाहीं, नफा नाहीं. सर्व कारखाने व उद्योगधंदे सरकारच्या मालकीचे. तेव्हां नवें भांडवल निर्माण करण्याची जबाबदारी सरकारवरच पडणार हें उघड आहे. त्याकरितां किती यंत्रसाधनें, श्रमशक्ति व कच्चा माल वापरावयाचा हें आर्थिक योजनेंत ठरतें; आणि यासाठीं आवश्यक असलेला पैसा पुरविणें हें काम द्रव्ययोजनेचें आहे. हें काम सरकारनें अंगिकारलेलें असल्यामुळें हा पैसा करांच्या रूपानें गोळा करावा लागणार आणि तो अंदाजपत्रकांत जमा व खर्चीं पडणार हें उघड आहे. सोव्हिएट द्रव्ययोजना आणि अंदाजपत्रक यांमध्यें आर्थिक योजनाच कशी प्रतिबिंबित झालेली असते याचें नव्या भांडवलाची निर्मिति हें उत्तम उदाहरण आहे.

**वेतन आणि किंमती**

द्रव्ययोजनेचें कार्य एवढेंच नाहीं. उपलब्ध वस्तु व श्रमशक्ति

यांची उपभोग्य वस्तु, नवें भांडवल, आणि सामाजिक सुखसोयी ( Services ) यांमध्यें योग्य विभागणी करणें हें द्रव्ययोजनेचें एक कार्य झालें. उपभोग्य वस्तूंची श्रमजीवि जनतेमध्यें योग्य वांटणी करणें हें द्रव्ययोजनेचें दुसरें कार्य आहे. याचाच अर्थ असा कीं उपभोग्य वस्तूंच्या किंमती व निरनिराळ्या व्यवसायांतील कामकऱ्यांचें वेतन ठरविणें आणि त्यांचा परस्परांशीं मेळ बसविणें हेंहि द्रव्ययोजनेचें महत्त्वाचें कार्य आहे. याची स्पष्ट कल्पना येण्यासाठीं पुढील समीकरण ध्यानांत घेतलें पाहिजे.

उपभोग्य वस्तूंची एकूण किंमत
= उपभोग्य वस्तु निर्माण करणाऱ्या कामकऱ्यांचें वेतन
+ नवे भांडवल " " " "
+ शिक्षण, आरोग्य, राज्यकारभार
इत्यादि समाजोपयोगी सुखसोयी. " " "

उत्पादनाचें चक्र सतत सुरू राहावयाचें असेल तर सर्व तयार मालाचा ( उपभोग्य वस्तूंचा ) बाजारांतून ठराविक कालमर्यादेत ( समजा, एका वर्षांत ) उठाव झाला पाहिजे. म्हणजे त्या वस्तु विकत घेण्याइतकी जनतेची ऐपत असली पाहिजे. शास्त्रीय परिभाषेंत सांगावयाचें तर त्या वस्तु विकत घेण्याइतकी क्रयशक्ति जनतेजवळ हवी. म्हणून सर्वांस मिळणारें एकूण वार्षिक वेतन उपभोग्य वस्तूंच्या एकूण किंमतीएवढें ( अडी-अडचणींसाठीं थोडा पैसाअडका जवळ बाळगण्यासाठीं थोडेसें अधिकच ) असलें पाहिजे. वरील समीकरण विकाऊ वस्तूंची एकूण किंमत आणि एकूण वेतन यांचा असा मेळ घालते.

तेव्हां द्रव्ययोजनेंत दोन योजना अंतर्भूत होतातः—

( १ ) वेतनाची योजना ( Wages plan )

( २ ) किंमतीची योजना ( Prices plan )

वेतनाची योजना कोणत्या तत्त्वावर आंखली जाते ? " समान कामाला समान वेतन " ( Equal pay for equal work. ) हें समाजवादी अर्थव्यवस्थेचें एक मूलभूत तत्त्व आहे. एकाच व्यवसायांतील

नोकरांचें उत्पादन समान असल्यास वेतन समान असतें; पण उत्पादन कमी जास्त असल्यास वेतन कमीअधिक होतें; निरनिराळ्या व्यवसायांतील आणि निरनिराळ्या दर्जाचे नोकरांचे वेतन त्या त्या व्यवसायानुसार व दर्जाप्रमाणें कमीअधिक असतें. अशा रीतीनें विविध नोकरवर्गाच्या वेतनाचें प्रमाण ठरतें आणि याबद्दल त्यांचें आपापल्या उद्योगकेंद्रांच्या अधिकारीवर्गाशीं सामुदायिक करार होतात. आर्थिक योजनेंत एकंदर राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची तपशीलवार माहिती असल्यामुळें एकूण राष्ट्रासाठीं वेतन योजना ठरविणें कठीण नसतें. वेतनाचा एकंदर राष्ट्राविषयींचा आंकडा व वेगवेगळ्या शाखांतील वेतनांचे आंकडेहि ठरविण्यांत येतात. राष्ट्रीय आर्थिक योजनेच्या जशा प्रादेशिक व शाखीय उपयोजना असतात, तीच गोष्ट राष्ट्रीय वेतनयोजनेसंबंधींहि असते.

आतां आपण किंमतीकडे वळूं. उपभोग्य वस्तूंची एकूण किंमत ठरविणाऱ्या समीकरणाची दुसरी बाजू पहा. या किंमतीमध्यें त्या वस्तु तयार करणाऱ्या कामकऱ्यांचें वेतन समाविष्ट होतें, एवढेंच नव्हे, तर नवें भांडवल तयार करणाऱ्या कामकऱ्यांचें आणि शिक्षण, आरोग्य, राज्यकारभार, इत्यादि सामाजिक सोयी (Services) निर्माण करणाऱ्या नोकरवर्गाचें वेतनहि अंतर्भूत असतें. तेव्हां कोणत्याहि उपभोग्य वस्तूची किंमत सामान्यपणें तिच्या उत्पादनास येणाऱ्या खर्चापेक्षां बरीच अधिक असणार हें उघड आहे. नव्या भांडवलाचा कार्यक्रम जेवढा मोठा आणि सामाजिक सोयींचा व्याप जितका अधिक, तेवढ्या प्रमाणांत उपभोग्य वस्तूंची विक्रीची किंमत आणि उत्पादनखर्च यांमधील फरक वाढतो. सोव्हिएट आर्थिक योजनेंत नवें भांडवल व समाजाच्या सुखसोयी प्रचंड वेगानें वाढविण्याचें ठरविलेलें होतें व आहे हें आपण मागे पाहिलेंच आहे. पण हा प्रचंड वेग क्षणभर बाजूला ठेवला तरी समाजाच्या धारणेसाठीं आणि त्याच्या प्रगतीसाठीं नवें भांडवल व सामाजिक सोयी कांहीं प्रमाणांत तरी आवश्यक असतात. त्यांचा बोजा एकंदर समाजानेंच उचलला पाहिजे. उपभोग्य वस्तूंची किंमत व उत्पादन खर्च यांमधील

फरकाच्या रूपानें सर्व नागरिकांवर तो विभागला जातो. अर्थात् एखाद्या वस्तूची "सामाजिक किंमत", तिच्याकरतां समाजाला द्यावी लागणारी किंमत (Social cost), केवळ तिच्या उत्पादनासाठीं येणाऱ्या खर्चापेक्षां (Production cost) बरीच अधिक असणें अपरिहार्य आहे.

विक्रीसाठीं असलेल्या वस्तूंचीं किंमत कशी ठरविली जाते या संबंधींचा हा सामान्य नियम झाला. पण विशिष्ट वस्तूची किंमत तिच्या उत्पादन खर्चापेक्षां कितीशी अधिक ठेवावयाची हें ठरवितांना या सामान्य सूत्राशिवाय इतर अनेक गोष्टी विचारांत घेतल्या जातात. आणि त्याप्रमाणें निरनिराळ्या वस्तूंच्या किंमती त्यांच्या उत्पादन खर्चापेक्षां वेगवेगळ्या प्रमाणांत अधिक ठेवलेल्या असतात. किंमती व उत्पादन खर्च यामधील हा वाढावा ही सोव्हिएट अंदाजपत्रकांतील उत्पन्नाची बाब आहे. तिला उत्पादन कर (Turnover tax) असें म्हणतात. याचा विशेष विचार पुढें केला आहे. ध्यानांत घ्यावयाचा मुख्य मुद्दा असा कीं सोव्हिएट देशांत वस्तूचीं किंमत बाजारांत ठरत नसून ती आधींच योजलेली असते. किंमतीची योजना (Price's plan) ही अशा रीतीनें आर्थिक योजनेचाच एक भाग बनते. एकदा आर्थिक योजना ठरली, कीं विविध शाखांत उत्पन्न होणाऱ्या वस्तूंच्या किंमतीच्या योजना व एकूण वस्तूंची किंमतीची योजना तिला अनुलक्षून ठरतात. एकूण वेतन आणि उपभोग्य वस्तूंची एकूण किंमत यांचा वर उल्लेखिल्याप्रमाणें मेळ बसविलेला असतो. अशा रीतीनें वस्तूंच्या उत्पादनाबरोबरच ती विकली जाण्यासाठीं आवश्यक असलेली क्रयशक्ति सामान्य जनतेजवळ आपोआप निर्माण होते आणि उत्पादन व विक्री यांचा गाडा सारखा चालू राहाणें सुलभ होतें.

## सरकारी उत्पन्नाच्या बाबी

सोव्हिएट अर्थव्यवस्थेंत द्रव्ययोजनेला कोणतें स्थान आहे व तिचें कार्य कोणत्या प्रकारचें आहे याचें विवेचन आतांपावेतों झालें. सोव्हिएट

सरकार आपल्या बहुविध खर्चासाठीं लागणारा पैसा कसा उभा करतें याचा आतां विचार करूं

सोव्हिएट सरकारचें उत्पन्न मुख्यतः दोन प्रकारचें आहे:—

( अ ) सरकारी आणि सहकारी उद्योगकेंद्रें व सामुदायिक शेतीकेंद्रें यांपासून मिळणारा पैसा;

(आ) नागरिकांच्या वैयक्तिक मिळकतींतून सरकारला मिळणारा पैसा.

**उत्पादन कर**

उत्पन्नाच्या पहिल्या प्रकारच्या बाबींत सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे उत्पादन कर होय. १९४७ च्या अंदाजपत्रकांत एकूण ३९१५ दशकोटि रुबल जमेपैकीं २५४७ दशकोटि रुबल एवढी मोठी रक्कम या करापासून मिळावयाची आहे. यावरून सोव्हिएट अंदाजपत्रकांतील या कराचें महत्त्व लक्षांत येईल. उत्पादन कराचें स्वरूप नीट समजण्यासाठीं कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाची ठोक विक्रीची किंमत कशी ठरविली जाते हें पाहाणें जरूर आहे.

मालाच्या ठोक विक्रीच्या किंमतीचे ( १ ) उत्पादन खर्च ( २ ) कारखान्याचा नियोजित नफा व ( ३ ) उत्पादन कर हे तीन भाग पाडतां येतील.

विक्रीची किंमत पूर्वनियोजित असते, आणि एकूण उत्पादनाची ठरवलेली योजना माहित असते, त्यामुळें कारखान्यांत वर्षांत तयार झालेल्या मालाची विक्रीची किंमत किती होईल याचा अंदाज करतां येतो. आर्थिक योजना आंखतांना उत्पादनखर्चाचा अंदाज केलेला असतो आणि वार्षिक दुरुस्ती, संकल्पित वाढ, नोकरांच्या सुखसोयी यांसाठीं कारखान्याला किती नफा ऊर्फ शिल्लक ठेवावयाची याचें शेंकडा प्रमाण ठरविलेलें असतें. ( रूढ अर्थानें याला नफा म्हणतां यावयाचें नाहीं, पण सोयीसाठीं तोच प्रतिशब्द वापरला आहे. ) विक्रीच्या किंमतीमधून या दोन्ही रकमा वजा जाऊन जेवढा पैसा राहील तो उत्पादन कर म्हणून सरकारकडे जमा होतो. उत्पादन कर हा किंमतीचे अमुक एक टक्के असा ठरविण्यांत येतो आणि कारखान्यांतून

मालाचें उत्पादन होऊन तो जसजसा व्यापारी संस्थांकडे जाईल तसतसा हा कर राष्ट्रीय बँकेंत जमा होत जातो.* उदाहरणानें ही गोष्ट अधिक स्पष्ट होईल. समजा, एखाद्या वस्तूची ठोक किंमत १५० रूबल आहे, तिचा उत्पादन खर्च १०० रूबल आहे आणि कारखान्याच्या नफ्याचें प्रमाण शें. ५ टक्के नियोजित केलें आहे; तर उत्पादन कराची रक्कम १५०—( १०० उत्पादन खर्च + ५ नफा ) = ४५ रूबल इतकी होईल; म्हणजे त्या वस्तूच्या किंमतीवर शेंकडा ३० टक्के उत्पादन कर आकारलेला असेल. यावरून दोन गोष्टी सहज ध्यानांत येतात. कारखान्याला स्वतांच्या उपयोगासाठीं ठेवलेली शिल्लक अतिशय थोडी असते. कारण त्या शिलकेचा विनियोग फक्त दुरुस्ती, कामगारांच्या सुखसोयी वगैरे किरकोळ बाबींवर होतो. नवें भांडवल निर्माण करण्याची जबाबदारी त्याच्यावर नसते, उलट विक्री–किंमत आणि उत्पादन–खर्च यामध्यें जो फरक असतो त्याचा सामान्यपणें बराच मोठा भाग सरकारी तिजोरींत जमा होतो. सर्व उद्योगकेंद्रांतून जमा झालेल्या या पैशाची सरकारकडून, नव्या भांडवलवाल्या निर्मितीसाठीं अथवा समजोपयोगी कार्यासाठीं योग्य वाटेल त्याप्रमाणें विभागणी व योजना होते. कारण ही जबाबदारी विशिष्ट कारखान्याची नसून सर्व राष्ट्राची म्हणजेच लोकनियुक्त सरकारची आहे.

---

* वास्तविक हा कर कारखान्यांतून माल व्यापारी संस्थांकडे गेल्यावर, म्हणजे या संस्थांना विकल्यावर, आणि विक्रीच्या किंमतीचें शेंकडा प्रमाण म्हणून, वसूल होतो. तरीहि विक्रीकर असें नांव न देतां उत्पादन कर असें नांव मी दिलें आहे. कारण नियोजित अर्थव्यवस्थेंत मालाच्या उत्पादनाबरोबर त्याच्या विक्रीचीहि योजना केलेली असते. या करांचें आपल्याकडील अबकारी ( एक्साइज ) कराशीं कांहींसे सादृश्य आहे. सोव्हिएट अर्थव्यवस्थेंतील उत्पादन कराचें स्थान, कार्य आणि सर्वगामित्व ध्यानांत घेतां आपल्याकडील विक्रीकर आणि एक्साइज कर यांपासून तो मूलतःच भिन्न आहे हें समजून येईल.

गा.०९२ २०६५

वेगवेगळ्या वस्तूंवरील उत्पादन कराचें प्रमाण वेगवेगळें असतें, परंतु प्रत्येक वस्तूवर उत्पादन कर हा असलाच पाहिजे. कोणत्याहि वस्तूच्या उत्पादनावर फक्त एकदांच कर बसावा अशी दक्षता घेतली जाते. तसेंच जो माल गिऱ्हाइकाकडे जावयाचा नसून दुसऱ्या एखाद्या उत्पादन-केंद्राकडे कच्चा माल म्हणून जावयाचा असेल त्या मालावरील उत्पादन कर केवळ नांवालाच असतो. हेतु हा कीं त्यामुळें नवीन मालाचा उत्पादन खर्च आणि म्हणून त्याची किंमत बेसुमार वाढू नये. उपभोग्य वस्तूंवरील उत्पादन कराचें प्रमाण त्या वस्तूची समाजास असलेली गरज, इष्टानिष्टता इत्यादि गोष्टींप्रमाणें बदलतें. कारण उत्पादन-कराच्या कमी-अधिकपणामुळें किंमत कमी होते हें आपण पाहिलेंच आहे. उदाहरणार्थ नित्य गरजेच्या वस्तूंवर उत्पादन कराची आकारणी कमी प्रमाणांत असते; उलट, सौंदर्यप्रसाधनांसारख्या चैनीच्या वस्तूंवर भरपूर कर आकारला जातो. व्होडका दारूवर शेंकडा ८४ टक्के इतका कर असतो. त्याचप्रमाणें एखाद्या वस्तूचा खप वाढवावयाचा असेल, अथवा तिचा पुरवठा गरजेपेक्षां अधिक झाल्यामुळें ती पडून असेल तर तिच्या-वरील कर कमी करून किंमत खालीं आणण्यांत येते. उत्पादन कराचें प्रमाण अर्ध्या टक्क्यापासून ९८ टक्केपर्यंत असूं शकतें, इतका हा कर लवचिक आहे ! यावरून वस्तूंची किंमत नियोजित करण्यास या कराचा किती उपयोग होत असेल याची कल्पना येईल. परंतु ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवली पाहिजे कीं किंमत आधीं ठरते आणि किंमतीवरून उत्पादन कर ठरतो. उत्पादन कर आधीं ठरवून त्यावरून किंमत ठरत नाहीं.

सरकारी उत्पन्नांत रावींत मोठी भर घालणें आणि भावनियोजन याशिवाय उत्पादन कराचें आणखीहि एक महत्त्वाचें कार्य आहे. उद्योग-केंद्राचें उत्पादन योजनेप्रमाणें होत आहे की नाहीं यावर देखरेख ठेवण्यास उत्पादन–कराची मदत होते. जरी एखादी वस्तु उत्पादन खर्चापेक्षांहि कमी किमतींत विकावयाचें ठरलें असलें, आणि त्यासाठीं सरकारला त्या उद्योगकेंद्राला आर्थिक मदत द्यावी लागत असली, तरीहि तिच्यावर अर्धा टक्का किमान उत्पादन–कर आकारला जातो.

(एका काळीं धुण्याचा साबण आणि पुस्तकें या वस्तूंची किंमत उत्पादन खर्चापेक्षां कमी ठेवली जात असे. हेतु अर्थातच उघड आहे.) असा कर ठेवण्याचें कारण असें कीं त्यामुळें उत्पादन किती होत आहे व त्याचा उठाव कसा होत आहे यावर आपोआप देखरेख होते.

उत्पादनाची योजना, किंमतीची योजना आणि उत्पादन–कर या तिन्ही गोष्टी आधीं ठरत असल्यामुळें पुढील वर्षांत सामान्यतः उत्पादन करापासून किती उत्पन्न होईल याचा अंदाज बांधतां येतो; आणि निरनिराळीं खातीं हे अंदाज आपल्या वरिष्ठ योजना–समिती आणि फडणिशी खातें यांजकडे कळवितात. कांहीं मालाबद्दल दररोज हिशोब होतो, कांहींचा दर दहा दिवशीं, तर कांहींचा महिन्यानें, असा उत्पादन–कर वर्षभर सारखा जमा होत असतो. मधून मधून हे सर्व हिशेब पाहून जरूर असल्यास अथवा इष्ट वाटल्यास उत्पादन–कराचे दर बदलण्यांत येतात.

ज्या वस्तु सरकारी संस्थांमार्फत तयार होतात त्यावरहि उत्पादन–कर आकारला जातो. मात्र हें प्रमाण सरकारी उद्योगकेंद्रांत तयार होणाऱ्या मालावरील करापेक्षां कमी असतें. याचें कारण असें की सहकारी संस्था बहुधा हस्तव्यवसाय करणाऱ्यांच्या असतात आणि त्यांच्याजवळील यंत्रसाधनें तितकीं उत्पादनक्षम नसतात.

## नफ्यावरील कर

सोव्हिएट अंदाजपत्रकांतील उत्पन्नाच्या बाजूची दुसरी प्रमुख बाब म्हणजे उद्योगकेंद्रांच्या नफ्यावर बसविलेला कर. नफा योजण्याचें मुख्य कारण—दुरुस्ती, संकल्पित वाढ आणि कामगारांच्या सुखसोयी—वर दिलेंच आहे. दुसरें कारण असें की त्यामुळें योजनेपेक्षां उत्पादन वाढविण्यास आणि उत्पादन खर्च कमी करण्यास चालना मिळते. यामुळें उत्पादनाचा खर्च कमींतकमी होण्यास मदत होते; आणि एकच माल तयार करणाऱ्या निरनिराळ्या उद्योगकेंद्रांचे उत्पादन खर्च स्पर्धेमुळें जवळजवळ समान होत जातात. नफ्यावरील कर नियोजित नफ्यावर

न आकारतां प्रत्यक्ष नफ्यावर आकारण्यांत येतो. वेगवेगळया उद्योग-केंद्रांतील नफ्यावरील कराचें प्रमाण वेगवेगळें असतें. ज्या उद्योग-केंद्रांना स्वतांची बऱ्याच मोठ्या प्रमाणांत वाढ करावयाची असेल त्यांवर कमी प्रमाणांत कर बसविला जातो; उलट ज्यांना वाढ करावयाची नसेल त्यांच्या नफ्यावर ८१ टक्केपर्यंत कर बसतो. परंतु कमींत कमी कर १० टक्के तरी असतोच. किमान कर बसविण्याचा उद्देश संकल्पित वाटीसाठीं जी योजना आंखलेली असते तिच्यावर नियंत्रण ठेवण्याचा असतो. हा कर दर तिमाहीला बँकेत जमा होतो आणि वर्षअखेरीस सर्व हिशेब पुरा करण्यांत येतो.

आतां प्रश्न असा उद्भवतो कीं उत्पादन कर आणि नफ्यावरील कर यांचा उद्देश जर भांडवलाची वाढ (अथवा दुरुस्ती करण्याचाच आहे) तर हे दोन कर वेगवेगळे कां ठेवले आहेत? याचें उत्तर असें आहे कीं नफा ही बाब काढून टाकली तर उद्योगकेंद्रांतील कामकऱ्यांना त्याबद्दल आपलेपणा व आस्था वाढणार नाहीं. उलट विक्री-किंमत व उत्पादन-खर्च यांमधील सर्व फरक नफा समजलें ( उत्पादन कर काढून टाकला ) तर उद्योगकेंद्राचें प्रत्यक्ष उत्पादन व नियोजित उत्पादन यांमध्यें कित्येक वेळा फरक पडत असल्यामुळें करापासून होणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज चुकेल आणि अंदाजपत्रक निरुपयोगी ठरेल. उत्पादन-कराची रक्कम ही एकूण राष्ट्रांतील वस्तूंच्या उत्पादनावर अवलंबून असते आणि वेगवेगळया उद्योगकेंद्रांतील उत्पादन योजनेपासून कांहींसें पुढें मागें ढळलें तरी एकूण उत्पादन बहुधा योजने-नुसार पार पडतें; त्यामुळें या कराचें अंदाजी उत्पन्न व प्रत्यक्ष उत्पन्न यांत तितका फरक पडूं शकत नाहीं.

याशिवाय उत्पादन केंद्रें अथवा इतर संस्था यांच्या उत्पन्नावर आणखी लहान सहान कर बसविण्यांत आलेले आहेत. यापैकीं सामायिक शेतीवर बसविलेल्या कराचा उल्लेख केला पाहिजे. पीक विकून येणाऱ्या उत्पन्ना-वर शेंकडा ३ ते ४ टक्के कर आकाण्यांत येत असतो. त्याचा मुख्य उद्देश अंदाजपत्रकांत फारशी भर घालण्याचा नसून शेतीचें उत्पादन व त्यांचा पैशांचा व्यवहार यावर नियंत्रण ठेवतां यावें असा आहे.

(एका काळीं धुण्याचा साबण आणि पुस्तकें या वस्तूंची किंमत उत्पादन खर्चापेक्षां कमी ठेवली जात असे. हेतु अर्थातच उघड आहे.) असा कर ठेवण्याचें कारण असें कीं त्यामुळें उत्पादन किती होत आहे व त्याचा उठाव कसा होत आहे यावर आपोआप देखरेख होते.

उत्पादनाची योजना, किंमतीची योजना आणि उत्पादन–कर या तिन्ही गोष्टी आधीं ठरत असल्यामुळें पुढील वर्षांत सामान्यतः उत्पादन करापासून किती उत्पन्न होईल याचा अंदाज बांधतां येतो; आणि निरनिराळीं खातीं हे अंदाज आपल्या वरिष्ठ योजना–समिती आणि फडणिशी खातें यांजकडे कळवितात. कांहीं मालाबद्दल दररोज हिशोब होतो, कांहींचा दर दहा दिवशीं, तर कांहींचा महिन्यानें, असा उत्पादन–कर वर्षभर सारखा जमा होत असतो. मधून मधून हे सर्व हिशेब पाहून जरूर असल्यास अथवा इष्ट वाटल्यास उत्पादन–कराचे दर बदलण्यांत येतात.

ज्या वस्तु सरकारी संस्थांमार्फत तयार होतात त्यावरहि उत्पादन–कर आकारला जातो. मात्र हें प्रमाण सरकारी उद्योगकेंद्रांत तयार होणाऱ्या मालावरील करापेक्षां कमी असतें. याचें कारण असें की सहकारी संस्था बहुधा हस्तव्यवसाय करणाऱ्यांच्या असतात आणि त्यांच्याजवळील यंत्रसाधनें तितकीं उत्पादनक्षम नसतात.

## नफ्यावरील कर

सोव्हिएट अंदाजपत्रकांतील उत्पन्नाच्या बाजूची दुसरी प्रमुख बाब म्हणजे उद्योगकेंद्रांच्या नफ्यावर बसविलेला कर. नफा योजण्याचें मुख्य कारण—दुरुस्ती, संकल्पित वाढ आणि कामगारांच्या सुखसोयी—वर दिलेंच आहे. दुसरें कारण असें की त्यामुळें योजनेपेक्षां उत्पादन वाढविण्यास आणि उत्पादन खर्च कमी करण्यास चालना मिळते. यामुळें उत्पादनाचा खर्च कमींतकमी होण्यास मदत होते; आणि एकच माल तयार करणाऱ्या निरनिराळ्या उद्योगकेंद्रांचे उत्पादन खर्च स्पर्धेमुळें जवळजवळ समान होत जातात. नफ्यावरील कर नियोजित नफ्यावर

न आकारतां प्रत्यक्ष नफ्यावर आकारण्यांत येतो. वेगवेगळ्या उद्योग-केंद्रांतील नफ्यावरील कराचें प्रमाण वेगवेगळें असतें. ज्या उद्योग-केंद्रांना स्वतांची बऱ्याच मोठ्या प्रमाणांत वाढ करावयाची असेल त्यांवर कमी प्रमाणांत कर बसविला जातो; उलट ज्यांना वाढ करावयाची नसेल त्यांच्या नफ्यावर ८१ टक्केपर्यंत कर बसतो. परंतु कमींत कमी कर १० टक्के तरी असतोच. किमान कर बसविण्याचा उद्देश संकल्पित वाढीसाठीं जी योजना आंखलेली असते तिच्यावर नियंत्रण ठेवण्याचा असतो. हा कर दर तिमाहीला बँकेंत जमा होतो आणि वर्षअखेरीस सर्व हिशेब पुरा करण्यांत येतो.

आतां प्रश्न असा उद्‌भवतो कीं उत्पादन कर आणि नफ्यावरलि कर यांचा उद्देश जर भांडवलाची वाढ (अथवा दुरूस्ती करण्याचाच आहे) तर हे दोन कर वेगवेगळे कां ठेवले आहेत? याचें उत्तर असें आहे कीं नफा ही बाब काढून टाकली तर उद्योगकेंद्रांतील कामकऱ्यांना त्याबद्दल आपलेपणा व आस्था वाढणार नाहीं. उलट विक्री-किंमत व उत्पादन-खर्च यांमधील सर्व फरक नफा समजलें ( उत्पादन कर काढून टाकला ) तर उद्योगकेंद्राचें प्रत्यक्ष उत्पादन व नियोजित उत्पादन यांमध्यें कित्येक वेळा फरक पडत असल्यामुळें करापासून होणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज चुकेल आणि अंदाजपत्रक निरुपयोगी ठरेल. उत्पादन-कराची रक्कम ही एकूण राष्ट्रांतील वस्तूंच्या उत्पादनावर अवलंबून असते आणि वेगवेगळ्या उद्योगकेंद्रांतील उत्पादन योजनेपासून कांहींसें पुढें मागें टळलें तरी एकूण उत्पादन बहुधा योजने-नुसार पार पडतें; त्यामुळें या कराचें अंदाजी उत्पन्न व प्रत्यक्ष उत्पन्न यांत तितका फरक पडूं शकत नाहीं.

याशिवाय उत्पादन केंद्रें अथवा इतर संस्था यांच्या उत्पन्नावर आणखी लहान सहान कर बसविण्यांत आलेले आहेत. यापैकीं सामायिक शेतीवर बसविलेल्या कराचा उल्लेख केला पाहिजे. पीक विकून येणाऱ्या उत्पन्ना-वर शेंकडा ३ ते ४ टक्के कर आकाण्यांत येत असतो. त्याचा मुख्य उद्देश अंदाजपत्रकांत फारशी भर घालण्याचा नसून शेतीचें उत्पादन व त्यांचा पैशांचा व्यवहार यावर नियंत्रण ठेवतां यावें असा आहे.

## मिळकतीवरील कर

सरकारी उत्पन्नाच्या दुसऱ्या भागाकडे आतां वळूं. हा भाग मुख्यतः दोन तऱ्हांनीं येतो; (१) वैयक्तिक मिळकतीवरील कर आणि घरबांधणी व सांस्कृतिक कर (२) राष्ट्रीय कर्ज. याशिवाय स्थानिक महत्त्वाचे कांहीं कर असतात आणि त्यांचा विनियोग विशिष्ट सुखसोयी पुरविण्याच्या कामीं होतो. त्यांचें प्रमाण ठिकठिकाणीं वेगवेगळें असतें. वर उल्लेखिलेले प्रमुख कर मात्र सर्व ठिकाणीं सारख्याच प्रमाणांत आकारलेले असतात.

उत्पन्नावरील कराचे दोन प्रकार आहेत—( १ ) शहरी नागरिकांवर बसविलेला कर ( २ ) ग्रामीण नागरिकांवर बसविलेला कर. शहरी कर पैशाच्या रूपानें वसूल करण्यांत येतो ( पगाराचा तेवढा हिस्सा कापून घेण्यांत येतो. ) ग्रामीण कर पैसा आणि धान्य अथवा इतर वस्तूंच्या रूपानें गोळा केला जातो. उत्पन्नावरील कराबरोबरच घरबांधणी कर आणि सांस्कृतिक सुखसोयींचा कर हेहि आकारले जातात. उत्पन्नावरील करांचें प्रमाण वाढत्या उत्पन्नाप्रमाणें वाढत जातें; आणि हें प्रमाण वेगवेगळ्या वर्गांतील नागरिकांवर वेगवेगळें असतें. उदाहरणार्थ, शहरी नागरिकांपैकीं कारखान्यांतील व इतर कामगारांवर सर्वांत कमी कर आकारला जातो; उलट सहकारी संस्थांत नसलेल्या व केवळ व्यक्तिशः धंदा करणाऱ्या कारागिरांवर अधिक कर आकारण्यांत येतो. तसेंच सामुदायिक शेती करणारे शेतकरी स्वतांच्या खाजगी शेतांतून जें उत्पन्न काढतात त्यांवरहि कर घेण्यांत येतो. पण जे शेतकरी सामुदायिक शेतींत भाग न घेतां सर्वच जमीन खाजगी रीत्या पिकवीत असतील त्यांच्यावरील करावें प्रमाण याहून अधिक असतें. याप्रमाणें उत्पन्नावरील कराचा सरकारी तिजोरींत भर घालण्याकडे जसा उपयोग होतो तसाच वेगवेगळ्या वर्गांत भेदभाव करून समाजवादी अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठींहि त्याचा उपयोग केला जातो.

## राष्ट्रीय कर्ज ( Loans. )

राष्ट्रीय कर्जाचें विवेचन करतांना प्रथम ही गोष्ट लक्षांत घेतली

पाहिजे कीं इतर देशांतल्याप्रमाणें अकस्मात् जादा खर्च करावा लागल्या-मुळें अंदाजपत्रकांत आलेली तूट भरून काढण्यासाठीं हें कर्ज उभारलेलें नाहीं. कर्ज ही उत्पन्नाची नित्याची बाब समजली जाते आणि त्याचा उद्देश जनतेजवळ रिकामा राहिलेला पैसा आर्थिक प्रगतीच्या कामीं उपयोगांत यावा हासा आहे. इतर देशांत हें कार्य लिमिटेड कंपन्या करतात. कर्ज दोन प्रकारचें असतें. उद्योगकेंद्रं, सहकारी व इतर संस्था या आपल्या संस्थांतर्फे सरकारी कर्जरोख्यांत पैसे गुंतवितात. तसेंच नागरिक व्यक्तिशः सरकारी कर्जरोखे खरीद करतात. कर्जरोखे घेणें सर्वांस सुलभ व्हावें म्हणून लहान लहान हप्त्यांनीं ते विकत घेण्याची सोय असते. व्याजाचा दर सामान्यपणें ४ टक्के असतो.

अंदाजपत्रकांत कर्जापासून मिळणाऱ्या वार्षिक रकमेचा आंकडा दरवर्षीं वाढत आहे. पण एकूण जमेच्या मानानें कर्जाचें प्रमाण अगदीं लहान असून तें कमीच होत आहे असें दिसतें. अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी कर्जावर अवलंबून राहण्याची मुळींच शक्यता नाहीं; तसेंच कर्जरोख्यांवर द्याव्या लागणाऱ्या व्याजाची रक्कम वाढून ती अंदाजपत्रकाला डोईजड होण्याची भीतीहि नाहीं.

सरकारी कर्जामुळें सोव्हिएट देशांत कर्जरोख्यावरील व्याजावर जगणारा नवा वर्ग निर्माण होत आहे असें विधान न कळत व जाणून बुजून कित्येक लेखक करतात. ( उदा. मिनू मसाणी. ) याविषयीं पुढील आकडे पाहिल्यास वस्तुस्थितीची कल्पना येईल.

१९३७ सालीं सरासरी वार्षिक वेतन दरमाणशीं ३०३८ रुबल होतें. या वर्षीं कर्जाचा एकूण आंकडा १८२७ कोटि रुबल असा होता. हें कर्ज ५ कोटि नागरिकांनीं दिलेलें होतें हें ध्यानात घेतलें पाहिजे. म्हणजे कर्जरोखे घेणारा वर्ग अल्पसंख्य नसून बहुतेक मिळवती जनता कर्जरोखे घेते असें सिद्ध होतें. तसेंच दर माणशीं कर्जाची रक्कम ३६५ रुबल पडते. याशिवाय १'४ कोटि लोकांनीं सेव्हिंग बँकेंत ३९८ कोटि रुबल ठेवलेले होते. हें प्रमाण दरमाणशीं २८५ रुबल आहे. यावर ४ टक्के व्याज मिळतें; म्हणजे सरासरी दर माणशीं ३०३८ रुबल वेतनांत

सरासरी १५ आणि ११ रुबल इतकी प्रचंड भर या व्याजामुळें पडते! यावरून वरील विधान कितीसें खरें आहे याची कल्पना वाचकांस येऊं शकेल. नागरिकांजवळ रिकामा राहिलेला पैसा स्वतांच्याच अडी-अडचणीसाठीं शिलकी टाकतां यावा आणि त्यामुळें राष्ट्रीय आर्थिक प्रगतीस हातभारहि लागावा एवढाच सरकारी कर्जरोख्यांमागील उद्देश आहे. शिलकी पैशांवर जगणारा नवा उच्च वर्ग निर्माण होत आहे ही कांहींना वाटणारी भीति किंवा (सोव्हिएट विरोधी लोकांना वाटणारी) आशा अगदीं फोल आहे.

## अंदाजपत्रक

अंदाजपत्रकांत उत्पन्नाच्या या प्रमुख चार बाबींचें महत्त्व कोणत्या प्रकारचें आहे हें दाखविण्यासाठीं जमेच्या बाजूचे तीन वर्षांचे आंकडे नमुन्या दाखल दिले आहेत. त्यावरून सोव्हिएट अंदाजपत्रक मुख्यत: उत्पादनकरावरच कसें उभें आहे याची उत्तम कल्पना येते. तसेंच वैयक्तिक उत्पन्नावरील कर आणि कर्जरोख्यांपासून मिळणारी रक्कम यांचें प्रमाण किती थोडें आहे हें दिसून येईल. (कोष्टकांत जमेच्या बाजूच्या सर्व बाबी दिलेल्या नाहींत. फक्त चार प्रमुख बाबी दिल्या आहेत.)

### कोष्टक ५ : सोव्हिएट अंदाजपत्रक—जमा

(आंकडे दशकोटि रुबलांचे)

| साल | १९३८ | १९४० | १९४७ (नियोजित) |
|---|---|---|---|
| एकूण जमा. | १२७४ | १७८१ | ३९१५ |
| यांपैकीं:— उत्पादन कर... | ८०४ | १०५८ | २५४७ |
| नफ्यावरील कर... | १०६ | २१४ | १८७ |
| कर्ज... | ७६ | ११४ | २१४ |
| उत्पन्नावरील व तत्सम कर... | ५० | ९४ | २७७ |

सोव्हिएट अंदाजपत्रकांतील खर्चाच्या बाजूचे आंकडे पुढें दिले आहेत.

**कोष्टक ६ : सोव्हिएट अंदाजपत्रक-खर्च** ( आंकडे दशकोटि रुबलांचे )

| साल | १९३८ | १९४० | १९४७ ( नियोजित ) |
|---|---|---|---|
| एकूण खर्च | १२४० | १७३३ | ३७१४ |
| त्यांपैकीं आर्थिक प्रगतीसाठीं | ५१७ | ५७१ | १३१८ |
| सांस्कृतिक व सामाजिक सोयी | ३५३ | ४१७ | १०७१ |
| यांमधील शिक्षण | १८८ | २२७ | ५४४ |
| संरक्षण | २३१ | ५६१ | ६७० |
| राज्यकारभार व न्यायखातें | ५४ | ६७ | १२८ |

यावरून पुढील गोष्टी ठळकपणें दिसून येतात. नवें भांडवल ( आर्थिक प्रगति ) आणि सांस्कृतिक व सामाजिक सोयी या दोन बाबींवरच सर्वांत अधिक खर्च (१९४७ सालीं शेंकडा ६४·३ टक्के ) होतो. सांस्कृतिक सोयींत सर्वांत महत्त्वाची बाब शिक्षण आहे. कारण त्यांमधील निम्याहून अधिक खर्च शिक्षणावर होतो. संरक्षणावरील खर्च सुमारें सहावा हिस्सा आहे आणि राज्यकारभार व न्यायदान यांवरील खर्चाचें मान एकंदर खर्चाचे मानानें अतिशय थोडें दिसतें.

युद्धकाळांत संरक्षण खर्चामध्यें कसा चढउतार होत गेला याची कल्पना वरील आंकड्यांवरून येत नाहीं म्हणून कांहीं वर्षांतील संरक्षण खर्चाचें एकूण खर्चाशीं बसणारें शेंकडा प्रमाण पुढें दिलें आहे.

**संरक्षण खर्चाचें एकूण खर्चाशीं शेंकडा प्रमाण**

| साल | | | | साल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| साल | १९३८ | १८·६ | टक्के | साल | १९४५ | ४२·९ | टक्के |
| ” | १९४० | ३२·६ | ” | ” | १९४६ | २३·९ | ” |
| ” | १९४३ | ५९·५ | ” | ” | १९४७ | १८ | ” |
| ” | १९४४ | ५२.२ | ” | | | | |

सांस्कृतिक व सामाजिक सोयीसाठीं होणाऱ्या खर्चाची वर्गवारी, सन १९४६ व १९४७ सालांच्या योजनांतील पुढील आंकड्यावरून दिसेल.

**कोष्टक ७ : सांस्कृतिक व सामाजिक सोयींवरील खर्च**

( आंकडे दशकोटि रुबलांचे )

| साल | १९४६ | १९४७ |
|---|---|---|
| शिक्षण— | ३८१ | ५४४ |
| आरोग्य— | १३८ | १८९ |
| वृद्धापकाळाचा व इतर विमा— ( Social Iusurance ) | ७३ | ९३ |
| समाजोपयोगी सोयी— ( क्लब, सिनेमा-विश्रांतिगृहें वगैरे ) | १७६ | २०६ |

आर्थिक प्रगति व नवें भांडवल याकरितां खर्चीं पडणाऱ्या पैशांची अर्थव्यवस्थेच्या विविध भागांत कशी विभागणी होते याची कल्पना येण्यासाठीं पुढील आंकडे देत आहें.

**कोष्टक ८ : आर्थिक प्रगति व नवें भांडवल यांवरील खर्च**

( आंकडे दशकोटि रुबलांचे )

| साल | १९४६ | १९४७ |
|---|---|---|
| एकूण— | ९५७ | १३१८ |
| यापैकीं उद्योगधंदे— | ६१६ | ७९९ |
| शेती— | १२२ | १६२ |
| वहातूक — | ८९ | १३२ |
| व्यापार— | ३१ | ३८ |

## मध्यवर्ति आणि इतर अंदाजपत्रकें

वर दिलेले सर्व आंकडे एकंदर सोव्हिएट देशासंबंधींचे आहेत. याला 'एकत्रित उर्फ राष्ट्रीय अंदाजपत्रक' असें नांव आहे. त्यामध्यें तीन प्रकारचीं अंदाजपत्रकें समाविष्ट झालेलीं आहेत—( १ ) मध्यवर्ति सरकारचें अंदाजपत्रक. ( २ ) घटक राष्ट्रांचीं अंदाजपत्रकें, आणि ( ३ ) स्वायत्त राष्ट्रें, प्रांत, जिल्हे, तालुके, शहरें व गांवें वगैरेंचीं 'स्थानिक' अंदाजपत्रकें यापैकीं प्रत्येक अंदाजपत्रक योग्य त्या लोकसभेकडून मंजूर व्हावें लागतें. आणि हीं सर्व अंदाजपत्रकें एकत्र आणणारें राष्ट्रीय अंदाजपत्रक मध्यवर्ति सोव्हिएट सभेत मंजूर व्हावें लागतें. मध्यवर्ति सरकारचें सर्व अंदाजपत्रकांवर याप्रकारें नियंत्रण राहतें. राष्ट्रीय अंदाजपत्रकाची या तीन विभागांत कशी वांटणी होते हें पुढील कोष्टकावरून समजतें. आंकडे १९४० सालचे असून दशकोटि रुबलांचे आहेत.

### कोष्टक ९ : अंदाजपत्रकांची विभागणी ( १९४० )

| | जमा | खर्च |
|---|---|---|
| एकत्रित अंदाजपत्रक | १८३९ | १७९९ |
| यापैकीं मध्यवर्ति ” | १४११ | १३७० |
| घटकराष्ट्रांचीं अंदाजपत्रकें | २८२ | १२४ |
| स्थानिक ” | १४६ | ३०५ |
| स्थानिक अंदाजपत्रकांना मध्यवर्ति व घटकराष्ट्रांच्या अंदाजपत्रकांकडून होणारी मदत | १५९ | …… |

मध्यवर्ति सरकारच्या खर्चाच्या मुख्य बाबी भांडवलाची निर्मिति व वाढ आणि संरक्षण या आहेत. घटक राष्ट्रें आणि स्थानिक अंदाजपत्रकांत मुख्यतः भांडवलाची निर्मिति आणि शिक्षण, आरोग्य वगैरे सांस्कृतिक सोयी यांवर खर्च होतो. १९४७ सालच्या अंदाजपत्रकांत

घटक राष्ट्रांच्या खर्चाचे ( यांत स्थानिक अंदाजपत्रकेंहि समाविष्ट आहेत ) पुढील आंकडे पाहा. एकूण खर्च ८२२ दशकोटि रुबल; यांपैकीं सांस्कृतिक व सामाजिक सोयींवरील खर्च ५३८ द. को. रु. आणि यांमधील शिक्षण–खर्च ३०९ द. को. रु. व आरोग्यखर्च १६६ द. को. रु. संरक्षण आणि भांडवल निर्मिति या गोष्टींकडे अखिल देशाच्या दृष्टीनें पाहावयास हवें, परंतु शैक्षणिक व इतर सामाजिक सोयी वाढवितांना त्या त्या प्रदेशाला अनुरूप अशी प्रगति व्हावयास पाहिजे हें या तऱ्हेच्या विभागणीमागील कारण आहे.

हें सर्व भागविण्यासाठीं ज्या त्या अंदाजपत्रकांत जमेच्या बाजू वांटून दिलेल्या असतात. कांहीं कर मध्यवर्ति सरकारकडे जमा होतात तर दुसरे कांहीं घटक राष्ट्रांच्या सरकारकडे व स्थानिक अधिकारी संस्थाकडे जमा होतात. कांहीं कर असे असतात कीं विवक्षित सरकारला ते वसूल करणें सुलभ असतें. उलट स्थानिक महत्त्वाचे व वैयक्तिक उत्पन्नावरील कर गोळा करणें स्थानिक अधिकारी संस्थांकडे सोपविल्यास त्या संस्था करवसुलींत अधिक बारकाईनें लक्ष घालून वसुली चांगलपणें करतात. आणि सर्व करवसुली व खर्च यांवर अखेर मध्यवर्ति सरकारचें नियंत्रण व देखरेख हवी. या सर्व गोष्टींचा विचार होऊन करांची विभागणी केलेली असते; तसेंच वेळोवेळीं या विभागणीचा फेरविचारहि होतो. स्थानिक अंदाजपत्रकांची तोंडमिळवणी होण्यासाठीं मध्यवर्ति व घटक राष्ट्रांच्या अंदाजपत्रकांमधून मदतीदाखल बरीच मोठी रक्कम मिळते हें मागील कोष्टकावरून दिसून येते. मध्यवर्ति सरकार कित्येक घटक राष्ट्रांनाहि असेंच साहाय्य करतें. मध्य आशियांतील मुसलमान बहुसंख्य असलेल्या मागासलेल्या राष्ट्रांची आर्थिक प्रगति यामुळेंच शक्य झाली.

## सोव्हिएट अंदाजपत्रकांचे विशेष

सोव्हिएट अंदाजपत्रक, कर आणि खर्चाच्या बाबी यांजकडे नजर टाकल्यास इतर राष्ट्रांच्या तुलनेनें त्याचे कांहीं विशेष ठळकपणें दिसून येतात. मुख्य विशेष असा कीं सोव्हिएट अंदाजपत्रक हें राष्ट्रीय

आर्थिक योजनेचें एक अंग आहे. आर्थिक योजनेंतील विविध वस्तूंच्या ताळेबंदांवर त्याची उभारणी होते. राष्ट्रीय अंदाजपत्रकांत केवळ सरकारी उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबींचा विचार केलेला असतो असें नाहीं; राष्ट्रांतील सर्व उद्योगकेंद्रांच्या आर्थिक कार्यक्रमांतील द्रव्ययोजनांची राष्ट्रीय अंदाजपत्रकांत दखल घेतली जाते. किंमत आणि उत्पादन-खर्च यांमधील वाढाव्याचें केंद्रीकरण करून त्याचा राष्ट्रीय गरजेनुसार विनियोग करण्याचें अंदाजपत्रक हें साधन आहे. समाजवादी अर्थव्यवस्थेंत भांडवल खाजगी मालकीचें नसतें, म्हणून आर्थिक प्रगति योजनाबद्ध असावी लागते आणि अंदाजपत्रक या प्रगतीची पैशाची बाजू सांभाळतें. म्हणूनच उत्पादनकर हा अंदाज पत्रकाचा मुख्य आधार आहे. इतर देशांत अंदाजपत्रक आणि आर्थिक प्रगति यांचा असा प्रत्यक्ष व जवळचा संबंध नसतो.

वैयक्तिक मिळकतीवरील कर हीं इतर देशांच्या अंदाजपत्रकांत जमेची मुख्य बाब असते. सोव्हिएट अंदाजपत्रकांत ही बाब अगदीं क्षुल्लक आहे. तसेंच इतर देशांत सरकारला एखादा मोठा आर्थिक कार्यक्रम ( उदा० धरणें, रेलवे बांधणे, ) हातीं घ्यावयाचा म्हटला कीं त्याकरितां मोठालीं कर्जें काढावीं लागतात. युद्धकाळीं तर कर्ज काढूनच अंदाजपत्रकांतील तूट भरून काढावी लागते. गेल्या महायुद्धांत इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांचा राष्ट्रीय कर्जाचा आंकडा सारखा फुगत गेला. सोव्हिएट सरकारला असें करावें लागत नाहीं. शिवाय ज्यांच्याकडून मोठालीं कर्जें मिळतील असे पैसेवाले भांडवलदार जमीनदार तेथें नाहींत. तेथें सरकारी कर्जरोखे आहेत, पण त्यांचा उद्देश वेगळा आहे, आणि एकूण उत्पन्नाशीं त्यांचें प्रमाण अगदीं कमी आहे. यामुळें इतर देशांतल्याप्रमाणें सोव्हिएट सरकारला कर्जाची परतफेड व व्याज यापायीं प्रतिवर्षी मोठा खर्च करावा लागत नाहीं. इंग्लंडच्या अंदाजपत्रकांत खर्चाच्या बाजूची सर्वांत मोठी बाब व्याज हीच आहे! १९३९ सालीं हा खर्च सुमारें एक चतुर्थांश होता. उलट सोव्हिएट देशांतील पुढील आंकडे पाहा. १९४० सालीं एकूण खर्च १७९९ दशकोटि रुबल

होता व त्यापैकीं व्याज आणि परतफेड यासाठीं फक्त २५ द. को. रुबल द्यावे लागले. १९४७ सालचे हेच आंकडे अनुक्रमें ३७१४ व ६१ दशकोटि रुबल असे आहेत.

## राष्ट्रीय बँक

सोव्हिएट देशांत पैशासंबंधीचा सर्व व्यवहार राष्ट्रीय बँक ( State Bank ) पाहते. तिच्या शाखा सर्व देशभर आहेत आणि तिच्याशिवाय इतर कोणाहि संस्थेला हुंड्या, चेक, बिलें देण्याचें व वटविण्याचे अधिकार नाहींत. राष्ट्रीय बँक ही मध्यवर्ति प्रधानमंडळाच्या नियंत्रणाखालीं पण इतर सर्व खात्यांहून अलग राहून आपलें काम करते. मध्यवर्ति प्रधानमंडळाचा एक सभासद तिचा अध्यक्ष असतो.

प्रत्येक उद्योगकेंद्राचें राष्ट्रीय बँकेंत खातें असते, आणि त्याचे दोन विभाग केलेले असतात. (१) चालू खातें व (२) कर्जाऊ खातें. उद्योगकेंद्राच्या दैनंदिन व्यवहाराला जो पैसा लागतो तो पैसा " खेळतें भांडवल " म्हणून त्याच्या चालू खात्यावर जमा करण्यात येतो आणि जरूरीप्रमाणें त्याचा विनियोग करण्याचा अधिकार उद्योगकेंद्रास असतो. जसजसें मालाचें उत्पादन होऊन त्याचा उठाव होतो तसतसा त्याच्या विक्रीचा पैसा त्याच्या नांवावर बँकेंत जमा होतो; आणि अशा प्रकारें खेळतें भांडवल कायम राहतें. नोकरांचे पगार व कच्च्या मालाची खरेदी या नित्य व्यवहाराचें काम चालू खात्यांतून भागतें. पण कारखान्याच्या वाढीसाठीं अथवा हंगामांत कच्च्या मालाची बरीच खरेदी करून ठेवण्यासाठीं अचानक बराच पैसा हवा असला तर त्याला खेळतें भांडवल पुरें पडत नाहीं. याकरितां बँकेकडून अल्प मुदतीनें कर्जाऊ रक्कम मिळते व तिचा हिशोब कर्जाऊ खात्यांत ठेवला जातो. तयार मालाच्या विक्रीचा पैसा उभा होतांच त्यापासून प्रथम कर्जफेड केली जाते. कर्ज देण्यापूर्वीं बँक कर्जाचें कारण तसेंच कारखान्याचें उत्पादन यांचा बारीक तपास करते. या पद्धतीनें कारखान्याच्या उत्पादनावर आणि पैशांच्या व्यवहारावर सारखें नियंत्रण राहतें. उद्योगधंद्यांच्या ज्या निरनिराळ्या

शाखा आहेत त्यांना अनुसरून राष्ट्रीय बँकेनेंहि सोयीसाठी वेगवेगळे विभाग काढलेले आहेत.

अशा प्रकारें उद्योगकेंद्राच्या दैनंदिन देवघेवीचा रोखीचा व्यवहार सुरू असतो. खरेदीचे पैसे वजा होतात, विक्रीचे पैसे जमा होतात, करांची रक्कम सरकारच्या खात्यांत टाकली जाते, नोकरांच्या पगारासाठीं लागणारा रोख पैसा अधिकाऱ्यांच्या हवालीं करण्यांत येतो. तसेंच वेगवेगळया उद्योगकेंद्रांचीं परस्परांकडे असलेली देणींघेणी आणि त्यांचे पैसे वळते करणें ही कामेंहि राष्ट्रीय बँकेमार्फत होतात.

## दीर्घ मुदतीचे व्यवहार ( Credits )

हा सर्व बहुतांशीं चालू व्यवहार झाला. पण कित्येक नवे कारखाने उभारावयाचे, रेलवे बांधावयाच्या तर या सर्वांना पैसे कोणाकडून व कसे पुरविण्यांत येतात ? कारण हे सर्व दीर्घ मुदतीचे व्यवहार आहेत. याकरितां राष्ट्रीय बँकेच्या नियंत्रणाखालीं चार प्रमुख बँका आहेत. आर्थिक योजनेंत ठरविल्याप्रमाणें एखाद्या नव्या कारखान्याच्या उभारणीसाठीं द्रव्ययोजनेंत जो पैसा मंजूर झालेला असेल तो सर्व या नव्या कारखान्यांच्या नांवें या चार बँकांपैकीं एका बँकेंत राष्ट्रीय बँकेकडून वळविला जातो. मग ज्यांच्यावर कारखाना उभारण्याची जबाबदारी टाकली आहे त्या अधिकाऱ्यांना या बँकेंतून जरूरीप्रमाणें पैसे मागतां येतात. परंतु ही मागणी पुरवितांना कारखान्यांच्या बांधणीचें काम योजनेप्रमाणें आणि ठरविलेल्या पैशांत पार पडत आहे कीं नाहीं, नसल्यास त्यांचे कारण कोणतें, इत्यादि गोष्टींची बँकेकडून छाननी होते. नव्या भांडवलाच्या उत्पादनावर सतत देखरेख राहावी असा या व्यवस्थेमागील उद्देश आहे. याकरितां वेगळया बँका असण्याचें कारण असें की राष्ट्रीय बँकेकडे सर्व सूत्रें येण्यापूर्वी त्या चालू होत्या व उद्योगधंद्यांच्या त्या त्या विभागांत त्या विशेष तज्ज्ञ झालेल्या होत्या. सध्यां त्यांचें स्वरूप राष्ट्रीय बँकेच्या तज्ज्ञ शाखा याच स्वरूपाचें आहे. नव्या भांडवलाच्या निर्मितीचा व्यवहार वेगळा कां

ठेवला जातो याचें कारण मात्र सोव्हिएट अर्थव्यवस्थेंतच आहे. तेथें कारखान्याची निर्मिति आणि त्यापासून पुढें होणारें उत्पादन या गोष्टी अलग आहेत. उत्पादन फायदेशीर होईल तरच नवें भांडवल निर्माण करावयाचें आणि जो कारखाना बांधतो त्याच्याच मालकीखालीं त्याचें उत्पादन चालू राहावयाचें अशी परिस्थिति तेथें नाहीं. जें खातें बांधणीच्या कामीं तज्ज्ञ असेल तें खातें कारखाना बांधतें; आणि जें चालविण्याच्या कामीं तज्ज्ञ असेल त्या खात्याकडून तो चालविण्यांत येतो. तेव्हां बांधणीच्या कामावर निराळी देखरेख असावयास पाहिजे; म्हणून तो व्यवहार निराळा ठेवण्यांत येतो.


हे सर्व अल्प मुदतीचे आणि दीर्घ मुदतीचे पैशाचे व्यवहार आर्थिक योजनेंतील विविध कार्यक्रम अमलांत आणण्यासाठीं असतात; म्हणून त्या सर्वांची पूर्वयोजना होऊं शकते. मुदतीच्या व्यवहारांची योजना ( Credit plan ) ही द्रव्ययोजनेचाच एक भाग असते; आणि ती त्या त्या फडणिशीखात्यानें ठरविलेली असते.

राष्ट्रीय बँकेचें दुसरें महत्त्वाचें काम म्हणजे सर्व देशभर होणाऱ्या आर्थिक उलाढालींत होणाऱ्या रोखीच्या व्यवहारांची योजना ( Cash plan ) ठरवून ती अमलांत आणणें. ही योजनाहि अर्थ-योजनेचा आणि म्हणून द्रव्ययोजनेचा एक उपविभाग असते. एकंदर द्रव्ययोजना ठरली आणि मुदतीच्या व्यवहारांची व्याप्ति ठरली कीं राहिलेली व्याप्ति रोखीच्या व्यवहारांची हें सरळ आहे. रोखीच्या व्यवहारांतील एका भागाचा ( उद्योगकेंद्रें व संस्था यांच्या चालू खात्याचा ) उल्लेख वर आलाच आहे. निरनिराळ्या उद्योगकेंद्रांचे एकमेकांशीं जे व्यवहार होतात तेहि बहुधा रोखीनें ( चालू खात्यांतून ) होतात. तसेंच सरकारची करवसूली ही प्रचंड उलाढाल रोखीनेंच होते; आणि सरकारी खर्चांतील बराचसा भागहि रोख व्यवहारानें होतो. यासाठीं बँकेजवळ रोख शिल्लक किती तरी असावी लागते आणि ती वर्षभर जमा होत व खर्च होत असते. यासाठीं बँकेची स्वतांचीहि रोखीचा योजना ( Cash plan ) आंखलेली असते.

**चलनाची योजना** ( Currency plan )

रोखीच्या व्यवहारांतील कित्येक व्यवहार केवळ निरनिराळ्या संस्थांच्या बँकेंतील खात्यांवर होतात. परंतु दुसरे कांहीं रोख पैसा, म्हणजे नोटा व नाणीं, देऊन करावे लागतात. उदाहरणार्थ, नोकरवर्गाला दिला जाणारा पगार रोख पैशांतच असला पाहिजे; तरच त्यांना आवश्यक वस्तु विकत घेतां येतील. तेव्हां एकंदर देवघेव सुरळीत होण्यासाठीं रोख पैसा, नाणीं व नोटा ठराविक संख्येनें पाहिजे. हा आंकडा अर्थातच आर्थिक देवघेवीच्या व्यापावर अवलंबून असतो. आर्थिक योजनेंत किंमती आणि उपभोग्य वस्तूंचें उत्पादन व विभागणी या गोष्टी ठरल्या कीं त्यासाठीं चलन किती हवे हें ठरवितां येतें. यालाच चलन योजना (Currency plan) म्हणतात आणि ती रोखीच्या योजनेचा (Cash plan) भाग असतो. तिच्याअन्वयें नवें चलन किती हवें अथवा चालू व्यवहारांतून किती चलन काढून घ्यावें लागेल यांचाहि अंदाज केलेला असतो. चलनासंबंधींचा सर्व अधिकार राष्ट्रीय बँकेचा आहे.

**चलनाचा ओघ कसा वाहतो याची कल्पना पुढील द्रव्यचक्रावरून येईल.**



## परदेशांशीं व्यवहार

अंतर्गत चलन व व्यवहार हे जसे राष्ट्रीय बँकेमार्फत नियोजित होतात, त्याप्रमाणें आयात निर्यात व्यापारांत परदेशांशीं होणारा पैशांचा व्यवहारहि तिच्यातर्फेंच होतो. तसेंच परदेशांतील वकिलाती किंवा प्रवासी यांसाठीं जें परदेशीय चलन लागतें तें उपलब्ध करून देण्याचें कामहि राष्ट्रीय बँकेचें आहे. या दोन तऱ्हेच्या कार्यासाठीं परदेशीय चलनाची योजना ( Foreign Currency plan ) ठरविण्यांत येते परदेशाशीं आर्थिक व्यवहार करतांना रुबलचा एखाद्या स्थिर परदेशीय चलनाशीं भाव ठरविलेला असतो. १९३८ सालापासून एका अमेरिकन डॉलरला ५.३ रुबल हा दर ठरविण्यांत आला आहे. या हुंडणावळीच्या दराला परस्पर देशांतील समान क्रयशक्ति असें स्वरूप नाहीं हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. केवळ हिशेब करावयाचें साधन एवढेंच त्याचें स्वरूप आहे. सोव्हिएट देशाचा इतर देशांशीं होणारा व्यापार हा सामान्यतः विनिमयाच्या स्वरूपाचा असतो.

## समाजवादी अर्थव्यवस्थेंत पैशाचें कार्य कोणतें ?

येथें तात्त्विक दृष्ट्या एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो, तो असा कीं समाजवादी देशांत पैशाचें कार्य कोणतें ? या प्रश्नाचा थोडक्यांत विचार करून द्रव्ययोजनेचें विवेचन संपवितों.

अखेर पैसा देऊनच वस्तु विकत घ्याव्या लागतात; तेव्हां प्रत्येकाच्या मिळकतीप्रमाणें त्यास उपभोग्य वस्तूंचा वांटा मिळवून देण्याचें पैसा हें साधन आहे. पैशाचें हें कार्य भांडवली आणि समाजवादी अर्थव्यवस्थेंत एकच आहे. परंतु या दोन अर्थव्यवस्थांमध्यें किंमती आणि वेतनें अगदीं भिन्नभिन्नपणें ठरतात आणि म्हणून विभागणीचीं तत्त्वें वेगवेगळीं आहेत.

भांडवली अर्थव्यवस्थेंत वस्तूची किंमत, ती तयार करण्यासाठीं किती श्रमशक्ति लागते, यावरून ठरते. पण कामगारांचें वेतन त्यांस जगण्यासाठीं किती किंमतीच्या वस्तु लागतील यांवरून ठरतें. समाजवादी

अर्थव्यवस्थेंत वेतन आणि किंमती अशा रीतीनें ठरत नाहींत. समाजानें उत्पन्न केलेल्या एकूण उपभोग्य वस्तूंची विभागणी ज्या त्या व्यक्तींच्या सामाजिक उपयुक्ततेप्रमाणें आणि गरजेनुसार व्हावी या हेतूनें वेतन आणि किंमती यांच्या योजना ठरविण्यांत येतात.

म्हणूनच समाजवादी अर्थव्यवस्थेंत चलन आणि पैशाचे व्यवहार योजनाबद्ध असतात आणि ते आर्थिक योजनेच्या पावलांवर पावलें टाकून चालतात. चलन आणि द्रव्यव्यवस्था ( Finance ) यांचा अर्थ-व्यवस्थेवर पगडा बसवण्याचा संभव उत्पन्न होत नाहीं; आणि म्हणून त्यामध्यें घालमेली योजून अर्थव्यवस्थेवर दडपण अथवा सुधारणा लादतां येत नाहीं.

मग समाजवादी उत्पादनांत पैशाचें कार्य कोणतें ? उत्पादनाच्या व्यवहारांत पैसा हें तेथें केवळ हिशेबाचें साधन आहे, भांडवली अर्थ-व्यवस्थेप्रमाणें तेथें वस्तूंच्या उत्पादनापासून कसेंहि करून फायदा मारण्याचा प्रश्न नसला, तरी वस्तु निर्माण करण्यासाठीं कच्चा माल आणि श्रमशक्ति कमींतकमी वापरली जावींत हा हेतु असतोच. कारण कमींत-कमी मानवी श्रमांत अधिकांत अधिक वस्तु उत्पन्न करतां येऊन सर्व समाजास भौतिक समृद्धि आणि सांस्कृतिक विकास साधतां यावा हें समाजवादी अर्थव्यवस्थेचें ध्येय आहे. तें साध्य होण्यासाठीं उद्योगधंदे व इतर उत्पादन-केंद्रें कार्यक्षम करणें आवश्यक असतें; त्यांची उत्पादनशक्ति वृद्धिंगत करावी लागते. याकरितां हिशेब ठेवावे लागतात आणि पैसा हें याकामीं साधन म्हणून वापरण्यांत येतें.

याप्रमाणें सोव्हिएट देशांत पैसा हें वस्तूंच्या उत्पादनावर देखरेख आणि नियंत्रण ठेवण्याचें आणि, एकंदर जनतेमध्यें उपभोग्य वस्तूंची योग्य वांटणी करण्याचें साधन आहे.

# दोन अर्थव्यवस्था : ४ :

हिंदुस्तानांत समाजवाद आला पाहिजे असें आज देशांतील अनेक राजकीय पुढारी आणि विचारवंत प्रतिपादन करतात. " किसान मजूर-राज्य " अथवा " शेतकरी कामकरी प्रजाराज्य " या घोषणांमागील उद्देश असाच आहे. भांडवली अर्थव्यवस्थेपेक्षां समाजवादी योजनाबद्ध अर्थ-व्यवस्था श्रेष्ठ दर्जाची आहे, हाच अर्थ यामध्यें अभिप्रेत असला पाहिजे हें उघड आहे. समाजवादी अर्थव्यवस्थेचे विशेष कोणते, आर्थिक नियोजनामध्यें कोणते प्रश्न उपस्थित होतात, आर्थिक नियोजनावर भांडवली अर्थशास्त्रज्ञांचे नेहमीचे आक्षेप कोणते आणि मानवी प्रगतीच्या दृष्टीनें सोव्हिएट अर्थव्यवस्थेला कोणतें महत्त्व आहे इत्यादि गोष्टींचें विवेचन या प्रकरणीं केलें आहे.

## समाजवादी अर्थव्यवस्थेचें श्रेष्ठत्व

वास्तविक समाजवादाचें श्रेष्ठत्व यापूर्वींच अनेकदां अनेक ठिकाणीं चर्चिलें गेलें आहे. पण आजहि त्याविरुद्ध जुनेच मुद्दे उपस्थित केले जातात म्हणून पुन्हा एकदा त्याकडे लक्ष वेधणें जरूर झालें आहे. उत्पा-दनाचीं साधनें समाजाच्या मालकीचीं झालीं कीं त्याचे कसे अनेक फायदे होतात पाहा. जमिनीची खाजगी मालकी नष्ट झाली कीं लोखंड, कोळसा, तेल इत्यादि भूमिगत संपत्तीचा शोध पद्धतशीरपणें

करणें शक्य होतें; आणि खनिज पाहाणीनंतर कोणत्या ठिकाणीं खाणी काढणें अगर विहिरी खोदणें राष्ट्राच्या दृष्टीनें आवश्यक आहे हें ठरवून त्याप्रमाणें योजनाबद्ध प्रगति करतां येते. जमीनदारांचा जमिनीवरील मालकी हक्क त्या ठिकाणीं आडवा येत नाहीं. तसेंच खोदतांना दूरवरचा विचार करून सर्व खनिज संपत्तीचा नीट उपयोग कसा होईल, तिचा अपव्यय होणार नाहीं, असें धोरण दूरदृष्टीनें आंखतां येतें. इतर देशांत ( आणि हिंदुस्तानांतही ) तात्काळ मिळणाऱ्या नफ्यावर दृष्टि ठेवून खाणीवाले भांडवलदार ही राष्ट्रीय खनिज संपत्ति कित्येकदां वांया घालवितात असें आढळून येतें.

नव्या गिरण्या कारखाने उभारतांना एकंदर देशाच्या हिताच्या दृष्टीनें आणि जरूरीप्रमाणें योजना ठरविली जाते. धनिकांच्या लहरीवर आणि परस्पर स्पर्धेवर हें अवलंबून नसतें. आणि म्हणून आपापसांतील स्पर्धा टळून श्रमाचा व भांडवलाचा अपव्यय टळतो. ( झारशाही रशियांत शेजारच्या तेलवाल्यांचें तेल आपल्या विहिरींत येऊन त्याचें नुकसान व्हावें या हेतूनें तेलाच्या विहिरींचे कित्येक मालक कुंपणाच्या आंत आपल्या जमिनींत अधिक खोल विहिर खोदीत असत ! ) तसेंच त्यामुळें निरनिराळ्या प्रदेशांची प्रमाणशीर औद्योगिक प्रगति घडवून आणणें शक्य होतें. एखादा प्रदेश अगदीं मागासलेला आणि दुसरा एखादा प्रदेश कारखान्यांनीं तुडुंब भरलेला अशी विसंगत आणि विषम परिस्थिति निर्माण होत नाहीं. कित्येक कारखाने शक्य तितके मोठाले बांधणें उत्पादनाच्या दृष्टीनें फायदेशीर असतें. परस्पर स्पर्धेमुळें आणि भांडवलदाराच्या वैयक्तिक संपत्तीच्या जोरावर असे मोठाले कारखाने बांधणें त्यांना शक्य नसतें. फक्त सरकारलाच तें शक्य असते.

तसेंच समाजवादी देशांत सर्व कारखान्यांची उत्पादनशक्ति पुरेपूर उपयोगांत आणतां येते. कारण धनिकांच्या लहरीप्रमाणें एकच वस्तु निर्माण करणारे जरूरीपेक्षां अधिक कारखाने निघण्याचा संभव नसतो. थोडाफार फरक असलेल्या पण वास्तविक एकाच तऱ्हेच्या निरनिराळ्या वस्तु

खपविण्यासाठीं कारखानदार जाहिरातीवर कसा पाण्यासारखा पैसा खर्च करतात हें आपणांस माहीत आहे. अशा भरमसाट आणि बेसुमार जाहिरातबाजीवर एवढी शक्ति फुकट घालविण्याचें समाजवादी कारखान्यांना मुळींच कारण नसते. भांडवलदारींत असलेली आणखी एक समाजविरोधी प्रवृत्ति नमूद केली पाहिजे. पुष्कळदां कमी श्रमांत आणि स्वस्त किंमतींत तोच माल उत्पादन करण्याची नवी यांत्रिक युक्ति निघालेली असते. पण आपला जुना कारखाना बसेल किंवा नव्या तऱ्हेच्या उत्पादनांत पूर्वींइतका नफा मिळणार नाहीं म्हणून ती युक्ति विकत घेऊन भांडवलदार ती उपयोगांत न आणतां तशीच पाडून ठेवतात. शर्ट वगैरे कपड्यांना बटणांऐवजीं असलेल्या सरकत्या सांखळीचें [ झिप् ] पेटंट अमेरिकेंतील बटणांच्या कारखानदारांनीं असेंच दडपून ठेवलें होतें असें सिद्ध झालें आहे.

शेती सामायिक आणि यांत्रिक झाली कीं धान्य व इतर पिकांत विलक्षण वाढ होते. यामुळें शेतकऱ्यांच्या जीवनाचें मान उंचावतें आणि उद्योगधंद्यांच्या वाढीस लागणारा कच्चा माल मुबलक उपलब्ध होतो. या सर्वांचा परिणाम असा होतो कीं खेडूत जनतेला नागरी सुखसोयींचा लाभ मिळणें शक्य होतें. तसेच धान्याचे सांठे करून ठेवतां येतात आणि त्यामुळें अवर्षणादि नैसर्गिक आपत्ति आल्या तरी अगदीं दुष्काळ आणि अन्नान्न दशा ओढवत नाहीं. झारशाही रशियांत आपल्या हिंदुस्थानप्रमाणें वारंवार दुष्काळाचा फेरा येई आणि लक्षावधि नागरिक मृत्युमुखीं पडत. शेती सामायिक झाल्यापासून असें संकट पुन्हां कधींच ओढवलें नाहीं.

## बहुजनसमाजाची सुखसोय

नवे उद्योगधंदे उभारतांना मूलभूत उद्देश समाजाची गरज भागविण्याचा असतो. कारखानदाराचा नफा हा त्यामागील हेतु नसल्यामुळें समाजाच्या दृष्टीनें आवश्यक असें उत्पादन कारखान्याला फायदेशीर नसलें तरी हातीं घेतां येतें. सोव्हिएट देशांत साबणाची किंमत उत्पा-

दन-खर्चापेक्षां कमी ठेवण्यांत येत असे याचा उल्लेख मागें आलाच आहे. इतर देशांत आर्थिक अरिष्टाच्या काळांत ( १९२९ पासून पुढें दोन चार वर्षांत ) शिक्षण आणि आरोग्य या सामाजिक हिताच्या बाबींवरील खर्च कमी करण्यांत आला. उलट सोव्हिएट देशांत हा खर्च प्रतिवर्षी सारखा वाढत गेला व वाढत जात आहे. मुंबईसारख्या कारखान्यांच्या शहरांत कामगारांसाठीं असलेल्या गलिच्छ चाळी नाहींशा करण्याच्या मार्गांत घरमालकाची खाजगी मालकी व फायदा या गोष्टी आडव्या येतात, हा अनुभव नेहमींचाच आहे. बहुजनसमाजाच्या सुखसोयींपेक्षां बहुधनसमाजाचा फायदा हाच भांडवली अर्थव्यवस्थेचा हेतु आहे याचें दुसरें उदाहरण कशाला हवें ? उलट ज्या वस्तूंची सामाजिक गरज अधिक, ती प्रथम उत्पादन झाली पाहिजे हें तत्त्व योजनाबद्ध समाजवादी अर्थव्यवस्थेंतच अमलांत येऊं शकतें.

तीच गोष्ट कारखान्यांत खपणाऱ्या कामगारांचें आरोग्य व सुरक्षितता ( Safety Measures ) यासंबंधींहि म्हणतां येईल. माणसें हींच देशांतील सर्वांत मौल्यवान भांडवल आहे ( असें स्तालीन म्हणतो ). कारखान्यांतील बांधणी आणि त्यांमधील वेगवान् उत्पादन पद्धति (Rationalization Methods) यांचा कामगारांच्या शारीरिक वा मानसिक आरोग्यावर अनिष्ट परिणाम होत आहे किंवा कसें याचा विचार केवळ नफ्याच्या राशीकडे डोळे लावून बसलेल्या मालकाला करण्याचें कांहींच कारण नसतें. उलट ज्यांच्या श्रमांवर समाजाची इमारत उभी असते त्या कामगारवर्गाच्या आरोग्याविषयीं समाजवादी अर्थव्यवस्थेंत प्रथम दक्षता घेतली जाते. उघडीं भयानक अजस्र यंत्रें, गलिच्छ कारखाने, आणि नजर ठरणार नाहीं अशा प्रकारचें वस्तु नेणारे गतिमान् पट्टे ( Conveyor Belts ) सोव्हिएट देशांत सहसा आढळून येणार नाहींत.

## भांडवली व्यवस्थेंतील अंतर्विरोध

भांडवली उत्पादनांतील एक मूलभूत विरोध असा आहे कीं, जेवढ्या वस्तु उत्पन्न होतात त्या विकत घेण्याइतकी आम समाजाची ऐपत कधींच

असू शकत नाहीं. कारण कामगारांना मिळणारें एकूण वेतन वस्तूंच्या एकूण किंमतीहून कमीच असतें. तसें नसतें तर कारखानेवाल्याला नफा कसा मिळणार? आणि मग तो कारखाना चालवील तरी कशाला? या मूलभूत विरोधामुळें भांडवली अर्थव्यवस्थेवर आर्थिक अरिष्टें कोसळतात. बाजारांत माल भरपूर, पण विकत घेण्यासाठीं सामान्य जनतेजवळ दिडकी नाहीं अशी स्थिति प्राप्त होते. परिणाम—बेकारी, उपासमार, हालअपेष्टा आणि मग वस्तूंची कृत्रिम कमतरता उत्पन्न करण्यासाठीं धनिकांनीं केलेला वस्तूंचा पद्धतशीर नाश! समाजवादी अर्थव्यवस्थेंत कामगारांचें वेतन, त्यांच्या श्रमापासून कारखान्याला होणाऱ्या फायद्यावर अवलंबून नसतें. वेतनांची योजना आणि वस्तूंच्या किंमती ठरवितांना त्यामागील उद्देश एकूण उपभोग्य वस्तूंची सर्व नागरिकांमध्यें योग्य प्रमाणांत वांटणी करण्याचा असतो, अर्थात् वेतनाचें प्रमाण एकूण उत्पादनाच्या वाढीप्रमाणें वाढत जातें. म्हणून समाजाचें एकूण वेतन आणि एकूण उत्पादन यांमध्यें तफावत नसते, त्यामुळें उपभोग्य वस्तूंचा उठाव तात्काळ होतो. अर्थात् वस्तूंचें फाजील ( विकत न जाण्याइतकें ) उत्पादन हा प्रकार तेथें संभवतच नाहीं. उत्पादन जेवढें अधिक होईल तेवढें हवेंच, कारण मग सर्वांना अधिक उपभोग्य वस्तू मिळतात. मालाला सारखी मागणी असल्यामुळें उत्पादन सारखें वाढत जातें. श्रमांची बचत करणारे नवे यांत्रिक व तांत्रिक शोध उपयोगांत आणले जातात; आणि उत्पादन कितीहि वाढलें तरी भांडवली अर्थव्यवस्थेंतील आर्थिक अरिष्टासारखा पेंचप्रसंग ओढवणें शक्यच नसतें.

भांडवली अर्थव्यवस्थेचें स्वरूप आज सुरुवातीच्या अवस्थेप्रमाणें खुल्या स्पर्धेवर आधारलेलें नसून तिनें मक्तेदारीचें रूप धारण केलें आहे. देशांतील अर्थव्यवस्थेच्या नाड्या मूठभर मक्तेदारांच्या हातांत असल्याचें दिसून येतें. बाजारपेठा आणि भांडवल पेरण्याचे प्रदेश म्हणून जगाची वांटणी आधींच झालेली आहे आणि दिवसेंदिवस अधिकाधिक भाग भांडवली चौकटींतून निसटून समाजवादी अर्थव्यवस्थेकडे जाऊं पाहत आहे. अशा या परिस्थितींत भांडवली अर्थव्यवस्था कायमच्या

आर्थिक अरिष्टांत सापडली असून तीमधून वाट काढण्यास तिला महायुद्ध किंवा जगावर फॅशिस्ट स्वरूपाचें अधिराज्य स्थापणें याशिवाय दुसरा मार्ग नाहीं, आणि यांमधूनही तिचे अंतर्विरोध सुटत नाहींत. भांडवली व्यवस्थेंतील अंतर्विरोध तिच्या चौकटींत राहून मिटणें शक्य नसल्यामुळें ती दिवसेंदिवस मोडकळीस येत चालली आहे. समाजवाद प्रस्थापित झाल्याशिवाय हे अंतर्विरोध नाहींसे होणार नाहींत.

पैसा हा भांडवली अर्थव्यवस्थेचा पाया आहे. नव्या भांडवलाची निर्मिति, उत्पादनाची वाढ वगैरे सर्व गोष्टींमध्यें पैशाला महत्त्वाचें स्थान असतें. म्हणून पैसा, चलन, हुंडणावळ यांमध्यें उद्‌भवणाऱ्या अनंत अडचणींचा उत्पादनावर परिणाम होतो, आणि अर्थव्यवस्थेंत अस्थिरता निर्माण होते. उलट, योजनाबद्ध अर्थव्यवस्थेंत पैशाला गौण महत्त्व असून मुख्य गोष्ट उत्पादन योजना असते. तेव्हां पैशापासून उद्‌भवणारे पेंच-प्रसंग तेथें उपस्थित होत नाहींत.

## योजनाबद्ध अर्थव्यवस्थेंतील कांहीं प्रश्न

याप्रमाणे समाजवादी नियोजित अर्थव्यवस्था भांडवली अर्थव्यवस्थे-पेक्षां निःसंशय श्रेष्ठ आहे हें खरें; परंतु अशा अर्थव्यवस्थेंत कोणतेच प्रश्न सोडवावे लागत नाहींत, एकदां समाजवादी सत्ता स्थापन झाली कीं सर्व कांहीं आपोआप सुरळीत चालतें, असें नाहीं. सोव्हिएट देशांत योजनाबद्ध अर्थव्यवस्था प्रगट होत गेली तसतसे अनेक नवे प्रश्न उप-स्थित झाले. यांपैकीं कांहींचा विचार मागेंच झालेला आहे. [ १ ल्या प्रकरणांत ] इतर महत्त्वाच्या अडचणी कोणत्या येतात व त्यांचा कसा निरास होतो इकडे आतां वळूं.

आर्थिक नियोजन केल्यानें किती वस्तु उत्पादन करावयाच्या हें ठर-वून तें पार पाडतां येतें. परंतु उत्पादित वस्तूंचा गुणात्मक दर्जा उत्तम प्रतीचा राखणें हें काम सहजसाध्य नाहीं. सोव्हिएट देशांत हा प्रश्न उद्‌भवला. भांडवली उत्पादनामध्यें कारखानदार स्वतांच उत्पा-

दनाच्या या बाजूकडे जरूर तें लक्ष देतो. पण सोव्हिएट अर्थव्यवस्थेंत मालकांना स्थान नसल्यानें याकरितां खास उपाय योजणें भाग पडलें. जरूरीपेक्षां जास्त श्रमशक्ति आणि कच्चा माल वापरला जाऊं नये या हेतूनें प्रथम उत्पादनाच्या खर्चावर विशेष कटाक्ष ठेवण्यांत येऊं लागला. तसेंच हिशेब व्यवस्थित ठेवले जावे यासाठीं नवे निर्बंध योजण्यांत आले. वस्तू अमूक एका दर्जाच्या उतरल्या नाहींत तर कारखान्याच्या स्वतांच्या वाढींसाठीं आणि सुखसोयींसाठीं योजलेली रक्कम कमी व्हावी अशी पद्धति यानंतर चालु झाली. हळू हळू एखादी वस्तु तयार करण्यासाठीं लागणारा निरनिराळा कच्चा माल आणि श्रमशक्ति यांच्या अनुरूप प्रमाणांचे निर्देशांक ठरविणें सुरू झालें. वस्तु अपेक्षित दर्जाप्रत उतरल्या नाहींत तर त्याबद्दल अधिकारी वर्गास जबाबदार धरण्यांत येईल असा सक्त नियम करण्यांत आला. याच्या जोडीनें उत्तम प्रतीच्या वस्तु तयार करणारे कामगार, अधिकारी व कारखाने यांचा गौरव होऊं लागला आणि द्रव्यरूपानें बढतीहि देणें सुरू झालें. उत्पादनांत उच्चांक आणि उत्तम दर्जा गाठण्याची ही प्रवृत्ति कामगारांत इतकी पसरली कीं तिनें एका मोठ्या देशव्यापी चळवळीचें स्वरूप धारण केलें. समाजवादी अर्थव्यवस्थेमध्यें उत्पादनांत सुधारणा करण्यास कामगारांना उत्तेजन मिळत नाहीं हा सर्वसामान्य संकेत अशाप्रकारें खोटा ठरला. हा मुद्दा विशेष महत्त्वाचा असल्यामुळें याचें अधिक विवेचन पुढें केलें आहे.

उत्पादनाचा दर्जा वाढविण्यासाठीं अधिकारीवर्गावर अधिकाधिक जबाबदारी टाकणें भाग होतें म्हणून त्याला आपलें कौशल्य व कार्यक्षमता दाखविण्यांकारितां अधिक वाव देणें आवश्यक होतें. नियोजन समितीकडून होणाऱ्या सूचनांची व्याप्ति किती असावी आणि कारखान्याच्या अधिकाऱ्यांची कक्षा किती वाढवावी हा प्रश्न उद्भवणें स्वाभाविक होतें. अखेर अनुभवानेंच हें प्रमाण अजमावावें लागलें; आणि अखेर मध्यवर्ति योजना–समिति आणि विविध खातीं व कारखाने यामध्यें आज असणारे संबंध प्रस्थापित झाले.

## कामगारवर्गाची नवी भूमिका

समाजवादी अर्थव्यवस्थेंत कारखान्यांतील कामगारवर्ग आणि अधिकारी वर्ग यांचे परस्परसंबंध नव्या प्रकारचे असणार हें उघड आहे. झारशाही भांडवली अर्थव्यवस्थेंत हें संबंध विरोधाचे होते. क्रांतीनंतर प्रथम प्रथम हीच प्रवृत्ति चालू राहिली. सत्ता कामगारांच्या हातीं असल्यामुळें अधिकारी वर्ग उत्पादनाविषयीं उदासीन असे कामगार संघटनाही प्रथम प्रथम कामगारांच्या हितास जपण्यापलीकडे आपलें अधिक कांहीं कार्य आहे असें मानीत नसत. परंतु हळुहळु कामगार वर्गांतून नवा सुशिक्षित यंत्रज्ञ अधिकारी निर्माण झाल्यावर ही परिस्थिति बदलूं लागली. आतां उत्पादन वाढविण्यासाठीं आणि त्याचा दर्जा सुधारण्यासाठीं, नवी समाजवादी शिस्त लावण्यासाठीं, अधिकारी वर्गांशीं सहकार्य केलें पाहिजे; असें केलें तरच आर्थिक प्रगति झपाट्यानें होऊन समाजवादी क्रांति यशस्वी होईल; भांडवलदार वर्ग नष्ट झाल्यानें आतां उत्पादन जेवढें वाढेल तेवढा सर्व समाजाचा आणि म्हणून आपलाच फायदा होणार आहे; ही नवी जाणीव कामगार संघटनांना होऊं लागली. सोव्हिएट कामगार संघटना आतां कामगारांच्या हितसंरक्षणाबरोबरच उत्पादनांतहि जातीनें लक्ष घालतात आणि अधिकारी वर्गांशीं सहकार्य करतात आणि त्यासंबंधीं त्यांस महत्त्वाचे अधिकार असतात. म्हणूनच सोव्हिएट देशांतील कामगार संघटनेंत संपाचें महत्व नाहींसे झालें आहे. अशाप्रकारें उत्पादनाची जबाबदारी मुख्यतः अधिकारी वर्गावर टाकलेली असून देखील कामगार वर्ग उत्पादनवाढीकरितां आणि उत्पादनाचा दर्जा सुधारण्याकरितां स्वयंस्फूर्तीनें पुढें येतो.

एवढ्या मोठ्या औद्योगिक प्रगतीचें नियोजन करावयाचें म्हणजे नवा कामगारवर्ग मिळविला पाहिजे, त्याला शिक्षण दिलें पाहिजे आणि त्याची निरनिराळ्या व्यवसायांमध्यें विभागणी केली पाहिजे. श्रमशक्तीची योजना आणि व्यावसायिक औद्योगिक शिक्षण हे समाजवादी अर्थव्यवस्थेंतील महत्त्वाचे प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठीं शिक्षणाच्या

विविध सोयी आणि वेतनांचें वेगवेगळें प्रमाण, सवलती आणि देशाभिमान यांचा कसा उपयोग करण्यांत येतो याचा उल्लेख मागें आलाच आहे.

उत्पादनाविषयींचा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे नव्या अर्थव्यवस्थेंत कामगार आणि अधिकारी या दोघांची कार्यक्षमता, शिस्त कशी वाढवावयाची, त्यांना अधिकाधिक कार्यप्रवण कसें करावयाचें हा होता. (Labour Incentives). चांगल्या कामास अधिक वेतन हा एक उपाय झाला. पुढें उद्योगधंद्यांत नवी समाजवादी पिढी येऊं लागतांच समाजवादी चढाओढ, स्टॅक्नोवाइट चळवळ इत्यादि स्वयंस्फूर्त उत्पादनवाढीचे नवे प्रकार रूढ होऊं लागले. निरनिराळे कारखाने, कारखान्याचे विभाग, कामगारांचें गट यांमध्यें उत्पादन वाढविण्यासाठीं चढाओढी लागतात आणि उच्चांक गाठणारांचा जाहीरपणें सन्मान होतो. समाजवादी चढाओढींचा महत्त्वाचा विशेष असा कीं जो गट उत्पादनाचा उच्चांक गांठील तो गट मागासणाऱ्या इतर गटांच्या मदतीस येतो; यामुळें चढाओढींत वैयक्तिक कडवटपणा न येतां उलट सामुदायिक उत्साहाचें वातावरण सर्वत्र प्रत्ययास येतें.

स्टॅकोनोव नांवाच्या कोळसा खाणकामगारानें उत्पादनाच्या पद्धतींत फेरफार करून उत्पादनाचें प्रमाण कितीतरी वाढविलें; तेव्हांपासून अशा तऱ्हेची स्वयंस्फूर्तीनें उत्पादनांत सुधारणा घडवून आणण्याची चळवळ सुरूं झाली. तिलाच स्टॅक्नोवाइट चळवळ असें नांव पडलें आहे. स्टॅक्नोवाइट कामगार उत्पादनपद्धतींत ज्या सुधारणा सुचवितात त्या केवळ वैयक्तिक करामतीवर अवलंबून नसतात, म्हणून हळूहळू बहुतेक सर्व कामगार तिचें अनुकरण करूं शकतात आणि सर्वसामान्य कार्यक्षमता वाढीस लागते. या चळवळींचें स्वरूप कांहीं कुशल कामगारांपुरतें मर्यादित राहिलेलें नाहीं; तिनें राष्ट्रव्यापी स्वरूप धारण केलें आहे. अशी उत्पादन वाढ घडवून आणणाऱ्या कामगारांचे वैयक्तिक वेतन तर वाढतेंच, शिवाय कामगार संघटना, अधिकारी वर्ग, सरकार आणि जनता यांजकडून त्यांचा गौरव होतो. त्यास "श्रमवीर"

( Labour Hero ) अशी सन्माननीय पदवी मिळते आणि सवलती व द्रव्यरूपानें पारितोषिकेंहि दिलीं जातात.

कामगारांना कार्यप्रवण करण्याच्या या मार्गाचें वैशिष्टय ध्यानांत घेतलें पाहिजे. भांडवली अर्थव्यवस्थेप्रमाणें वैयक्तिक हित आणि प्रगति ह्या यामागील प्रधान प्रेरणा नाहींत. कारण एखादा कामगार जर वैयक्तिक करामतीनें उत्पादन वाढवीत असेल आणि त्यामुळें बरोबरीच्या इतर कामगारांच्या कार्यपद्धतींत सुधारणा होणार नसेल तर त्याची मिळकत वाढली तरी त्याला सार्वजनिकरीत्या मानमान्यता मिळत नाहीं. इतकेंच नव्हे तर जर एखादा कामगार केवळ स्वतांच्या हितासाठींच झटत असला आणि सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडीत नसला तर त्यावर त्याच्या सहकाऱ्यांकडून कडक टीका होते. तेव्हां समाजवादी अर्थव्यवस्थेंत वेतनांत भेदभाव ठेवून वैयक्तिक प्रयत्नांस वाव ठेवण्यांत आला असला तरी उत्पादनांतील सुधारणांची मुख्य प्रेरणा सामाजिक स्वरूपाची आहे. वैयक्तिक हित हीच उत्पादनवाढीची मुख्य प्रेरणा राहाणार हा भांडवली समाजांतील संकेत अशा प्रकारें खोटा ठरला आहे.

श्रमांचा व कौशल्याचा जसा गौरव होतो तसा अंगचुकारपणा, निष्काळजीपणा आणि अनियमितपणा याबद्दल शासनहि करण्यांत येतें. आपली जबाबदारी योग्यरीतीनें पार न पाडल्यास कारखान्याच्या अधिकाऱ्यांस कधीं कधीं चांगलीच शिक्षा करण्यांत येतें. “ सोव्हिएट देशांतील ही पाहा जुलूम जबरदस्ती आणि दडपशाही ” असा भांडवली वृत्तपत्रें याचा बराच गवगवा करतात. खाजगी मालमत्तेस धक्का लावल्याबद्दल [ चोरी, नुकसानी वगैरे ] भांडवली समाजांत जर शिक्षा होते, तर समाजोपयोगी उत्पादनकेंद्रांवर ज्यांचा अधिकार आहे त्यांना त्यांच्या कुचराईबद्दल आणि अशा रीतीनें समाजाचें नुकसान केल्याबद्दल शिक्षा होणें अयोग्य आहे असें कोण म्हणेल ?

## शेतकऱ्यांचा प्रश्न

शेतीचें उत्पादन योजनाबद्ध करण्याच्या मार्गांत शेतकऱ्यांच्या मालकीचे लहान लहान जमिनीचे तुकडे हीच पहिली अडचण होती. शेती सामायिक होऊं लागताच ती अडचण दूर होऊं लागली. परंतु शेती यांत्रिक होण्यासाठी यंत्रसाधनादि नवें भांडवल निर्माण होणें जरूर होतें. सामान्य शेतकऱ्यांना हीं यंत्रसाधनें विकत घेणें कसें परवडेल? ही जबाबदारी सरकारनें स्वीकारली आणि सामायिक शेतीचे विसाविसांचे, तिसातिसांचे, असे गट्ट पाडून प्रत्येक गटाला आवश्यक असणारीं यांत्रिक औतें व इतर साधनें पुरवणारीं शेती यंत्रांचीं केंद्रे (Machine Tractor Stations) सुरू करण्यांत आलीं. याच्या मोबदला सरकार पिकांचा कांहीं हिस्सा नियंत्रित भावानें घेतें आणि शेतीयंत्रांच्या केंद्रांवरील कामगारांनाहि पिकाचा ठराविक भाग दिला जातो. अशा प्रकारें विकाऊ पिकांचा बराच मोटा भाग सरकार खरीद करीत असल्यानें अप्रत्यक्षपणें शेतीचें नियोजन करणें शक्य होतें. तसेच बीं बियाण्याची सुधारणा, खतपाणी आणि इतर शेतीविषयीं तज्ज्ञ सल्ला देऊन सरकार शेतीचें उत्पादन वाढविण्यास मदत करतें.

सामायिक शेतकरी झाला तरी स्वतांची शेतजमीन असावी व स्वतांसाठीं गुरेंढोरें व कोंबडीं, बकरीं पाळावीं अशी अनिवार इच्छा त्याला असतेच. शेतकऱ्याची ही स्वाभाविक प्रवृत्ति आणि शेतीचा सामायिकपणा यांमध्यें मेळ घालणें हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा होता. सोव्हिएट सामायिक शेतकरी सामायिक शेतावर काम करून राहिलेल्या वेळांत स्वतांच्या मालकीच्या लहानशा जमिनीत स्वतः पीक काढतो; यासाठीं सरकारी शेतीयंत्रांचें केंद्र त्याला यांत्रिक साधनेंहि पुरवितें. शिवाय सामायिक शेतकरी मर्यादित प्रमाणांत जनावरेंहि पाळतो. या सर्व वस्तू त्याला स्वतंत्रपणें विकतां येतात. मात्र या उत्पन्नावर त्याला थोडासा अधिक कर द्यावा लागतो.

शेती व उद्योगधंदे यांपासून उत्पन्न होणाऱ्या उपभोग्य वस्तूंचा शहरी

व खेडूत जनतेस पुरवठा करण्याचें काम, म्हणजेच अंतर्गत व्यापार, सोव्हिएट सरकारचें व्यापारी खातें आणि सहकारी संस्था यांमार्फत चालतो. व्यापाराची योजना कशी केली जाते आणि त्याचें काम कसें चालतें हें सांगण्याची ही जागा नव्हे. जनतेची क्रयशक्ति वाढली आणि सांस्कृतिक आणि भौतिक गरजा वाढूं लागल्या तसतशी उत्पादनांत प्रचंड वाढ होत असूनहि वस्तूंचा तुटवडा फार भासूं लागला व अद्याप-ही कांही अंशीं भासतो. मूलभूत औद्योगीकरणाच्या प्रचंड कार्यक्रमा-मुळें १९३५ सालापर्यंत निल्योपयोगी वस्तूंचें रेशन करणें भाग झालें; याचा उल्लेख मागें आलाच आहे. हा तुटवडा तीव्रतेनें भासला आणि त्यामुळें बाहेरच्या देशांतील लोकांना असें वाटत असे कीं सोव्हिएट औद्योगीकरणाची योजना फसली असून देशांत उपभोग्य वस्तूंचें उत्पा-दन घटून दुष्काळ पडलेला आहे. याचें एक उदाहरण मनोरंजक व बोधप्रद आहे. १९३०–३२ मध्यें अंगाचा साबण आणि पायांतील बूट यांची कमालीची तूट भासली. परंतु वास्तविक याच काळांत या दोन्ही वस्तूंचें उत्पादन कितीतरी पटीनें वाढलें होतें. मग असें कां झालें ? याचें खरें कारण असें होतें कीं जे लोक पूर्वी कधींच अंगाला साबण लावीत नव्हते वा बूट वापरीत नव्हते ते आतां या नव्या वस्तू वापरावयास शिकले होते आणि विकत घेण्याइतकें पैसेहि त्यांना आतां मिळत होते ! जस-जसें औद्योगिकरण वाढत गेलें तसतसें सर्वत्र सुबत्तेचें वातावरण दिसूं लागलें. अर्थव्यवस्था भांडवली नसल्यामुळें एकीकडे उत्पादन वाढ आणि दुसरीकडे वस्तू विकत घेण्यास पैसा नाहीं अशी परिस्थिति निर्माण होण्याचें तेथें कारणच नव्हतें.

१९३८ सालापर्यंत सोव्हिएट अर्थव्यवस्थेनें हे प्रमुख प्रश्न सोडविले आणि तिला मजबुती आली. यापुढें तिच्या मार्गांत कोणत्याच अडचणी नव्हत्या अगर नाहींत असें नाहीं; पण त्या मूलभूत स्वरूपाच्या नसून तांत्रिक स्वरूपाच्या होत्या आणि अधिक अनुभवांतीं त्यांचें सहज निरा-करण होणें शक्य होतें. युद्धकाळांत सोव्हिएट समाजवादी अर्थव्यवस्था

## शेतकऱ्यांचा प्रश्न

शेतीचें उत्पादन योजनाबद्ध करण्याच्या मार्गात शेतकऱ्यांच्या मालकीचे लहान लहान जमिनीचे तुकडे हीच पहिली अडचण होती. शेती सामायिक होऊं लागताच ती अडचण दूर होऊं लागली. परंतु शेती यांत्रिक होण्यासाठी यंत्रसाधनादि नवें भांडवल निर्माण होणें जरूर होतें. सामान्य शेतकऱ्यांना हीं यंत्रसाधनें विकत घेणें कसें परवडेल? ही जबाबदारी सरकारनें स्वीकारली आणि सामायिक शेतीचे विसाविसांचे, तिसातिसांचे, असे गट्ट पाडून प्रत्येक गट्टाला आवश्यक असणारीं यांत्रिक औतें व इतर साधनें पुरवणारीं शेती यंत्रांचीं केंद्रे ( Machine Tractor Stations ) सुरू करण्यांत आलीं. याच्या मोबदला सरकार पिकांचा कांहीं हिस्सा नियंत्रित भावानें घेतें आणि शेतीयंत्रांच्या केंद्रांवरील कामगारांनाहि पिकाचा ठराविक भाग दिला जातो. अशा प्रकारें विकाऊ पिकांचा बराच मोठा भाग सरकार खरीद करीत असल्यानें अप्रत्यक्षपणें शेतीचें नियोजन करणें शक्य होतें. तसेच बीं बियाण्याची सुधारणा, खतपाणी आणि इतर शेतीविषयीं तज्ज्ञ सल्ला देऊन सरकार शेतीचें उत्पादन वाढविण्यास मदत करतें.

सामायिक शेतकरी झाला तरी स्वतांची शेतजमीन असावी व स्वतांसाठीं गुरेंढोरें व कोंबडीं, बकरीं पाळावीं अशी अनिवार इच्छा त्याला असतेच. शेतकऱ्याची ही स्वाभाविक प्रवृत्ति आणि शेतीचा सामायिकपणा यांमध्यें मेळ घालणें हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा होता. सोव्हिएट सामायिक शेतकरी सामायिक शेतावर काम करून राहिलेल्या वेळांत स्वतांच्या मालकीच्या लहानशा जमिनीत स्वतः पीक काढतो; यासाठीं सरकारी शेतींयंत्रांचें केंद्र त्याला यांत्रिक साधनेंहि पुरवितें. शिवाय सामायिक शेतकरी मर्यादित प्रमाणांत जनावरेंहि पाळतो. या सर्व वस्तू त्याला स्वतंत्रपणें विकतां येतात. मात्र या उत्पन्नावर त्याला थोडासा अधिक कर द्यावा लागतो.

शेती व उद्योगधंदे यांपासून उत्पन्न होणाऱ्या उपभोग्य वस्तूंचा शहरी

व खेडूत जनतेस पुरवठा करण्याचें काम, म्हणजेच अंतर्गत व्यापार, सोव्हिएट सरकारचें व्यापारी खातें आणि सहकारी संस्था यांमार्फत चालतो. व्यापाराची योजना कशी केली जाते आणि त्याचें काम कसें चालतें हें सांगण्याची ही जागा नव्हे. जनतेची क्रयशक्ति वाढली आणि सांस्कृतिक आणि भौतिक गरजा वाढूं लागल्या तसतशी उत्पादनांत प्रचंड वाढ होत असूनहि वस्तूंचा तुटवडा फार भासूं लागला व अद्याप-ही कांही अंशीं भासतो. मूलभूत औद्योगीकरणाच्या प्रचंड कार्यक्रमा-मुळें १९३५ सालापर्यंत नित्योपयोगी वस्तूंचें रेशन करणें भाग झालें; याचा उल्लेख मागें आलाच आहे. हा तुटवडा तीव्रतेनें भासला आणि त्यामुळें बाहेरच्या देशांतील लोकांना असें वाटत असे कीं सोव्हिएट औद्योगीकरणाची योजना फसली असून देशांत उपभोग्य वस्तूंचें उत्पा-दन घटून दुष्काळ पडलेला आहे. याचे एक उदाहरण मनोरंजक व बोधप्रद आहे. १९३०–३२ मध्यें अंगाचा साबण आणि पायांतील बूट यांची कमालीची तूट भासली. परंतु वास्तविक याच काळांत या दोन्ही वस्तूंचें उत्पादन कितीतरी पटीनें वाढलें होतें. मग असें कां झालें ? याचें खरें कारण असें होतें कीं जे लोक पूर्वी कधींच अंगाला साबण लावीत नव्हते वा बूट वापरीत नव्हते ते आतां या नव्या वस्तू वापरावयास शिकले होते आणि विकत घेण्याइतकें पैसेहि त्यांना आतां मिळत होते ! जस-जसें औद्योगिकरण वाढत गेलें तसतसें सर्वत्र सुबत्तेचें वातावरण दिसूं लागलें. अर्थव्यवस्था भांडवली नसल्यामुळें एकीकडे उत्पादन वाढ आणि दुसरीकडे वस्तू विकत घेण्यास पैसा नाहीं अशी परिस्थिति निर्माण होण्याचें तेथें कारणच नव्हतें.

१९३८ सालापर्यंत सोव्हिएट अर्थव्यवस्थेनें हे प्रमुख प्रश्न सोडविले आणि तिला मजबुती आली. यापुढें तिच्या मार्गांत कोणत्याच अडचणी नव्हत्या अगर नाहींत असें नाहीं; पण त्या मूलभूत स्वरूपाच्या नसून तांत्रिक स्वरूपाच्या होत्या आणि अधिक अनुभवांतीं त्यांचें सहज निरा-करण होणें शक्य होतें. युद्धकाळांत सोव्हिएट समाजवादी अर्थव्यवस्था

पुरेपूर कसास उतरली आणि तिचें स्थैर्य व सामर्थ्य सिद्ध झालें. युद्धा-नंतर ती आतां पुढील मार्ग आक्रमीत आहे.

## समाजवादी अर्थव्यवस्थेचे टीकाकार :

आश्चर्याची गोष्ट अशी कीं सोव्हिएट देशाची आर्थिक प्रगति इतक्या झपाट्यानें होत असल्याचें दिसत असूनहि भांडवली अर्थशास्त्रज्ञ, योजनाबद्ध समाजवादी अर्थव्यवस्था यशस्वी होणें शक्य नाहीं, असा आक्षेप घेत होते. या आक्षेपांपैकीं कांहीं केवळ विनोदी आहेत तर दुसरे कांहीं तात्त्विक स्वरूपाचे आहेत. आज या आक्षेपांना वास्तविक तितकेसें महत्त्व राहिलेलें नाहीं; सर्वत्र समाजवादी विचारसरणी मान्य होत आहे. तरीसुद्धां अद्यापहि तेच तेच आक्षेप निराळ्या शब्दांत पुढें आणण्यांत येतात. अमेरिकन मुत्सद्दी आणि अर्थशास्त्रज्ञ तर आज भांडवली अर्थव्यवस्थेचे भाट्च बनलेले दिसतात; आणि आपल्याकडेहि टाटासारखे भांडवलदार, सरकारनें नेमलेल्या प्लॅनिंग ॲडव्हायजरी बोर्डाचे सभासद, समाजवादाचें विडंबन अथवा 'फेरविचार' करून आतां भांड-वलदारीची कांस धरणारे श्री. मिनू मसाणीसारखे भांडवदारी हस्तक, इत्यादि लोक समाजवादावरील जुनेच आक्षेप उगाळून भांडवली अर्थ-व्यवस्थेचीं स्तुतिस्तोत्रें गातांना दिसतात. म्हणून त्यांचा विचार करणें आवश्यक झालें आहे.

१९२८ सालीं पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली, त्याबरोबर भांडवली अर्थशास्त्रज्ञ भाकित करूं लागले कीं पंचवार्षिक योजनेचें अपयश निश्चित आहे आणि सोव्हिएट अर्थव्यवस्था धुळीस मिळणार आहे. पण या भांडवली कुडबुड्या ज्योतिष्यांचें भविष्य खरें ठरलें नाहीं. उलट सोव्हिएट देशाबाहेरचें भांडवली जग मात्र १९२९ सालापासून आर्थिक अरिष्टाच्या भोंवऱ्यांत भिरभिरूं लागलें, इकडे सोव्हिएटचा पंचवार्षिक कार्यक्रम पुरा होऊन दुसऱ्या योजनेस आरंभ झाला आणि जगाच्या बाजारपेठांत सोव्हिएट माल दिसूं लागला. नजरेला धक्का देणारें तें दृश्य पाहून त्यांनीं आपला सूर तात्बडतोब बदलला.

सोव्हिएटमध्यें कामगार गुलाम आहेत, म्हणूनच सोव्हिएटला या आर्थिक अरिष्टाच्या काळांत देखील उत्पादन वाढवितां येतें, सोव्हिएट मालाचा पूर जगाच्या बाजारपेठेंत येईल आणि जगावर मोठी आपत्ति कोसळेल असे उद्गार ते आतां काढूं लागले! कांहीं अर्थशास्त्रज्ञांनीं आपल्या डोळयांवरील ढापणें तशींच गच्च धरून ठेवलीं आणि एका प्रसिद्ध अर्थ-शास्त्रज्ञानें आर्थिक नियोजन मुळांतच अशक्य आहे असें सिद्ध करणारा जाडा विद्वत्तापूर्ण ग्रंथ १९३५ सालीं (सात वर्षांच्या योजनाबद्ध प्रगतीनंतर) लिहिला! या प्रकारच्या चिजा पाश्चात्य देशांत आतां दिसेनाशा झाल्या असल्या तरी हिंदुस्थानांत मात्र श्री. मिनू मसाणी आणि त्यांचे मराठी पाठिराखे श्री. अनंत काणेकर त्यांची प्रथा पुढें चालवीत आहेत. समाजवादी अर्थव्यवस्थेमुळें रशियासारख्या मागासलेल्या देशाची औद्योगिक प्रगति झालीच नाहीं (आणि म्हणून हिंदुस्थानलाहि तशी प्रगति करतां येणें शक्य नाहीं) असें या दोघां विद्वानांचें म्हणणे आहे! असो.

समाजवादी अर्थव्यवस्थेविरुद्ध एक प्रकारचा आक्षेप असा आहे, कीं खाजगी मालकी, नफा आणि भांडवलदारी स्पर्धा नसली तर नवें भांड-वल निर्माण करण्यास उत्तेजनच मिळत नाहीं. मग तांत्रिक युक्त्यांचा आणि यांत्रिक शोधांचा वापर करणारीं नवीं यंत्रसाधनें कोण व कशाला उत्पन्न करील? तसेंच भांडवलदारी स्पर्धा नसली तर कोणत्या उद्योग-धंद्यांत नवें भांडवल निर्माण व्हावयाचें हें योग्य तऱ्हेनें ठरणें अशक्य आहे. उत्पादनाचा दर्जा सुधारावयाचा असेल तर खाजगी मालकी व नफा हीं अवश्य पाहिजेत आणि वस्तूंची किंमत खुल्या बाजारपेठेंत ठरली पाहिजे. योजनाबद्ध किंमती आणि नव्या भांडवलाची योजना-बद्ध विभागणी यामुळें अर्थव्यवस्था कार्यक्षम पायावर उभी राहणेंच शक्य नाहीं.

हे सर्व आक्षेप कसे फोल आहेत हें सोव्हिएट आर्थिक प्रगतीवरून प्रत्यक्ष व्यवहारांतच सिद्ध झालें आहे. एकूण देश आणि त्यांतील प्रादे-शिक विभाग, तसेंच उद्योगधंद्यांचे निरनिराळे भाग, यांमध्यें अधिकांत

अधिक उपयुक्त तऱ्हेनें नवें भांडवल कसें निर्मितां येतें हें त्यांनीं दाखवून दिलें आहे. इतकेंच नव्हे तर इतर अनेक भांडवली देशांपेक्षां कितीतरी अधिक पटीनें आणि कितीतरी अधिक वेगानें त्यांनीं आपला देश आर्थिक दृष्ट्या सुसंपन्न आणि सामर्थ्यवान् केला आहे. नवे नवे यांत्रिक शोध दडपून न ठेवतां तेथेंच उपयोगांत येतात. शास्त्रीय संशोधनाची तेथें अतिशय उत्तम तरतूद केलेली आहे असें खुद्द ब्रिटिश व इतर पाश्चात्य शास्त्रज्ञ म्हणतात. वस्तूंचा गुणात्मक दर्जा सुधारण्याचें तंत्र ते आत्मसात् करीत आहेत. उपभोग्य वस्तूंची योग्य रीतीनें विभागणी करण्यास खुल्या बाजारपेठेची गरज नाहीं हेंहि त्यांनीं दाखवून दिलें आहे. तेव्हां योजनाबद्ध समाजवादी अर्थव्यवस्थेला नव्या भांडवलाच्या निर्मितीचे, किंमतीचे आणि वस्तूंच्या विभागणीचे प्रश्न सोडवितां येणार नाहींत असें आज इसवी सनाच्या १९४८ व्या वर्षांत म्हणणें हास्यास्पद आहे.

## व्यक्तिस्वातंत्र्य

समाजवादी अर्थव्यवस्थेविषयीं दुसऱ्या प्रकारचे आक्षेप व्यवहार्यतेविषयीं अथवा कार्यक्षमतेविषयीं नसून व्यक्तिस्वातंत्र्याच्या भूमिकेवरून घेण्यांत येतात. या अर्थव्यवस्थेंत खुली बाजारपेठ नाहीं, म्हणून जनतेला वस्तूंच्या निर्मितीवर पसंती नापसंतीचा शिक्कामोर्तब करण्यास वाव नाहीं. तसेंच कारखाने योजनाबद्ध रीतीनें चालविल्यामुळें कामगारांस व्यवसाय निवडण्याचें अथवा स्वतांच्या कौशल्याचा उपयोग करून स्वतांची प्रगति करून घेण्याचें स्वातंत्र्य नाहीं अशा तऱ्हेचे हे आक्षेप आहेत.

प्रथम गिऱ्हाईकांच्या पसंतीचा विचार करूं. भांडवली अर्थव्यवस्थेंत वस्तूंच्या गुणावगुणांवर मत देऊन तिच्या निर्मितीवर परिणाम घडवून आणणें गिऱ्हाइकांस कितीसें शक्य असतें ? त्यांचा आणि कारखानदारांचा प्रत्यक्ष संबंधच येत नाही. वस्तु कोणत्या आणि कोणत्या प्रकारच्या निर्माण करावयाच्या हें वस्तूंच्या उत्पादनाचे मक्तेदार ठरवितात आणि ती वस्तु ठरल्या किंमतीस गिऱ्हाईकानें हवी तर घ्यावी अथवा नाकारावी एवढीच मुभा

त्याला असते. ज्याच्यांजवळ मोठी क्रयशक्ति असते त्यालाच वस्तूंच्या उत्पादनावर प्रभावी दडपण आणतां येणें शक्य असते. सामान्य गिऱ्हाईकांपाशीं एवढी क्रयशक्ति नसतेच. समाजवादी अर्थवस्थेंत कोणत्या मालाला अधिक उठाव आहे, कोणता पडून आहे याची दखल भांडवली अर्थव्यवस्थेइतकी किंबहुना अधिकच घेतली जाईल; कारण तेथें गिऱ्हाईकांच्या संघटना आपलें मत आणि पसंती संघटितपणें मांडूं शकतात.

आतां जनतेला व्यवसाय निवडण्याचें अथवा स्वतांची प्रगति करून घेण्याचें स्वातंत्र्य नाहीं या आक्षेपाचा विचार करूं. सोव्हिएट अर्थव्यवस्थेचा आजपर्यंत अनुभव पाहिला तर प्रत्येक नागरिकास लायकीप्रमाणें आणि आवडीनुसार व्यवसाय निवडतां येतो, इतकेंच नव्हे, तर भांडवली देशांत ज्यांची सुप्त शक्ति तशीच पडून राहिली असती अशा लक्षावधि गरीब कामगार शेतकऱ्यांच्या कर्तबगारीस वाव मिळाला हें स्पष्टपणें दिसून येतें. समाजाच्या आणि देशाच्या तात्कालिक गरजांचा व्यवसायांच्या निवडीवर परिणाम होत नाहीं असें नव्हे. पण समाजाचे हित वैयक्तिक हिताहून अधिक श्रेष्ठ ठरविणें अनिष्ट अथवा अयोग्य आहे असें ( समाजविरोधी व्यक्तींशिवाय इतर ) कोण म्हणेल ?

भांडवली अर्थव्यवस्थेंत व्यवसायनिवडीचें स्वातंत्र्य फक्त धनिक अथवा उच्च मध्यवर्गीयांनाच आहे आणि वस्तूंच्या निर्मितीवरहि त्यांचाच प्रभाव पडूं शकतो. खुली बाजारपेठ आणि खुली स्पर्धा या गोष्टी अर्थशास्त्राच्या पुस्तकांत आणि अर्थशास्त्रज्ञाच्या डोक्यांतच अस्तित्वांत आहेत, प्रत्यक्षांत त्या कधींच अवतरल्या नाहींत. भांडवली युगाच्या अगदीं सुरुवातीसहि बेकारी आणि दारिद्र्य थैमान घालीत होतींच आणि आज तर या भांडवली स्वर्गावर मूठभर मक्तेदारांचेंच स्वामित्व आहे; आणि या सर्वोत्तम अर्थव्यवस्थेंत बेकारी, उपासमार, आर्थिक अरिष्टें हीं भुतें थैमान घालतात आणि अखेर सर्व अर्थव्यवस्था महायुद्धाकडे वळविल्याशिवाय मंदी दूर होत नाहीं; याचा आतां जगांतील जनतेला चांगलाच अनुभव आला आहे. व्यक्तिस्वातंत्र्याकरितां बेकारी आणि आर्थिक अराजक या रूपानें समाजाला किंमत देणें भाग आहे असें गंभीर तत्त्वज्ञान सांगून

अधिक उपयुक्त तऱ्हेनें नवें भांडवल कसें निर्मितां येतें हें त्यांनीं दाखवून दिलें आहे. इतकेंच नव्हे तर इतर अनेक भांडवली देशांपेक्षां कितीतरी अधिक पटीनें आणि कितीतरी अधिक वेगानें त्यांनीं आपला देश आर्थिक दृष्ट्या सुसंपन्न आणि सामर्थ्यवान् केला आहे. नवे नवे यांत्रिक शोध दडपून न ठेवतां तेथेंच उपयोगांत येतात. शास्त्रीय संशोधनाची तेथें अतिशय उत्तम तरतूद केलेली आहे असें खुद्द ब्रिटिश व इतर पाश्चात्य शास्त्रज्ञ म्हणतात. वस्तूचा गुणात्मक दर्जा सुधारण्याचें तंत्र ते आत्मसात् करीत आहेत. उपभोग्य वस्तूंची योग्य रीतीनें विभागणी करण्यास खुल्या बाजारपेठेची गरज नाहीं हेंहि त्यांनीं दाखवून दिलें आहे. तेव्हां योजनाबद्ध समाजवादी अर्थवस्थेला नव्या भांडवलाच्या निर्मितीचे, किंमतीचे आणि वस्तूंच्या विभागणीचे प्रश्न सोडवितां येणार नाहींत असें आज इसवी सनाच्या १९४८ व्या वर्षांत म्हणणें हास्यास्पद आहे.

## व्यक्तिस्वातंत्र्य

समाजवादी अर्थव्यवस्थेविषयीं दुसऱ्या प्रकारचे आक्षेप व्यवहार्यतेविषयीं अथवा कार्यक्षमतेविषयीं नसून व्यक्तिस्वातंत्र्याच्या भूमिकेवरून घेण्यांत येतात. या अर्थव्यवस्थेंत खुली बाजारपेठ नाहीं, म्हणून जनतेला वस्तूंच्या निर्मितीवर पसंती नापसंतीचा शिक्कामोर्तब करण्यास वाव नाहीं. तसेंच कारखाने योजनाबद्ध रीतीनें चालविल्यामुळें कामगारांस व्यवसाय निवडण्याचें अथवा स्वतांच्या कौशल्याचा उपयोग करून स्वतांची प्रगति करून घेण्याचें स्वातंत्र्य नाहीं अशा तऱ्हेचे हे आक्षेप आहेत.

प्रथम गिऱ्हाईकांच्या पसंतीचा विचार करूं. भांडवली अर्थव्यवस्थेंत वस्तूंच्या गुणांवगुणांवर मत देऊन तिच्या निर्मितीवर परिणाम घडवून आणणें गिऱ्हाइकांस कितीसें शक्य असतें ? त्यांचा आणि कारखानदारांचा प्रत्यक्ष संबंधच येत नाही. वस्तु कोणत्या आणि कोणत्या प्रकारच्या निर्माण करावयाच्या हें वस्तूंच्या उत्पादनाचे मक्तेदार ठरवितात आणि ती वस्तु ठरल्या किंमतीस गिऱ्हाईकानें हवी तर घ्यावी अथवा नाकारावी एवढीच मुभा

त्याला असते, ज्याच्यांजवळ मोठी क्रयशक्ति असते त्यालाच वस्तूंच्या उत्पादनावर प्रभावी दडपण आणतां येणें शक्य असते. सामान्य गिऱ्हाईकांपाशीं एवढी क्रयशक्ति नसतेच. समाजवादी अर्थवस्थेंत कोणत्या मालाला अधिक उठाव आहे, कोणता पडून आहे याची दखल भांडवली अर्थव्यवस्थेइतकी किंबहुना अधिकच घेतली जाईल; कारण तेथें गिऱ्हाईकांच्या संघटना आपलें मत आणि पसंती संघटितपणें मांडूं शकतात.

आतां जनतेला व्यवसाय निवडण्याचें अथवा स्वतांची प्रगति करून घेण्याचें स्वातंत्र्य नाहीं या आक्षेपाचा विचार करूं. सोव्हिएट अर्थव्यवस्थेचा आजपर्यंत अनुभव पाहिला तर प्रत्येक नागरिकास लायकीप्रमाणें आणि आवडीनुसार व्यवसाय निवडतां येतो, इतकेंच नव्हे, तर भांडवली देशांत ज्यांची सुप्त शक्ति तशीच पडून राहिली असती अशा लक्षावधि गरीब कामगार शेतकऱ्यांच्या कर्तबगारीस वाव मिळाला हें स्पष्टपणें दिसून येतें. समाजाच्या आणि देशाच्या तात्कालिक गरजांचा व्यवसायांच्या निवडीवर परिणाम होत नाहीं असें नव्हे. पण समाजाचे हित वैयक्तिक हिताहून अधिक श्रेष्ठ ठरविणें अनिष्ट अथवा अयोग्य आहे असें ( समाजविरोधी व्यक्तींशिवाय इतर ) कोण म्हणेल ?

भांडवली अर्थव्यवस्थेंत व्यवसायनिवडीचें स्वातंत्र्य फक्त धनिक अथवा उच्च मध्यवर्गीयांनाच आहे आणि वस्तूंच्या निर्मितीवरहि त्यांचाच प्रभाव पडूं शकतो. खुली बाजारपेठ आणि खुली स्पर्धा या गोष्टी अर्थशास्त्राच्या पुस्तकांत आणि अर्थशास्त्रज्ञाच्या डोक्यांतच अस्तित्वांत आहेत, प्रत्यक्षांत त्या कधींच अवतरल्या नाहींत. भांडवली युगाच्या अगदीं सुरुवातीसहि बेकारी आणि दारिद्र्य थैमान घालीत होतींच आणि आज तर या भांडवली स्वर्गावर मूठभर मक्तेदारांचेंच स्वामित्व आहे; आणि या सर्वोत्तम अर्थव्यवस्थेंत बेकारी, उपासमार, आर्थिक अरिष्टें हीं भुतें थैमान घालतात आणि अखेर सर्व अर्थव्यवस्था महायुद्धाकडे वळविल्याशिवाय मंदी दूर होत नाहीं; याचा आतां जगांतील जनतेला चांगलाच अनुभव आला आहे. व्यक्तिस्वातंत्र्याकरितां बेकारी आणि आर्थिक अराजक या रूपानें समाजाला किंमत देणें भाग आहे असें गंभीर तत्त्वज्ञान सांगून

जनतेची खात्री पटणें आतां शक्य नाहीं. पण तरीहि केवळ खुली बाजारपेठ आणि अनिर्बंध खाजगी मालकी व नफा यांनींच सर्व व्यक्तींचे हित साधूं शकतें, ही गोष्ट स्वयंसिद्ध सत्य आहे, असा हट्टाग्रह अद्यापि एखाद्यानें धरला तर त्याची समजूत काढणें हें वाळूंतून तेल काढण्यासारखें होणार आहे ! तेव्हां त्या भानगडींत न पडणेंच बरें !

येथें व्यक्तिस्वातंत्र्याची थोडी फार चर्चा करणें अप्रस्तुत होणार नाहीं. भांडवली अर्थव्यवस्था व्यक्तिस्वातंत्र्याच्या पायावर उभारलेली आहे असें अनेकदां म्हटलें जातें. भांडवलशाहीनें सरंजामदारी नष्ट करण्यासाठीं स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या घोषणा आपल्या निशाणावर उजळल्या होत्या आणि त्यामुळें मानवी समाज मध्ययुगीन बंधनें तोडून बराच पुढें गेला यांत शंका नाहीं. व्यक्तीला व्यक्ति म्हणून कांहीं हक्क आहेत; तिला स्वतांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घेतां आला पाहिजे हें प्रथम भांडवलदारी क्रांतीनेंच पुढें आणलें. पण या घोषणा सर्व जनतेच्या बाबतींत सफल झाल्या नाहींत. मूठभर धनिक वर्ग सोडला तर भांडवली समाजांत कितीकांना व्यक्तिस्वातंत्र्य उपभोगतां येतें ? बहुसंख्य कष्टकरी जनतेला व्यक्तिस्वातंत्र्य तर राहोच पण माणुसकीनें जगणेहि शक्य नसतें. इंग्लंड, अमेरिका व इतर पाश्चात्य भांडवली राष्ट्रांत मध्यमवर्गीयांना जें थोडेंफार आर्थिक स्वास्थ्य आणि म्हणून स्वातंत्र्य लाभतें त्याला कारण कोट्यवधि गुलाम वासाहतिक प्रजेकडून मिळविलेली लूट हेंच होय. या पार्श्वभूमीवर भांडवली समाजांतील व्यक्तिस्वातंत्र्याची छाननी केली कीं बहुजनसमाजाला तें कधींच मिळालें नव्हतें आणि मिळण्याचा संभव नाहीं हें सहज दिसून येतें. उलट दारिद्र्य, बेकारी, उपासमार हींच त्यांच्या वांट्याला येतात. तेव्हां व्यक्तिस्वातंत्र्याच्या विकासाला आर्थिक स्वास्थ्य, संपन्नता, आणि सांस्कृतिक विकासाची बहुविध सोय यांची सर्व समाजाला मूलभूत आवश्यकता असते. आणि भांडवली अर्थव्यवस्थेंत हें साध्य होणें शक्यच नाहीं.

व्यक्ति आणि समाज यांचे परस्परसंबंध कोणते ? व्यक्तिस्वातंत्र्य हें

समाजनिरपेक्ष अनिर्बंध स्वातंत्र्य असू शकतें काय ? समाजांत राहणाऱ्या व्यक्तीला स्वैर स्वातंत्र्य उपभोगणें कधींच शक्य नसतें. व्यक्तीच्या स्वातंत्र्याला समाजांतील इतर व्यक्तींच्या हिताच्या आणि स्वातंत्र्याच्या दृष्टीनें मर्यादा घालाव्याच लागतात. बहुसंख्य समाजाला दीनवाणें आणि गुलामी जीवन कंठावयास लावण्याची मुभा, असा व्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ कोणासहि मान्य होणार नाहीं. पण भांडवलदारांना नेमकें हेंच समाजविघातक स्वातंत्र्य हवें असतें, आणि म्हणून भांडवली समाजांत व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजहित यांमध्यें विरोध उत्पन्न होतो. वास्तविक व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजहित यामध्यें मूलतः विरोध नाहीं. भांडवली समाजांत व्यक्तिस्वातंत्र्य उपभोगणारे अल्पसंख्य धनिक, बहुजनसमाजाच्या हितावर निखारा ठेवून त्यांच्या पिळणुकीवर जगतात म्हणून तेथें हा विरोध दृष्टोत्पत्तीस येतो. समाजवादी अर्थव्यवस्थेंत प्रत्येकास त्याच्या लायकीप्रमाणें व्यवसाय मिळण्याची आणि व्यक्तिविकासाला पूर्ण संधि मिळण्याची शक्यता निर्माण होते; आणि म्हणून हा विरोध नाहींसा होऊन व्यक्ति व समाज यांचा नव्या पातळीवर समन्वय साधला जातो.

कांहीं विचारवंत समाजवादी अर्थव्यवस्थेवर आणखी एक आक्षेप घेतात. त्यांच्या मतें योजनाबद्ध अर्थव्यवस्था आली, तिचा विकास झाला, जिकडे तिकडे समृद्धीचें साम्राज्य पसरलें मग तरी बेकारी अथवा रिकामा वेळ राहणार नाहीं काय ? आणि मग या रिकामपणामुळें मनुष्याची अधोगति होणार नाहीं काय ? समाजवादी व्यवस्थेंत समृद्धि येणारच नाहीं असें म्हणणाऱ्या टीकाकारांनीं हा आक्षेप घेऊन आपला मोहरा बरोबर उलट्या दिशेला फिरविला आहे ! आपल्या भौतिक गरजांसाठीं, त्या भागविण्यासाठीं कामधंदा करून जो वेळ रिकामा राहील तो कोणीहि सुसंस्कृत व्यक्ति आपल्या विकासासाठीं खर्च करील हेंच या आक्षेपाला उत्तर आहे. खरोखर एवढी पंचाईत पडण्याइतकी समृद्धि पृथ्वीवर अवतरण्यापूर्वीं बरींच वर्षें जावीं लागतील; आणि ज्यावेळीं अशी परिस्थिति उत्पन्न होईल त्यावेळीं यापुढें काय करावें याचा विचार करण्यास त्या वेळेचे विचारवंत खचित समर्थ आहेत. शहाणपणाचा आणि दूर-

दृष्टीचा मक्ता फक्त आपल्यालाच आहे असें तर या आक्षेपकांना म्हणायाचें नाहीं ? " चिंतातुर जंतू " प्रमाणें दूरचा विचार करून आपल्या इवलाल्या बुद्धीला व्यर्थ शीण देण्याची खरोखर मुळींच जरूरी नाहीं. त्याऐवजीं सध्यांची दुःसह भांडवली समाजपद्धति बदलून तिच्याहून श्रेष्ठ अशी समाजवादी पद्धति आणण्यासाठीं त्यांनीं सध्यां प्रयत्न केल्यास ते सत्कारणीं तरी लागतील.

## भांडवली देशांतील " आर्थिक नियोजन "

सोव्हिएट देशांत पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली त्यावेळीं तिचें वैयर्थ्य सिद्ध करण्यासाठीं भांडवली विचारवंत चंग बांधून सज्ज झाले होते. परंतु यानंतर एकाच वर्षानें ( १९२९ सालीं ) भांडवलदारी देशावर महान् आर्थिक अरिष्ट कोसळलें आणि हे सर्व विचारवंत दिङ्मूढ झाले. इकडे आर्थिक अरिष्ट कांहीं केल्या संपेना आणि तिकडे सोव्हिएट देशांत तर आर्थिक प्रगति झपाट्यानें चाललेली. या आश्चर्यकारक घटनेचें मूळ कशांत आहे याचा त्यांनीं कसून शोध केला; आणि तें सापडलें असें वाटतांच आर्किमिडीजच्या आविर्भावानें ते सर्वांना सांगू लागले; "सांपडलें! आम्हांस सोव्हिएट प्रगतीचें गुपित सापडलें ! सोव्हिएट प्रगतीचें कारण त्यांचें आर्थिक नियोजन आहे; आपणहि आर्थिक नियोजन केलें पाहिजे ! " या महान् शोधाच्या आनंदांत ते एक गोष्ट जाणून बुजून विसरले, ती ही, कीं हें नियोजन समाजवादी अथवा समाजवादाच्या मार्गावर असणाऱ्या अर्थव्यवस्थेंतच शक्य आहे. पण यानंतर बहुतेक सर्व अर्थशास्त्रज्ञ वेळीं अवेळीं आर्थिक नियोजनाचा हिरीरीनें पुरस्कार करूं लागले. पूर्वीं आर्थिक नियोजन कोठेंच व कधींच शक्य नाहीं असा त्यांचा अभिनिवेश होता हें तर ते विसरलेच; पण आतां आर्थिक नियोजनाच्या कल्पनेनें ते इतके भारून गेले कीं भांडवली अर्थव्यवस्थेंत समाजाच्या हितासाठीं आर्थिक नियोजन करणें शक्य नाहीं याची दखल घेण्याची त्यांस जरूरीच भासली नाहीं. आजहि हा वैचारिक गोंधळ सर्वत्र दृष्टोत्पत्तीस येतो म्हणून त्याचा विस्तारानें परामर्श घेतला पाहिजे.

भांडवली अर्थव्यवस्थेंत आर्थिक नियोजन शक्य नाहीं याला दोन मुख्य कारणें आहेत. खाजगी मालकी, नफा व स्पर्धा हाच तिचा पाया असल्यामुळें नियोजन करणें म्हणजे तिचा पायाच उखडण्यासारखें आहे. तसेंच उपभोग्य वस्तूंच्या किंमती आणि श्रमजीवि समाजाचें एकूण वेतन यांमध्यें भांडवलदारास मिळणाऱ्या नफ्यामुळें जी तफावत पडते त्यामुळें उत्पादिलेला सर्व माल विकला जाणें अशक्य होऊन बसतें. उत्पादनांतील अराजक आणि तोकडी क्रयशक्ति हे भांडवली अर्थ_व्यवस्थेंतील दोन मुख्य अंतर्विरोध आहेत, आणि भांडवली जगावर "नेमेचि येणाऱ्या" आर्थिक अरिष्टाचीं तींच कारणें आहेत. क्रयशक्ति नाहीं म्हणून माल विकला जात नाहीं, माल विकला जात नाहीं कीं किंमती उतरतात, किंमती उतरल्या कीं नफा कमी होतो, नफा नाहीं तर कारखाने कोण चालविणार ? अर्थात् कारखाने बंद पडतात; मग बेकारी, उपासमार सुरू. हें घातचक्र तोडावयाचें कसें व कुठें ?

आर्थिक अरिष्टावर भांडवली देशांत दोन प्रकारचे उपाय योजण्यांत आले. आणि त्यांनाच 'आर्थिक नियोजन' असें नांव देण्यांत आलें. ज्यामुळें फाजील उत्पादन झालें त्या उत्पादनांतील अराजकावर पहिल्या प्रकारचे उपाय योजण्यांत आले. या बाबतींत नियोजन करावयाचें म्हणजे फाजील उत्पादनाला आळा घालावयाचा, म्हणजे उत्पादन कमी करावयाचें, असा आर्थिक नियोजनाचा अर्थ करण्यांत आला. बहुतेक सर्व देशांत भांडवलदारांनीं हा उपाय योजला. उत्पादन मुद्दाम कमी करण्यांत आलें; इतकेंच नव्हे तर जिकडे तिकडे बेकार कामगार विपन्नावस्थेंत हिंडत असतांना धान्य, कापूस इत्यादि वस्तूंचा पद्धतशीरपणें नाश करण्यांत आला. यामागील उद्देश वस्तूंची कृत्रिम कमतरता निर्माण होऊन घसरलेली किंमत चढावी आणि नफ्याचें प्रमाण पूर्ववत् व्हावें असा होता. सृष्टि संपन्न आहे, परंतु समाजव्यवस्था मात्र दरिद्री आहे हें भीषण सत्य या तथाकथित भांडवली नियोजनानें सर्वांच्या नजरेस आलें. पण उत्पादन कमी करावयाचें ठरवूनहि पेंचप्रसंग सुटत नव्हता. कारण उत्पादन कमी करावयाचें तें कोणत्या कारखान्याचें, हें स्पर्धेवर उभारलेल्या

अर्थव्यवस्थेंत कसें ठरवितां येणार ? हें ठरविण्याचा एकच प्रकार भांडवलशाहीस माहीत आहे आणि तो म्हणजे मोठ्या माशानें लहान माशास गिळणें. अर्थात् लहान लहान भांडवलदार धुळीस मिळाले. या पद्धतीनें बड्या मक्तेदारांचा नफा कायम राहिला पण आर्थिक मंदी आणि बेकारी फारशी दूर झाली नाहींत.

अमेरिकेंत प्रे. रूझवेल्ट यांच्या सरकारनें दुसऱ्या अंतर्विरोधावर, क्रयशक्तीच्या तोकडेपणावरहि नियोजन करण्याचा प्रयत्न केला. यालाच "नवें धोरण" ( न्यू डील ) असें नांव आहे. सरकारनें कित्येक लोकोपयोगीं कामें हातीं घेतलीं, आणि त्यामुळें बेकारी दूर होण्यास अंशतः मदत झाली. पण एकूण श्रमजीवि वर्गाची तोकडी क्रयशक्ति वाढवावयाची म्हणजे त्यांचें वेतन वाढविलें पाहिजे; म्हणजे भांडवलदारांचा नफा कमी करावयाचा. भांडवलदार असें नियंत्रण थोडेंच घालून घेणार ! यामुळें प्रे. रूझवेल्ट यांचा तोडगा आर्थिक अरिष्ट हद्दविण्याच्या कामीं अपुरा पडणें स्वाभाविक होतें. जेथपर्यंत भांडवलदार वर्गाच्या खाजगी मालकीवर व नफ्यावर नियंत्रण घालतां येत नाहीं, म्हणजेच भांडवली अर्थव्यवस्थेच्या चौकटीवर प्रहार करतां येत नाहीं तेथपर्यंत वाढत्या सामाजिक सुखसोयींचा आणि वाढत्या उत्पादनाचा कार्यक्रम ( म्हणजेच आर्थिक नियोजन आंखतां येणें शक्य नाहीं. अर्थात् भांडवली व्यवस्थेंत आर्थिक मंदी व बेकारी हीं अपरिहार्य आहेत, आणि तीं दूर होण्याचा मार्ग एकच, व तो म्हणजे जागतिक महायुद्ध. सर्व राष्ट्रें दुसऱ्या महायुद्धाची तयारी करूं लागलीं, शस्त्रास्त्रांचें उत्पादन वाढवूं लागलीं, तेव्हां आर्थिक मंदी दूर होऊं लागली; आणि इंग्लंड, अमेरिका या राष्ट्रांतील बेकारी अखेर युद्ध सुरू झाल्यावरच नाहींशी झाली.

## फॅसिस्ट "आर्थिक नियोजन"

इटाली, जर्मनी वगैरे फॅसिस्ट राष्ट्रांत भांडवली अर्थव्यवस्थेनें निराळें स्वरूप धारण केलें. या राष्ट्रांतील आर्थिक पेंचप्रसंग नेहमींच्या चौकटींत राहून सुटेना आणि कामगारवर्ग आपल्या हातीं राज्यसत्ता घेणार असें दिसूं

लागलें. तेव्हां भांडवलदारवर्गानें आतांपर्यंतचीं लोकशाहीची झिराझिरित आवरणें फेंकून दिलीं आणि आपलें उघडें नागडें सत्य स्वरूप प्रकट केलें. नाझी पक्षासारख्या दहशतवादी संघटनांस हाताशीं धरून त्यांनीं उघड उघड हुकूमशाही सत्ता स्थापली. असें करण्यासाठीं समाजवादी संघटनांत दुफळी माजविणें आवश्यक होतें. म्हणून भांडवली अर्थव्यवस्था नाहींशी करून समाजवाद ( नवा 'राष्ट्रीय' समाजवाद ) स्थापन झाला पाहिजे अशा फसव्या घोषणा करण्यांत आल्या. सत्ता हातीं येतांच मात्र कामगार–संघटना आणि इतर सर्व विरोधक यांवर भीषण दडपशाही करून त्यांचा नायनाट करण्यांत आला. फॅशिस्ट राजवटींत भांडवलदारांची मालकी व नफा अबाधित राहिलीं, इतकेंच नव्हे तर जर्मनींत क्रोडोपतींची संख्या वाढली. या देशांत भांडवल आणि उत्पादन यांवर नियंत्रण घालण्यांत आलें. पण त्याचा उद्देश समाजाची समृद्धि असा नसून आक्रमणाची तयारी हा होता. आर्थिक नियोजन झालें; पण त्याची तऱ्हा वेगळी होती; उपभोग्य वस्तूंचें उत्पादन मर्यादित करण्यांत येऊन युद्धसाहित्याचें उत्पादन वेगानें वाढविण्यांत आलें. या फॅशिस्ट आर्थिक नियोजनाचा उद्देश इतर राष्ट्रांवर आक्रमण करण्याचा, युद्ध करून साम्राज्य संपादण्याचा होता. सामान्य जनतेचें जीवन समृद्ध आणि विकसित करण्याचा नव्हता.

यावरून हें स्पष्टपणें दिसून येतें कीं भांडवली चौकटींत राहून समृद्ध जीवनासाठीं आर्थिक नियोजन करतां येणें शक्य नाहीं. अमेरिकेंतील प्रे. रूझवेल्ट यांच्या उपायांची विफलता आपण पाहिली. जेथें भांडवली अर्थव्यवस्था फॅशिस्ट तऱ्हेनें नियंत्रित झाली तेथें ती महायुद्धाच्या गाड्याला जुंपण्यांत आली. तेव्हां भांडवली चौकटींतील नियंत्रण म्हणजे, उपासमार, दारिद्र्य, गुलामी आणि महायुद्ध हीं जनतेच्या वांट्याला यावयाचीं हें निश्चित आहे. भांडवली व्यवस्थेचीं आधारभूत प्रमेयें जीं खाजगी मालकी आणि नफा, त्यांचा समाजाच्या गरजासाठीं केलेल्या आर्थिक नियोजनाशीं मूलभूत विरोध आहे.

समाजाच्या समृद्धीसाठीं आर्थिक नियोजन फक्त समाजवादी अथवा

बुद्धिपुरस्सर समाजवादाचा मार्ग आक्रमिणाऱ्या अर्थव्यवस्थेंतच होऊं शकेंत. कारण तेथें खाजगी मालकी व नफा या भांडवलशाहीच्या खोडांवरच मूळ प्रहार करण्याचें धोरण असतें.

**समाजवादी अर्थव्यवस्थेचीं प्रमेयें:**

समाजवादी योजनाबद्ध अर्थव्यवस्थाच अखेर आली पाहिजे हें आज अनेकांस मान्य झालेलें आहे. अशा वेळीं सोव्हिएटनें समाजवादी अर्थव्यवस्था कशी उभी केली याचा अभ्यास व अवलोकन करणें आवश्यक झालें आहे. कारण योजनाबद्ध अर्थव्यवस्था हें रशिया या देशाचें वैशिष्ट्य नसून तें समाजवादाचें वैशिष्ट्य आहे. त्यांना ज्या मार्गानें जावें लागलें त्यामध्यें जे महत्त्वाचे टप्पे त्यांना घेतले तोच मार्ग स्थूलपणें समाजवादाकडे जाऊ पाहणाऱ्या, समृद्ध जीवन उभारूं पाहणाऱ्या, सर्वांना चालावयाचा आहे. परिस्थितीप्रमाणें आणि कालमानाप्रमाणें त्यांच्या प्रगतीच्या आणि इतरांच्या प्रगतीच्या बाह्यस्वरूपांत फरक पडेल हें खरें. परंतु उद्योगधंद्यांतील खाजगी मालकी नष्ट करणें, जमीनदारी नाहींशी करणें, बँका आणि आयात व निर्यात व्यापार सरकारच्या हातीं घेणें, सामायिक शेतीला उत्तेजन देणें, नियोजित अर्थव्यवस्था, सहकारी व्यापार, संस्था, इत्यादि ठळक गोष्टी सामान्यपणें त्याच क्रमानें सर्वांस कराव्या लागणार.

पूर्व युरोपांतील झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हिया, बल्गेरिया वगैरे देश आज त्याच मार्गानें नवी समाजवादी अर्थव्यवस्था बांधीत आहेत. त्यांना रशियाप्रमाणें भीषण अंतर्गत यादवीला तोंड द्यावें लागलें नाहीं, अथवा एकमेव कामगारवर्गाची सत्ता स्थापावी लागली नाहीं, याला कारण गेल्या तीस वर्षांत जागतिक परिस्थिति बदलली आहे; फॅशिस्टविरोधी स्वातंत्र्य-युद्धांतच त्यांनीं प्रतिगामी शक्तींचें कंबरडें मोडलें. पार्लमेंटांच्या निवडणुकींत बहुमत संपादन करून ते या गोष्टी करीत आहेत. परंतु कामगार-वर्गानें या कामीं नेतृत्व घेतलेलें असून त्यांनीं जमीनदारी आणि बडे भांडवलदार नष्ट केले आहेत, व्यापारावर नियंत्रणें घातलीं आहेत, औद्योगीकरणाची योजना आंखून ते आपला मागासले-

पणा घालवीत आहेत; या कामीं तद्देशीय जनता सोव्हिएट देशांतील जनतेप्रमाणें उत्साहानें व स्वयंस्फूर्तीनें सामील होत आहे; आणि समाजवादाचा खंदा पुरस्कर्ता जो क्रांतिकारक कामगारवर्ग तो आज या जनसंघटनेच्या अग्रभागीं आहे; असें दृश्य आपणास आढळून येतें. तेथील निरनिराळे समाजवादी पक्ष आज प्रतिगामी भांडवलदार, जमीनदारवर्गाविरुद्ध एकवटले असून देश समाजवादाकडे नेण्याचा त्यांचा निश्चय आहे. अर्थव्यवस्थेच्या नाड्या लोकनियुक्त मंत्र्यांनीं आपल्या हातीं घट्ट ठेवल्या असून जनतेच्या हितासाठीं नियंत्रित व योजनाबद्ध प्रगति ते करीत आहेत. खाजगी भांडवल, नफा आणि जमीनदारी या भांडवली अर्थव्यवस्थेच्या खोडावर ते प्राणांतिक प्रहार करीत आहेत, म्हणूनच हें साध्य होत आहे. भांडवली चौकटींत राहून नव्हे, हें पक्कें लक्षांत घेतलें पाहिजे. आजची त्यांची अर्थव्यवस्था समाजवादी म्हणतां यावयाची नाहीं; पण समाजवाद आणण्याची पूर्वतयारी ते करीत आहेत यांत शंका नाहीं.

आज समाजवादी अर्थव्यवस्था आणि आर्थिक नियोजन यांना पूर्वीसारखा विरोध होत नाहीं; उलट बहुसंख्य लोक या भूमिकेवरूनच विचार करतात. पण त्यांनीं योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचीं वर उल्लेखिलेलीं मूलभूत तत्त्वें आणि तिच्या प्रगतीचा मार्ग नीट ध्यानांत धरला पाहिजे. जागतिक जनतेची शक्ति वाढली आहे म्हणूनच भांडवलदार व त्यांचे वैचारिक हस्तक यांजकडून निरनिराळ्या प्रकारें वैचारिक गोंधळ माजविण्याचा प्रयत्न होत आहे. इंग्लंडमध्यें मजूरपक्षाचें वाढतें सामर्थ्य पाहून हायेक्‌सारख्या बुद्धिमान् पण प्रतिगामी अर्थशास्त्रज्ञानें व्यक्तिस्वातंत्र्याच्या नांवाखालीं पुन्हा एकदां योजनाबद्ध अर्थव्यवस्थेला शिव्याशाप देणारें पुस्तक लिहिलें. समाजवादाच्या वाढत्या लाटेविरुद्ध निकराचा उपाय म्हणून ब्रिटिश व अमेरिकन भांडवलवादी वृत्तपत्रांनीं त्याला जगभर प्रसिद्धी मिळवून दिली, आणि त्याच्या पुस्तकाच्या लाखों प्रती स्वस्त किंमतीनें विकल्या; पण हा सर्व उपद्व्याप फुकट गेला. चर्चिलला पराभूत करून ब्रिटिश जनतेनें मजूरपक्षाला, म्हणजे अप्रत्यक्षपणें नियंत्रित समाजवादी अर्थव्यवस्थेला, मान्यता दिली. (आतां मजूर

पक्षाचें धोरण साम्राज्यधार्जिणें आहे ही गोष्ट वेगळी.) आज हिंदुस्थानांतहि धनिकवर्ग आणि त्याचे हस्तक हिंदी अर्थव्यवस्थेचीं सूत्रें आपल्या हातीं राहून अनिर्बंध भांडवली अर्थव्यवस्थेला मोकाट राहातां यावें या हेतूनें निरनिराळ्या तऱ्हांनीं वैचारिक गोंधळ माजवीत आहेत आणि जन-संघटनांवर आंतून व बाहेरून, सरकारी व बिनसरकारी साधनांनीं प्रहार करीत आहेत. अशा वेळीं समाजाच्या अभिवृद्धीसाठीं आर्थिक नियोजन कोणत्या प्रकारचें पाहिजे, तें कोण व कसें करूं शकेल, याविषयीं बिनचूक कल्पना येण्याकरितां सोव्हिएट अर्थव्यवस्था आणि पूर्व यूरोपांतील देशांतील अर्थव्यवस्था यांच्या प्रगतीचे विशेष आपण बारकाईनें जरूर अभ्यासिले पाहिजेत.

हिंदी अर्थव्यवस्थेसमोर कोणते प्रश्न उभे आहेत आणि हिंदुस्थानच्या आर्थिक प्रगतीसाठीं ते कोणत्या प्रकारें सोडविले पाहिजेत याचें विवेचन पुढील प्रकरणीं केलें आहे.

# हिंदी अर्थव्यवस्था

: ५ :

आज आपल्या देशापुढील अतिशय निकडीचा आणि सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आर्थिक प्रगतीचा आहे. गेलीं दीडशें वर्षें ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं हिंदी जनतेची अमानुष पिळणूक केली आणि येथून अपरंपार लूट नेली. त्यामुळें आपली आर्थिक स्थिति अगदीं हलाखीची बनली असून अर्थव्यवस्थेचा डोलारा कोसळूं पाहात आहे.

## समृद्ध देश आणि कंगाल जनता

अफाट नैसर्गिक संपत्ति असूनहि आपले उद्योगधंदे अगदीं मागासलेले आहेत. पंचाहत्तर टक्के हिंदी जनता मोडक्या तोडक्या औतांनीं शेती करून हलाखीचें जिणें कसेंतरी कंठते. जे कांहीं थोडेसे उद्योगधंदे उभारलेले आहेत त्यांमध्यें मूलभूत स्वरूपाचे उद्योगधंदे नाहींत. एवढ्या मोठ्या देशाच्या विस्ताराच्या मानानें पाहातां रेल्वे, रस्ते वगैरे दळणवळणाचीं साधनें अतिशय तुटपुंजीं आहेत. आपल्या देशाचें राहाणीचें मान अतिशय कमी (दरमाणशीं वार्षिक उत्पन्न अवघें ६५ रुपये) असून मृत्युसंख्येचें प्रमाण अतिशय मोठें आहे. आयुष्याची सरासरी वयोमर्यादा फक्त २६ वर्षें असून दरहजारीं बालमृत्यूचें प्रमाण १७१ इतकें मोठें आहे. दीडशें वर्षांच्या ब्रिटिश राजवटीनंतरहि शेंकडा ८६ टक्के जनता निरक्षर आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत हिंदी जनतेचें आर्थिक

दैन्य परमावधीस पोंचलें. बंगालमध्यें पस्तीस लक्ष लोक दुष्काळामुळें मृत्युमुखीं पडले आणि सर्व हिंदी जनतेस कमालीच्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. आज युद्धोत्तर काळांतहि परिस्थितींत मुळींच सुधारणा झालेली नाहीं. सर्वत्र दुष्काळाची छाया पडलेली दिसते, खाण्यास अन्न नाहीं, पेहेरावयास वस्त्र नाहीं, सर्व वस्तूंचे भाव अतिशय कडाडलेले; आणि तशांत आतां बेकारीचें भूत भेडसावूं लागलें आहे.

या आर्थिक पेंचप्रसंगास तोंड द्यावयाचें असेल तर वेगवान् आणि पूर्वनियोजित आर्थिक प्रगतीची कांस आपण धरली पाहिजे हें उघड आहे. या आर्थिक प्रगतीचा कार्यक्रम कोणता आणि तो कसा पार पाडावयाचा हें ठरविण्यापूर्वीं, नैसर्गिकदृष्ट्या समृद्ध देश आणि अपार दारिद्र्य, हा भीषण विरोध निर्माण करणाऱ्या आजच्या अर्थव्यवस्थेचे विशेष आपण प्रथम ध्यानीं घेतले पाहिजेत. कारण आपणास आजच्या परिस्थितींतून मार्ग काढावयाचा असून आजची दिवाळखोर अर्थ-व्यवस्था नष्ट करून तिच्या जागीं आपणास नवी आर्थिक घडी बसवावयाची आहे.

## दरिद्री अर्थव्यवस्था

हिंदी जनतेची निरंतर पिळणूक करतां यावी आणि आपलें आर्थिक वर्चस्व अबाधित राहावें या हेतूनें ब्रिटिश साम्राज्यशाहीनें आजची हिंदी अर्थव्यवस्था हिंदुस्थानवर लादलेली आहे. ब्रिटिश भांडवल-वाल्यांच्या हितासाठीं हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाची पद्धतशीरपणें गळचेपी करण्यांत आली आहे. उद्योगधंद्यांवर उपजीविका करणाऱ्या लोकसंख्येचें प्रमाण अतिशय अल्प असून तेंहि सारखें घटत आहे आणि त्यामुळें आधींच मागासलेल्या शेतीव्यवसायावर लोकसंख्येचा भार सारखा वाढत आहे. जे कांहीं उद्योगधंदे निघाले ते लोखंड, पोलाद, रासायनिक अथवा याच तऱ्हेच्या मूलभूत उद्योगक्षेत्रांत नसून कापड-गिरण्या वगैरे दुय्यम प्रतीच्या क्षेत्रांत निघाले आहेत. आधीं कळस मग पाया रे असें आजच्या हिंदी उद्योगधंद्यांचें वर्णन करतां येईल. अर्थ-

व्यवस्थेंतील महत्त्वाचा भाग जें बँक भांडवल त्यावर ब्रिटिश भांडवलाचें वर्चस्व असून त्यामुळें येथें जे कांहीं उद्योगधंदे निघाले आहेत त्यांवरहि ब्रिटिश भांडवलाची दाट छाया पडलेली आहे. महत्त्वाच्या खनिज पदार्थांच्या खाणींवर ब्रिटिशांची मालकी असल्यामुळें येथें धातूंच्या शुद्धीकरणाचे कारखाने निघालेले नाहींत आणि येथील लाखों टनवारी खनिज संपत्ति अशुद्ध स्वरूपांत परदेशीं जाते. दर्यावर्दी वाहातूक आणि परदेशाशीं व्यापार यांच्या नाड्या पुष्कळशा ब्रिटिश भांडवलाच्या हातीं आहेत. अशा प्रकारें ब्रिटिश भांडवलाचा हिंदी अर्थव्यवस्थेला जबरदस्त विळखा बसलेला असून त्यामुळें हिंदी आर्थिक जीवन सर्वस्वीं खुरटलें आहे.

युद्धापूर्वी सुमारें १२०० कोटि रुपये ब्रिटिश भांडवल हिंदुस्थानांत गुंतविलेलें होतें. युद्धकाळांत यामध्यें फारसा बदल झालेला नाहीं. ब्रिटिश भांडवली वृत्तपत्रांचा अंदाज असा आहे कीं, युद्धकाळांत यापैकीं फार तर सहावा हिस्सा भांडवल कमी झालें असेल. म्हणजे अद्यापहि हिंदुस्थानांतून प्रतिवर्षीं या भांडवलावरील नफा म्हणून दीड दोनशें कोटि रुपयांची लूट नेली जात असावी. आतां तर ब्रिटिश भांडवल हिंदी भांडवलाबरोबर भागीनें मोठाल्या कंपन्या काढीत आहे; तेव्हां या ब्रिटिश भांडवलांत भरच पडत जाईल. (स्टर्लिंग कर्जामुळें हिंदुस्थान ब्रिटनचा धनको बनला आहे आणि म्हणून ब्रिटिश भांडवलाचें महत्त्व नष्ट झालें आहे असा समज कित्येकदां करून दिला जातो; तो चुकीचा आहे. हिंदी ब्रिटिश भांडवलाची भागीदारी आणि स्टर्लिंग कर्ज यांचा विशेष विचार पुढें केला आहे.) तेव्हां शेतमळे, खाणी, उद्योगधंदे, व्यापार आणि बँका यांवर असलेली ब्रिटिश भांडवलाची मिठी तोडल्याशिवाय हिंदुस्थानांत आर्थिक प्रगति होणें शक्य नाहीं ही गोष्ट आपण प्रथम लक्षांत घेतली पाहिजे.

ब्रिटिश अमलाखालीं औद्योगीकरणाचा कोंडमारा झाला त्याचप्रमाणें शेती व्यवस्थेंतहि पेंचप्रसंग ओढवला आहे. या देशावर राज्य करावयाचें तर आपणांस येथें पाठिराखे निर्माण केले पाहिजेत, या एकाच उद्देशानें

हिंदुस्थानच्या बऱ्याच मोठ्या भागांवर ब्रिटिशांनीं जमीनदारी पद्धति लादली. ब्रिटिश अंमलाखालीं शेतकऱ्यांची परिस्थिति सारखी खालावत गेल्यामुळें जेथें जमीनदारी पद्धति नाहीं अशा भागांतील शेतजमीनहि सावकारांच्या हातीं गेलीं आहे. आज खंडानें देण्याचा प्रघात इतक्या थरास गेला आहे, कीं कधीं कधीं जमीन प्रत्यक्ष कसणाऱ्या शेतकुळाच्या हातीं येण्यापूर्वीं आठदहाजणांच्या हातांतून गेलेली असते. याचाच अर्थ असा कीं एवढा मोठा परपुष्ट वर्ग शेतकुळाच्या मेहनतीवर जगतो. आज शेंकडा ६० टक्के शेतजमीन कसणाऱ्याच्या मालकीची नाहीं आणि दिवसेंदिवस अधिकाधिक जमीन सावकारांच्या हातीं जात असून शेतमजुरांची संख्या भराभर वाढत आहे. जो जमीन प्रत्यक्ष कसतो त्याला पिकाचा एक द्वितीयांश ते तीन चतुर्थांश भाग खंड व सारा म्हणून जमीनदार, सावकार आणि त्यांचे बगलबच्चे यांच्या स्वाधीन करावा लागतो. ऐतखाऊ लोकांच्या या प्रचंड ओझ्याखालीं शेतकरी आणि शेतमजूर दडपले गेले आहेत आणि त्यामुळें ते दिवसेंदिवस अधिकच कर्जांत बुडत चालले आहेत.

जमिनीचे असंख्य तुकडे; कालवे पाटबंधारे, बी बियाणीं, खतपाणी इत्यादि गोष्टीकडे सरकार आणि जमीन मालक यांनीं केलेलें दुर्लक्ष; खंड, सारा, कर्ज आणि व्याज यांचा प्रचंड बोजा; यामुळें आपला शेतकरी इतका निस्त्राण झाला आहे कीं, त्यामुळें शेतीचें पीक सारखें घटत आहे. १९०९ पासून १९३९ पर्यंत भाताचें दर एकरीं पीक शेंकडा २५ टक्क्यांनीं कमी झालें. गेल्या वीस वर्षांत अन्नधान्याच्या लागवडी-खालीं असलेली जमीन २० लक्ष एकरानीं घटली आणि अन्नधान्याची पैदास ८६ लक्ष टनांनीं घसरली. युद्धकाळांत ही परिस्थिति अधिक बिकट झाली, शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढला, सावकारांच्या ताब्यांत अधिकाधिक जमीन गेली, आणि तशांत सरकारनें चलनवाढ करून युद्धाचा बोजा हिंदी जनतेवर टाकला. या सर्वांचा परिणाम असा झाला आहे कीं आज आपल्या देशांत अन्नधान्याचा विलक्षण तुटवडा भासतो. या दुष्काळी परिस्थितीस तोंड देण्यासाठीं आपणास

परकीय देशांकडे धान्याची याचना करावी लागते आणि ते सांगतील त्या भरमसाट भावानें धान्याची आयात करावी लागते.

उद्योगधंदे मागासलेले, आणि शेतीव्यवस्थेची ही अशी कुचंबणा, यामुळें सरासरी राहाणीचें मान अतिशय खालावलेलें आहे. पण बहुसंख्य जनतेच्या अपरंपार दारिद्र्याची कल्पना केवळ सरासरीवरून येत नाहीं. संपत्तीची विभागणी कमालीची विषम आहे. प्रा. शहा आणि खंबाटा यांच्या मतें संपत्तीचा तिसरा भाग शेंकडा १ टक्का लोकांच्या हातीं जातो; आणि शेंकडा ६० टक्के जनतेच्या वांट्याला फक्त ३० टक्के संपत्ति येते. यावरून सामान्य कष्टकरी जनतेचें राहाणीचें मान सरासरी उत्पन्नाच्या देखील निम्म्यानें कमी आहे असें दिसतें. हे आंकडे युद्धपूर्व काळांतील आहेत. युद्धकाळांत धनिक लोक अधिकच धनवान् झाले आहेत आणि गरीब जनता अधिकच दरिद्री झाली आहे हें सर्वांच्या चांगल्या परिचयाचें आहे. एका टोंकाला शेतकरी आणि कामकरी यांच्या श्रमावर ऐषआरामांत लोळणारा मूठभर जमीनदार भांडवदारांचा वर्ग आणि दुसऱ्या टोंकाला अर्धपोटी, अर्धनग्न सामान्य जनता असें आपल्या संपत्तीच्या विभागणीचें भीषण चित्र आहे.

ब्रिटिश भांडवलाची मगरमिठी, उद्योगधंद्यांचा मागासलेपणा, मोडकळीस आलेली शेतीव्यवस्था आणि संपत्तीची विषम विभागणी असें आजच्या हिंदी अर्थव्यवस्थेचें थोडक्यांत वर्णन करतां येईल. कच्चा माल हमखास मिळावा, तयार मालासाठीं खात्रीची बाजारपेठ असावी, भांडवल परतां यावें आणि आपल्या राजकीय व आर्थिक वर्चस्वास धक्का लागूं नये, या हेतूनें ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं हिंदुस्तानांत अशा प्रकारची परतंत्र वासाहतिक अर्थव्यवस्था जबरीनें निर्माण केलेली आहे. तिच्या जागीं आपणांस नवी हिंदी अर्थव्यवस्था उभारावयाची आहे. यामधील एखादाच भाग सुधारूं म्हटल्यास तें शक्य नाहीं; कारण वर उल्लेखिलेले सर्व भाग एकमेकांशीं निगडित आहेत. देशाचें औद्योगीकरण करावयाचें तर ब्रिटिश भांडवलाची पकड नाहींशी झाली पाहिजे;

तसेंच शेतकऱ्याला जखडणाऱ्या जमीनदारी सावकारीच्या बेड्या तोडून टाकल्या पाहिजेत. शेतीवर अवलंबून असलेली बहुसंख्य जनता इतकी दरिद्री ठेवून औद्योगीकरणांत फारशी प्रगति होणें अशक्य आहे. कारण शेतकऱ्याच्या राहाणीचें मान वाढून उद्योगधंद्यांत तयार झालेला माल खरीद करण्यास आवश्यक असलेली क्रयशक्ति वाढली तरच औद्योगीकरणांत प्रगति होऊं शकेल. म्हणून शेतीव्यवस्थेंत आमूलाग्र बदल, शेतकरी क्रांति, होणें अपरिहार्य आहे. उलट शेतीवरील लोकसंख्येचा वाढता भार कमी करून शेतीपद्धति सुधारावयाची, तर त्याकरितां औद्योगीकरणहि झपाट्यानें झालें पाहिजे. आणि या दोन्ही गोष्टी सध्यांच्या अर्थव्यवस्थेच्या चौकटींत राहून साध्य होणार नाहींत. ही चौकट उखडल्याशिवाय हिंदी जनतेचें राहाणीचें मान उंचावूं शकेल, आर्थिक जीवन सुधारूं शकेल, अशी नवी हिंदी अर्थव्यवस्था निर्माण करणें अशक्य आहे.

**आर्थिक प्रगतीचा कार्यक्रमः—**

या वासाहतिक अर्थव्यवस्थेस कायमची मूठमाती देऊन उद्योगधंदे आणि शेतीव्यवस्था यांची झपाट्यानें प्रगति साधणारी व त्यांचा योग्य मेळ बसविणारी नवी अर्थव्यवस्था निर्माण करणें हा आज आपल्यापुढील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. या आर्थिक प्रगतीसाठीं कोणता आर्थिक कार्यक्रम ताबडतोब हातीं घेतला पाहिजे याचें उत्तर सद्यःस्थितीच्या वरील विवेचनांतच सांठाविलेलें आहे. त्यावरून आर्थिक कार्यक्रमाविषयीं पुढील निष्कर्ष निघतात.

१. औद्योगीकरणासाठीं पहिली आवश्यक गोष्ट अशी कीं ब्रिटिश भांडवलाची हिंदी अर्थव्यवस्थेवर असलेली पकड दूर झाली पाहिजे. ब्रिटिश आणि इतर परकी भांडवलाचें येथून उच्चाटन करण्यांकरितां गिरण्या, कारखाने, रेल्वे, वाहातूक, शेतमळे-वगैरे ज्या ज्या ठिकाणीं परकीय भांडवल गुंतविलेलें असेल तीं तीं आर्थिक केंद्रें हिंदी सरकारनें आपल्या हातीं घ्यावीं. हिंदी

औद्योगीकरणाच्या प्रगतीसाठीं याची मूलभूत जरूरी आहे. याचबरोबर पुढेंहि परकीय हितसंबंध आणि भांडवल यांना आपला पाय येथें रोवतां येऊं नये असें धोरण आंखण्यांत आलें पाहिजे.

२. औद्योगीकरणाची योजना यशस्वी व्हावयाची असेल तर आज चालू असलेले सर्व मूलभूत उद्योगधंदे, रेल्वे व दर्यावर्दी वाहातूक, खनिज संपत्ति आणि ज्या ज्या क्षेत्रांत मक्तेदारी उत्पन्न झाली असेल किंवा होण्याचा संभव आहे असे इतर मोठाले उद्योगधंदे राष्ट्राच्या मालकीचे होणें आवश्यक आहे.

या क्षेत्रांतील पुढील प्रगति राष्ट्रीयीकरणाच्या चौकटींत झाली पाहिजे; मूलभूत महत्त्वाच्या उद्योगधंद्यांत खाजगी भांडवलास वाव असतां कामा नये.

याशिवाय इतर सर्व क्षेत्रांतील औद्योगिक प्रगति खाजगी भांडवलामार्फत व्हावी; पण त्यावर सरकारचें नियंत्रण असलें पाहिजे. तसेंच आयात व निर्यात व्यापार आणि बँका व बँकांचे व्यवहार या अर्थव्यवस्थेच्या प्रमुख नाड्या सरकारनें आपल्या हातीं ठेवणें आवश्यक आहे. हें झालें तरच औद्योगीकरणाची योजना आंखून योजनाबद्ध वेगवान् आर्थिक प्रगति करणें शक्य होईल. अशाप्रकारच्या अल्पकालीन आणि दीर्घकालीन औद्योगिक योजना आखण्यांत येऊन त्या अंमलात आणण्याची व्यवस्था व्हावयास पाहिजे.

३. शेतीव्यवस्थेंत क्रांतिकारक बदल झाल्याशिवाय औद्योगिक योजना यशस्वी होणें अशक्य आहे. किंबहुना शेतकरी क्रांति हा नव्या हिंदी अर्थव्यवस्थेचा आवश्यक पाया आहे असें म्हटल्यास चालेल. सर्व प्रकारची जमीनदारी नाहींशी करण्यांत येऊन जमीन कसणाऱ्याच्या मालकीची करण्यांत यावी. शेतकऱ्यावरील कर्जाचा प्रचंड बोजा निकालांत निघाल्याशिवाय शेतीव्यवस्थेंतील आजचा पेंचप्रसंग सोडवितां येणार नाहीं.

याबद्दल कोणत्याहि प्रकारची नुकसान भरपाई देण्यांत येऊं नये; मात्र यामुळें ज्यांचा वृत्तिच्छेद होईल ( कारण न कसणाऱ्या लहान सहान दरिद्री जमीन मालकांची संख्या बरीच मोठी, तीस लक्ष एवढी, आहे ) त्यांना औद्योगीकरणाच्या योजनेंत कामधंदा मिळवून देण्यांत यावा.

शेतीव्यवस्थेचा प्रश्न येवढ्यानें सुटणार नाहीं. जमिनीचे असंख्य लहान लहान तुकडे पडले आहेत आणि त्यांवर शेती करून शेतकऱ्यांचें पोट भरणें शक्य नाहीं. शेतकऱ्याला सुखानें पोट भरतां येईल एवढी सलंग शेतजमीन मिळवून देण्याची योजना आंखण्यांत यावी आणि त्याच्यावरील सरकारी खंडाचें प्रमाण त्याच्या ऐपतीप्रमाणें ठरविण्यांत यावें. याचबरोबरीनें शेतीच्या पद्धतींत सुधारणा झाली तरच आजचा शेतीव्यवस्थेचा आणि राष्ट्रासमोरील अन्नधान्याचा प्रश्न सुटणार आहे. शेतकऱ्यास आज स्वतां होऊन शेतींत सुधारणा करणें शक्य नाहीं, ती करावयास लागणारें भांडवल आज त्याचेजवळ नाहीं. त्यासाठीं सरकारनें कमी दराच्या कर्जाची, शेतीचीं यांत्रिक साधनें पुरविण्याची, आणि सामायिक शेतीस उत्तेजन देण्याची योजना आंखली पाहिजे. या सर्व योजना तांतडीच्या व ताबडतोबीच्या आहेत. अखेर शेती सामायिक व यांत्रिक झाल्याशिवाय हिंदी शेतीव्यवस्थेची खरी प्रगति होणें शक्य नाहीं. प्रा. राधाकमल मुकर्जी यांसारख्या समाजवादाचा अभिनिवेश नसलेल्या शेतीतज्ज्ञानेंहि हेंच मत प्रदर्शित केलें आहे. हिंदी शेतीचीं पाऊलें या दिशेनें पडलीं पाहिजेत हें ओळखून शेतीव्यवस्थेंतील सुधारणेची योजना ठरविण्यांत यावी.

४. औद्योगिक आणि शेतीविषयक प्रगतीच्या यशस्वितेसाठीं संपत्तीच्या विभागणींतील विषमता दूर करण्याचे प्रयत्न आजपासून झाले पाहिजेत. कामगार आणि नोकरवर्ग यांस जीवनवेतन, विमा वगैरे किमान सवलती मिळण्याची व्यवस्था ताबडतोब

व्हावयास हवी. तसेंच उत्पन्नावरील कराचें प्रमाण वाढतें असावें व भांडवलदारांच्या नफ्याचें प्रमाण नियंत्रित करण्यांत यावें. शेतकऱ्याला त्याच्या पिकाबद्दल योग्य किंमत मिळाली पाहिजे. उपभोग्य वस्तूंची जनतेमध्यें योग्य वांटणी होण्यासाठीं आवश्यक वस्तूंचे भाव नियंत्रित व्हावेत आणि नफेबाजी, काळाबाजार व लांचलुचपत समूळ नष्ट करण्याचे उपाय योजण्यांत यावे. ज्या वस्तूंचा तुटवडा असेल त्यांचें गरजेप्रमाणें योग्य प्रमाणांत रेशन करण्यांत आलें पाहिजे.

नव्या हिंदी अर्थव्यवस्थेचा भक्कम पाया घालण्यासाठीं कोणत्या प्रकारचा कार्यक्रम आवश्यक आहे याची स्थूल कल्पना वर दिली आहे. त्यामध्यें अनेक तपशील भरावे लागतील आणि प्रादेशिक गरजांप्रमाणें निरनिराळ्या प्रदेशांसाठीं वेगवेगळ्या तपशीलवार योजना आंखाव्या लागतील, आणि त्यामध्यें एकसूत्रता आणण्यासाठीं मध्यवर्ती सरकारला मार्गदर्शन, नियोजन आणि नियंत्रण आपल्या हातीं ठेवावें लागेल हें उघड आहे. परंतु या सर्व गोष्टी मूलभूत महत्त्वाच्या नसून यांत्रिक महत्त्वाच्या आहेत. मूलभूत महत्त्वाची गोष्ट ही कीं ब्रिटिश भांडवलाची पकड नाहींशी झाल्याशिवाय, महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण झाल्याशिवाय, आणि जमीनदारी व सावकारशाही नष्ट केल्याशिवाय नव्या अर्थव्यवस्थेची अथवा आर्थिक प्रगतीची भाषा बोलणें व्यर्थ आहे.

## राष्ट्रीय चळवळीचा आर्थिक कार्यक्रम

सध्यांची अर्थव्यवस्था बदलून तिच्या जागीं आर्थिक प्रगति साधणारी अर्थव्यवस्था आली पाहिजे हें हिंदी राष्ट्रीय चळवळीनें सन १९३१ पासून ओळखलें. स्वतंत्र हिंदी नागरिकाची स्थिति आजच्याहून कशी वेगळी असेल हें स्पष्ट करणें जनसंघटनेचें सामर्थ्य व व्यापकता वाढविण्याच्या दृष्टीनें आवश्यक होतें. यास अनुसरून १९३१ सालीं कॉंग्रेसनें मूलभूत हक्कांचा मसुदा तयार केला. १९३६ सालीं शेतकऱ्यांविषयींचा कार्यक्रम आणि पुढें निवडणुकीपूर्वी सर्व हिंदी जनतेविषयींचा

कार्यक्रम जाहीर झाला. प्रांतांमधून कॉंग्रेस सरकारें स्थापन झाल्यावर कॉंग्रेसतर्फे पं. नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रीय नियोजन समिति नेमण्यांत आली. आणि तिनें वरील जाहीरनाम्यांच्या अनुरोधानें नियोजनाविषयीं ढोबळ तत्त्वें आणि तपशील ठरविले. याप्रमाणें आर्थिक प्रगतीची घोषणा करून हिंदी जनतेनें ब्रिटिश साम्राज्यशाहीला आणि तिनें लादलेल्या अर्थव्यवस्थेला एकप्रकारें आव्हानच दिलें असें म्हणावयास हरकत नाहीं.

महत्त्वाचे उद्योगधंदे सरकारी "मालकीचे अथवा नियंत्रणाखालीं" असावे अशी संदिग्धता रा. नि. समितीच्या अहवालांत प्रथमतः असली तरी पुढें संरक्षणविषयक, मूलभूत महत्त्वाचे आणि सार्वजनिक उपयोगाचे, अशा तीन क्षेत्रांतील सतरा उद्योगधंदे सरकारी मालकीचे असले पाहिजेत हें तिनें स्पष्ट केलें. त्यांची यादी पुढीलप्रमाणें:—

**संरक्षणविषयक उद्योगधंदे:**—(१) बंदुकी वगैरे शस्त्रें (२) दारूगोळा (३) रणगाडे, चिलखती गाडे वगैरे (४) आरमारी जहाजें (५) लष्करी विमानें (६) युद्धोपयोगी वायु.

**मूलभूत उद्योगधंदे:**—(१) वीज व इतर शक्ति (२) कोळसा, खनिज तेल वगैरे (३) धातूंचें उत्खनन आणि शोधन (४) यंत्र निर्मितीस लागणारीं हत्यारें (मशिन टूलस्) (५) यांत्रिक साधनाची निर्मिती (६) जहाजें, इंजिनें, मोटारी, विमानें निर्माण करण्यासाठीं मोठाले इंजिनियरिंग कारखाने (७) रंग, खतें आणि महत्त्वाचे रासायनिक कारखाने.

**सार्वजनिक उपयोगाचे उद्योग:**—(१) वीज, गॅस वगैरेंचा पुरवठा (२) वाहतूक आणि पोस्ट तार खातें वगैरे (३) पाणी पुरवठा (४) आरोग्य व स्वच्छता.

उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणासाठीं इतकी स्पष्ट घोषणा करण्यांत आली होती तरीहि रा. नि. समितीच्या कार्यक्रमांत कित्येक अंशीं संदिग्धता आणि कमकुवतपणा होता असें म्हटलें पाहिजे. बँका आणि आयात व निर्यात व्यापार यांच्या राष्ट्रीयीकरणाविषयीं समितीनें ठाम

मत प्रदर्शित केलें नाहीं आणि जे उद्योगधंदे सरकारी मालकीचे व्हाव-याचे ते कोणत्या रीतीनें चालविण्यांत यावे ( सरकारनें स्वतः तज्ज्ञ अधि-काऱ्यांच्या व कामगारांच्या सहकार्यानें चालवावे, कीं बड्या भांडवल-दारांच्या प्रतिनिधींची वेगळी कार्पोरेशन स्थापून तिच्यामार्फत चाल-वावे ) याविषयीं समितीच्या सभासदांमध्यें मतभेद होता. परकीय भांडवलाचें हिंदुस्थानावर वर्चस्व असूं नये अशी भूमिका समितीनें घेतली असली तरी सध्यां असलेलें परकीय भांडवल कोणत्या प्रकारें नष्ट करावें आणि यापुढें परकीय भांडवल ( कर्ज ) आणि यांत्रिक साहाय्य यांविषयीं कोणतें धोरण ठेवावयाचें हेंहि तिनें स्पष्ट केलें नव्हतें.

शेतीव्यवस्थेविषयींचा कार्यक्रमहि अगदींच अस्पष्ट होता. नुकसान-भरपाई न देतां जमीनदारी नष्ट झाली पाहिजे अशी स्पष्ट घोषणा तिनें केली नाहीं. शेतकऱ्यांवरील कर्जाचा भार कमी व्हावा. अशासारखा गुळमुळीत कार्यक्रम तिनें नमूद केला होता आणि शेतीव्यवस्थेचा प्रश्न सोडविण्यास हे जुजबी उपाय पुरेसे नाहींत हें वाटूनच कीं काय सामायिक आणि सहकारी शेतीस उत्तेजन मिळावें अशी शिफारसही तिनें केली! पण मुख्य प्रश्न जो जमीनदारी त्याची तिनें असंदिग्धपणें कोठेंच दखल घेतली नाहीं.

याप्रमाणें रा. नि. समितीचा कार्यक्रम कित्येक बाबतींत असंदिग्ध व स्पष्ट नसला तरी महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण, भाव-नियंत्रण, नफेबाजीस विरोध, शेतकरी व कामगार यांच्या स्वतंत्र संघ-टनेच्या हक्कास आणि कामगारांच्या संप करण्याच्या हक्कास दिलेली मान्यता यामुळें दुसऱ्या महायुद्धापूर्वीं कॉंग्रेसनें हिंदी जनतेसमोर नव्या अर्थव्यवस्थेचा स्थूल आराखडा उभा केला यांत शंका नाहीं.

## युद्धोत्तर काळांतील धरसोड आणि घसरगुंडी

परंतु महायुद्धानंतरच्या काळांत, आणि विशेषतः कॉंग्रेसनें मध्यवर्ति आणि प्रांतीय सत्ता स्वीकारल्यापासून कॉंग्रेस रा. नि. समितीच्या शिफा-रशींच्या मागें जात आहे असें म्हणणें भाग आहे. सत्तांतरानंतर नव्या

अर्थव्यवस्थेविषयींचा कार्यक्रम अधिक स्पष्ट होईल, अधिक असंदिग्ध होईल अशी जनतेची अपेक्षा होती; आणि भाषणांत आणि ठरावांत समाजवादाचें ध्येयहि श्री. शंकरराव देवांसारखे उजव्या गटाचे पुढारी देखील आतां मान्य करूं लागले आहेत. पण प्रत्यक्ष सरकारी धोरण, योजना आणि नवी राज्यघटना पाहिली तर राष्ट्रीय पुढारी वरील सर्व कार्यक्रमाविषयीं धरसोडीची आणि कित्येक प्रसंगीं मागें खेचणारी भूमिका घेत आहेत असें म्हणणें प्राप्त आहे. या दृष्टीनें नेहरू सरकारनें गेल्यावर्षीं (प्लॅनिंग ॲडव्हायझरी बोर्ड) नियोजनविषयक सल्ला देणारी समिति नेमली होती, ती आपल्या अहवालांत कोणत्या शिफारशी करते तें प्रथम पाहूं.

उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाविषयीं बोर्डाची भूमिका अतिशय संदिग्ध आणि धरसोडीची आहे. अहवालांतील याविषयींच्या शाब्दिक कसरतींतून पुढील गोष्टी निघतात. संरक्षक उद्योगधंदे आणि ज्यांमध्यें भांडवल गुंतविण्यास हिंदी भांडवलदार नाखूष असतील असे उद्योगधंदे यांचेंच राष्ट्रीयीकरण व्हावें. परंतु एकदम बरेचसे उद्योगधंदे राष्ट्राच्या मालकीचे करण्यानें औद्योगीकरण झपाट्यानें होणार नाहीं. कोळसा, खनिज तेल, लोखंड, पोलाद, मोटारी, आणि हवाई व नद्यांतील वाहातूक, यांच्या राष्ट्रीयीकरणाचा **विचार** व्हावा (जाडा टाईप लेखकाचा). यावरून हें स्पष्ट दिसतें कीं वर उल्लेखिलेले उद्योगधंदे राष्ट्रीय मालकीचे व्हावेत असा तिचा आग्रह नाहीं. राष्ट्रीय नियोजन समितीच्या शिफारशीं-पासून बोर्ड किती मागें सरकलें आहे आणि मूलभूत उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणामुळें औद्योगीकरणाच्या मार्गांत अडथळा होईल असें विधान करण्याइतकी त्याची मजल गेली आहे, हें यावरून दिसून येतें.

राष्ट्रीयीकरण झालेले उद्योगधंदे चालविण्याची पद्धति आणि इतर उद्योगधंद्यांवर नियंत्रण ठेवण्याची पद्धति कशी असावी याविषयींहि बोर्डाच्या शिफारशी प्रतिगामी आहेत. कारण सरकारी मालकीचे उद्योगधंदे प्रत्यक्ष सरकारनें न चालवितां कॉर्पोरेशन स्थापून चालवावेत असें बोर्डाचें म्हणणें आहे; आणि खाजगी मालकीचे नवे उद्योगधंदे

सुरू करतांना सरकारनें त्यांजवर कामगारांच्या वेतनाविषयीं वगैरे कोणत्याहि अटी घालूं नयेत, त्यामुळें औद्योगीकरण लंगडें पडेल, अशी शिफारस तिनें केलेली आहे ! या शिफारशी मान्य केल्यास सरकारी मालकी आणि नियंत्रण या दोन्ही शब्दांचा अर्थ किती हास्यास्पद होईल हें कोणाच्याहि ध्यानांत येईल.

परकीय भांडवलाला येथें वाव मिळूं नये अशी स्पष्ट शिफारस करण्यांत बोर्डानें योग्य भूमिका घेतली आहे; पण सध्यां येथील अर्थव्यवस्थेवर वर्चस्व गाजविणारें परकीय भांडवल आणि सध्यां हिंदी ब्रिटिश संयुक्त भांडवलावर उभारल्या जाणाऱ्या कंपन्या यांचें काय करावयाचें याविषयीं अहवालांत उल्लेख नाहीं. परंतु ज्या उद्योगधंद्यांत परकीय तज्ज्ञांचें साहाय्य लागेल तेथें भांडवल आणि कारभार यांमध्यें परकीयांनीं वांटा मागितल्यास तो द्यावा लागेल असें बोर्डाचें म्हणणें आहे. अशाप्रकारें पुढील दार बंद करून मागील दारानें आंत शिरण्यास मात्र परकीय भांडवलास परवानगी मिळणार आहे !

शेती सुधारणेबाबत अनेक जुजबी सुधारणा सुचविण्यांत आलेल्या आहेत, पण सर्वांत महत्त्वाचा प्रश्न जो जमीनदारी आणि सावकारी यांचें उच्चाटण, त्याचा विचारही बोर्डानें केलेला नाहीं.

संपत्तीची वांटणी विषम प्रमाणांत होऊं नये आणि कामगार व शेतकरी वर्गाची स्थिति सुधारावी अशी सदिच्छा बोर्डाच्या अहवालांत व्यक्त केलेली आहे. परंतु उद्योगधंद्यांच्या कारभारांत कामगार वर्गाचें स्वयंस्फूर्त साहाय्य मिळविण्याकरितां जीवनवेतन, विमा इत्यादींची तरतूद कायद्यानें करण्यास बोर्डाचा विरोध आहे हें आपण वर पाहिलें. मग कारभारांतहि कामगारवर्गाला वांटा द्यावा लागेल ही कल्पना बोर्डाच्या सभासदांच्या मनाला कशी शिवणार ?

यावरून बोर्डाच्या शिफारशी रा. नि. समितीच्या आराखड्याच्या किती मागें जात आहेत हें उघड होईल. युद्धापूर्वीची कॉंग्रेसनें नेमलेली राष्ट्रीय नियोजन समिति आणि हंगामी सरकारनें नेमलेलें बोर्ड यांचे सभासद निरनिराळे आहेत एवढ्यानेंच या घटनेचें स्पष्टीकरण होत

नाहीं. त्याचें कारण बदललेल्या परिस्थितींत शोधलें पाहिजे. युद्धपूर्वकाळांत राष्ट्रीय चळवळीचें नेतृत्व भांडवलदार वर्गाकडे असलें तरी ब्रिटिश भांडवलाची हिंदी अर्थव्यवस्थेवरील पकड येथील भांडवलाच्या प्रगतीच्या आड येत असल्यामुळें आणि विशेष सवलती मिळण्याची आशा नसल्यामुळें हिंदी भांडवलदार कॉंग्रेसचे झेंड्याखालीं असलेल्या सामान्य जनतेबरोबर मिळतें घेऊन साम्राज्यशाहीविरोधी एकसंध फळी उभी करण्यास तयार होते. रा. नियोजन समितीच्या कार्याचा मुख्य रोख ब्रिटिशांविरुद्ध असल्यानें तिच्या शिफारशी त्यांना सर्वस्वीं मान्य नसल्या तरी तिला त्यांचा सर्वसाधारण पाठिंबा होता. पण युद्धकाळांत ही परिस्थिति बदलूं लागली आणि युद्धोत्तर काळांत ती साफ पालटली आहे. असें कां झालें ?

**बड्या भांडवलदारांची टाटाबिर्ला योजना**

युद्धकाळांत येथील भांडवलदारांनीं अचाट नफा लाटला. ( पुढील आंकड्यांवरून याची थोडीशी कल्पना येईल. * )

**युद्धकाळांत हिंदी भांडवलदारांनीं बेफाट पैसा केला !**

**कांहीं धंद्यांतील नफ्याचे निर्देशांक**

( १९३९ चा नफा १०० धरला आहे )

| साल | १९३९ | १९४० | १९४१ | १९४२ | १९४३ |
|---|---|---|---|---|---|
| ज्यूट | १०० | ५९० | ६१७ | ८९६ | ९२६ |
| कापड व सूत | १०० | ७३ | १०५ | ३१३ | ६४५ |
| चहा | १०० | ११८ | २१४ | २५२ | ३९२ |
| साखर | १०० | १४३ | १२२ | १६० | २१८ |
| सर्व धंदे | १०० | १२७ | २८२ | २५९ | ३२७ |

* मुंबईमधील एकूण १४ कोटि रुपये भांडवल असलेल्या ६१ गिरण्यांनीं युद्धकाळांतील पांच वर्षांत भांडवलाच्या साडेसहापट ( ९० कोटि ) नफा मिळविला !

युद्धानंतरच्या काळांत कांहीं ना कांहीं प्रमाणांत हिंदी लोकांच्या हातीं अधिक राजकीय सत्ता येणार असें निश्चितपणें दिसूं लागलें. तेव्हां या वाढलेल्या सामर्थ्याच्या जोरावर भावी काळांत हिंदी अर्थव्यवस्थेवर आपण आपलें वर्चस्व स्थापलें पाहिजे या दिशेनें त्यांचे प्रयत्न सुरू झाले. १९४३ सालीं प्रसिद्ध झालेली टाटाबिर्ला योजना हें याचेंच द्योतक आहे. येथील भांडवलदार वर्गानें हिंदी अर्थव्यवस्थेचा आंखलेला आराखडा या दृष्टीनें आपण या योजनेकडे पाहिलें पाहिजे. या योजनेंत उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाविषयीं अगदीं गुळमुळीत, संदिग्ध व धरसोडीची भूमिका घेण्यांत आली आहे. उद्योगधंदे सरकारी मालकीचे असण्याची जरूरी नाहीं, सरकारी नियंत्रण असलें म्हणजे झालें; सरकारी मालकीचे करावयाचेच झाले तर ते सरकारनें स्वतां न चालवितां खाजगी कंपन्यांना अथवा कार्पोरेशन स्थापून त्यांना चालविण्यास द्यावे; असें त्याचें म्हणणें आहे. सरकारी नियंत्रणाची त्यांची व्याख्या मोठी अजब आहे; कारण सरकारकडून उद्योगधंद्यांना सवलती मिळाव्या आणि फार तर सरकारचा एखादा प्रतिनिधि डायरेक्टर बोर्डावर असावा एवढाच ते सरकारी नियंत्रणाचा अर्थ करतात ! सारांश राष्ट्रीयीकरण आणि सरकारी नियंत्रण यांचा फारसा जाच नसावा आणि हिंदी भांडवलदारांना अनिर्बंध मोकळीक मिळावी ही त्यांची औद्योगीकरणाविषयींची भूमिका आहे. शेतीव्यवस्थेंत सुधारणा सुचवितांनाहि त्यांनीं जमीनदारी आणि सावकारी या मुख्य प्रश्नाला बगल दिली आहे, इतकेंच नव्हे तर जमीनदारी समूळ नष्ट करण्यास विरोध दर्शविला आहे. संपत्तीच्या विभागणीचा विचार करण्याचें त्यास कारणच नव्हतें ! राहतां राहिला प्रश्न परकीय भांडवल, परकीयांना कारभारांत किती वाव द्यावयाचा आणि परकीय तज्ज्ञांची मदत यासंबंधींचा. या योजनेचे दोन प्रमुख पुरस्कर्ते जे टाटा व बिर्ला त्यांनीं ब्रिटिश भांडवलाशीं भागीदारी जमविली आहे यावरून या प्रश्नाचें उत्तर आपोआप मिळतें.

पं. नेहरूंच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय नियोजन समितीचा खर्डा, हंगामी सरकारनें नेमलेल्या नियोजन सल्लागार बोर्डाचा अहवाल, आणि

बड्या भांडवलदारांची टाटाबिर्ला योजना यांमधील शिफारशी एक-मेकांशेजारीं ठेवल्या कीं, बोर्डाच्या शिफारशींचा तोंडवळा रा. नि. समितीच्या आराखड्याहून अगदीं वेगळा असून टाटाबिर्ला योजनेशीं त्याचें बरेंचसें साम्य दिसून येतें. यावरून हिंदी भांडवलदारांचें राष्ट्रीय सरकारवर कसें दडपण येत आहे याची कल्पना येईल. युद्धकाळांतील टंचाईचा फायदा घेऊन भरमसाट नफेबाजी करणारे हिंदी भांडवलदार येथील अर्थव्यवस्था भविष्यकाळांत आपल्या हातीं यावी या हेतूनें कसे पद्धतशीर प्रयत्न करीत आहेत त्यांची विशेष छाननी करून त्यांजकडे सामान्य जनतेचें लक्ष वेधणें अतिशय जरूर झालें आहे.

## हिंदी ब्रिटिश भांडवलदारांचें कारस्थान

हिंदी आणि परकीय ( ब्रिटिश ) भांडवल यांमधील संबंध युद्धोत्तर काळांत बदलले आहेत ही गोष्ट प्रथम ध्यानांत घेतली पाहिजे. युद्धकाळांत हिंदी भांडवलदारांनीं बेफाट पैसा केला. त्यामुळें कांहीं क्षेत्रांत त्यांची मक्तेदारीहि उत्पन्न झाली. उलट ब्रिटिश भांडवलशाहीची ताकद या काळांत बरीच कमी झाली. तसेंच ब्रिटिशांना आपल्या हातीं राजकीय सत्ता कायम ठेवणें अवघड होऊं लागलें. याचा परिणाम असा झाला कीं पूर्वीं हिंदी भांडवलास तुच्छतेनें वागविणारे ब्रिटिश भांडवलदार आपलें येथील आर्थिक वर्चस्व कमी होऊं नये या हेतूनें हिंदी भांडवलाशीं तडजोड करून भागीदारी पत्करावयास तयार झाले आहेत. हिंदी भांडवलास हें हवेंच आहे. सत्तांतरानंतर येथील अर्थव्यवस्था कोणाच्या हातीं असावयाची, जनतेच्या कीं भांडवलदारांच्या, या निर्णायक प्रश्नास तोंड द्यावें लागेल हें त्यांनीं जाणलें आहे; आणि युद्धकाळांत काळा बाजार आणि नफेबाजी यामुळें त्रस्त झालेली हिंदी जनता आपणांस या बाबतींत कसून विरोध करणार हेंहि त्यांस माहीत आहे. हिंदी जनतेच्या भांडवलविरोधी मोर्च्यास विरोध करण्याइतकें बळ आजहि त्यांजजवळ नाहीं हें ठाऊक असल्यामुळें त्यांनीं आपल्या पूर्वीच्या प्रतिस्पर्धी शत्रूंबरोबर ब्रिटिश भांडवलाबरोबर, भागीदारी पत्करली

आहे. आपलें दोघांचें सामर्थ्य एकवटून हिंदी अर्थव्यवस्थेचा कबजा घ्यावयाचा असा हा त्यांचा प्रयत्न आहे. इंपीरियल केमिकल आणि टाटा किंवा बिर्ला व नुफील्ड यांसारखे जे करार होत आहेत त्यांच्या-मागील उद्देश हिंदी जनतेच्या कल्याणाचा नसून वरीलप्रमाणें आहे.

यामुळें हिंदी औद्योगिक प्रगतीस मोठाच अडथळा निर्माण होणार आहे. कारण ब्रिटिश भांडवलाची ताकद कमी झाली असली आणि हिंदी भांडवलाचें सामर्थ्य वाढलें असलें तरी ब्रिटिश भांडवलदार आजहि त्यांच्या हिंदी दोस्तांहून कितीतरी पटीनें भारी आहेत. तेव्हां या भागीदारीचा प्रत्यक्ष परिणाम असा होणार आहे कीं ब्रिटिश भांडवलाची येथून हकालपट्टी न होतां उलट त्याचे पाय येथें घट्ट रोंवले जाणार. म्हणजेच हिंदी अर्थव्यवस्थेवरील त्यांची पकड ढिली होणार नाहीं; आणि हिंदुस्तानच्या औद्योगिक प्रगतीचा कोंडमारा असाच चालू राहील. हिंदी भांडवलाशीं सोयरीक जमवून येथील अर्थ-व्यवस्था आहे अशीच वासाहतिक, दरिद्री, शेतकीप्रधान ठेवावयाची आणि आपलें बस्तान आणि पिळणूक पूर्वीप्रमाणें चालू रहावयाची असें ब्रिटिश भांडवलानें रचलेलें हें कारस्थान आहे.

स्टर्लिंग कर्जामुळें हिंदुस्थान देश ब्रिटनचा धनको झाला आहे, ब्रिटिश भांडवल येथून काढता पाय घेत आहे, ब्रिटिश भांडवलाला हिंदी अर्थव्यवस्थेंत आतां महत्त्व राहिलेलें नाहीं अशीं विधानें नेहमीं केलेलीं आढळतात. त्यांचा विचार येथें केला पाहिजे. ज्या क्रोडों रुपयांचा माल हिंदुस्थानी जनतेपासून जबरदस्तीनें वसूल करून देशांत दुष्काळ माजविण्यांत आला त्या स्टर्लिंग कर्जाचा बराचसा भाग बुडविण्याचा आपला निश्चय ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं जगजाहीर केला आहे. तेव्हां स्टर्लिंग कर्जामुळें हिंदुस्थानची आर्थिक स्थिति संपन्न झाली आहे असें म्हणावयास आतां कोणी धजावेल असें वाटत नाहीं. उलट जें कांहीं थोडेंफार कर्ज वसूल होईल तें ब्रिटिश मालाच्या रूपानें होणार

आणि हा माल केव्हां व कोणता मिळणार हें ब्रिटिश राज्यकर्ते ठरविणार. यामुळें एकपरी हिंदी अर्थव्यवस्था या कर्जवसूलीसाठीं ब्रिटिश अर्थव्यवस्थेच्या गाड्याला जखडलीच मात्र जाईल याचा प्रत्यक्ष परिणाम ब्रिटिश भांडवलदारांनीं हिंदी भांडवलदारांस यंत्रसामुग्री पुरविण्याचें नाकारून आपल्याशीं भागीदारीची तडजोड करण्यास भाग पाडलें आहे. मुख्य प्रश्न असा आहे कीं या कर्जाच्या मोबदला येथील ब्रिटिश भांडवलाचें हिंदीकरण करतां येईल कीं नाहीं? आतांपर्यंतच्या घटनांवरून असें स्वच्छ दिसतें कीं ब्रिटिश भांडवलदार तसें करण्यास तयार नाहींत. युद्धापूर्वीं येथें असलेलें ब्रिटिश भांडवल फारसें कमी झालेलें नाहीं; उलट नव्या हिंदीब्रिटिश भागीदारीमुळें त्यां-मध्यें भरच पडण्याचा रंग दिसतो. तसेंच ब्रिटिश कंपन्यांच्या अनुभवाचा व तज्ज्ञ सल्ल्याचा उपयोग करण्याच्या हेतूनें जे करार होत आहेत त्यांवरूनहि असें दिसतें कीं हिंदी तज्ज्ञ निर्माण करून त्यांवर येथील कंपन्या सोपवून जाण्याची कालमर्यादा शक्य तितकी लांबविली जाईल आणि शक्य तितका अधिक वर्षें या हिंदी कंपन्यांचें काम ब्रिटिश मालाची जुळणी करून त्यांवर " हिंदी " म्हणून फक्त शिक्का मारण्याचें राहील. तसेंच हिंदुस्तानांतील सध्यांच्या ब्रिटिश भांडवलास आणि नवें भांडवल गुंतविण्यांत धोका नाहीं असें ब्रिटिश भांडवली वृत्तपत्रें आपल्या भांड-वलदारांस अवर्जून सांगत आहेत. तेव्हां ब्रिटिश भांडवलाचा येथून हाल-ण्याचा मुळींच इरादा नाहीं; उलट हिंदी भांडवलाच्या मदतीनें आपलें आसन बळकट करण्याचा त्यांचा निश्चय उघड होतो.* येथें गुंतलेल्या

---

* कांहीं हिंदी भांडवलदारांचें लक्ष अमेरिकन भांडवलाकडे आहे. पण " योग्य अटी " मान्य झाल्याशिवाय अमेरिकन भांडवल हिंदुस्तानांत येणार नाहीं असें अमेरिकन वकील मि. ग्रॅडी यांनीं परवांच बजावलें आहे. परकीय भांडवलशाहीला कोणत्या " अटी " " योग्य " वाटणार हें साम्राज्यशाहीचा दीडशें वर्षें अनुभव घेतलेल्या हिंदी जनतेला चांगलें माहीत आहे. युद्धकाळांत मि. ग्रॅडी यांनीं हिंदुस्तानांतील उद्योगधंद्यांची

ब्रिटिश भांडवलाचें देशांतील मुख्य मुख्य आणि मूलभूत आर्थिक व औद्योगिक शाखांवर वर्चस्व आहे; आणि तें तसेंच कायम ठेवण्याचे त्यांचे आटोकाट प्रयत्न चालू आहेत. ब्रीटिश भांडवल जात आहे, किंवा स्टर्लिंग कर्जामुळें हिंदुस्तान धनको झाला आहे, असा वृथा समज करून हिंदी जनता गाफील राहिली आणि तिनें हे प्रयत्न हाणून पाडले नाहींत तर सध्यांच्या दरिद्री अर्थव्यवस्थेंत फारसा फरक होणार नाहीं, अशी धोक्याची सूचना देणें भाग आहे.

## राष्ट्रीयीकरणास विरोध कां ?

हिंदी अर्थव्यवस्था आपल्या हातीं यावी आणि त्याचा फायदा लुटण्यास आपणांस अनियंत्रित व अनिर्बंध मोकळीक असावी याकरितां हिंदी भांडवलदार आज उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणास कसून विरोध आहे. ईस्टर्न इकॉनॉमिस्ट या हिंदी भांडवलाच्या मुखपत्राच्या मतें हा प्रश्न आज वस्तुस्थितीस धरूनच नाहीं ! लोखंड पोलादाचे उद्योगधंदे सरकारनें हातीं घेतले तर गंभीर स्वरूपाच्या तांत्रिक (टेक्निकल) अडचणी निर्माण होतील असा बाऊ टाटासारखे बडे मक्तेदार दाखवितात आणि मिनू मसानीसारखे त्यांचे हस्तक आपला (फेरविचार केलेला!) समाजवादहि गुंडाळून ठेवून अनिर्बंध भांडवलशाहीचे गोडवे गातांना दिसतात. पूर्वयुरोपांतील मागासलेल्या राष्ट्रांनींसुद्धां मोठाले कारखाने राष्ट्राच्या मालकीचे केले आणि तेथें उत्पादन विलक्षण गतीनें वाढत आहे. पण आपल्याकडे मात्र भांडवलदार आणि त्यांचे बगलबच्चे

---

जी प्रगति सुचविली होती त्यामध्यें मूलभूत आणि महत्त्वाच्या उद्योगधंद्यांना वगळण्यांत आलेलें होतें ही गोष्ट येथें नमूद करणें आवश्यक आहे. उदाहरणार्थ हिंदुस्तानांत जहाजाचे कारखाने निघावेत असें त्यांस वाटत नव्हतें. आणि विमानांचे कारखाने न निघतां अमेरिकेंतून विमानांचे भाग आणून त्यांची जुळणी करण्याचें कामच फक्त येथें व्हावें अशी त्यांची शिफारस होती !

राष्ट्रीयीकरण केल्यास अव्यवस्था, नोकरशाही आणि अकार्यक्षमता बोकाळेल हें जुनेंच तुणतुणें अद्यापहि वाजवीत आहेत. उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण केल्यास आपणांस परदेशांतून हवें असलेलें तज्ज्ञांचें साहाय्य मिळणार नाहीं हा मुद्दा ते पुढें आणतात. आणि म्हणून ज्या उद्योगधंद्यांत फारच कमी नफा होण्याचा संभव असेल अथवा नफा होणार नसेल आणि त्यामुळें भांडवलदार भांडवल गुंतविण्यास पुढें येत नसतील, असे धंदेच फक्त सरकारनें चालवावे, आणि तेही पुरेसा नफा मिळूं लागतांच खाजगी भांडवलाच्या स्वाधीन करावेत अशी त्यांची शिफारस आहे ! सरकारनें त्यांस यंत्रसामुग्री मिळवून देण्यास मदत करावी आणि परदेशी मालावर जकात घालून आणि निर्यातीस उत्तेजन देऊन देशी उद्योगधंद्यांस मदत करावी एवढेंच त्यांच्या मतें सरकारी नियंत्रण ( ! ) असावें.

उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणास आणि नियंत्रणास विरोध करण्यासाठीं दुसराहि एक युक्तिवाद सध्यां पुढें करण्यांत येत आहे. राष्ट्रीयीकरणाचें भय, बेसुमार नफेबाजीची चौकशी करण्याविषयींची गेल्या अंदाजपत्रकांतील सूचना, आणि कामगारवर्गाविरुद्ध उपाय योजण्यास असलेली सरकारची नाखुषी यामुळें नवे उद्योगधंदे उभारण्यास भांडवल धजत नाहीं, भांडवल बुजत आहे, अशी ओरड चालू झाली आहे. आगगाड्यांच्या इंजिनाचा कारखाना उभारण्यास हवें असलेलें अवघें ९ कोटि रुपयांचें भांडवल याच कारणामुळें उभारतां आलें नाहीं असें टाटा कंपनीचें म्हणणें आहे. वास्तविक युद्धकाळांत गबर झालेल्या टाटासारख्या बड्या मक्तेदारांचे खिसे झटकले तरी कोट्यावधि भांडवल बाहेर पडावें अशी स्थिति आहे. *

* हिंदुस्थानांत "बुजरं" झालेलें भांडवल इतर देशांत जाऊन कंपन्या उभारण्यास "लाजत" नाहीं ही गोष्ट पाहाण्यासारखी आहे. इंडोनेशियांत हिंदी भांडवल गुंतविण्यास आरंभ झाला आहे. मध्यपूर्वेतील अरब देश, पूर्व आफ्रिका आणि आग्नेय आशियांतील देश,

पण युद्धकाळांत भरमसाट नफा मिळविण्याची चटक लागलेले भांडवलदार आज कमी नफा स्वीकारावयास तयार नाहींत. नफ्याचें आजचें अवास्तव प्रमाण कायम राहावें, याकरितां हा सर्व खटाटोप आहे. नवे उद्योगधंदे उभारावयाचें स्थगित करून सध्यांच्या बिकट परिस्थितींत सरकारच्या मार्गांत अडथळे निर्माण करावे आणि अशा रीतीनें राष्ट्रीयीकरणाचें धोरण सोडून देण्यास सरकारला भाग पाडावें या हेतूनें हिंदी भांडवलदार ताणून धरीत आहेत. वेळीं अवेळीं देश-कल्याणाची भाषा बोलणारें भांडवल आज "बुजरें" बनलें आहे याचें कारण दुसरें कांहीं एक नाहीं.

## हिंदी भांडवलदारांची मोहीम

याच उद्देशानें आज हिंदी भांडवलदारवर्गानें कामगारवर्गाविरुद्ध जोराची हाकाटी सुरू केली आहे. कामगार अवास्तव पगार मागतात, विनाकारण संप करतात, त्यामुळें उत्पादन घटत आहे, कामगारवर्ग राष्ट्रविरोधी वर्तन करीत असून त्यांचा सरकारनें बंदोबस्त केला पाहिजे, अशी भाषा टाटा-पासून किर्लोस्करांपर्यंत सर्व छोटेबडे भांडवलदार एकसुरानें बाढीत आहेत. युद्धकाळांत कापड गिरण्यांनीं भांडवलाच्या साडेसहापट नफा मिळविला पण कामगारांस मात्र महागाईबद्दल पूर्ण भरपाई मिळाली नाहीं. सर्वत्र मालकांच्या नफ्याचें मान कमालीचें वाढलें आणि कामगारांच्या राहाणीचें मान मात्र खालावलें. युद्धकाळांत अत्यंत हालअपेष्टा सोसलेल्या कामगारवर्गाला युद्धोत्तर काळांतहि वाढती महागाई आणि बेकारी यांस तोंड द्यावें लागत आहे. नफ्याचें प्रमाण पूर्वीसारखें मोठें राहावें या उद्देशानें मालकवर्ग सर्वत्र पगारकाटीचें, कामगार संघटनांवर प्रहार करण्याचें आणि फाटाफूट करण्याचें धोरण अवलंबीत आहे आणि

---

या बाजारपेठा मिळविण्यासाठीं आणि तेथें भांडवल गुंतविण्यासाठीं आज हिंदी भांडवलाची जोराची खटपट आहे. या मागासलेल्या दोस्त राष्ट्रांना आपण साहाय्य केलें पाहिजे या कळवळ्यानें हे सर्व प्रयत्न चालू आहेत!

म्हणून त्याविरुद्ध कामगारवर्ग संपलढे लढवीत आहे. हे संप तो मोठ्या हौशीनें किंवा सुखासुखी करतो असें नव्हे; नाइलाज म्हणून त्यास संप करणें भाग पडतें. त्यांच्या जिवावर इतका नफा लाटूनहि त्यांच्या किमान मागण्या मान्य करण्यास मालक तयार नाहींत, उलट संपामुळें इतकें उत्पादन घटलें अशी पानपान जाहिरात देऊन सामान्य जनता आणि कामगार यांमध्य वितुष्ट माजविण्याचा प्रयत्न मालकवर्ग करीत आहे. तसेंच सरकारवर दडपण आणून कामगारविरोधी कायदे करून घेण्यांत येत आहेत. कामगार मुद्दाम गैरहजर राहातात, काम कमी करतात, यामुळें उत्पादन अधिकच घटणार आहे असा कांगावाहि आतां सुरू झाला आहे. गेलीं सात आठ वर्षें वाढत राहिलेल्या महागाईमुळें कामगारांच्या शरीरप्रकृतीवर अनिष्ट परिणाम झाला असून त्यामुळें गैरहजेरी, आजार आणि अकार्यक्षमता वाढत आहे असें खुद्द डॉ. लोकनाथन् या भांडवली अर्थशास्त्रज्ञानें म्हटलें आहे. तरीसुद्धां वरील प्रचार चालूच आहे.

भांडवलदारवर्ग आज उत्पादनवाढीची घोषणा करीत आहे तिचा उद्देशहि हाच आहे. कामगारांनीं प्रथम उत्पादन वाढविलें पाहिजे, पगारवाढीची मागणी करतां कामा नये, संप करतां कामा नये असा आग्रह आज सर्व भांडवलदार धरीत आहेत, आणि आजच्या टंचाईच्या काळांत हें कामगारवर्गाचें राष्ट्रीय कर्तव्य आहे, असें प्रतिपादन करीत आहेत. पण हे राष्ट्रप्रेमी भांडवलदार आपल्या नफ्यास मात्र काडीइतका धक्का लावण्यास तयार नाहींत, उलट तशी वेळ आलीच तर लवादाचे निर्णय धाब्यावर बसवून खुशाल टाळेबंदी करतात. त्यावेळीं उत्पादन-वाढीची त्यांस आठवण होत नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. *

---

* भांडवलदारवर्ग कामगारांच्या संपामुळें उत्पादनांत आलेल्या घटीचा वृत्तपत्रांत पानभर जाहिराती देऊन ( आणि त्याहि निनांवी ! ) डांगोरा पिटतो. मालकांच्या अरेरावीमुळें झालेल्या उत्पादनांतील तुटीची जाहिरात करावयास लागणारीं प्रचाराचीं साधनें गरीब कामगार संघटनांजवळ कोठून असणार ?

बिहारमधील कोळशाच्या खाणीचे मालक, अभ्रकाच्या खाणीचे मालक, कानपूरचे कातडी सामानाचे कारखानदार, फार कशाला एक वर्ष गिरणी बंद ठेवणारे आपल्या जवळचे अमळनेरचे गिरणीमालक, यांच्या उदाहरणावरून मालकवर्गाचा उत्पादनवाढीविषयींचा कळवळा आणि तळमळ किती पोकळ आहे हें सहज समजण्याजोगें आहे. उत्पादन वाढीच्या नांवाखालीं आज त्यांस कामगारांच्या रास्त मागण्या डावलून टाकावयाच्या आहेत.

एकीकडे कामगारांविरुद्ध ही कारवाई चालली आहे तर दुसरीकडे ज्या जनतेच्या कल्याणासाठीं म्हणून ते उत्पादनवाढीची घोषणा करीत आहेत तिच्या हातीं मात्र तें उत्पादन लागत नाहीं. उत्पादनांतील बराच मोठा भाग परस्पर काळ्या बाजारांत जातो. म्हणूनच उत्पादनावर सरकारी नियंत्रण घालण्यास मालकांचा एकजात विरोध आहे. भावनियंत्रण नाहींसें व्हावें किंवा मालाच्या किंमती तरी वाढवाव्या असें दडपण आज भांडवलदार सरकारवर आणीत आहेत. + याचाच अर्थ असा कीं एकीकडे कामगारवर्गाच्या किमान मागण्यांना नाकारून आणि दुसरीकडे सामान्य जनतेची अधिकच पिळवणूक करून हिंदी भांडवलदार उत्पादन वाढीचा बुरख्याखालीं युद्धकालीन भरमसाट नफ्याचें प्रमाण फारसें कमी होऊं नये यासाठीं आटोकाट खटपट करीत आहे.

आज हिंदी भांडवलदारवर्ग हिंदी अर्थव्यवस्थेवर वर्चस्व बसविण्यासाठीं आणि अशा रीतीनें आपणांस अनिर्बंध आणि अनियंत्रित पिळवणुकीची मोकळीक मिळविण्यासाठीं ब्रिटिश भांडवलदारांशीं संगनमत करून

---

+ तसेंच आज आपल्या देशांत कापड व इतर वस्तूंची टंचाई असूनहि त्या परदेशांत निर्यात करण्याची परवानगी मिळावी असा आग्रह ते सरकारपाशीं धरीत आहेत. तसे केलं नाहीं तर या बाजारपेठा आपल्या हातून जातील अशी भीति ते दाखवितात. यांचें खरें कारण असें आहे कीं आज हिंदुस्थानशेजारच्या देशांत वस्तूंचे भाव अधिक कडाडलेले असल्यामुळें त्यांस येथल्यापेक्षां तेथे अधिक फायदा मिळतो !

कसे नानातऱ्हेचे प्रयत्न करीत आहे हें आपण आतांपर्यंत पाहिलें. हिंदी भांडवलदारांच्या या खटपटीचें राष्ट्रीय सरकारवर दडपण येत आहे असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. कारण वरील सर्व बाबतींत राष्ट्रीय सरकारचें धोरण धरसोडीचें आणि मागें सरकणारें आहे. कसें तें पाहा.

## राष्ट्रीय सरकारची धरसोड आणि घसरगुंडी

राष्ट्रीयीकरणाच्या बाबतींत सरकारचें धोरण अगदीं संदिग्ध आहे. येथील ब्रिटिश भांडवल, सध्यां होत असलेले हिंदी ब्रिटिश भांडवलाचे भागीदारीचे सौदे, आणि नव्या हिंदी अर्थव्यवस्थेंत परकीय भांडवलाचें स्थान, या तिन्ही अतिशय महत्त्वाच्या बाबतींत राष्ट्रीय सरकारनें स्पष्ट भूमिका घेतलेली नाहीं. तीच गोष्ट परकीय तज्ज्ञांच्या साहाय्यासंबंधीं म्हणतां येईल. हिंदीब्रिटिश भागीदारीच्या कंपन्यांविषयीं मध्यवर्ति कायदे-मंडळांत प्रश्न विचारला असतां आपणांस त्याची माहिती नसल्याचें उत्तर देऊन श्री. राजगोपाळाचारी यांसारख्या जबाबदार मंत्र्यानें तो उडवून लावला. मोठाल्या बँकांचें राष्ट्रीयीकरण आणि सरकारनें आयात निर्यात व्यापार आपल्या हातीं घेणें, याविषयींहि सरकार मूग गिळून आहे. मूलभूत आणि इतर महत्त्वाचे उद्योगधंदे, बँका आणि परदेशाशीं व्यापार यांच्या नाड्या सरकारनें आपल्या हातीं घेतल्याशिवाय येथें असलेलें ब्रिटिश भांडवल, परकीय भांडवल अथवा तज्ज्ञ साहाय्य यांचे प्रश्न त्यास सोड-वितां येणार नाहींत आणि देशाचें झपाट्यानें औद्योगीकरणहि होणार नाहीं. अशी वस्तुस्थिति असूनहि राष्ट्रीय सरकार त्यासंबंधीं स्वस्थ आहे. इतकेंच नव्हे, तर " मध्यंतरीच्या काळांत " " फार मोठाल्या क्षेत्रांत " खाजगी भांडवलास वाव द्यावाच लागेल असें म्हणून पं. नहरू पाऊल मागें घेत आहेत. खाजगी भांडवलास " मोठें क्षेत्र " ठेवावें लागेल हें कोणीच नाकबूल करीत नाहीं. पण मूलभूत आणि राष्ट्रीय महत्त्वाचे उद्योगधंदे या कक्षेंत असणार कीं नाहीं, आणि " मध्यंतरीचा काळ " किती असावयाचा हाच खरा प्रश्न आहे. हिंदुस्तान सरकारचे नवे अर्थमंत्रि श्री. षण्मुखम् चेट्टी यांनीं ऑक्टोबर महिन्यांत केलेल्या भाषणांत हिंदी भांडवलदारांना

हवें असलेलें धोरण स्वीकारलें आहे. राष्ट्रीय सरकारच्या घसरगुंडीनें कमाल मर्यादा गांठली आहे.

भावनियंत्रणाविषयीं मध्यवर्ति व प्रांतिक सरकारचें धोरण अगदीं धरसोडीचें आहे इतकेंच नव्हे तर तें भांडवलदारांच्या बाजूस झुकतें असा अनुभव आहे. * महाराष्ट्रांतील जनतेस गुळाच्या नियंत्रणाचा खेळ-खंडोबा माहीत आहेच, आणि कापडाचें भावनियंत्रण व वांटप यांच्या अव्यवस्थेविषयीं आणि बेबंदशाहीबद्दल सर्व नागरिक चडफडताना दिसतात. लांचलुचपत, नफेबाजी, काळाबाजार याविषयीं सरकारचे उपाय अगदीं अपुरे आहेत. नागरिक या गोष्टी चव्हाट्यावर आणीत नाहींत असा दोष त्यांच्यावरच ढकलून चालणार नाहीं. विरोधी राजकीय अथवा वर्गीय संघटनांवर पद्धतशीरपणें शस्त्र धरणाऱ्या नोकरशाहीला हे समाजविरोधी गुन्हे पकडतां येत नाहींत असें म्हणणें हास्यास्पद आहे. परवांच झालेल्या महाराष्ट्रांतील जेवणावळीच्या सुप्रसिद्ध खटल्यावरुन नोकरशाही या बाबतींत मुद्दामच अकार्यक्षम आहे असा जनतेचा ग्रह झाल्यास त्यांत नवल नाहीं.

उत्पादनाच्या वाढीविषयींहि सरकारचें धोरण गुळमुळीत व मालदारांचें पक्षपाती आहे असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. उत्पादनांतील बराच मोठा भाग काळया बाजारांत जातो असा गवगवा झालेला असूनहि सरकारनें अद्याप उत्पादनावर सरकारी देखरेख ठेवण्याची योजना मालकांवर लादली नाहीं. लवाद कोर्टाचे

---

* भाव ठरविण्यासाठीं सरकारनें एक समिति नेमली होती, तिच्या शिफारशींना सरकारच हरताळ फांसीत आहे म्हणून तिच्या दोन्ही सभासदांनीं ( श्री. धनंजयराव गाडगीळ आणि श्री. गोरवाला ) यांनीं राजीनामा दिल्याचें जाहीर झालें आहे. आतां तर कॉंग्रेस पुढारी महात्मा गांधींच्या आश्रयानें भावनियंत्रणच समूळ काढून घेण्याचें धोरण आंखीत आहेत. त्याची अंमलबजावणी झाली तर जनतेचे हाल कुत्रा खाणार नाहीं !

निर्णय झुगारून देऊन सरकारला उघड उघड धाब्यावर बसवून टाळेबंदी केल्याचीं आणि अशा रीतीनें उत्पादनांत खंड पाडल्याचीं उदाहरणें अनेक आहेत. पण संपांचे पुढारी आणि लढाऊ कामगार यांवर दडपशाहीचें शस्त्र धरण्यास नेहमीं सज्ज असलेली नोकरशाही या बाबतींत मात्र मुंगीच्या पावलानें हालचाल करते. उत्पादन आणि वांटणी यांवर नियंत्रण ठेवण्यासाठीं वास्तविक सरकार, मालक, कामगार आणि सामान्य जनता यांची संयुक्त समिति हवी. परंतु अशा समिति अगोदर फारशा अस्तित्वांतच नाहींत आणि जेथें आहे त्या कापड-नियंत्रण समितींत पंचवीसांपैकीं तेवीस प्रतिनिधि गिरणी मालकांचे असा प्रकार दिसतो !

उलट आठ वर्षें युद्धकालीन तंगीमुळे हैराण झालेला कामगारवर्ग वेतन, रजा वगैरे किमान मागण्यासाठीं लढूं लागला कीं सध्यांचें सरकार कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठीं पूर्वीच्या साम्राज्यशाही सरकाराप्रमाणें मालकांच्या मदतीला धावून येतें; सक्तीचे लवाद, संपबंदी, इत्यादींची तरतूद करणारे कायदे करतें; आणि साम्राज्यशाही सरकारपेक्षांहि अधिक जुलमी अधिकार धारण करतें. कॉंग्रेस अधिकारावर असल्याचा फायदा घेऊन राष्ट्रीय पुढारी ठिकठिकाणीं निराळ्या कामगार संघटना काढून कामगार संघटनांत फूट पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि अशा रीतीनें उघडपणें मालकधार्जिणे धोरण ठेवीत आहेत. भांडवलदारांच्या उत्पादन वाढीच्या फसव्या घोषणेला बळी पडल्यामुळें कित्येक राष्ट्रीय पुढाऱ्यांची आणि मंत्र्यांची मजल कामगारांच्या बेजबाबदारपणामुळें उत्पादनांत खंड पडत आहे असें म्हणण्यापर्यंत गेली आहे. कामगारांच्या सध्यांच्या हलाखीच्या परिस्थितींत धडाडीनें सुधारणा घडवून आणण्याचें बाजूलाच राहिलें. पण अलीकडील बातम्यांवरून असा रंग दिसतो कीं कामाचे तास पुन्हां वाढविण्यांत येणार आणि दुसरीकडे मालाच्या किंमतीहि वाढविण्यांत यावयाच्या आहेत. भरमसाढ किंमती ठेवून बेसुमार नफेबाजी करणाऱ्या आणि उत्पादनांत घट पडत आहे अशी वृथा ओरड करणाऱ्या कापड गिरण्यांच्या मालकांचीं आंतडीं गेल्या वर्षीं श्री. खंडूभाई

देसाई या कॉंग्रेसवादी मजूर पुढाऱ्यानें आंकडे व इतर पुरावा देऊन बाहेर काढलीं. तरीसुद्धां कापडाचें उत्पादन वाढविण्यासाठीं आठ तासांचा दिवस नऊ तासांचा करावा आणि कापडाच्या किंमती वाढवाव्या, या मालकांच्या मागणीचाच सरकार पुरस्कार करीत आहे. नव्या सरकारी योजना बाहेर आल्या आहेत त्यावरून हें स्पष्टपणें दिसतें.

राष्ट्रीयीकरण, औद्योगिक प्रगति, उत्पादनवाढ, भावनियंत्रण, यांविषयीं राष्ट्रीय सरकारचें धोरण जसें स्पष्ट नाहीं त्याचप्रमाणें शेतीव्यवस्थेंतील मुख्य प्रश्न, जमीनदारी व सावकारशाही यांचें निर्मूलन, त्याविषयींहि कॉंग्रेस आणि राष्ट्रीय सरकार यांचें धोरण संदिग्ध, कालहरणाचें आणि धरसोडीचें आहे. कर्जनिवारणाचे कायद्यांची कक्षा अतिशय लहान आहे आणि शेतीविषयक इतर कायदे म्हणजे केवळ तात्पुरते थातुरमातुर केल्यासारखे आहेत. कांहीं कायदेमंडळांत जमीनदारीविरुद्ध नुसतेच ठराव होत आहेत. तर दुसऱ्या कित्येक ठिकाणीं जमीनदारी नष्ट करण्यासाठीं जे कायदे झाले आहेत त्यांत जमीनदारांस संपूर्ण नुकसानभरपाई देण्याची योजना आहे. याचा परिणाम दोन प्रकारें होणार आहे. एक तर या नुकसानभर-पाईच्या मोठाल्या रकमेचा बोजा सामान्य कर देणाऱ्या जनतेवर निरंतर पडणार दुसरें असें कीं, यामुळें जुना जमीनदारवर्ग नव्या धनिक वर्गाच्या रूपानें अर्थव्यवस्थेवर हक्क गाजविण्यास पुढें येणार आहे. बड्या जमीन-दारांना नुकसानभरपाई देणें म्हणजे आजचा खंडाचा बोजा पुन्हां करांच्या रूपानें जनतेवर लादल्यासारखें होणार आहे. शेतीव्यवस्थेविषयीं जे उपाय योजावयाचे त्याविषयीं सर्व देशासाठीं म्हणून निश्चित धोरण सरकारनें ठरविलेलें नाहीं. परवांच अन्नधान्यासंबंधीं धोरण ठरविण्या-साठीं एक समिति नेमण्यांत आली; परंतु तिच्या सभासदांत श्री. पुरुषोत्तमदास ठाकूरदास यांसारखे बडे भांडवलदार आणि बिर्लासारखे भांडवलदार व जमीनदार आहेत. शिवाय हे दोघेहि टाटा बिर्ला योजनेचे प्रमुख निर्माते आहेत. तेव्हां त्यांच्या शिफारशी कोणत्या स्वरूपाच्या राहातील याचा अंदाज सहज करतां येण्यासारखा आहे.

कॉँग्रेस आणि राष्ट्रीय सरकार यांवर प्रतिगामी गटाचें दडपण कसें वाढत आहे याचें उत्तम उदाहरण नव्या संकलिपत राज्यघटनेंत मूलभूत हक्कांचा जो मसुदा तयार केला आहे त्यामध्यें दिसून येतें. १९३१ सालीं कॉँग्रेसनें जाहीर केलेल्या सनदेंत कामगारांचें वेतन, रजा, विमा, संघटनास्वातंत्र्य इत्यादीविषयींचे हक्क नमूद केलेले होते. नव्या राज्य-घटनेंत मूलभूत हक्कांचे दोन भाग केलेले असून पहिल्या भागांतील हक्क बंधनकारक आहेत आणि दुसऱ्या भागांत नमूद केलेले हक्क फक्त शिफारस-वजा आहेत. आश्चर्याची गोष्ट ही कीं १९३१ च्या जाहीरनाम्यांतील कामगार व सामान्य जनता यांच्याविषयीं उद्घोषिलेले बहुतेक सर्व हक्क नव्या राज्यघटनेंत बंधनकारक नसून केवळ शिफारसवजा आहेत; पण १९३१ च्या जाहीरनाम्यात नसलेला, मालमत्तबद्दल भरपूर नुकसान भरपाई देण्याविषयींचा एक नवा मूलभूत हक्क नव्या राज्यघटनेंत निर्माण करण्यांत आला असून तो मात्र बंधनकारक यादींत आहे !

एकीकडे हिंदी भांडवलदार ब्रिटिशांशीं भागीदारी पत्करून आणि येथील प्रतिगामी व जातीय गटांशीं एकजूट करून हिंदी अर्थव्यवस्थेवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि त्याकरितां राष्ट्रीय सरकारवर जोराचें दडपण आणीत आहे; परंतु जनहिताची काळजी वाहाणारें राष्ट्रीय सरकार व कॉँग्रेस मात्र कोणतीहि निश्चित भूमिका न घेतां मागील अंकावरून पुढें चालू अशासारखें धोरण ठेवून चालढकल व दिरंगाई करीत आहेत.

## धोक्याचा इशारा

ही परिस्थिति अतिशय धोक्याची आहे असा इशारा खुद्द सरकारी गोटांतील भांडवली अर्थशास्त्रज्ञांनींसुद्धां दिला आहे. रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक अहवालांत असें स्वच्छ म्हटलें आहे कीं, लांचलुचपतीमुळें अर्थ-व्यवस्थेस इतकी जबरदस्त कीड लागली आहे कीं, तिनें कोणत्याहि तऱ्हेचें नियोजन अशक्य करून टाकलें आहे. तसेंच, भावनियंत्रणाविषयीं

कोणतेंच निश्चित धोरण नाहीं याचा आर्थिक जीवनावर अतिशय अनिष्ट परिणाम होत आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. देशमुख यांनीं ५।८।४७ रोजीं कलकत्ता येथें केलेल्या भाषणांत हाच सूर काढला आहे. गेल्या वर्षीं चलनवाढ झाली नसूनही किंमतीचा निर्देशांक गेल्या वर्षांत २७ नें वाढला आहे, आणि त्यांच्या मतें निर्देशांकांच्या या वाढींत सर्व वस्तूंच्या भावांत झालेली वाढ व्हावी तितकी प्रतिबिंबित झालेली नाहीं. शेवटीं ते म्हणतात कीं भांडवलदारांनीं फायद्याचे आजचें अवास्तव प्रमाण कमी करण्यास आणि कामगारवर्गास अधिक सुखसोयी देण्यास तयार झालें पाहिजे. हिंदी सरकारचे एक मंत्रि श्री. जॉन मथाई यांनीं ८।८।४७ रोजीं केलेल्या भाषणांत याहून अधिक स्पष्ट शब्दांत हेंच सांगितलें आहे. "(स्वातंत्र्य) लढ्यांत ज्यांवर आपण विश्वास टाकला त्या प्रस्थापित आर्थिक हितसंबंधांची (हिंदी धनिक वर्गाची) आपल्यावरील पकड अधिकच घट्ट झाली आहे... ही पकड जरी साफ नष्ट करतां आली नाहीं तरी ती बरीच ढिली केल्याशिवाय गत्यंतर नाहीं... योग्य विभागणीची व्यवस्था झाल्यावांचून उत्पादनवाढीचा उद्देश मुळींच साध्य होणार नाहीं... (कंसांतील स्पष्टीकरणाचे शब्द माझे—श्र. रा. का.) हे दोन्ही अर्थशास्त्रज्ञ कोणत्याहि दृष्टीनें समाजवादी म्हणतां यावयाचे नाहींत; ते नियोजित अर्थव्यवस्थेची मागणी करीत नाहींत. त्यांचा दृष्टिकोन संपूर्णतया भांडवली अर्थशास्त्रज्ञांचा असूनहि हिंदी भांडवलदारांची नफ्याची हांव, लांचलुचपत आणि अर्थव्यवस्थेवरील त्यांची दुष्ट पकड यांजकडे त्यांना दुर्लक्ष करतां आलें नाहीं हें ध्यानांत घेण्याजोगें आहे.

पं. नेहरू यांनाहि सध्याच्या परिस्थितीची जाणीव नाहीं असें नाहीं. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीं समस्त हिंदी जनतेस उद्देशून त्यांनीं जें भाषण केलें त्यामध्यें वरील दोन्ही गोष्टींचा स्पष्ट उल्लेख आढळतो. ते म्हणाले, "आम जनतेचें हित सर्वाआधीं पाहिलें पाहिजे आणि तें साध्य होण्याच्या मार्गांत जे जे आर्थिक हितसंबंध येतील ते बाजूस सारले पाहिजेत... उत्पादनाची पहिल्या प्रतीची आवश्यकता आहे, पण

केवळ उत्पादनवाढ एवढीच गोष्ट पुरेशी नाहीं. आजचे संपत्तीचे डोंगर अधिकच मोठे होऊं नयेत यासाठीं योग्य विभागणी अमलांत आली पाहिजे. " पण आज या दोन गोष्टींस फक्त मान्यता दाखवून चालणार नाहीं. तुरुंगांतून बाहेर आल्यावर काळ्या बाजाराविरुद्ध आणि नफेबाजीविरुद्ध त्यांनीं जी सिंहगर्जना केली त्यामुळें त्रस्त जनतेस केवढा धीर आला होता. पण त्यानंतर त्यांनीं ती गर्जना अमलांत आणण्याचे प्रयत्न केले नाहींत. पं. नेहरूंनीं या बाबतींत धडाडीचा आर्थिक कार्यक्रम आंखून आजचें दैन्य आणि अपरंपार दारिद्य नष्ट करण्यास ताबडतोब सुरवात केली पाहिजे. आज आर्थिक प्रगतीचा कार्यक्रम हातीं घ्यावयाचा झाला कीं प्रथम वर उल्लेखिलेल्या मूलभूत प्रश्नांचें उत्तर दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं. हिंदी अर्थव्यवस्था जनतेच्या हितासाठीं आणि तिच्या नियंत्रणाखालीं असावयाची, कीं ती हिंदी भांडवलदारांच्या हातांत आणि त्यांच्या हितासाठीं असावयाची याबद्दल स्पष्ट भूमिका घेणें अगदीं जरूरीचें आहे. राष्ट्रीय चळवळीची आज-पर्यंतची परंपरा पुढें न्यावयाची असेल तर श्री. षण्मुखम चेट्टी यांनीं गेल्या ऑक्टोबर महिन्यांत मुंबईला जें मानभावी धोरण स्वीकारलें तें स्वीकारून चालणार नाहीं. श्री. षण्मुखमना कदाचित् माहीत नसेल ( कारण ते आतांपर्यंत राष्ट्रीय चळवळीच्या विरुद्ध बाजूच्या गोटांत होते ! ) पण प्रत्येक हिंदी मनुष्याला हें माहीत आहे कीं या देशाची अर्थव्यवस्था जनतेच्या हितासाठीं आणि तिच्याच नियंत्रणाखालीं यावयाची, आणि अखेर ती समाजवादी पद्धतीची होणार, असें आजवर राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं अनेकदां जाहीर केलेलें आहे. तेव्हां हिंदी भांडवलाचें प्रियाराधन करण्यासाठीं, आणि जनतेच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यासाठीं या देशांत अर्थव्यवस्था भांडवली का समाजवादी असावयाची हें अनिर्णित आहे, असें श्री. षण्मुखम् यांनीं म्हणणें शुद्ध मानभावीपणाचें आहे.

औद्योगीकरण, आर्थिक प्रगति, उत्पादनवाढ यांना आज कोणाचाच विरोध नाहीं. याबद्दल भांडवलदार, राष्ट्रीय पुढारी, कामगार, शेतकरी, मध्यमवर्ग सर्वांचें एकमत आहे. मतभेदाचा प्रश्न आहे तो ही आर्थिक

प्रगति कोणत्या पद्धतीनें, कोणाच्या हितासाठीं, कोणाच्या नियंत्रणाखालीं व्हावी याबद्दलचा आहे. केवळ वर्गीय हित पुढें ठेवून उत्पादनांत खंड आणते असा आरोप जिच्यावर तिचे शत्रु वारंवार करतात, ती हिंदी कामगारांची सर्वांत प्रमुख संघटना, अखिल भारतीय ट्रेड युनियन कॉंग्रेस तिनेंहि उत्पादनवाढीची आणि औद्योगीकरणाची घोषणा उचलून धरली आहे, इतकेच नव्हे, तसा तिचा जबरदस्त आग्रह आहे. पण अनियंत्रित भांडवलदारी पद्धतीनें आर्थिक प्रगति व्हावी यास मात्र तिचा जोराचा विरोध आहे आणि तें रास्तच आहे.

## भांडवलदारी पद्धतीनें प्रगति होणें अशक्य

वस्तुस्थिति खरोखर अशी आहे कीं आजच्या युगांत भांडवलदारी अर्थव्यवस्थेच्या चौकटींत राहून हिंदुस्तानची फारशी आर्थिक प्रगति होणें अशक्य आहे. अठराव्या शतकांत भांडवली अर्थव्यवस्था खुल्या स्पर्धेवर आधारलेली होती; पूर्वीच्या सरंजामदारी अर्थव्यवस्थेस टक्कर देऊन झपाट्यानें औद्योगीकरण साधण्याचा जोम तिच्या अंगीं होता. आज ती परिस्थिति नाहीं. आज भांडवली अर्थव्यवस्थेला मक्तेदारीनें ग्रासलें असून तिचा सर्वत्र ऱ्हास होत आहे. ब्रिटिश, अमेरिकन आणि इतर बड्या मक्तेदार वर्गाचें हित आणि हिंदुस्तानसारख्या मागासलेल्या देशाचें औद्योगीकरण या दोन गोष्टींचा परस्परांशीं विरोध आहे. म्हणून गेल्या शतकांतील अमेरिका, ब्रिटन यांच्या प्रगतीचे आदर्श आपल्याला उपयोगी पडणार नाहींत. त्यांच्या जागतिक मक्तेदारीला आणि आर्थिक वर्चस्वाला विरोध करूनच हिंदुस्तानला आर्थिक प्रगति घडवून आणतां येणें शक्य आहे. कमजोर हिंदी भांडवलाचे अंगीं एवढी ताकद नाहीं. आजची दरिद्री अर्थव्यवस्था बदलून झपाट्यानें औद्योगीकरण करण्याचें हें प्रचंड कार्य, फक्त एकंदर हिंदी जनतेचें सामर्थ्य एकवटलें, तरच होऊं शकेल.

तसेंच हिंदी भांडवलदार जमीनदारी नष्ट करण्यासहि तयार नाहींत. म्हणजे शेतीव्यवस्थेंतील पेचप्रसंग सुटणार नाहीं; आणि तें झाल्याशिवाय फारशी औद्योगिक प्रगति होणें शक्य नाहीं हें आपण मागें पाहिलेंच

आहे. तेव्हां ब्रिटिश भांडवलाचें उच्चाटण, देशाचें वेगवान् औद्योगीकरण, जमीनदारी पद्धतीचें निर्मूलन आणि शेतीव्यवस्थेंतील क्रांति हा अर्थव्यवस्थेंतील प्रचंड बदल घडवून आणण्यास हिंदी भांडवलदार असमर्थ आहेत. आणि ते असमर्थ आहेत इतकेंच नव्हे तर उलट आपलें वर्चस्व आणि फायदा कायम राहावा यासाठीं ब्रिटिश व इतर परकीय भांडवल, आणि संस्थानिक जमीनदार वगैरे येथील सरंजामदारी वर्ग, यांचेशीं संगनमत करून नियंत्रित अर्थव्यवस्थेला, म्हणजेच अर्थव्यवस्था बदलण्याला, विरोधाची भूमिका स्वीकारतील असा संभव मात्र दिवसेंदिवस बळावत आहे.

हिंदुस्थानची प्रगति अनिर्बंध भांडवलदारी पद्धतीनें होणार नाहीं याला तिसरेंहि एक कारण आहे. आजची राष्ट्रीय चळवळ या मूलभूत प्रश्नाबद्दल पूर्णपणें जागृत नसली तरी गेल्या युद्धकाळांत तिनें हिंदी धनिकवर्गाची अफाट नफेबाजी आणि काळाबाजार स्वतांच्या हालअपेष्टांनीं अनुभवला आहे आणि अद्याप अनुभवीत आहे. लक्षावधि लोक मरत असतांना बंगालच्या जमीनदारांनीं आणि व्यापाऱ्यांनीं केलेला बेसुमार पैसा, आणि लाज राखण्यासाठीं धडुतें मिळत नसतांना मुंबईच्या गिरणी मालकांनीं मारलेला अचाट फायदा तिला चांगला माहीत आहे. हिंदी जनता अनिर्बंध भांडवलदारी अर्थव्यवस्थेस कबूल होणें शक्य दिसत नाहीं; आणि संघटित कामगारवर्ग आणि शेतकरी वर्ग हे तर हिंदी भांडवलाच्या या योजनेस कसून विरोध केल्याशिवाय राहाणार नाहींत. नियंत्रित आणि नियोजित अर्थव्यवस्थेची असंदिग्ध शब्दांत मागणी करून त्यासाठीं ते स्पष्ट कार्यक्रम जनतेपुढें ठेवीत आहेत; आणि त्याकरितां ते लढल्याशिवाय राहाणार नाहींत.

## कामगारविरोधी मोहिमेचें रहस्य

म्हणूनच हिंदी भांडवलदारांनीं त्याविरुद्ध, विशेषत: संघटित कामगारवर्गाविरुद्ध जोराची मोहीम उघडली आहे. इकडे किंमतींत वाढ करून त्यांना जनतेची पिळणूक कायम ठेवावयाची आहे; तर दुसरीकडे

कामगारांच्या किमान मागण्या नाकारून, पगारकाट करून, फाटाफूट माजविण्यासाठीं प्रतिस्पर्धि कामगारसंघटनांस उत्तेजन देऊन, त्यांनीं कामगारवर्गाविरुद्ध निकराचें शस्त्र उगारलें आहे. हें सर्व पचविण्यासाठीं वृत्तपत्रादि सर्व प्रचारसाधनांकरवीं त्यांनीं आणि त्यांचे हस्तकांनीं जोराची प्रचारमोहीम सुरू केली आहे; आणि मुख्य मुद्याला बगल देऊन ते भलभलते वैचारिक गोंधळ माजवूं पाहात आहेत. कामगारांनीं संप करून उत्पादनांत घट आणली, यामुळें जनतेच्या हालअपेष्टा वाढत आहेत, कामगार स्वार्थी आहेत, वर्गहितासाठीं ते राष्ट्रहित बळी देत आहेत, आज खरी जरूरी उत्पादनवाढीची आहे, तेव्हां कामगारांचा बंदोबस्त केला पाहिजे, या सर्व प्रचारामागील खरा उद्देश कामगारवर्गाविरुद्ध सामान्य जनतेचें, विशेषतः सुशिक्षित मध्यमवर्गीय जनतेचें मत कलुषित करून कामगार वर्गास जनतेपासून अलग पाडण्याचा आहे. कामगारवर्गास असें जनतेपासून वेगळे करून त्याचा समाचार घेतां यावा; एकीकडे कामगारांस दडपून टाकावें आणि दुसरीकडे वस्तूंचे भाव वाढवून सामान्य जनतेची नागवणूक करावी; आणि अशाप्रकारें आपला अचाट नफा कायम ठेवून हिंदी अर्थव्यवस्था आपल्या ताब्यांत यावी या हेतूनें हिंदी भांडवलदारवर्गानें हा प्रयत्न चालविला आहे.

सामान्य जनतेनें, विशेषतः मध्यमवर्गीय जनतेनें हें नीट ओळखलें पाहिजे आणि हिंदी भांडवलदारवर्गाचा हा डाव उधळून लावण्यासाठीं इतर वर्गाशीं ऐक्य केलें पाहिजे. आज कामगारवर्ग किमान मागण्यांसाठीं जो लढा देत आहे, किसान संघटना जमीनदारीविरुद्ध जो मोर्चा उभारीत आहेत, हे लढे केवळ वर्गहिताचे नसून हिंदी अर्थव्यवस्था जनतेच्या हितासाठीं आणि तिच्या नियंत्रणाखालीं यावी यासाठीं, हिंदी जनतेच्या आर्थिक प्रगतीसाठीं, चालविलेले लढे आहेत हें मध्यमवर्गीयांनीं ध्यानांत धरणें आवश्यक आहे. ज्यांनीं आजवर हिंदी स्वातंत्र्यासाठीं आपली शक्ति पणाला लावली ते कामगार शेतकरी राष्ट्रप्रेमी नाहींत हें म्हणणें हास्यास्पद आहे. त्यांना राष्ट्रहित कळत नाहीं हें म्हणणेंहि चुकीचें ठरेल. संघटित कामगार आणि शेतकरी आतां चांगला सज्ञान झाला आहे आणि

देशाच्या राज्यव्यवस्थेंत आणि अर्थव्यवस्थेंत त्याला इतरांच्या बरोबरीनें हक्काचें स्थान हवें आहे. त्याला अजाण अर्भकासमान मानून चालणार नाहीं. अर्थव्यवस्था बदलण्यासाठीं, औद्योगीकरणासाठीं, उत्पादन वाढीसाठीं कामगारवर्गानें जो कार्यक्रम मांडला आहे त्यामध्यें त्याची ही जागृति आणि ताकद स्पष्टपणें प्रतिबिंबित होत आहे; आणि म्हणून तर या संघटित कामगार-किसानांवर आज भांडवलदार-जमीनदारांचा एवढा दांत आहे. कामगार किसानांची ही वाढती जागृति पाहिली कीं हिंदी अर्थव्यवस्था भांडवलदारांच्या हातीं जाणार नाहीं असा भरंवसा वाटतो आणि भारताच्या आर्थिक प्रगतीची खात्री वाटूं लागते. या वर्गांच्या वाढत्या सामर्थ्यांतच भारताचा उज्वल काल सामावलेला आहे.

## जनतेच्या अर्थव्यवस्थेसाठीं संयुक्त आघाडी

पण हें साध्य होण्यासाठीं राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं सध्यांची धरसोड आणि घसरगुंडीचें धोरण ताबडतोब सोडून दिलें पाहिजे आणि धडाडीचा कार्यक्रम योजून तो प्रत्यक्षांत उतरविण्यासाठीं जनतेची सर्व ताकद उपयोगांत आणली पाहिजे. या कार्यक्रमाचा तपशील कसाहि असो; पण त्याचीं मुख्य तत्वें या प्रकरणाच्या सुरवातीस सांगितल्या-प्रमाणें ( ब्रिटिश भांडवलाचें उच्चाटन, मूलभूत व मुख्य धंद्यांचें राष्ट्रीयीकरण, जमीनदारी व सावकारशाही यांचें निर्मूलन आणि योग्य विभागणी ) असलीं पाहिजेत यांत बिलकूल संशय नाहीं. राष्ट्रीयीकरण यशस्वी होणार नाहीं ही भीति अगदीं फोल आहे. कामगारवर्गाच्या किमान मागण्या मान्य केल्या आणि कारखाने चालविण्याची जबाबदारी त्यांवर टाकली तर राष्ट्रीयीकरण पार यशस्वी होईल आणि देशाचें औद्योगीकरण झपाट्यानें होईल. पूर्व युरोपांतील युगोस्लेव्हिया, बल्गेरिया वगैरे मागासलेले देश आज याच पद्धतीनें वेगवान् औद्योगीकरणाचा मार्ग आक्रमीत आहेत. सरकार आपल्या बाजूचें आहे, भांडवल-दारांचें हितरक्षक नाहीं, ही खात्री पटल्यास प्रचंड औद्योगीकरणासाठीं

आवश्यक असलेला तात्पुरता स्वार्थत्याग करावयासहि राष्ट्रप्रेमी कामगार-वर्ग खुषीनें तयार होईल.

तसेंच जमीनदार, सावकार आणि त्यांच्या आश्रयानें राहणारा मोठा परपुष्ट वर्ग नाहींसा करण्यासाठीं जमीनदारी पद्धति निकालांत काढण्याचा कार्यक्रम तावडतोब योजला पाहिजे; आणि तो तडीस नेण्यासाठीं शेतकरी संघटनांचें सामर्थ्य उपयोगांत आणलें पाहिजे. भावनियंत्रण जारीनें अंमलांत आणण्याकरितां आणि काळाबाजार आणि नफेबाज यांचा पुरा नायनाट करण्याकरितां सामान्य जनतेच्या संघटनांचें साहाय्य घेतलें पाहिजे. धनिकांच्या प्रतिनिधींनीं ओथंबलेली काळाबाजारविरोधी समिति नेमून आणि काळाबाजार निम्म्यानें बंद झाला अशा तावडतोब घोषणा करून काळाबाजार बंद होत नाहीं; पुढाऱ्यांचें हंसें मात्र होतें.

अशा प्रकारच्या मर्यादित आर्थिक कार्यक्रमासाठीं देशांतील बहुसंख्य जनतेची एकजूट उभारणें सहज शक्य आहे. कारण आजच किसान कामगार राज्य व्हावें असा कोणाचा आग्रह नाहीं; आजच संपत्तीचीं सर्व साधनें सामाजिक मालकीचीं व्हावींत असा कोणाचा हट्ट नाहीं. देशाची अर्थव्यवस्था जनतेच्या हितासाठीं लोक-नियंत्रित असावी एवढेंच या कार्यक्रमाचें मर्यादित उद्दिष्ट आहे. भांडवलदारांनाहि त्यांत स्थान आहे; कारण मूलभूत उद्योगधंदे सोडून इतर क्षेत्रांत खाजगी भांडवलास जरूर वाव आहे. मात्र त्यांनीं मर्यादित नफा घेण्याचें आणि सरकारी नियंत्रण मान्य करण्याचें राष्ट्रप्रेम दाखविलें पाहिजे. *

फक्त वडे मक्तेदार, परकीय भांडवल, आणि सरंजामदारी वर्ग यांस या कार्यक्रमांत मुळींच स्थान नाहीं. या वर्गाविरुद्ध कामगार, शेतकरी, मध्यमवर्ग आणि राष्ट्रप्रेमी धनिकवर्ग यांची प्रचंड संयुक्त आघाडी उभारण्यांत आली तरच जनतेची अर्थव्यवस्था आणि लोकशाही स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचें महान् कार्य यशस्वी होईल.

---

* अलीकडे बरेच भांडवलदार कामगारवर्गाला वेळीं अवेळीं राष्ट्र-प्रेमाचा उपदेश करतांना दिसतात. तेव्हां तेहि स्वार्थ सोडून राष्ट्रप्रेम दाखवतील असें धरून चालण्यास हरकत नाहीं !

परिशिष्ट

# हिंदुस्थानविषयीं कांहीं महत्त्वाची आंकडेवारी

आंकडे फाळणीपूर्वीच्या हिंदुस्थानविषयीं आहेत :

## संपन्न देश—

### खनिज संपत्ति

**कोळसा**:— बंगाल, बिहार, मध्यप्रांत आणि वऱ्हाड येथील खाणींत ७७०० कोटि टन कोळसा आहे; त्यापैकीं २५१५ कोटि टन कोळसा सहज काढतां येण्याजोगा आहे. त्याशिवाय आसाममध्येंहि इतकाच प्रचंड साठा आहे.

**लोखंड**:— लोखंडाचा साठा ३०० कोटि टन इतका असून दरसाल १ कोटि ६२ लक्ष टन लोखंड काढतां येण्याजोगें आहे; पण आज फक्त १८ लक्ष टनच काढलें जातें.

**बॉक्साईट**:— २५ कोटि टन.

**मँगेनीज**:— जगाच्या उत्पादनापैकीं ३० टक्के उत्पादन हिंदुस्थानांत होतें.

**अभ्रक**:— ,, ,, ७५ ,, ,, ,, ,,

**लाख**:— उत्पादनांत हिंदुस्तानचा नंबर जगांत पहिला आहे. पण हिंदुस्तानांत या तिन्ही वस्तूंचे शुद्धीकरणाचे कारखाने फारसे नाहींत.

### जलशक्ति ( आंकडे लक्ष अश्वशक्तींचे )

| देशाचें नांव | उपयोगांत आणण्याजोगी | उपयोगांत आणलेली | शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| अमेरिका | ३५० | ११७ | ३३ टक्के |
| कॅनडा | १८२ | ४५ | २५ ,, |
| फ्रान्स | ५४ | २१ | ३७ ,, |
| जपान | ४५ | १७ | ३६ ,, |
| हिंदुस्तान | २७० | ८ | ३ ,, |

## आणि—दरिद्री जनता !

**दरमाणशीं वार्षिक उत्पन्न** ( सन १९३६ )

| | | |
|---|---|---|
| हिंदुस्तान | ६२ | रुपये |
| जपान | २७१ | ,, |
| जर्मनी | ६३४ | ,, |
| फ्रान्स | ६३६ | ,, |
| ब्रिटन | १०९२ | ,, |
| कॅनडा | १२६८ | ,, |
| अमेरिका | २०५३ | ,, |

**आहार** ( सन १९४६ ) दर दिवशीं आहारांत असणारी शक्ति, (कॅलोरीमध्यें)

| | | |
|---|---|---|
| हिंदुस्तान | ९६० | कॅलोरी |
| जर्मनी | १८०० | ,, |
| जपान | १८०० | ,, |
| ब्रिटन | २८५० | ,, |
| कॅनडा | ३००० | ,, |
| अमेरिका | ३१०० | ,, |

## आपलें आरोग्य

**१ जन्म आणि मृत्यु यांचें लोकसंख्येशीं प्रमाण** ( दरहजारीं )

| | जन्म | मृत्यु |
|---|---|---|
| हिंदुस्थान | ३४·३ | २३·८ |
| ब्रिटन | १५·५ | १२·२ |
| स्वीडन | १४·१ | ११·६ |
| अमेरिका | १७·३ | १०·९ |

## २ सरासरी आयुर्मान

| | |
|---|---|
| हिंदुस्थान | २६·६ वर्षे |
| ब्रिटन | ६०·७ ,, |
| स्वीडन | ६२·३ ,, |
| अमेरिका | ६०·८ ,, |

## ३ बालमृत्यूंचें प्रमाण ( दरहजारीं )

| | |
|---|---|
| हिंदुस्थान | १७१ |
| ब्रिटन | ६४ |
| स्वीडन | ५१ |
| अमेरिका | ५१ |

## ४ इस्पितळांतील खाटा ( दर दहा हजार लोकवस्तीस )

| | |
|---|---|
| हिंदुस्तान | २·५ |
| अमेरिका | १०४·४ |
| ब्रिटन | ७१·४ |

## शिक्षणांतील मागासलेपणा

* ८६ टक्के जनता निरक्षर आहे.
* शाळकरी वयाच्या मुलांपैकीं फक्त २० टक्के मुलें शाळेंत जातात.
* यापैकीं फक्त पांचवा हिस्सा मुलें मराठी चौथ्या इयत्तेपर्यंत पोंचतात.
* मुंबई प्रांतांतील २१६०० खेडेगांवांपैकीं ७८०० खेडेगांवीं शाळाच नाहींत

## शेती—व्यवस्थेंतील पेंचप्रसंग

### १ उद्योगधंदे आणि शेती यांवर अवलंबून असलेल्या जनतेचें एकूण लोकसंख्येशीं प्रमाण

| सन | शेती | उद्योगधंदे |
|---|---|---|
| १९११ | ७२·२ टक्के | ५·५ टक्के |
| १९२१ | ७३ ,, | ४·९ ,, |
| १९३१ | ७५ ,, | ४·३ ,, |
| १९४१ | ——— | ४·२ ,, |

द्योगधंद्यांत काम मिळत नाहीं म्हणून शेतीवरील लोकसंख्येचा भार वाढतो

### २ निरनिराळ्या देशांतील दरएकरीं पीक

( आंकडे पौंडाचें, १९३२–३३ सालचे )

| | तांदूळ | गहूं |
|---|---|---|
| हिंदुस्थान | १३५७ | ६५२ |
| जपान | २७६७ | १५०८ |
| इजिप्त | २३५६ | १६८८ |
| अमेरिका | २११२ | ९७३ |
| इटाली | ४६०१ | १२४१ |
| जर्मनी | —— | १७४० |
| ब्रिटन | —— | १८१२ |

### ३ दर एकरीं पीक घटत आहे!

गहूं ( दर एकरीं पीक, पौंडामध्यें )

| | |
|---|---|
| सन १९१४ ते १९१९ ची सरासरी | ९८२ |
| ,, १९२६ ते १९३० ची ,, | ८५१ |
| ,, १९३१ ते १९३५ ची ,, | ८२९ |
| ,, १९३८ ते १९३९ ची ,, | ७२८ |

## ४ खेड्यांतील कर्जबाजारीपणा

| सन | ( एकूण कर्ज, कोटि रुपये ) |
|---|---|
| १९११ | ३०० |
| १९२४ | ६०० |
| १९३० | ९०० |
| १९३५ | १२०० |
| १९३८ | १८०० |

## ५ अन्नासाठीं परक्या देशाकडे पाहावें लागतें !

### परदेशांतून धान्याची आयात

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सन | १९४३ | ३२८ | हजार | टन |
| ,, | १९४४ | ६५३ | ,, | ,, |
| ,, | १९४५ | ८५६ | ,, | ,, |
| ,, | १९४६ | २२५० | ,, | ,, |
| ,, | १९४७ ( सहा महिने ) | ११५७ | ,, | ,, |

धान्य देतांना परदेशी व्यापारी भरमसाट भाव सांगतात ! १९४६ सालीं धान्याच्या आयातीकरितां ७७ कोटि रुपये द्यावे लागले !

## शेती—व्यवस्थेंतील पंचप्रसंग

### १ उद्योगधंदे आणि शेती यांवर अवलंबून असलेल्या जनतेचें एकूण लोकसंख्येशीं प्रमाण

| सन | शेती | उद्योगधंदे |
|---|---|---|
| १९११ | ७२·२ टक्के | ५·५ टक्के |
| १९२१ | ७३ ,, | ४·९ ,, |
| १९३१ | ७५ ,, | ४·३ ,, |
| १९४१ | ——— | ४·२ ,, |

द्योगधंद्यांत काम मिळत नाहीं म्हणून शेतीवरील लोकसंख्येचा भार वाढतो

### २ निरनिराळ्या देशांतील दरएकरीं पीक

( आंकडे पौंडाचें, १९३२–३३ सालचे )

| | तांदूळ | गहूं |
|---|---|---|
| हिंदुस्थान | १३५७ | ६५२ |
| जपान | २७६७ | १५०८ |
| इजिप्त | २३५६ | १६८८ |
| अमेरिका | २११२ | ९७३ |
| इटाली | ४६०१ | १२४१ |
| जर्मनी | —— | १७४० |
| ब्रिटन | —— | १८१२ |

### ३ दर एकरीं पीक घटत आहे !

गहूं ( दर एकरीं पीक, पौंडामध्यें )

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सन | १९१४ | ते | १९१९ ची सरासरी | ९८२ |
| ,, | १९२६ | ते | १९३० ची ,, | ८५१ |
| ,, | १९३१ | ते | १९३५ ची ,, | ८२९ |
| ,, | १९३८ | ते | १९३९ ची ,, | ७२८ |

## ४ खेड्यांतील कर्जबाजारीपणा

| सन | ( एकूण कर्ज, कोटि रुपये ) |
|---|---|
| १९११ | ३०० |
| १९२४ | ६०० |
| १९३० | ९०० |
| १९३५ | १२०० |
| १९३८ | १८०० |

## ५ अन्नासाठीं परक्या देशाकडे पाहावें लागतें !

### परदेशांतून धान्याची आयात

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सन | १९४३ | ३२८ | हजार | टन |
| ,, | १९४४ | ६५३ | ,, | ,, |
| ,, | १९४५ | ८५६ | ,, | ,, |
| ,, | १९४६ | २२५० | ,, | ,, |
| ,, | १९४७ ( सहा महिने ) | ११५७ | ,, | ,, |

धान्य देतांना परदेशी व्यापारी भरमसाट भाव सांगतात ! १९४६ सालीं धान्याच्या आयातीकरितां ७७ कोटि रुपये द्यावे लागले !

## सध्यांची परिस्थिति बदलली पाहिजे

### सध्यां

* ६१ टक्के हिंदी जनतेला पोटभर अन्न मिळत नाहीं.
* मुंबई व अहमदाबाद या शहरांत अनुक्रमें शेंकडा ९१ टक्के आणि ७३ टक्के कामगार कुटुंबें एका खोलीच्या गाळ्यांत रहातात. मुंबईतील शेंकडा १३ टक्के रहिवासी रस्त्यावर झोंपतात !
* कापडाचें वार्षिक उत्पादन सरासरी दर माणशीं फक्त १० वार आहे.

### पहिल्या दहा वर्षांची संकल्पित प्रगति

( रा. नियोजन समितीच्या १९४० सालच्या शिफारशी )

* प्रत्येक प्रौढ कष्टकरी नागरिकास निदान २४०० कॅलोरी शक्ति असलेलें अन्न मिळालें पाहिजे.
* माणशीं १०० चौरस फूट राहाण्याची
* माणशीं प्रतिवर्षी ३० वार कापड.
* सर्व नागरिक साक्षर झाले पाहिजेत.
* एक हजार लोकवस्तीला एक वैद्यकीय

REFBK-0006975

# आमची कांहीं महत्वाची प्रकाशनें

## इतिहासाचार्य
## वि. का. राजवाडे

महिकावतीची बखर

राधामाधव विलासचंपू

प्रस्तावना खंड

[ मराठ्यांच्या इतिहासाची साधनें या बावीस खंडांना लिहिलेल्या प्रस्तावनांचा संग्रह ]

राजवाडे लेखसंग्रह भाग २–३

## कै. दत्तोपंत आपटे

इतिहास मंजिरी

श्रीरंगपट्टवरील मोहीम

ऐतिहासिक दंतकथा व गोष्टी
भाग १–२

## कै. शि. म. परांजपे

मराठ्यांच्या लढ्यांचा इतिहास

गोविंदाची गोष्ट

स्वातंत्र्यासाठीं आत्मशुद्ध

ग्रीस देश कसा स्वतंत्र झाला

टायटोलेंची स्वातंत्र्य कथा

## महामहोपाध्याय
## द. वा. पोतदार

विविध दर्शन

## कै. दत्तोपंत आपटे स्मारक ग्रंथ

इतिहास : शास्त्र व तत्वज्ञान

[ नऊ नामवंत विद्वानांनी कै. दत्तोपंताचे स्मृतीस वाहिलेली इतिहास चिकित्सविषयक निबंधांजली ]

## श्री. त्र्यं. र. देवगिरीकर

फेडरेशन

वसाहतीचे स्वराज्य

घटना परिषद

अल्पसंख्यांचा प्रश्न

आयर्लंडच्या स्वातंत्र्याचा इतिहास

फिलिपाइनच्या स्वातंत्र्याचा इतिहास

गीतांजलि

कै. वासूकाका जोशी व त्यांचा काल

## श्री. दि. के. बेडेकर

सोव्हिएट राष्ट्रें व लोक

संयुक्त महाराष्ट्र

सुमित्रानंदन पंत

## इतिहासविषयक इतर ग्रंथ

मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष

शिवचरित्र साहित्य खंड ३ रा

प्राचीन भारतवर्षीय कोष

राजतरंगिणी ( काश्मीरचा जुना इतिहास

# आमची शिरीष माला

अल्प किंमतीत महत्वाच्या विषयावरील पुस्तकं
प्रकाशित करणारी एकमेव माला

(१) **गांधी–जीना पत्रव्यवहार** पृष्ठें ५१ आठ आणे
हिंदु–मुस्लिम ऐक्याच्या एका महान् प्रयत्नाचा पत्ररुप इतिहास.

(२) **कस्तुरबा** पृष्ठें ४६ सहा आणे
राष्ट्रमाता कस्तुरबा यांचा सुलभ जीवनपट

(३) **लिली–मोगरा** पृष्ठें ५६ आठ आणे
नोबेल प्राइज मिळविणाऱ्या कांहीं साहित्यिकांच्या एकेका लघुकथेचा अनुवाद संग्रह.

(४) **ज्ञानतुषार** पृष्ठें ३२ सहा आणे
पांचशेंएक ज्ञानकणांचा संग्रह.

(५) **अमर चीन** पृष्ठें ४८ दहा आणे
पांच चिनी अमर कथांचा संग्रह.

(६) **सोव्हिएट राष्ट्रें व लोक** पृष्ठें ४९ दहा आणे
सोव्हिएट रशियामध्यें अल्पसंख्याकांचा प्रश्न कसा यशस्वी रीतीनें सोडविला आहे याचें थोडक्यांत दिग्दर्शन.

( ७ ) **हिंदी स्वातंत्र्याच्या योजना** पृष्ठें ६६ बारा आणे

क्रिप्स योजनेपासून हिंदी स्वातंत्र्याच्या बिलापर्यंत सर्व स्वातंत्र्य योजनांचा एकत्रित संग्रह.

( ८ ) **दिल्ली येथील स्वातंत्र्य सोहळा**

पृष्ठ २२ आठ आणे

स्वतंत्र भारताच्या राजधानींत स्वातंत्र्यदिनाचे दिवशीं झालेल्या सोहाळ्याचे अविस्मरणीय वर्णन.

( ९ ) **हरिजन संत** पृष्ठें ४४ आठ आणे

पांच हरिजन संतांचा परिचय.

( १० ) **क्रांतीच्या ज्वाला** पृष्ठ ८० बारा आणे

भारतीय स्वातंत्र्य–संग्रामांतील क्रांतिकारकांच्या कार्याचे धांवते समालोचन.

☆